
प्रथमोपशम सम्यक्त्वापूर्वीच्या

# पंचलब्धि




डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा

प्रथमोपशम सम्यक्त्वापूर्वीच्या

# पंचलब्धि

- लेखिका -

**डॉ. सौ. उज्ज्वला दिनेशचंद्र शहा**

एम. बी. बी. एस., डी. सी. एच., डी. जी. पी.

– संपादक –

**पं. श्री. दिनेशभाई शहा**

एम. ए., एल. एल. बी.

## वीतरागवाणीप्रकाशक

१५७/९, निर्मला निवास, सायन (पूर्व)

मुंबई ४०००२२

फोन २४०७ ३५८१

**email - ujwaladinesh@yahoo.com**

**visit our website: www.jaintattva.com**

प्रथम आवृत्ती १५ एप्रिल २००३
(महावीर जयंती)

| | | |
|---|---|---|
| मराठी | ३००० | प्रति |
| गुजराती | ४००० | प्रति |
| हिन्दी | २००० | प्रति |
| एकूण | ९००० | प्रति |

## प्राप्तिस्थान

वीतरागवाणीप्रकाशक
१५७/९, निर्मला निवास,
सायन (पूर्व), मुंबई ४०००२२
टेली. २४०७३५८१
email - ujwaladinesh@yahoo.com

पं. टोडरमल स्मारक ट्रस्ट
ए-४, बापू नगर,
जयपुर ३०२०१५
टेली. २७०५५८१, २७०७४५८
email - ptstjaipur@yahoo.com

**visit our website: www.jaintattva.com**

## दातारांची नावे

| | |
|---|---|
| ● स्व. मोहनलाल धनजीभाई शाह व स्व. कांताबेन मोहनलाल शाह कुटुंबियांकडून | रु.३५,००० |
| ● श्री. अशोक रतनचंद जैन, पारोळेकर, ताडदेव | रु.२१,००० |
| ● सौ. शुभदा शशीकांत चवरे, कारंजा | रु. २,१०० |
| ● श्री. शशांक शरदकुमार शहा, माटुंगा | रु. १,५०० |
| ● श्रीमती प्रतिभा अष्टीकर, विक्रोळी (स्व. जवाहरलाल अष्टीकर यांच्या स्मरणार्थ) | रु. १,१०० |
| ● करण व प्रियंका भरत दोशी, ठाणे | रु. १००० |
| ● सौ. शालन शांतीलाल शहा, पुणे | रु. १००० |
| ● श्री. दिलीपकुमार गुलाबचंद बेलोकर, मुंबई | रु. १००० |
| ● श्री. अरविंद रावजी दोशी, चेंबूर | रु. ८०० |
| ● श्री. वसंत देवलसी, अमरावती | रु. २५१ |

मूल्य रु. १०/-

# प्रकाशकीय

करणानुयोग विषयावर लिहिलेले एखादे पुस्तक छापणे हे एक मोठ्या हिंमतीचेच काम आहे. याबाबत सर्व प्रकाशकांना अनुभव आहेच. कारण प्रथमत:च विचार असा येतो की हा विषय वाचणारे असे किती वाचक भेटतील? छापलेली पुस्तके आपल्याकडेच पडून राहणार तर नाहीत ना? वगैरे वगैरे. परंतु आजपर्यंतचा आमचा अनुभव तर जगावेगळाच आहे.

आम्ही उभयता, मी व माझी धर्मपत्नी सौ. उज्ज्वला जेथे जेथे प्रवचनाकरिता जातो तेव्हा तेथे करणानुयोगाच्या विषयांसंबंधीत ज्या काही गोष्टी निघत असत त्यावेळी श्रोत्यांमध्ये करणानुयोग जाणण्याची फक्त उत्सुकताच नव्हे तर त्याबद्दलची भरपूर रुचि पाहून या विषयावरील एखादे पुस्तक आपण प्रकाशित करावे असे मनोमन वाटत होते. कारण आमच्यातर्फे प्रकाशित झालेल्या 'करणानुयोग परिचय' या पुस्तकाला अपेक्षेपेक्षा प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि त्या कृतिचे वाचकांनीच नव्हे तर करणानुयोगाच्या तज्ञांनी आणि अनेक पंडितांनीदेखील कौतुक व प्रशंसा केली. त्यामुळेच आणखीन एखादे करणानुयोगावरील पुस्तक छापावे असा विचार मनात कोठेतरी घर करून बसला होता.

योगायोग पहा, याच सुमारास आदरणीय गुरुतुल्य ब्र. पं. यशपाल अण्णांनी सौ. उज्ज्वलाला तुम्ही प्रथमोपशम सम्यक्त्वापूर्वीच्या 'पंचलब्धिं'वर पुस्तक लिहावे असा अक्षरश: लकडा लावला. कारण त्यांना पूर्ण खात्री होती की या विषयावर सौ. उज्ज्वला त्यांच्या अपेक्षेनुसार नक्कीच लिहिल. कारण करणानुयोगाचा विषय द्रव्यानुयोगाच्या अपेक्षेने समजावण्याची सौ. उज्ज्वलाची खास हातोटी त्यांच्या परिचयाची होती. म्हणून त्यांनी जाता येता सौ. उज्ज्वलाला 'पंचलब्धि'वर पुस्तक लिहिण्यास उद्युक्त केले. गोष्ट या थराला पोहोचली की त्यांनी भर सभेमध्येच जयपुर येथे आणि देवळालीमध्ये सुध्दा, 'मी डॉ. सौ. उज्ज्वलाला पंचलब्धि या विषयावर पुस्तक लिहिण्याची विनंती केली आहे आणि त्या ते पूर्ण करतील अशी मला खात्री आहे' - असे जाहिर केले. अशा तऱ्हेने वारंवार प्रेरणा दिली गेल्याने सौ. उज्ज्वलाने पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली व ते पूर्णदेखील केले. मला सार्थ अभिमान वाटतो की पुस्तक छापण्यापूर्वी त्यांनी ते आपणहून अथपासून इतिपर्यंत वाचले आणि अत्यंत प्रसन्न चित्ताने तोंड भरभरून स्तुति केली आणि आशिर्वादही दिले.

जेव्हा आमच्याबरोबरच्या सहाध्यायींना ही गोष्ट समजली की आम्ही पुनश्च पुस्तक छापणार आहोत तेव्हा त्यांनी अगदी मन:पूर्वक दान देण्यात अहमहमिका सुरु केली. काही जणांनी तर खूप महिन्यांपूर्वी पासून पैसे देऊन ठेवले होते. परंतु याच दरम्यान स्व. मोहनलाल धनजीभाई शाह आणि स्व. कांताबेन मोहनलाल शाह यांच्या कुटुंबियांनी या पुस्तकाचा पूरा खर्च उचलण्याचा आग्रह धरला. त्यामुळे इतरांची मने दुखावली जाऊ नयेत म्हणून पुस्तके जास्त प्रमाणात छापली.

या सर्व दातारांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. हे पुस्तक छापण्यात आम्हाला डी.टी.पी.वाले, प्रिन्टर्स यांनी उत्तम सहकार्य केले त्यांचेही आम्ही आभारी आहोत.

एकंदरीत आम्ही या निष्कर्षाप्रत पोहोचलो की एखादे चांगले काम हाती घेतले असेल तर ते पूर्ण होण्यात काही अडचणी येत नाहीत. हे पुस्तक वाचकांच्या हाती देण्यात आम्ही धन्यता अनुभव करतो. वाचकांनी हे पंचलब्धिचे पुस्तक वाचून आत्मलब्धिचा मार्ग सुकर करावा हीच जिनेश्वर चरणी प्रार्थना!

पं. श्री. दिनेशभाई शहा

# लेखिकेचे मनोगत

१९९२ साली मी व माझे पती श्री. दिनेशचन्द्र दोघेही स्वाध्यायासाठी आपापल्या व्यवसायातून निवृत्त झालो. तेव्हापासून जयपुरच्या तसेच इतर ठिकाणच्या शिबिरांमध्ये ब्र. पं. यशपालजी जैन यांच्या गुणस्थानाच्या वर्गात आम्ही बसू लागलो. द्रव्यानुयोगाचा अभ्यास तर आम्ही अनेक वर्षांपासून करतच आलो होतो, आता करणानुयोगाच्या स्वाध्यायातदेखील रुचि वाटू लागली. आम्ही दोघांनी मिळून पं. टोडरमलजी लिखित सम्यग्ज्ञानचंद्रिका या ग्रंथाच्या जीवकांड, कर्मकांड, लब्धिसार, क्षपणासार, अर्थसंदृष्टि अधिकार या सर्व भागांचा स्वाध्याय केला, त्यानंतर सामूहिक रीतीनेदेखील या सर्वांचा स्वाध्याय केला. जयपुर, देवळाली, छिंदवाडा, दुबई, अमदाबाद, कारंजा, देऊळगावराजा, सोलापुर, पुणे इत्यादि अनेक ठिकाणी आम्ही करणानुयोगाच्या विषयांवर वर्ग घेतले. प्रत्येक ठिकाणी लोकांमध्ये करणानुयोग जाणण्याची तीव्र जिज्ञासा व उत्साह आढळून आला, श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. लोकांनी या विषयाची खूपच प्रशंसा केली.

काही लोकांना प्रश्न पडतो की पू. श्री कानजीस्वामीजींनी करणानुयोगावर प्रवचनं दिली नव्हती तर मग याची काय आवश्यकता आहे? त्या लोकांना मी सांगू इच्छिते की त्यांच्या अनेक प्रवचनांमध्ये काही वाक्यं अशी येतात की त्यावरून हे लक्षात येते की त्यांचा करणानुयोगाचा अत्यंत सखोल अभ्यास होता. करणानुयोगाच्या अध्ययनाने द्रव्यानुयोगाच्या सिध्दांतांची पुष्टि होते आणि द्रव्यानुयोगाच्या अध्ययनाने करणानुयोग वाचूनदेखील त्याद्वारे भेदज्ञान करण्याची व वीतरागतेची वृध्दि करण्याची कला आत्मसात होते.

पू. श्री कानजीस्वामीजींच्या द्वारे आम्हाला द्रव्यानुयोगाच्या महान सिध्दांतांचे मर्म समजले आहे. त्यामुळे द्रव्यानुयोगाच्या या विशिष्ट दृष्टीने करणानुयोगाचा पाच लब्धि संबंधीचा विषय पुस्तकरूपाने मी लिहावा यासाठी ब्र. पं. यशपालजी जैन यांनी मला वारंवार प्रेरणा दिली. असा कठिण विषय मी समजावून सांगू शकणार नाही हे माहित असूनदेखील मी त्यांच्या शब्दाबाहेर जाऊ शकले नाही. लब्धिसार, मोक्षमार्गप्रकाशक, जैनेन्द्र सिध्दांत कोश इत्यादि ग्रंथांचा वरचेवर आधार घेत घेत मी हे 'पंचलब्धि' पुस्तक लिहिण्याचे धाडस केले आहे. माझे सखोल अध्ययन होत गेले तसे लक्षात आले की या विषयाच्या बाबतीत कधी या विशिष्ट दृष्टिकोनातून विचारच केला नव्हता. माझ्या अल्पबुध्दि अनुसार हा विषय लिखित रूपात मांडण्याचा मी प्रयत्न तर केला आहे परंतु मला आशा आहे की या विषयातील विशेष जाणकार लोक यामध्ये काही उणीवा असतील माझ्या निदर्शनास आणून देतील.

येथे मूळ विषय समजाविण्यापूर्वी कर्मविषयीची सामान्य माहिती व पारिभाषिक शब्दांचे अर्थ सांगितले आहेत त्यामुळे मूळ विषय समजणे सोपे जाईल. अनेक ठिकाणी आकृत्या व कोष्टक बनवून समजाविण्याचा प्रयत्न केला आहे. हा विषय शिकविल्यानंतर व त्यावर लिखाण केल्यानंतर एक गोष्ट माझ्या लक्षात आली की स्वतःचा स्वतः अभ्यास करताना ज्या गोष्टी खास समजल्या नव्हत्या त्याच गोष्टी शिकवताना व लिहिताना चांगल्या रीतीने समजल्या. करणानुयोगाची ही सूक्ष्मता लक्षात येते तेव्हा आमचे परोक्ष गुरु पं. टोडरमलजीं विषयीचा आदरभाव - अहोभाव वृध्दिंगत होतो. त्यांनी या टीका लिहून समजाविले नसते तर आम्हाला काहीच समजले नसते. 'पंचलब्धि' विषयावर लिहित असतांना त्याविषयी माझ्या ज्ञानाचा विकास झाला ही लब्धि - एवढा लाभ तर मला अवश्य झाला.

पुस्तक लिहून झाल्यानंतर ते छापून वाचकांच्या हाती पोहोचते त्या दरम्यान अत्यंत खडतर तपश्चर्या असते. प्रूफ रीडिंग व छपाईसंबंधीच्या इतर अनेक कटकटींमधून पार पडावे लागते. हे कार्य माझे पती श्री. दिनेशचंद्र गत अनेक वर्षांपासून मोठ्या कुशलतेने पार पाडत आहेत. त्यांच्या आधाराशिवाय माझे हे लिखाण माझ्या घरीच पडून राहिले असते. माझी ही पत्रं फक्त माझ्या मुलींपर्यंतच पोहोचली असती यास्तव त्यांचे आभार मानण्यापेक्षा मी त्यांची ऋणी राहण्यातच धन्यता मानते.

मला आशा आहे की 'पंचलब्धि' जाणून, प्रकट करून, आपण सर्वजण दर्शन आणि चारित्र यांची लब्धि प्राप्त करून अतिशीघ्र मोक्षलब्धि प्राप्त करू.

डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा

# आमची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जैनतत्त्व परिचय | - मराठी, हिंदी, गुजराती | रु. १०/- |
| २. | जैनतत्त्वं परिचय | - इंग्लिश | रु. १५/- |
| ३. | करणानुयोग परिचय | - मराठी, हिंदी, गुजराती | रु. १०/- |
| ४. | कारण-कार्य रहस्य | - मराठी, हिंदी, गुजराती | रु. १०/- |
| ५. | कारण-कार्य रहस्य | - इंग्लिश | रु. १५/- |
| ६. | पंचलब्धि | - मराठी, हिंदी, गुजराती | रु. १०/- |
| ७. | भक्तामर स्तोत्र प्रवचन | - मराठी | रु. १०/- |
| ८. | परमात्मा कसे बनाल! | - मराठी | रु. ४/- |
| ९. | स्वानुभव | - मराठी | रु. ४/- |

# कॅसेट्स उपलब्ध

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | लघु जैन सिध्दान्त प्रवेशिका | ५५ | कॅसेट्स | - पं. दिनेशभाई शहा |
| २. | बालबोध पाठमाला - भाग १,२,३ | २९ | कॅसेट्स | - पं. दिनेशभाई शहा |
| ३. | वीतराग विज्ञान पाठमाला - भाग १,२,३ | ३९ | कॅसेट्स | - पं. दिनेशभाई शहा |
| ४. | तत्त्वज्ञान पाठमाला - भाग १,२ | ४० | कॅसेट्स | - पं. दिनेशभाई शहा |
| ५. | छहढाला (प्रवचनं चालू आहेत) | | | - पं. दिनेशभाई शहा |
| ६. | करणानुयोग परिचय | २० | कॅसेट्स | - डॉ. उज्ज्वला शहा |
| ७. | क्रमबध्दपर्याय | २८ | कॅसेट्स | - डॉ. उज्ज्वला शहा |
| ८. | निमित्त उपादान | १२ | कॅसेट्स | - डॉ. उज्ज्वला शहा |
| ९. | अलौकिक संख्यामान | ८ | कॅसेट्स | - डॉ. उज्ज्वला शहा |
| १०. | पंचपरावर्तन | ४ | कॅसेट्स | - डॉ. उज्ज्वला शहा |
| ११. | प्रमादाचे ३७५०० भेद | ४ | कॅसेट्स | - डॉ. उज्ज्वला शहा |
| १२. | षट्स्थानपतित वृध्दीची स्थानं | ७ | कॅसेट्स | - डॉ. उज्ज्वला शहा |

– प्रत्येक कॅसेट ९० मिनिटांची आहे –

# एम पी ३ कॉम्पॅक्ट सीडी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | लघु जैन सिध्दान्त प्रवेशिका | २ सीडी | ८२ तास | पं. दिनेशभाई शहा |
| २. | बालबोध पाठमाला - भाग १,२,३ | १ सीडी | ४५ तास | पं. दिनेशभाई शहा |
| ३. | पंचाध्यायी | १० सीडी | २७९ तास | पं. दिनेशभाई शहा |
| ४. | पंचास्तिकाय | ६ सीडी | १०७ तास | पं. दिनेशभाई शहा |
| ५. | तत्त्वार्थसूत्र (अपूर्ण) | ८ सीडी | १३० तास | पं. दिनेशभाई शहा |
| ६. | प्रवचनसार (प्रवचनं चालू आहेत) | ४ सीडी | २०० तास | पं. दिनेशभाई शहा |
| ७. | नियमसार (प्रवचनं चालू आहेत) | ४ सीडी | २०० तास | पं. दिनेशभाई शहा |
| ८. | करणानुयोग परिचय व निमित्त उपादान | १ सीडी | ४८ तास | डॉ. उज्ज्वला शहा |
| ९. | क्रमबध्दपर्याय व पंचपरावर्तन | १ सीडी | ४८ तास | डॉ. उज्ज्वला शहा |
| १०. | लब्धिसार व क्षपणासार | ६ सीडी | १३० तास | डॉ. उज्ज्वला शहा |

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| पत्रांक १ | कर्म-मूलप्रकृति | १ |
| पत्रांक २ | कर्म-उत्तरप्रकृति | १४ |
| पत्रांक ३ | कर्म-उत्तरप्रकृति भाग २ | २८ |
| पत्रांक ४ | कर्मासंबंधी काही पारिभाषिक शब्द | ४० |
| पत्रांक ५ | प्रथमोपशम सम्यक्त्व-पात्रता | ५५ |
| पत्रांक ६ | क्षयोपशमलब्धि आणि विशुध्दिलब्धि | ६७ |
| पत्रांक ७ | देशनालब्धि | ७९ |
| पत्रांक ८ | प्रायोग्यलब्धि | ९१ |
| पत्रांक ९ | करणलब्धि - अध:प्रवृत्तकरण | १०६ |
| पत्रांक १० | करणलब्धि - अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण | १२४ |
| पत्रांक ११ | प्रथमोपशम सम्यक्त्व | १४२ |

# कर्म-मूलप्रकृति

पत्रांक १

डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा
१५७/९ निर्मला निवास
सायन (पूर्व) मुंबई ४०००२२
टेलि. २४०७ ३५८१
२५ एप्रिल २००३

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,
अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

'कारण कार्य रहस्य' या पत्ररूप स्वाध्यायामुळे जैन तत्त्वज्ञानाची व वस्तुव्यवस्थेची तसेच वस्तुस्वातंत्र्याची सखोल माहिती व ओळख झाली असे तुम्ही कळविलेत.

ही तत्त्वं अशीच आहेत, अन्यप्रकारे नाहीत अशी पूर्ण खात्री झाल्याशिवाय, त्यानुसार तत्त्वनिर्णय झाल्याशिवाय आपली निमित्ताधीन दृष्टि सुटत नाही. जोपर्यंत जीवाची निमित्ताधीन दृष्टि आहे, निमित्तामुळेच कार्य होते व निमित्त नाही म्हणून माझे विशिष्ट कार्य होत नाही अशी मान्यता आहे, तोपर्यंत प्रत्येक द्रव्याची स्वाधीन, सहज, स्वयंपूर्ण कार्यक्षमता व कार्यव्यवस्था या जीवाच्या लक्षात येत नाही, त्यावर त्याचा विश्वासच बसत नाही.

जीव आणि पुद्‌गल ही दोन स्वतंत्र भिन्न द्रव्यं असून त्यांची प्रत्येक पर्याय त्यांच्या स्वतःमध्ये, स्वतःमुळे, स्वतःच्या विशिष्ट योग्यतेने होत असते. सहाही द्रव्यांमध्ये हा नियम लागू होतो.

आपण सहा द्रव्यांची नावे तर जाणतो, कोणी विचारले तर पटकन सांगतो देखील; पण खरोखरीच आपण सहा द्रव्यांचे अस्तित्व मानले आहे का याचा आपण स्वतःशीच विचार करावयास हवा. शरीरच मी आहे असे मानून याहून भिन्न कोणी जीव नावाचा पदार्थ आहे यावरच अनेक लोकांचा विश्वास नाही. दृश्य व इंद्रियगम्य अशा गोष्टींचे - ज्ञेयांचे अस्तित्व या जीवाला मान्य आहे, त्या

गोष्टींची त्याला खात्री आहे पण त्यांना जाणणारा हा मी स्वतःच जीव आहे, शरीराहून भिन्न अस्तित्व असणारा पदार्थ आहे अशी त्याला जाणीवही नाही.

शास्त्र स्वाध्यायाचे प्रयोजन त्या विषयाची माहिती गोळा करणे हे नसून त्याद्वारे स्वतःचे स्वरूप ओळखणे आणि पुद्‌गलादि अन्य द्रव्यांहून भिन्न व स्वतःच्या गुणपर्यायांहून अभिन्न अशा अभेद स्वशुध्दात्म्याचा अनुभव करणे हेच प्रयोजन आहे - तात्पर्य आहे. यालाच म्हणतात की प्रत्येक शास्त्राचे तात्पर्य वीतरागता हेच आहे.

'करणानुयोग परिचय' या पत्ररूप पुस्तकाद्वारे करणानुयोगाचा अभ्यास करतानादेखील स्वतःचे स्वरूप कसे ओळखायचे, द्रव्यानुयोगाद्वारे शिकलेले सिध्दांत त्यावर कसे घटवावयाचे या दृष्टीने आपण विचार केला होता. त्या पुस्तकात आपण जीवाच्या वीस प्ररूपणा तसेच कर्मासंबंधी काही जुजबी माहिती घेतली होती. त्यामध्ये सम्यक्त्वप्राप्ति होण्यापूर्वी होणाऱ्या पाच लब्धिंविषयी उल्लेख केला होता व थोडक्यात चर्चा केली होती. त्याविषयीच्या अधिक माहितीसाठी मोक्षमार्ग प्रकाशक तसेच रत्नकरंड श्रावकाचार ग्रंथांची टीका वाचण्याची मी तुम्हाला प्रेरणा दिली होती. तुम्ही ते वाचले व रत्नकरंड श्रावकाचाराच्या कॅसेट्‌सदेखील ऐकल्या तरीदेखील प्रायोग्यलब्धि व करणलब्धि संबंधीच्या गोष्टी काही समजत नाहीत, तूच समजावून सांग असे तुम्ही कळविलेत.

अनेक विद्वानांनी सुध्दा पाच लब्धिसंबंधी खुलासेवार पुस्तक लिहा असा आग्रह केला होता. तसे पाहिले तर लब्धिसार ग्रंथाच्या स्वाध्यायामध्ये हा विषय मी आपल्या येथे सकाळच्या स्वाध्यायाच्या वेळी लोकांना शिकविला होता. समोर बसलेल्या स्वाध्यायींना शिकविणेदेखील अवघड काम आहे तर मग लिहून समजाविणे कसे शक्य होईल या विचाराने मी टाळाटाळच करीत होते.

परंतु ब्र. पं. यशपालजी जैन गेल्या अनेक महिन्यांपासून मला प्रेरणा देत आले आहेत की तुम्ही या विषयावर जरूर लिहा. जेव्हा जेव्हा शिबिरामध्ये ते भेटत असत आणि मुंबईला येत असत, त्या त्या वेळेला ते विचारणा करीत असत की तुम्ही पंचलब्धि या विषयावर लिखाण सुरू केले की नाही?

म्हणून मोठे धाडस करून आज महावीर जयंतीच्या दिवशी मी या नव्या विषयावर लिहिण्यास प्रारंभ करीत आहे. आज २६०० वा महावीर जन्मजयंतीचा दिवस जगभर उजवला जात आहे. त्यांच्या दिव्यध्वनिमध्ये प्रतिपादित व आचार्यांच्या परंपरेने आपल्याला प्राप्त झालेल्या ग्रंथांच्या आधारे या विषयावर चर्चा करण्यास आज आपण सुरुवात करूया.

सर्वप्रथम आपले शासननायक अशा भगवान महावीरस्वामींना मी अनेकवेळा भावपूर्ण नमस्कार करते. भगवान महावीर आपल्या भरतक्षेत्राचे वर्तमान चोवीसीतील अंतिम तीर्थंकर आहेत. त्यांच्या दिव्यध्वनिद्वारे मोक्षमार्गाचा उपदेश आपल्याला प्राप्त झाला. एका तीर्थंकरानंतर दुसऱ्या तीर्थंकरापर्यंतचा काळ हा पूर्वीच्या तीर्थंकरांचा शासनकाळ म्हटला जातो. भरतक्षेत्रातील सध्याचा हा पंचमकाळ भगवान महावीरांचा शासनकाळ आहे.

भगवान महावीरांची ॐकाररूपाने दिव्यध्वनि खिरली. ती ऐकून गणधरांनी बारा अंगांची अर्थात द्रव्यश्रुताची - जिनागमाची रचना केली. वर्षानुवर्षे हे ज्ञान आचार्यांच्या परंपरेने चालत आले. परंतु काळानुसार बहुतांशी ज्ञानाचा लोप झाला. अत्यंत अल्प ज्ञान राहिले, जे 'षट्खंडागम' नावाने प्रथमच लिखितरूपात अस्तित्वात आले, लिपिबध्द केले गेले. याला प्रथम श्रुतस्कंध म्हटले आहे. यामध्ये जीवासंबंधी तसेच कर्मासंबंधी विस्तृत वर्णन आहे. यातील प्रथम तीन खंडांवर कुंदकुंदाचार्यांनी 'परिकर्म' नावाची विस्तृत टीका लिहिली होती.

आगमाची द्वितीय शाखा ज्याला द्वितीय श्रुतस्कंध म्हटले आहे, त्या परंपरेनुसार पुढे अनेक शास्त्रांची रचना झाली. त्यामध्ये कुंदकुंदाचार्यांनी रचलेले समयसार, प्रवचनसार, नियमसार, अष्टपाहुड, पंचास्तिकाय आदि शास्त्रं प्रसिध्द आहेत.

आपण मोठे भाग्यवान आहोत की ही सर्व शास्त्रं व वेळोवेळी त्यावर लिहिलेल्या टीका, त्यांची भाषांतरं व विद्वानांची त्यावर केलेली प्रवचनं आपल्याला आजदेखील उपलब्ध आहेत.

आचार्यांच्या या मूळ ग्रंथांचा आपण आद्योपांत - सुरुवातीपासून शेवटपर्यंत क्रमाने स्वाध्याय करावयास हवा. मोजक्या गाथा किंवा त्यावरील प्रवचनं ऐकून

आपणास सर्वांगीण अर्थबोध होत नाही. कारण विशिष्ट ठिकाणी विशिष्ट अपेक्षेने कथन केले जाते. एकच आचार्य वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या अपेक्षेने कथन करतात.

कुंदकुंदाचार्यांनी समयसार लिहिला व प्रवचनसार ग्रंथही त्यांनीच लिहिला. प्रवचनसार ग्रंथामध्ये ज्ञानप्रधान शैली आहे, तेथे ते म्हणतात की जे द्रव्य ज्या भावरूपाने परिणमते ते द्रव्य त्यावेळी त्या भावरूपच असते. द्रव्य विभावरूप - रागरूप परिणमते तो त्या द्रव्याचा विभावस्वभाव आहे. तेच कुंदकुंदाचार्य समयसारमध्ये दृष्टिप्रधान कथनशैलीमध्ये म्हणतात की राग जीवाचा नाहीच, तो निश्चयाने कर्माचा आहे, कर्मकृत आहे, पुद्‌गल आहे. तेथे रागादिंबद्दल आपली स्वामित्वबुध्दि तोडून निजशुध्दात्म्याची दृष्टि करविणे हाच आचार्यांचा हेतु आहे.

करणानुयोगाच्या गोम्मटसारादि ग्रंथांमध्ये कर्मासंबंधी, त्याच्या बंध, उदय आदिसंबंधी जे विस्तृत वर्णन आहे, ते निमित्ताचे ज्ञान करविण्यासाठी केले आहे. आजपर्यंत आपण स्वतःला दुबळे व पराधीन मानत आलो होतो व कर्माला आपण बलवान मानले होते, कर्म आपल्याला सुखी दुःखी करवितात, राग द्वेष करावयाला भाग पाडतात असे मानले होते. करणानुयोगाच्या ग्रंथाद्वारे कर्माच्या बंधासंबंधीचे, उदयासंबंधीचे तसेच त्याच्या अन्य अनेक अवस्थांसंबंधीचे ज्ञान झाल्याने आपल्याला त्याच्या भिन्नतेचे भान होते. या अभ्यासाद्वारे कर्मोदयाने प्राप्त झालेले परपदार्थ आणि आपला स्वतःचा स्वभाव यांमध्ये सहजपणे भेदज्ञान होत रहाते.

शास्त्रात कथन येते की दर्शनमोहनीय कर्माचा भेद जे मिथ्यात्व कर्म, त्याच्या उदयाने जीवास मिथ्यात्व होते. ते वाचून जर आपण विचार करत बसलो की अरे, माझे हे कर्म तर अनादिचे आहे व प्रत्येक समयात उदयास येत आहे मग मला सम्यक्त्व कसे बरे होईल? तर आपल्याला कर्माची भीति वाटू लागेल परंतु कर्माचे ज्ञान करून, स्वतःच्या भिन्नतेचे भान करून, स्वतःचे स्वरूप ओळखून स्वशुध्दात्म्यामध्ये एकाग्रता केल्याने सम्यक्त्वाची प्राप्ति होते ही गोष्ट समजताच आपली भीति नष्ट होते. खरं तर, आपले सम्यग्दर्शनरूपी कार्य प्रकट करण्यासाठी आपल्याला कर्माकडे पहात बसण्याची गरज नाही.

आपल्या सम्यग्दर्शनरूपी कार्याचे कारण, केवलज्ञानरूपी शुध्द कार्याचे कारण तर आपल्या स्वतःच्या द्रव्यामध्येच सदैव विद्यमान आहे. सध्या संध्याकाळी नियमसारच्या स्वाध्यायात हीच चर्चा चालू आहे. तुम्हाला माहितच आहे की सध्या रोज सायंकाळी तुमचे बाबा १ तास प्रवचनसार व १ तास नियमसार या शास्त्रांवर प्रवचनं करीत आहेत.

नियमसारमध्ये तर वारंवार म्हटले आहे की शुध्द कार्य अर्थात स्वभावपर्याय उत्पन्न होते त्याचे कारण तर द्रव्यामध्ये त्रिकाळ विद्यमान आहे. केवलज्ञानरूपी शुध्द कार्य, ज्याला आचार्यांनी कार्यस्वभावज्ञान म्हटले आहे, त्याचे कारण कोण? ज्ञानावरण कर्माच्या क्षयाने केवलज्ञान उत्पन्न होते की काय? मुळीच नाही. त्याचे कारण तर त्या जीवद्रव्यामध्ये त्रिकाळ विद्यमान आहे त्यास कारणस्वभावज्ञान म्हटले आहे. ज्ञानपर्यायाचे ते त्रिकाळी उपादानकारण आहे व केवलज्ञानरूपाने पर्यायामध्ये प्रकट होण्याचे सामर्थ्य प्रत्येक समयात आपल्यातच वर्तत असते - विद्यमान असते.

आपल्या या स्वसामर्थ्याची जेव्हा आपल्याला जाणीव होते, तेव्हा इतर पदार्थांचे महात्म्य सहजच सुटते, त्यांच्यावरील आपले लक्षही हटते, आपली स्वतःची - स्वसामर्थ्याची महानता भासित होऊ लागते. त्यावेळी आपल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या या त्रिकाळी स्वभावावर केंद्रित होतो, एकाग्र होतो, लीन होतो व सम्यग्दर्शनाची प्राप्ति होते, त्याच स्वभावामध्ये अधिकाधिक एकाग्रता होत गेल्याने, शुध्दोपयोगाद्वारेच केवलज्ञानाची प्राप्ति होते.

ज्यावेळी केवलज्ञानाची उत्पत्ति होते त्याच समयात सर्व प्रकारच्या ज्ञानावरण कर्मांचा त्यांच्या स्वतःच्या उपादानाच्या योग्यतेने स्वतःच क्षय होतो. एकाच समयात होणाऱ्या या दोन भिन्न द्रव्यांच्या पर्यायांमध्ये निमित्त नैमित्तिक संबंधाचे ज्ञान करविण्यासाठी शास्त्रात कथन येते की ज्ञानावरण कर्माच्या क्षयाने केवलज्ञानाची उत्पत्ति झाली. कर्माचे जे जे कथन येईल तेथे जीवाचा व कर्माचा असाच निमित्त नैमित्तिक संबंध आहे हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे आणि अशा निर्णयापूर्वकच जीवासंबंधीच्या व कर्मासंबंधीच्या कथनाचा आपण योग्य रीतीने अर्थ जाणावयास हवा.

जीवाच्या परिणामांचे वर्णन करताना त्या परिणामांच्या निमित्ताने कोणती कर्मं बांधली जातात किंवा कोणत्या कर्मांचा बंध होणे थांबते इत्यादिचे कथन शास्त्रात केले जाते. त्यावेळी कर्मप्रकृतींची मोठी यादी देणे हे प्रयोजन नसून त्या समयामध्ये जीवाचे परिणाम कसे आहेत हे दर्शविणे हाच हेतु असतो.

आता येथे प्रथमोपशम सम्यक्त्वापूर्वी ज्या पाच लब्धि नियमाने असतात त्यांचे स्वरूप वर्णन करताना आपण जीवाचे परिणाम व कर्मांची स्थित्यंतरं यांची करणानुयोगाच्या आधारे चर्चा करणार आहोत. ते नीट समजावे म्हणून कर्मासंबंधी प्राथमिक माहिती, काही पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ समजून घेणे अति आवश्यक आहे.

लब्धि म्हणजे लाभ-प्राप्ति. लौकिक जीवनामध्ये आपण कोणत्याही गोष्टीचा - कार्याचा लाभ फक्त पैशातच मोजतो. बा जीवा! तू तर चैतन्यशक्तीचा पिंड आहेस व धनसंपत्ति तर अचेतन-जड-पुद्गल आहे. या पुद्गलात वाढ - हानि झाल्याने तुला काय लाभ-नुकसान होणार? हां, अतींद्रिय ज्ञान व अतींद्रिय सुख प्राप्त होणे हीच तुझी खरी उपलब्धि आहे, खरा लाभ आहे.

अशा प्रकारचे परिपूर्ण ज्ञान - अनंत ज्ञान व अनंत सुख तर मोक्षप्राप्तिमध्ये आहे. मोक्ष म्हणजे जीवाची संपूर्ण शुध्दि आणि सत्तेमधील सर्व कर्मांचा संपूर्णतः नाश होणे. ही मोक्षपर्याय संवर आणि निर्जरापूर्वकच होते. बंधाची हानि होणे हा संवर आहे व कर्मसत्त्वाची हानि होणे ही निर्जरा आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर नवीन बंध कमी होणे हा संवर आहे आणि पूर्वी बांधलेल्या कर्मांत घट होत जाणे ही निर्जरा आहे. जीवाच्या परिणामाच्या दृष्टीने पाहिले तर शुध्दीची उत्पत्ति हा संवर आहे, शुध्दीची वृध्दि ही निर्जरा आहे व शुध्दीची पूर्णता हा मोक्ष आहे.

ही शुध्दि म्हणजे शुध्दोपयोग - आत्मस्थिरता - आत्मलीनता अर्थात शुध्दात्माभिमुख परिणाम. जेव्हा हा जीव शुध्दोपयोगात असतो त्यावेळी त्यास अतींद्रिय आनंदाची प्राप्ति होते. रागद्वेषरूप कषाय दु:ख देणारे आहेत. छहढालेमध्ये म्हटले आहे की, 'रागादि प्रकट ये दु:खदेन'. शुध्दोपयोग रागद्वेषरहित वीतरागी परिणाम असल्याने त्यामध्ये निराकुलतारूप सुखाचा अनुभव होतो.

तुम्ही विचाराल, 'हे सुख कसे आहे?' या सुखाला आपल्या ऐहिक सुखाची उपमा देता येणार नाही. आपण ज्याला सुख समजतो त्या विषयभोगामध्ये तर दुःखच आहे परंतु आपण भ्रमापोटी त्यास सुख मानले आहे. विषय शब्दाचा अर्थ आहे पाच इंद्रियांचे विषय. आपल्याला स्पर्शनेंद्रिय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय, चक्षुरिंद्रिय व कर्णेंद्रियाद्वारे अनुक्रमे पुद्‌गलाच्या स्पर्श, रस, गंध, वर्ण, आणि शब्द यांचे ज्ञान होते. त्यातील विशिष्ट पर्यायांना हा जीव इष्ट मानतो व त्यांना जाणत असता असे मानतो की 'मी या पदार्थांचा भोग घेत आहे'.

खरं तर जीवाला विशिष्ट इच्छा होते, समजा एखाद्याला लाडू खाण्याची इच्छा झाली तर तो त्या इच्छेने दुःखी होतो. लाडू खाण्याने त्याची इच्छा मिटते व इच्छेमुळे उत्पन्न झालेले दुःख कमी होते. म्हणून लाडू खाण्यामुळे मी सुखी झालो असे तो समजतो. परंतु खरोखरीच लाडू खाण्याने सुख होत असेल तर अधिक लाडू खाण्याने अधिक सुख व्हायला पाहिजे. कोणी दोन, चार.... पन्नास लाडू खाल्ले तर? त्या कल्पनेनेच पोटात ढवळू लागते, होय ना?

एखाद्याला लाडू खाण्याची इच्छा होते, लाडू खाईपर्यंत त्याला दुसऱ्या अनेक इच्छा उत्पन्न होत रहातात. ही तर आपल्या रोजच्या अनुभवातली गोष्ट आहे. त्यामुळे लाडू खाल्ला तरी दुसऱ्या अनेक इच्छांमुळे तो जीव दुःखीच रहातो. याला एक मजेशीर दृष्टांत देऊन समजाविले जाते. तराजूच्या एका पारड्यात अनेक बेडकांना एकानंतर एक ठेवून नंतर त्यांचे एकावेळी वजन करण्यासारखे हे आहे. एक बेडूक ठेवून दुसरा हातात घेईपर्यंत पहिला टुणकन् खाली उडी घेतो. इच्छेच्या बाबतीतही तसेच आहे. एका इच्छेची पूर्ती करण्यासाठी प्रयत्नशील असतानाच दुसऱ्या दहा इच्छा उत्पन्न होत असतात. शिवाय आपल्या इच्छेनुसार समोरच्या पदार्थाचे परिणमन किंवा त्याची प्राप्ति होत नसते. त्यामुळे हा जीव राग द्वेष करून निरंतर दुःखीच रहातो. अशाप्रकारे इंद्रियसुख हे दुःखच आहे.

याउलट अतींद्रिय सुख हे आत्म्यामधून उत्पन्न होत असल्याने ते स्वाधीन, सहज व विषयातीत आहे. आत्म्याला जाणत असता अर्थात शुध्दोपयोगामध्ये राग द्वेषाचे विकल्प नसल्याने जीवास निराकुलतारूप सुख अनुभवास येते. याला विषयजनित कोणत्याही सुखाची उपमा देता येत नाही म्हणून ते अनुपम आहे.

हे सुख बाधारहित आहे, कमीअधिक होत नाही. वेदनीय कर्माच्या–साता असाताच्या उदयामुळे संयोगजनित सुखदु:ख हीनाधिक होत रहाते, परंतु आत्म्यामध्ये उत्पन्न होणाऱ्या सुखाला कर्म अडवू शकत नाही.

असे हे सुख प्राप्त करण्यास कोणाला बरे आवडणार नाही? छहढालेमध्ये म्हटले आहे -

**'आतमको हित है सुख सो सुख आकुलताबिन कहिए।**

**आकुलता शिवमाँहि न, तातै शिवमग लाग्यौ चहिए ॥'**

आकुलतारहित सुख मोक्षामध्ये असल्याने जीवाने मोक्षमार्गाला लागले पाहिजे. हीच खरी उपलब्धि आहे, हाच लाभ आहे. लौकिकामध्ये पैशाचा, धनसंपत्तीचा लाभ झाला तरी कटकट व आकुलता संपते कोठे? त्याचा हिशोब ठेवा, त्यावर आयकर भरा व आयकर कमी करण्यासाठी कायद्यातील बारकावे जाणून त्यानुसार सारी मेहनत आणि चिंता करा. आत्मिक सुखामध्ये कुठलाही 'कर' भरावा लागत नाही, सारा रोकडा व्यवहार तोही टॅक्सफ्री! लहानथोर, गरीबश्रीमंत, स्त्रीपुरुष, एवढेच काय संज्ञी पंचेंद्रिय तिर्यंचदेखील या आत्मसुखाचा अनुभव घेऊ शकतात. त्यासाठी व्रत वैकल्यं, उपास तापास, यात्रा कशा कशाची जरूरी नाही. अशा या आत्मिक सुखाची सुरुवात सम्यग्दर्शनाने होते.

सम्यग्दर्शनाच्या व आत्मानुभूतीच्या बाबतीत आपण पूर्वीच्या तिन्ही पुस्तकांमध्ये विस्तृत चर्चा केलीच आहे. आता आपला विषय असा आहे की सम्यग्दर्शन प्राप्त करण्यापूर्वी व प्राप्त करत असताना जीवाचे परिणाम कसे असतात व त्यावेळी कर्मामध्ये काय काय उलाढाली होतात. हे सारे आपल्याला जाणून घ्यावयाचे आहे. त्यासाठी कर्माविषयीच्या प्राथमिक माहितीपासून आपण सुरुवात करूया. तुम्ही असे समजू नका की पंचलब्धिचा विषय सोडून मी 'कर्मकांड' शिकविण्यास सुरुवात केली आहे.

प्रत्येक जीव अनादिकाळापासून कर्माशी बध्द - बांधलेल्या अवस्थेमध्ये आढळून येतो. असे कधीच नव्हते की प्रथम जीव शुध्द होता व नंतर त्याने कर्मं बांधली. ज्याप्रमाणे सोन्याच्या खाणीत सोने सुवर्णपाषाणाच्या रूपात आढळते त्याप्रमाणे जीव आणि कर्म अनादिपासूनच एकमेकांशी बध्द अवस्थेमध्ये

आढळतात. तरीदेखील दोन्ही द्रव्यांचे अस्तित्व भिन्नच रहाते. कर्म हे पुद्‌गल असून कार्माणवर्गणा नावाच्या पुद्‌गलस्कंधापासून ते बनते हे तर तुम्ही जाणताच.

कर्म बांधणे म्हणजे कर्माचा बंध होणे. जीव स्वतः स्वतःमध्ये स्वतःच्या योग्यतेने मोह, राग, द्वेषरूप परिणाम करतो त्यावेळी कार्माणवर्गणा स्वतःच स्वतःच्या योग्यतेने कर्मरूप अवस्था धारण करतात व जीवाशी त्यांचा संश्लेष संबंध होतो अर्थात जीवाच्या असंख्यात प्रदेशांमध्ये ही कर्मं एकक्षेत्रावगाह संबंधाने रहातात. विशिष्ट कालमर्यादेनंतर कर्म पुन्हा अकर्मरूप होते, अन्य पुद्‌गलस्कंधरूप होते त्यावेळी त्याचे फळ मिळते त्यास कर्माचा उदय झाला अथवा कर्म खिरले अथवा कर्माची निर्जरा झाली असे म्हणतात. ही सामान्य निर्जरा आहे, ही मोक्षमार्गामध्ये होणारी संवरपूर्वक होणारी निर्जरा नाही.

कर्माचा उदय होतो त्यावेळी कर्माचे फळ जीवास मिळते. त्या फळामध्ये जीव पुन्हा इष्टअनिष्टपणाच्या कल्पनेने रागद्वेष करीत रहातो व नित्य नवी नवी कर्मं बांधत रहातो.

मुलींनो, आपणदेखील अनादिकाळापासून प्रत्येक समयामध्ये नवी नवी कर्मं बांधत आलो आहोत व पूर्वीच्या कर्मांची फळंदेखील प्रत्येक समयामध्ये भोगत आलो आहोत. प्रत्येक समयात जुन्या कर्मांचा उदय व नव्या कर्मांचा बंध चालू रहातो व अशाप्रकारे जीवाबरोबर कर्माची सत्ता सतत विद्यमान रहाते.

हा जीव निरंतर वेगवेगळे परिणाम करतो व त्याद्वारे वेगवेगळी कर्मं बांधतो आणि त्यानुसार चार गति व चौऱ्याऐंशी लाख योनिंमध्ये सतत भटकत रहातो. एकेंद्रियापासून पंचेंद्रियापर्यंतच्या विविध पर्यायांमध्ये जन्म घेत घेत स्वतःला त्याच रूपात अनुभव करतो. अशाप्रकारे हा जीव 'पर्यायमूढ' होऊन, भिकारी बनून परद्रव्यांकडून सुखाची भीक मागत वणवण भटकत रहातो. आपल्या या दयनीय अवस्थेचे भान झाले तर आपल्यालाच रडू कोसळेल, परंतु स्वतःच्या मूर्खपणापोटी - अज्ञानापोटी हा यातच सुख मानून स्वतःला मोठा समजत आला आहे.

पर्यायमूढ म्हणजे प्राप्त पर्यायामध्ये एकत्वबुध्दि. मनुष्यपर्यायातील जीव स्वतःला मनुष्य मानतो, तिर्यंच पर्यायातील जीव स्वतःला तिर्यंच मानतो. त्या त्या शरीराहून भिन्न अशा स्वतःच्या अस्तित्वाची त्याला जाण नसते.

अत्यंत दुर्लभ असा मनुष्यभव व महादुर्लभ अशा जिनवाणीश्रवणाचे भाग्य मिळूनदेखील धनसंपत्तीच्या लालसेने या जीवाला पछाडले आहे. ही लालसा याच्या मानगुटी बसून रात्रंदिवस याला गुरासारखे राबवत आहे. याची दुर्दशा तर पहा! गुरांनादेखील दोन वेळा चारापाणी व रात्री झोप मिळते परंतु हा उल्लू जीव खाण्यापिण्याची, झोपेची आबाळ करून धावतो आहे संपत्ति गोळा करायला! भिकारी चार आठ आण्याची भीक मागतो पण हा तर मोठा भिकारी आहे. याची हाव तर कधी संपतच नाही.

मी बायकामुलांसाठी मेहनत करीत आहे असा आव हा आणतो खरा, पण बायकामुलांकडे बघायला तरी याला फुरसत आहे का? आत्मिक शांति व आत्मचिंतनाची गोष्ट तर दूरच राहो.

हां, तर कर्मबंधाबाबतीत आपण चर्चा करीत होतो. जीवाबरोबर कर्म बांधलेले आहे. त्याचा प्रचंड साठा सतत कायम रहातो. त्यातील जुनी काही कर्मे दर समयाला निघून जातात - उदयाला येतात व दर समयाला नवी कर्मे बांधली जातात. प्रत्येक समयामध्ये अनंत कर्म परमाणु बांधले जातात - बध्द होतात, त्या संख्येस 'समयप्रबध्द' असे म्हणतात. पूर्वी बांधलेल्या कर्मांपैकी तेवढेच अनंत परमाणु उदय होऊन निघून जातात.

सामान्यपणे आपण कर्म बांधले, कर्म उदयास आले असे म्हणत असलो तरी त्या कर्मांच्या वेगवेगळ्या आठ जाति आहेत. त्यांचा स्वभाव अर्थात प्रकृति अथवा कार्य वेगवेगळे आहे , त्यांना कर्मप्रकृति असे म्हणतात. या आठ कर्मप्रकृतींना 'मूलप्रकृति' म्हटले आहे. त्यांची नावे अशी आहेत -

| | | | |
|---|---|---|---|
| (१) ज्ञानावरण | (२) दर्शनावरण | (३) मोहनीय | (४) अंतराय |
| (५) वेदनीय | (६) आयु | (७) नाम | (८) गोत्र. |

त्यांच्या स्वभावानुसारच ही नावे आहेत. कसे ते आपण पाहूया.

(१) ज्ञानावरणाचा अर्थ आहे ज्ञानावरील आवरण. जे कर्म ज्ञानावर आवरण घालते, ज्ञानगुणाची शक्ति ज्ञानपर्यायामध्ये पूर्णपणे प्रकट होऊ देत नाही ते ज्ञानावरण कर्म आहे. मुलींनो, यापुढे कथन तर असे निमित्ताचेच करण्यात येईल की निमित्ताने कार्य केले - ज्ञानावरण कर्माने ज्ञानावर आवरण घातले. परंतु येथे

जीव व कर्म अर्थात पुद्गल या दोन द्रव्यांची भिन्नता व स्वतंत्रता सतत लक्षात ठेवूनच या विधानाचा अर्थ समजून घेणे इष्ट आहे. नाही तर कर्माला जीवाचे बरेवाईट करणारा मानाल तर पराधीनतेच्या कल्पनेने दुःखी व्हाल. योग्य अर्थ लावण्याची जबाबदारी आता तुमची आहे, कारण या विषयासंबंधी सविस्तर चर्चा आपण पूर्वी 'कारण कार्य रहस्य' पुस्तकामध्ये केली आहे.

शास्त्रामध्ये आठ कर्मांचे स्वरूप दृष्टांत देऊन समजाविले आहे. ज्याप्रमाणे देवतेच्या मूर्तीचे मुख वस्त्राने झाकले असता वस्त्राच्या कारणाने आपल्याला त्या मूर्तीचे विशेष ज्ञान होऊ शकत नाही त्याप्रमाणे ज्ञानावरण कर्म ज्ञानावर आवरण घालते.

(२) दर्शनावरण कर्म दर्शनावर आवरण घालते अर्थात दर्शन गुणाची शक्ति पर्यायात पूर्णपणे प्रकट होऊ देत नाही. ज्याप्रमाणे राजद्वाराशी उभा राहिलेला द्वारपाल राजाला पाहू देत नाही, राजाचे दर्शन घेऊ देत नाही, त्याप्रमाणे दर्शनावरण कर्म दर्शनावर आवरण घालते. दर्शनाचा अर्थ सामान्य अवलोकन करणे हे तर तुम्हाला माहितच आहे.

(३) मोहनीय कर्म जीवाला मोहित करते, असावधान करते. ज्याप्रमाणे मद्य किंवा इतर मादक पदार्थांचे सेवन केल्याने जीव बेसावध होतो, त्याची मति मोहित होते, त्याप्रमाणे मोहनीय कर्म आत्म्याला मोहित करते.

मोहनीय कर्माचे दोन भेद आहेत (१) दर्शनमोहनीय (२) चारित्रमोहनीय.

दर्शनमोहनीयाच्या मिथ्यात्व कर्माच्या उदयामध्ये जीवास मिथ्यात्व होते, श्रध्दा गुणाचे विपरीत परिणमन होते.

चारित्रमोहनीय कर्माच्या उदयामध्ये जीवाचे क्रोध, मान, माया, लोभ तसेच हास्यादि नऊ नोकषायरूप परिणमन होते. जीव जेव्हा स्वतःच हे रागद्वेषादि परिणाम करतो त्यावेळी चारित्रमोहनीय कर्माचा उदय आढळतो. कर्म जीवाला जबरदस्तीने रागद्वेषरूप परिणाम करावयास लावत नाही.

(४) अंतराय कर्म विघ्न अर्थात बाधा आणणारे कर्म आहे. दातार व पात्र इत्यादिंमध्ये परस्पर अंतर करविणारे ते अंतराय आहे. ज्याप्रमाणे राजा एखाद्याला दान देऊ इच्छितो परंतु त्याचा भंडारी अर्थात खजिनदार त्याला तसे

करू देत नाही, त्यामध्ये बाधा आणतो - दान देण्यापासून परावृत्त करतो त्याप्रमाणे अंतराय कर्म दान, लाभ, भोग, उपभोग, वीर्य यांमध्ये विघ्न आणते.

दान, लाभ, भोग, उपभोग आणि वीर्य हे जीवाचे गुण आहेत. अंतराय कर्माच्या निमित्ताने त्यांची शक्ति पर्यायामध्ये पूर्ण प्रकट होत नाही. स्वभावपर्यायरूप आनंदाचे दान स्वतःला देणे, त्याचा लाभ होणे, त्याचा भोग घेणे, त्याचा पुनःपुनः भोग अर्थात उपभोग घेणे हे या गुणांचे कार्य आहे. पुरुषार्थ हे वीर्य गुणाचे कार्य आहे - वीर्य गुणाची पर्याय आहे. स्वरूपाची रचना पर्यायामध्ये करणे हे वीर्यगुणाचे कार्य आहे अर्थात हाच पुरुषार्थ आहे.

ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय या चार कर्मांना घातिकर्म असे म्हणतात. उरलेल्या चार कर्मांना - वेदनीय, आयु, नाम व गोत्र या कर्मांना अघातिकर्म असे म्हणतात.

(५) वेदनीय कर्माच्या निमित्ताने अनुकूल किंवा प्रतिकूल संयोग मिळतात आणि मोहनीय कर्माच्या निमित्ताने जीव त्यामध्ये इष्ट अनिष्टपणाची कल्पना करून सुखी दुःखी होतो. सुखदुःखाचे अनुभव करविणारे ते वेदनीय कर्म आहे. मधाने माखलेली तलवारीची धार ज्याप्रमाणे सुखःदुखाला कारणीभूत आहे त्याप्रमाणे वेदनीय कर्म जीवाला सुखदुःख उत्पन्न करविते. ही खऱ्या आत्मिक सुखाची गोष्ट नाही, परंतु इंद्रियजनित व मनजनित सुखदुःखाची ही गोष्ट आहे.

(६) आयुकर्माच्या निमित्ताने जीव विवक्षित पर्यायामध्ये - गतिमध्ये जीवन व्यतीत करतो. पर्याय अर्थात भव धारण करण्याच्या निमित्ताने जी प्राप्त होते ती आयु आहे. ज्याप्रमाणे बंदीगृहामध्ये कैद्याला साखळदंडाने बांधतात अथवा लाकडी खोड्यात त्याचा पाय अडकवून ठेवतात ज्यायोगे तो कैदी आपली जागा सोडून जाऊ शकत नाही - त्याच ठिकाणी स्थित रहातो, त्याप्रमाणे आयुकर्म जीवाला विशिष्ट पर्यायांमध्ये - मनुष्य, तिर्यंच, देव, नारकी आदि पर्यायांमध्ये स्थित ठेवते, मरू देत नाही, अन्य पर्याय धारण करू देत नाही.

(७) नामकर्माच्या उदयाने शरीरादिकासंबंधी रचना होतात. नाना प्रकारचे अर्थात अनेक प्रकारचे कार्य उत्पन्न करते ते नामकर्म आहे. ज्याप्रमाणे चित्रकार अनेक प्रकारची चित्रं चितारतो त्याप्रमाणे नामकर्म जीवाला नरनारकादि अनेकरूप बनविते.

(८) गोत्रकर्माच्या निमित्ताने जीवाला उच्च अथवा नीच गोत्र मिळते. ज्याप्रमाणे कुंभार मातीच्या मोठ्या किंवा छोट्या वस्तु बनवितो, भारी किंवा हलक्या वस्तु बनवितो, त्याप्रमाणे गोत्रकर्म जीवाला उच्च किंवा नीच दशेस प्राप्त करविते.

या सर्व गोष्टी आपण 'करणानुयोग परिचय' मध्ये शिकलोच आहोत. येथे फक्त त्यांचा थोडक्यात उल्लेख करत आहे. त्या पुस्तकातून पुन्हा एकदा जरूर वाचा.

मुलींनो, कर्माचा बंध होतो असे आपण म्हणतो, त्यावेळी चार प्रकारांनी त्याचे वर्णन करण्यात येते -

(१) प्रकृतिबंध (२) प्रदेशबंध (३) स्थितिबंध (४) अनुभागबंध.

कर्माची जी प्रकृति बांधली जाते त्यास प्रकृतिबंध म्हणतात. वर आपण कर्माच्या आठ मूलप्रकृति पाहिल्या. त्या प्रत्येकाचे अनेक भेद प्रभेद आहेत. त्यांना 'उत्तरप्रकृति' असे म्हणतात.

या आठ मूलप्रकृतींचा बंध आणि उदय सतत दर समयाला चालू रहातो, ज्यामध्ये अपवाद फक्त आयुकर्माच्या बंधाचा आहे. कारण आयुकर्माचा बंध कधी कधी होतो. परंतु इतर सात कर्मांचा बंध दर समयाला होत असतो. या सात कर्मांच्या उत्तर प्रकृतींचा बंध विशिष्ट गुणस्थानामध्ये व विशिष्ट गतिमधील जीवांना वेगवेगळा होत असतो. आपण आता उत्तरप्रकृतींची नावे पाहूया.

यामध्ये कपाळाला आठ्या पडण्याचे काहीच कारण नाही, चिंता करण्याचे काहीच कारण नाही. त्यातील बारकावे समजू लागतात व कोणत्या जीवांना कोणता बंध होतो, सम्यक्त्व प्राप्त होण्यापूर्वी व प्राप्त झाल्यानंतर उत्तरप्रकृतींचा बंध कसा कमी कमी होत जातो, बंधाचा अभाव कशा रीतीने होतो व कर्म कसे नष्ट होते इत्यादि गोष्टी समजल्याने संसारपरिभ्रमणाचे गूढ तर समजतेच परंतु त्यातून सुटण्याच्या मोक्षमार्गाचे स्वरूपदेखील नीट लक्षात येते. शिवाय ही सर्व माहिती तर रोचक आहेच.

याची चर्चा आता पुढील पत्रात करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# कर्म - उत्तरप्रकृति

पत्रांक २ १९ मे २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

'करणानुयोग परिचय' या पुस्तकरूप स्वाध्यायानंतर पुन्हा एकदा करणानुयोगासंबंधी विषय जाणून घेण्यास तुम्ही दोघी उत्सुक आहात हे जाणून मला आनंद वाटला.

मूलप्रकृतींचे स्वरूप पाहिल्यानंतर आता थोडी चर्चा उत्तर प्रकृतिंसंबंधी करूया.

ज्ञानावरण कर्माच्या पाच उत्तरप्रकृति आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत-

(१) मतिज्ञानावरण (२) श्रुतज्ञानावरण (३) अवधिज्ञानावरण

(४) मनःपर्ययज्ञानावरण (५) केवलज्ञानावरण.

ज्ञानाच्या पाच पर्यायांची नावे तर तुम्हाला माहितच आहेत. त्यापुढे 'आवरण' शब्द जोडला की त्या विशिष्ट ज्ञानावर आवरण घालणाऱ्या कर्मप्रकृतीचे नाव आपल्या सहज लक्षात रहाते.

दर्शनावरण कर्माच्या नऊ उत्तरप्रकृति आहेत. तुम्ही विचाराल, 'दर्शन गुणाच्या तर चारच पर्याय आम्हाला माहित आहेत, तर मग दर्शनावरणाच्या नऊ प्रकृति कशा बरे असतील?'

चांगला प्रश्न आहे. दर्शनगुणाच्या चार पर्याय आहेत - चक्षुदर्शन, अचक्षुदर्शन, अवधिदर्शन आणि केवलदर्शन. त्याच्याबरोबर आवरण शब्द जोडला असता दर्शनावरणाच्या चार उत्तर प्रकृतींची नावे आपण सहजपणे जाणू शकतो. त्या प्रकृति अशा आहेत -

(१) चक्षुदर्शनावरण (२) अचक्षुदर्शनावरण

(३) अवधिदर्शनावरण (४) केवलदर्शनावरण.

यांच्याशिवाय निद्रा कर्माच्या पाच प्रकृति आहेत. अत्यंत गाढ निद्रेपासून अत्यंत तरल निद्रेपर्यंतच्या कर्मांची नावे अशी आहेत -

(१) स्त्यानगृध्दि (२) निद्रानिद्रा (३) प्रचलाप्रचला, (४) निद्रा (५) प्रचला.

स्त्यानगृध्दि दर्शनावरणाच्या उदयामध्ये जीवास गाढ निद्रा येते, उठवले तरी तो उठत नाही, झोपून रहातो. झोपेतच तो अनेक कार्य करतो, बोलतो, कोणत्याही प्रकारची सावधानी नसते.

निद्रानिद्रा कर्माच्या उदयामध्ये डोळे उघडण्यास तो असमर्थ असतो. प्रचलाप्रचला कर्माच्या उदयामध्ये झोपेत तोंडातून लाळ वहाते, हातपाय हलतात. निद्रा कर्माच्या उदयामध्ये चालणारा उभा रहातो, उभा असलेला बसतो किंवा आडवा होतो. मद, खेद वगैरे मिटविण्यासाठी झोपतो. प्रचला कर्माच्या उदयामध्ये जीव अर्धवट झोपतो - झोपत असताना देखील थोडे थोडे जाणतो, वारंवार हलकी झोप येते, डोळे अर्धवट उघडे ठेवून झोपतो.

उरलेल्या चार दर्शनावरण कर्मांचा अर्थ व त्यांचे कार्य तर नावाप्रमाणेच आहे हे तुमच्या लक्षात आले असेलच.

मोहनीय कर्मामध्ये दोन प्रकार आहेत. दर्शनमोहनीय व चारित्रमोहनीय. त्यापैकी दर्शनमोहनीय कर्माच्या तीन उत्तरप्रकृति आहेत -

(१) मिथ्यात्व (२) सम्यग्मिथ्यात्व (३) सम्यक् प्रकृति.

या तीन प्रकृतिंपैकी बंध फक्त मिथ्यात्व प्रकृतीचाच होतो. प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या काळात याचेच तीन तुकडे होतात. याविषयी सविस्तर चर्चा पुढे येईलच.

चारित्रमोहनीय कर्माच्या पंचवीस उत्तरप्रकृति आहेत. जीवाच्या कषायांची व नोकषायांची नावे आणि या प्रकृतींची नावे तीच आहेत. जीवाच्या रागादि भावांना कषाय म्हटले जाते व हे आहे कषायकर्म. जसे, जीवाचा क्रोध कषाय आहे व कर्मामध्ये क्रोध कर्म आहे. ही नावे तर तुम्हाला माहितच आहेत. ती अशी -

| | | |
|---|---|---|
| अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ | - | ४ कषायकर्म |
| अप्रत्याख्यानावरण क्रोध, मान, माया, लोभ | - | ४ कषायकर्म |
| प्रत्याख्यानावरण क्रोध, मान, माया, लोभ | - | ४ कषायकर्म |
| संज्वलन क्रोध, मान, माया, लोभ | - | ४ कषायकर्म |
| हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा | - | ६ नोकषायकर्म |
| स्त्रीवेद, पुरुषवेद, नपुंसकवेद | - | ३ नोकषायकर्म |
| असे एकूण पंचवीस भेद आहेत. | - | २५ |

अंतराय कर्माच्या ज्या पाच उत्तरप्रकृति आहेत, त्या अशा -

(१) दानांतराय (२) लाभांतराय (३) भोगांतराय
(४) उपभोगांतराय (५) वीर्यांतराय.

दानादि पाच गुणांची नावे तर आपण पूर्वी पाहिलीच आहेत. त्यापुढे अंतराय शब्द जोडून ही पाच नावे तुमच्या सहज लक्षात राहतील.

वेदनीयकर्माच्या दोन उत्तरप्रकृति अशा आहेत -

(१) सातावेदनीय (२) असातावेदनीय.

रति मोहनीय कर्माच्या उदयामध्ये इंद्रियविषयांमध्ये सुख उत्पन्न करविते ते सातावेदनीय कर्म आहे व अरतिमोहनीय कर्माच्या उदयामध्ये इंद्रियविषयांमध्ये दुःख उत्पन्न करविते ते असातावेदनीय कर्म आहे.

आयुकर्माच्या चार उत्तरप्रकृति अशा आहेत -

(१) मनुष्यायु (२) देवायु (३) तिर्यंचायु (४) नरकायु.

नामकर्माच्या त्र्याण्णव उत्तरप्रकृति पहाण्यापूर्वी गोत्र कर्माच्या दोन उत्तरप्रकृति पाहूया. त्या अशा -

(१) उच्चगोत्र (२) नीचगोत्र.

नामकर्माच्या उत्तरप्रकृतींच्या त्र्याण्णव संख्येने घाबरण्याचे काही कारण नाही. त्यामध्ये पिंडप्रकृति अर्थात ग्रुपवाल्या प्रकृति चौदा आहेत व उरलेल्या अपिंडप्रकृति अर्थात एक एक प्रकृति अठ्ठावीस आहेत, त्यामध्ये युगल म्हणजे जोडीवाल्या प्रकृति लक्षात घेतल्यास सहज रीतीने ही नावे पाठ होतात.

प्रथम त्यांची नावे लिहून त्यानंतर त्या प्रत्येकाचे स्वरूप पाहूया.

| | | |
|---|---|---|
| (१) गति - ४ | (२) जाति - ५ | (३) शरीर - ५ |
| (४) बंधन - ५ | (५) संघात - ५ | (६) संस्थान - ६ |
| (७) संहनन - ६ | (८) अंगोपांग -३ | (९) स्पर्श - ८ |
| (१०) रस - ५ | (११) गंध - २ | (१२) वर्ण - ५ |
| (१३) गत्यानुपूर्वी - ४ | (१४) विहायोगति - २ | (१५) अगुरुलघु |
| (१६) उपघात | (१७) परघात | (१८) उच्छ्वास |
| (१९) आतप | (२०) उद्योत | (२१) त्रस |
| (२२) स्थावर | (२३) बादर | (२४) सूक्ष्म |
| (२५) पर्याप्त | (२६) अपर्याप्त | (२७) प्रत्येक |
| (२८) साधारण | (२९) स्थिर | (३०) अस्थिर |
| (३१) शुभ | (३२) अशुभ | (३३) सुभग |
| (३४) दुर्भग | (३५) सुस्वर | (३६) दुस्वर |
| (३७) आदेय | (३८) अनादेय | (३९) यशस्कीर्ति |
| (४०) अयशस्कीर्ति | (४१) तीर्थंकर | (४२) निर्माण. |

यामध्ये पहिली चौदा नावे तर पिंडप्रकृतींची आहेत व इतर नावांमध्ये पुष्कळशा जोड्या आहेत. थोड्याशा सरावाने ही नावे सहज लक्षात रहातात. यांचा अर्थ जाणण्यास तुम्ही उत्सुक असाल, पण त्यापूर्वी यांना जाणण्याचे प्रयोजन लक्षात घ्या.

शरीराचा स्पर्श, रस, गंध, वर्ण, आकार, गति, इंद्रिय, हाडांची रचना व बळकटी, चाल, आवाज इत्यादि अनेक गोष्टी नामकर्माच्या उदयाच्या निमित्ताने होतात हे लक्षात आल्याने 'शरीरच मी आहे' अशी अनादिची खोटी मान्यता आपोआपच नष्ट होते.

कर्मप्रकृतींची नावे पाठ करून स्वतःच्या बुध्दीची कसरत करून दाखविणे हे आपले प्रयोजन नसून या कर्मांच्या फलस्वरूप प्राप्त होणाऱ्या गोष्टींहून मी स्वतः भिन्न आहे असे भेदज्ञान करणे हेच एकमात्र प्रयोजन आहे.

शरीर भिन्न आहे, कर्म भिन्न आहे व जीव भिन्न आहे. प्रत्येकाचे स्वतःचे

परिणमन स्वतःमध्ये स्वतःच्या कारणाने होते, परंतु त्यांच्यामध्ये निमित्त नैमित्तिक संबंध आढळून येतो. त्यामुळे नामकर्मामुळे शरीराची रचना झाली किंवा जीवाने कर्म बांधले असे आपण म्हणतो. असे कथन केले असेल तरीदेखील प्रत्येक परमाणुची व प्रत्येक जीवाची स्वतंत्रता आपल्या ध्यानात असली पाहिजे.

तुम्ही म्हणाल, 'नामकर्माच्या कारणाने शरीराची विशिष्ट रचना होते असे तू म्हणत आहेस. आम्ही तर आजकाल प्रत्यक्ष पहातो - ऐकतो की आपले शास्त्रज्ञ (संशोधक) त्यांच्या प्रयोगशाळेमध्ये हव्या त्या वर्णादिच्या शरीरवाल्या जीवांची उत्पत्ति करीत आहेत. टेस्ट ट्यूब बेबी, क्लोन्स इत्यादि निर्माण होत आहेत, तर मग तुझ्या त्या कर्मांचे काय झाले?'

मुलींनो, सर्वप्रथम एक गोष्ट पक्की लक्षात ठेवा की कर्मासंबंधीचे हे ज्ञान किंवा कथन आपल्याला सर्वज्ञाकडून प्राप्त झालेले आहे. मी माझे स्वतःचे काहीदेखील कथन करत नाही.

दुसरी गोष्ट, शास्त्रज्ञांनी - वैज्ञानिकांनी जीवाची निर्मिती केली की शरीरादि पुद्‌गलाची? अस्तित्व गुण, जो सामान्य गुण असल्याकारणाने सर्व द्रव्यांमध्ये आढळतो, त्याच्या निमित्ताने द्रव्याचा कधीही नाश होत नाही व द्रव्य कधी कोणाद्वारे उत्पन्नही होत नाही. या विषयावर आपण विस्तृत चर्चा केली होती. यावरून हे सिध्द होते की वैज्ञानिकांनी ना जीवाला उत्पन्न केले व ना शरीराला उत्पन्न केले.

तो जीव अन्यत्र कोठेतरी मरून या ठिकाणी स्वतःच्या योग्यतेने जन्मला आहे. कधीही कोणताही जीव नव्याने उत्पन्नच होऊ शकत नाही.

तुम्ही म्हणाल, 'वैज्ञानिकांनी त्याच्या शरीराची रचना तरी आपल्या इच्छेनुसार करून दाखविलीच ना?'

शरीर पुद्‌गल स्कंध आहे. आहारवर्गणेपासून त्याची रचना होते. आहारवर्गणा अनंतानंत पुद्‌गल परमाणुंचा स्कंध आहे. तर मग तुम्ही आता मला हे सांगा की वैज्ञानिकांनी पुद्‌गल परमाणु उत्पन्न केले की त्यांचे स्पर्श, रस, गंध, वर्ण आदि गुण बनविले की त्यांच्या पर्याय बनविल्या?

तुम्ही म्हणाल, 'द्रव्य आणि गुणांना तर कोणी बनवित नाही, ते तर अनादिअनंत कायम रहातात. त्याअर्थी त्यांनी त्यांना हवी तशी पर्याय तयार केली. पहा ना, त्यांनी हिरव्या रंगाचा ससा उत्पन्न केला, शिवाय अगदी एकसारख्या मेंढ्या तयार केल्या.'

मुलींनो, आपण पूर्वीच हे शिकलो होतो व सिध्दही केले होते की प्रत्येक द्रव्याची अथवा गुणाची प्रत्येक पर्याय त्याच्या स्वसामर्थ्याने उत्पन्न होते व प्रत्येक द्रव्याच्या प्रत्येक गुणाच्या अनादिअनंत अवस्था सुनिश्चित आहेत. कोणतेही द्रव्य स्वतःचीही पर्याय करेल व दुसऱ्या द्रव्याचीही पर्याय करेल असे तीन काळात कधी होऊ शकत नाही. वैज्ञानिक स्वतःचेही (आत्म्याचे) कार्य करतील व त्यांच्या शरीराचेही कार्य करतील ही गोष्टदेखील असंभव आहे, तर मग ते दुसऱ्या जीवांचे शरीर त्यांच्या इच्छेनुसार हवे तसे बनवू शकतात ही मान्यता हे तर महामिथ्यात्वाचे द्योतक आहे.

वैज्ञानिक अर्थात संशोधक देखील शोध लावतात, पूर्वी माहित नसलेले माहित करून घेतात, काही बनवित नाहीत. ते ना तर नव्या द्रव्यांची निर्मिति करतात, ना त्यांच्यामध्ये नवे गुण घालतात आणि ना त्यांच्या पर्याय स्वतःच्या मर्जीनुसार बदलतात. ते तसे करूच शकत नाहीत.

वैज्ञानिकांची व त्यांच्या संशोधनाची तुम्ही प्रशंसा करीत आहात, अथवा तुम्हाला त्यांच्याबद्दल आदरभाव वाटतो, परंतु तुम्हाला हे माहित आहे का की महान हिंसापूर्वक हे क्लोन उत्पन्न केले जातात किंवा अन्य प्रयोग होतात?

ज्याला एम्ब्रियो (गर्भ) म्हणतात त्यातील विवक्षित पेशी-सेल्स किंवा टिश्यू काढून घेऊन त्यावर हे प्रयोग केले जातात. अनेक एम्ब्रियो व्यर्थ नष्ट केले जातात तेव्हा कोठे हवे तसे सेल्स किंवा टिश्यू मिळतात. एम्ब्रियो अर्थात गर्भ, मग तो आईच्या उदरात वाढत असो अथवा टेस्ट ट्यूबमध्ये परंतु तो तर एक पर्याप्त मनुष्यभव आहे. एक खून करणाऱ्याला कायद्यामध्ये शिक्षा अर्थात दंड दिला जातो परंतु संशोधनाच्या नावाखाली हजारो एम्ब्रियो पैदा करून नष्ट केले जातात. म्हणून अशा प्रकारच्या संशोधनाविषयी आदरबुध्दि बाळगणे हे महान हिंसेला अनुमोदना देण्यासारखे आहे, ज्यामध्ये हिंसेएवढेच पाप लागते.

तुम्ही दोघींनी 'एम्ब्रियॉलॉजी' या विषयाचा पूर्वी अभ्यास केला आहे. मोना, तू तर मेडिकलमध्ये हे शिकली आहेस व रीना तूदेखील चाइल्ड डेव्हलपमेंट विषयामध्ये हे शिकली आहेस. मला आठवतंय, रीनाने एक गोष्ट माझ्या निदर्शनास आणून दिली होती. त्यावर विचार करण्यास मला प्रवृत्त केले होते. गर्भनिरोधनासाठी कॉपरटीचा वापर करण्यात येतो, त्याच्यामुळे गर्भ गर्भशयात टिकू शकत नाही, पडून जातो. अर्थात गर्भधारणा तर होते परंतु प्रतिकूल परिस्थितिमुळे तेथे तो राहू शकत नाही. रीनाने त्यावेळी मला विचारले होते की कॉपरटी लावण्याचा सल्ला देणे हे गर्भपाताएवढेच महापाप आहे ना?

पहा बरं, एखाद्या विषयाची सविस्तर माहिती घेतली असता त्यातील योग्य अयोग्यतेचा निर्णय आपण स्वतः करू शकतो. येथेदेखील कर्माविषयी सविस्तर माहिती करून घेण्याचे प्रयोजन हेच आहे की त्याद्वारे कर्माहून भिन्न अशा निजशुध्दात्म्याची आपणास ओळख व्हावी. आजपर्यंत कर्माच्या उदयामुळे प्राप्त होणाऱ्या गोष्टींनाच आपण आपले स्वरूप व वैभव मानले होते. त्याहून मी कोणी भिन्न महान वैभवधारी पदार्थ आहे हे कधी जाणलेच नव्हते, त्याविषयी ऐकलेही नव्हते, त्यामुळे तसे मानलेही नव्हते.

नामकर्मामुळे शरीराची रचना होते हेदेखील निमित्ताचे कथन आहे. पूर्वी आपण शिकलो होतो की योगाच्या निमित्ताने जीव कर्माचे आणि नोकर्माचे ग्रहण करतो. जरा विचार करा की जोपर्यंत आपण मनुष्यगतिमध्ये आहोत तोपर्यंत औदारिक शरीराचे परमाणुच का ग्रहण करतो? वैक्रियिक जातीचे परमाणु का ग्रहण करीत नाही? गोरा माणूस गोऱ्या रंगाचेच परमाणु का ग्रहण करतो? काळा माणूस काळ्या रंगाचे परमाणुच का ग्रहण करतो?

याचे कारण आहे विशिष्ट नामकर्माचा उदय. मनुष्य आणि तिर्यंचांना औदारिक शरीर नामकर्माचा उदय असतो म्हणून ते औदारिक जातीचे परमाणु ग्रहण करतात. त्याचबरोबर विशिष्ट स्पर्श, रस, गंध, वर्ण नावाच्या नामकर्माच्या उदयामध्ये विशिष्ट त्याच प्रकारचे परमाणु ग्रहण केले जातात. परंतु याला नामकर्माच्या निमित्ताने होणारी पुद्‌गलाची अवस्था न जाणता अज्ञानी जीव यालाच आपले स्वरूप जाणतो व मानतो.

समयसार परिशिष्टावरील प्रवचनात पू. श्री कानजीस्वामीजी म्हणतात -

''अज्ञानी जीव स्वतःच्या अस्तित्वाला न ओळखता, न मानता, परद्रव्यांचे भाव अर्थात पर्यायच मी आहे असे मानतो. ज्ञानामध्ये तर अचेतन आणि चेतन असे दोन्ही भाव जाणले जातात परंतु अचेतन भाव अर्थात स्पर्शादि हेच माझे अस्तित्व आहे असे अज्ञानी मानतो. माझे शरीर, माझा फोटो, माझे घर, माझे कपडे असेच याने आजपर्यंत मानले आहे आणि या गोष्टी मिळविण्यात व टिकविण्यातच याचे अनंत भव बरबाद झाले आहेत. स्वतःमध्ये ज्ञान, दर्शन, आनंद, शांति आदि अनंत भाव आहेत त्यांना न मानता अचेतन भाव स्वतःचे मानून हा अज्ञानी अचेतन झाला आहे, त्याने स्वतःच्या चैतन्याचा नाश केला आहे'' - आत्महत्या केली आहे. आत्मघाती तर महापापी असतो होय ना? ते पुढे म्हणतात, ''ज्ञानी धर्मी जीव मानतात की स्वभाव आणि परभाव यांना जाणणारा मी आहे. परंतु मी परभावरूप नाही. स्वतःच्या ज्ञानात - आपल्या भावामध्ये परभाव जाणले जातात हा आपला स्वतःचा भाव आहे.''

या गोष्टी ध्यानात ठेवून आता आपण नामकर्माच्या त्र्याण्णव उत्तरप्रकृतींचे स्वरूप व त्यांचे कार्य याविषयी चर्चा करूया. मला माहित आहे की तुम्हीदेखील ते जाणण्यासाठी उत्सुक आहात. पुढे लब्धिच्या प्रकरणामध्ये या प्रकृतींबद्दल चर्चा येईल त्यावेळी गोंधळ होऊ नये यासाठी आताच याविषयीची चर्चा करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**गति नामकर्म** - ज्याच्या उदयाने आत्मा एका पर्यायातून दुसऱ्या पर्यायात जातो, गमन करतो त्यास गति नामकर्म म्हणतात. ज्याच्या उदयाने नरकपर्याय होते ते नरकगति नामकर्म आहे. ज्याच्या उदयाने तिर्यंचपर्याय होते ते तिर्यंच गति नामकर्म आहे. ज्याच्या उदयाने मनुष्यपर्याय होते ते मनुष्यगति नामकर्म आहे व ज्याच्या उदयाने देवपर्याय होते ते देवगति नामकर्म आहे.

**जाति नामकर्म** - जाति नामकर्म पाच प्रकारचे आहे - एकेंद्रिय जाति, द्वींद्रिय जाति, त्रींद्रिय जाति, चतुरिंद्रिय जाति व पंचेंद्रिय जाति नामकर्म. जे काही एकेंद्रिय जीव आहेत त्यांच्यामध्ये एकेंद्रिय अस्तित्वाच्या अपेक्षेने समानता आहे, याला सादृश्यभाव म्हणतात. एकेंद्रिय आणि द्वींद्रिय एकसमान होऊन एकमेकात मिसळत नाहीत - एकमेकांसारखे होऊ शकत नाहीत म्हणून त्याला

अव्यभिचारी म्हटले आहे. अव्यभिचारी सादृश्यभावाच्या आधारे जीव एकत्रित केले जातात, त्यांचा ग्रुप केला जातो त्यास 'जाति' असे म्हणतात.

ज्या कर्माच्या उदयामध्ये जीव एकेंद्रिय म्हटला जातो ते एकेंद्रिय जाति नामकर्म आहे. सध्या आपला पंचेंद्रियजाति नामकर्माचा उदय चालू आहे व आपण पंचेंद्रिय जीव म्हटले जातो.

पहा बरं, आपल्या रागद्वेषादि परिणामांमुळे वेगवेगळ्या समयी वेगवेगळी गति, जाति, इत्यादि नामकर्म बांधली जातात आणि त्या कर्माच्या उदयामध्ये तशी अवस्था प्राप्त होते. जीवत्व शक्तीच्या अपेक्षेने सर्व जीव समान असले तरी विविध जीव विविध पर्यायांमध्ये आढळतात - चार गति व पाच जातिंमध्ये आढळतात. जीवाच्या या विविध पर्याय तर आपण प्रत्यक्ष पहातो. काही लोक तर कर्माच्या अस्तित्वालाच नाकारतात. आठ कर्मांच्या उदयामध्ये जीवांना जे वेगवेगळे फळ मिळते, वेगवेगळे संयोग मिळतात त्यांच्या आधारे कर्माचे अस्तित्व सहज सिध्द होते.

**शरीर नामकर्म :** ज्याच्या उदयामध्ये शरीराची उत्पत्ति होते ते शरीर नामकर्म आहे. हे पाच प्रकारचे आहे -

(१) औदारिकशरीर नामकर्म (२) वैक्रियिकशरीर नामकर्म
(३) आहारकशरीर नामकर्म (४) तेजसशरीर नामकर्म
(५) कार्माणशरीर नामकर्म.

**बंधन नामकर्म :** त्या त्या शरीराच्या नावाचे बंधन नामकर्म आहे. हेदेखील पाच प्रकारचे आहे -

(१) औदारिकबंधन नामकर्म (२) वैक्रियिकबंधन नामकर्म
(३) आहारकबंधन नामकर्म (४) तेजसबंधन नामकर्म
(५) कार्माणबंधन नामकर्म.

शरीर नामकर्माच्या उदयामध्ये आहारवर्गणादिरूप पुद्गल स्कंधांचे ग्रहण केले जाते. त्यांच्या प्रदेशांचा परस्पर संश्लेष संबंध ज्याच्या उदयामध्ये होतो ते बंधन नामकर्म आहे.

**संघात नामकर्म :** ज्याच्या उदयामध्ये औदारिकादि शरीर छिद्ररहित एकक्षेत्रावगाहरूपाने एकत्वपणा प्राप्त करते त्यास औदारिकादि संघात नामकर्म म्हणतात. शरीरांच्या नावाचीच ही पाच संघात नामकर्म आहेत.

(१) औदारिकसंघात नामकर्म (२) वैक्रियिकसंघात नामकर्म

(३) आहारकसंघात नामकर्म (४) तेजससंघात नामकर्म

(५) कार्माणसंघात नामकर्म.

**संस्थान नामकर्म :** ज्याच्या उदयामध्ये औदारिकादि शरीरांचा आकार उत्पन्न होतो त्यास संस्थान नामकर्म म्हणतात. हे सहा प्रकारचे आहे.

(१) समचतुरस्र संस्थान - समान चौकोर आकार - बांधेसूद आकार.

(२) न्यग्रोधपरिमंडल संस्थान - वडाच्या झाडाप्रमाणे वरचा भाग मोठा व खालचा भाग बारीक.

(३) स्वाति संस्थान - वरचा भाग बारीक व खालचा भाग मोठा.

(४) कुब्जक संस्थान - कुबडा.

(५) वामन संस्थान - ठेंगणा.

(६) हुंडक संस्थान - अनेक अवक्तव्य आकार.

**अंगोपांग नामकर्म :** ज्याच्या उदयामध्ये शरीरात अंग व उपांग असे भेद होतात, ते अंगोपांग नामकर्म आहे. स्थावर, एकेंद्रिय जीवांना याचा उदय नसतो, फक्त त्रस जीवांना असतो. अंग म्हणजे मुख्य अवयव - हात, पाय, डोके इत्यादि आणि उपांग म्हणजे बोटं वगैरे छोटे अवयव. या कर्माचे तीन भेद आहेत-

(१) औदारिक अंगोपांग (२) वैक्रियिक अंगोपांग (३) आहारक अंगोपांग.

**संहनन नामकर्म :** संहनन शब्द तुम्ही बऱ्याच वेळा ऐकला असेल, आता त्याचा अर्थ तुमच्या नीट लक्षात येईल. ज्याच्या उदयामध्ये हाडांची विशिष्ट बळकटी व त्यांच्या बंधनाचे वैशिष्ट्य आढळते त्यास संहनन नामकर्म म्हणतात. संहनन म्हणजे हाडांचा समूह. संहनन नामकर्म सहा प्रकारचे आहे, त्याच्या उदयामध्ये सहा प्रकारचे संहनन प्राप्त होते. संहनन नामकर्माचा उदय मनुष्य आणि द्वींद्रियादि तिर्यंचांमध्येच असतो, एकेंद्रिय जीव व देव, नारकी जीवांमध्ये याचा उदय नसतो.

(१) वज्रवृषभनाराच संहनन : ज्या शरीरामध्ये वज्रमय हाडे, वज्रमय

वेष्टनाद्वारे वेष्टित आहेत व वज्रमय नाराच द्वारे कीलित आहेत त्यास वज्रवृषभनाराच संहनन म्हणतात. जे वज्रासमान अभेद्य आहे त्यास वज्र म्हणतात. वृषभ म्हणजे त्याचे बंधन आणि नाराच म्हणजे खिळा. जसे लोखंडी खिळा लाकडात ठोकतात, तसे हाडांचे सांधे नाराचद्वारे कीलित असतात.

(२) वज्रनाराच संहनन : ज्या शरीरात हाडे तर वज्रासारखी आहेत पण वज्राचे वृषभ नाही परंतु सामान्य वृषभ आहे, परंतु नाराच वज्रासारखे आहे त्यास वज्रनाराच संहनन म्हणतात.

(३) नाराच संहनन : ज्या शरीरात हाडांचे सांधे सामान्य नाराचद्वारे कीलित आहेत परंतु वज्रासमान नाराचद्वारे कीलित नाहीत, त्यास नाराच संहनन म्हणतात.

(४) अर्धनाराच संहनन : ज्या शरीरामध्ये हाडांचे सांधे नाराचद्वारे अर्धकीलित आहेत, त्यास अर्धनाराच संहनन म्हणतात.

(५) कीलित संहनन : ज्या शरीरात वज्राची हाडे नाहीत व ती परस्पर कीलित आहेत, त्यास कीलित संहनन म्हणतात.

(६) असंप्राप्तासृपाटिका संहनन : ज्या शरीरामध्ये हाडे परस्पर प्राप्त होत नाहीत, सरीसृपाच्या हाडांप्रमाणे शिरांनी जी हाडे परस्पर बांधलेली आहेत त्याला असंप्राप्तासृपाटिका संहनन म्हणतात.

पूर्वी आपण 'कारण कार्य रहस्य' पुस्तकाच्या निमित्त उपादान या प्रकरणात पाहिले होते की चरमशरीरधारी जीवांना अर्थात त्याच भवातून मोक्षाला जाणाऱ्या जीवांना पहिले अर्थात वज्रवृषभनाराच संहनन असते, त्या जीवांना त्या विशिष्ट नामकर्माचा उदय असतो. परंतु ते संहनन त्यांना मोक्षप्राप्तिमध्ये मदत करीत नाही. सातव्या नरकात जाणाऱ्या जीवांना - मनुष्य किंवा तिर्यंचांना देखील वज्रवृषभनाराच संहनन असते.

स्त्रियांमध्ये शेवटच्या तीन संहननांपैकी एक संहनन असते. त्याच स्त्री पर्यायातून त्या मोक्षालाही जाऊ शकत नाहीत तसेच सहाव्या नरकाच्या पुढे म्हणजे सातव्या नरकातदेखील जाऊ शकत नाहीत. करणानुयोगाचा असा अकाट्य नियम असूनदेखील स्त्री पर्यायातून मोक्ष होतो असे मानणे हे महान अज्ञानाचे द्योतक आहे.

सध्या येथे भरतक्षेत्रामध्ये पंचमकाळ - दुखमाकाळ चालू आहे. या काळातील मनुष्यांना व तिर्यंचांना शेवटच्या तीन संहननांपैकीच एखादे संहनन असते. त्यामुळे पंचमकाळातील मुनि श्रेणी चढण्याचा पुरुषार्थ करू शकत नाहीत. त्याचप्रमाणे ग्रैवेयकामध्ये जाणारे मुनिदेखील उत्तमसंहननधारी (पहिल्या तीन संहननाचे धारक) जीवच असतात.

दुसऱ्या व तिसऱ्या संहननाचे धारक जीव उपशम श्रेणी चढून अकराव्या गुणस्थानापर्यंतचा पुरुषार्थ करू शकतात, परंतु क्षपकश्रेणी चढू शकत नाहीत. असेच निमित्त नैमित्तिक संबंध बनतात.

एक गोष्ट पुन्हा सांगू इच्छिते की कोणतेही संहनन जीवाला पुरुषार्थामध्ये साधकही नाही, तसेच बाधकही नाही. जीव आणि शरीर यांचा तर एकमेकात अत्यंताभाव आहे.

**स्पर्श, रस, गंध, वर्ण नामकर्म** - ज्या कर्माच्या उदयाच्या निमित्ताने शरीरामध्ये विशिष्ट स्पर्श, रस, गंध, वर्ण आढळतो त्यास अनुक्रमे स्पर्शनामकर्म, रसनामकर्म, गंधनामकर्म आणि वर्णनामकर्म म्हणतात.

पुद्गल द्रव्याच्या स्पर्शादि गुणांच्या वीस पर्याय आपण शिकलो होतो, आठवतंय? त्यामध्ये स्पर्श गुणाच्या आठ पर्याय, रस गुणाच्या पाच पर्याय, गंध गुणाच्या दोन पर्याय आणि वर्ण गुणाच्या पाच पर्याय आहेत. त्या नावांच्या पुढे नामकर्म असे जोडले की वीस नामकर्म होतात. ते खालीलप्रमाणे आहे -

स्पर्शनामकर्म आठ प्रकारचे आहे - कर्कशनाम, मृदुनाम, गुरुनाम, लघुनाम, शीतनाम, उष्णनाम, स्निग्धनाम, रुक्षनाम.

रसनामकर्म पाच प्रकारचे आहे - तिक्तनाम, कटुकनाम, कषायनाम, आम्लनाम, मधुरनाम.

गंधनामकर्म दोन प्रकारचे आहे - सुरभिगंधनाम, दुरभिगंधनाम.

वर्णनामकर्म पाच प्रकारचे आहे - कृष्णवर्णनाम, नीलवर्णनाम, रक्तवर्णनाम, पीतवर्णनाम, श्वेतवर्णनाम.

**गत्यानुपूर्वी नामकर्म** : याचे कार्य पहाल तर तुम्हालाही हसू येईल. गतिनामकर्माबरोबर त्या त्या नावाचे गत्यानुपूर्वी अर्थात गतिप्रायोग्यानुपूर्वी नामकर्मदेखील बांधले जाते. जीव प्रत्येक समयामध्ये कोणती ना कोणती गति

व गत्यानुपूर्वी कर्म बांधतच असतो. मनुष्यगति ज्याला बांधली जाते त्याबरोबर मनुष्यगत्यानुपूर्वीचा बंध होतो, तद्वतच दुसऱ्या गतिसंबंधीदेखील जाणावे.

परंतु मजेची गोष्ट अशी आहे की गतिनामकर्माचा उदय तर प्रत्येक समयात चालू असतो. परंतु गत्यानुपूर्वीचा उदय फक्त विग्रहगतिमध्येच असतो. त्यामुळे याला क्षेत्रविपाकी कर्म म्हणतात. विपाक म्हणजे कर्माचे फळ अथवा उदय. दुसरा भव धारण करण्यासाठी जीव गमन करतो फक्त त्याचवेळी याचा उदय विद्यमान असतो.

या कर्माचे कार्य काय आहे असे विचाराल तर याच्या निमित्ताने जीवाचा पूर्वीच्या भवातील आकार विग्रहगतिमध्ये कायम रहातो. तसेच नव्या गतिमध्ये जीवाला घेऊन जाण्याचे कार्यदेखील या कर्माचे आहे.

नीट नाही ना समजले? थांबा, पुनः सांगते. या कर्माचे चार प्रकार आहेत - मनुष्यगत्यानुपूर्वी, देवगत्यानुपूर्वी, तिर्यंचगत्यानुपूर्वी, नरकगत्यानुपूर्वी.

जो जीव अन्यत्र मरून मनुष्यगतिमध्ये जन्म घेण्यासाठी गमन करतो त्याला विग्रहगतिमध्ये मनुष्यगत्यानुपूर्वी कर्माचा उदय असतो. समजा, एखादा कुत्रा मेला व तो मनुष्यगतिमध्ये जन्म घेणार आहे. विग्रहगतिच्या पहिल्या समयापासूनच त्याची मनुष्यायु चालू होते, मनुष्यायुचा उदय सुरू होतो, मनुष्यगति नामकर्माचा उदय देखील चालू होतो. परंतु मनुष्यगत्यानुपूर्वी नामकर्माच्या उदयाने त्याच्या पूर्वभवाचा अर्थात कुत्र्याचा आकार कायम रहातो. मनुष्यशरीर धारण करण्याच्या पहिल्या समयापासून त्याचा मनुष्य आकार होतो. आहे ना मजेची गोष्ट?

मी जर तुम्हाला विचारले की कुत्र्याच्या आकाराचा मनुष्य कोठे आढळतो अथवा मनुष्याच्या आकाराचा घोडा कोठे आढळतो, तर तुम्ही आता गोंधळून जाणार नाही, होय ना? आगमचक्षुद्वारे अर्थात आगमरूपी नेत्रांद्वारे आपण या सर्व गोष्टी स्पष्टपणे पाहू शकतो, अर्थात जाणू शकतो. कुत्रा मरून विग्रहगतिच्या पहिल्या समयापासूनच मनुष्य जीव म्हटला जातो कारण त्याच्या मनुष्यायुचा व मनुष्यगतिचा उदय सुरू होतो तरीदेखील त्याचा आकार कुत्र्याचाच रहातो. त्याचप्रमाणे जेव्हा मनुष्य मरून घोडा होतो तेव्हा विग्रहगतिमध्ये तो घोडा जीव आहे परंतु तेथे त्याचा पूर्वीचा मनुष्य आकार कायम रहातो.

गत्यानुपूर्वी नामकर्माचा उदय विग्रहगतिमध्ये अर्थात मोडवाल्या गतिमध्ये

असतो परंतु ऋजुगतिने जाणाऱ्या अर्थात सरळ एका दिशेला गमन करून त्याच समयात दुसऱ्या भवामध्ये पोहोचणाऱ्या जीवामध्ये याचा उदय नसतो.

तुम्ही विचाराल, 'असे का बरे ? आणि मग त्याला त्या विशिष्ट गतिसंबंधी आकार केव्हा प्राप्त होतो ?'

दोन्ही प्रश्नांचे उत्तर एकच आहे. ते असे आहे की संस्थान नामकर्माच्या उदयाने त्या विशिष्ट गतिसंबंधी आकार प्राप्त होतो. आहारपर्याप्तिच्या पहिल्या समयापासूनच संस्थान नामकर्माचा उदय सुरू होतो आणि नवा आकार प्राप्त होतो. असे समजू नका की जेथे जन्म घेणार आहे तेथे शरीर तयार असते व जीव तेथे जाऊन त्यामध्ये प्रवेश करत असतो. जीर्ण वस्त्राचा त्याग करून कोणी नवे वस्त्र - रेडिमेड अर्थात तयार वस्त्र धारण करतो, त्याप्रमाणे रेडिमेड शरीर नसते.

जीव शरीरासंबंधीच्या परमाणुंना ग्रहण करतो आणि ते परमाणु पिंडरूप होऊन त्या आकारामध्ये परिणमित होतात. हे जीवा! शरीराच्या आकारावर मोहित होऊ नकोस, त्याच्या स्पर्शादिंना स्वतःचे स्वरूप मानू नकोस. त्याचे उपादान तर आहारवर्गणा आहे आणि निमित्त कर्माचा उदय आहे. तुमचा व त्यांचा कोणताही संबंध नाही. त्यांना चांगल्याप्रकारे ओळखून स्वतःपासून ते भिन्न आहेत असे जाण.

**विहायोगति नामकर्म** : विहाय म्हणजे आकाश. आकाशामध्ये गमन ही विहायोगति आहे परंतु त्याचा अर्थ पक्ष्याप्रमाणे आकाशात उडणे किंवा विग्रहगतिमध्ये गमन करणे असा होत नाही. कारण विग्रहगतिमध्ये व अपर्याप्त अवस्थेमध्ये या कर्माचा उदयच नसतो. विहायोगतिचा अर्थ आहे 'चाल'. उदाहरणार्थ - हत्तीची चाल, बदकाची चाल वगैरे.

या कर्माचे दोन भेद आहेत (१) प्रशस्त विहायोगति अर्थात मनोज्ञ चाल व (२) अप्रशस्त विहायोगति अर्थात अमनोज्ञ चाल.

अशाप्रकारे आपण चौदा पिंड प्रकृति पाहिल्या - गति ४, जाति ५, शरीर ५, बंधन ५, संघात ५, संस्थान ६, अंगोपांग ३, संहनन ६, स्पर्श, रस, गंध, वर्ण २०, गत्यानुपूर्वी ४ आणि विहायोगति २. या सर्व मिळून ६५ उत्तरप्रकृति आहेत.

आता उरलेल्या अपिंड प्रकृतींची माहिती पुढील पत्रामध्ये पाहूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# कर्म - उत्तरप्रकृति भाग २

**पत्रांक ३** १६ जून २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

नामकर्माच्या उत्तरप्रकृतींची एवढी सगळी नवी नावे ऐकून तुम्ही चिंता व्यक्त केली आहे की हे सर्व लक्षात कसे ठेवणार, पाठ कसे करणार? मुलींनो, चिंता करण्याचे काही कारण नाही. चिंता करण्याने काही पाठ तर होणार नाही. हां, हे वाचत असताना यांचे स्वरूप लक्षात येते की नाही? बस्स, एवढेच पुरेसे आहे. भविष्यात जेव्हा कधी एखाद्या प्रकृतीचे नाव कसल्यातरी संदर्भात येईल तेव्हा पाने उलटून या पत्रामध्ये पुन्हा वाचू तरी शकाल ना?

पिंडप्रकृति पाहिल्यानंतर आता अपिंडप्रकृतिंविषयी चर्चा करूया.

अगुरुलघु, उपघात, परघात व उच्छ्वास या चार प्रकृतींना समूहरूपाने लक्षात ठेवणे सोपे आहे. त्यांचे कार्य काय आहे ते आता पाहूया.

**अगुरुलघु नामकर्म** : या कर्माच्या उदयाने शरीर लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे अति जड होत नाही व शेवरीच्या कापसाप्रमाणे अति हलके होऊन उडून जात नाही. म्हणून याला अगुरु आणि अलघु मिळून अगुरुलघु म्हणतात.

**उपघात नामकर्म** : स्वयं प्राप्त होणाऱ्या घातास उपघात किंवा आत्मघात म्हणतात. ज्या कर्माच्या उदयामध्ये शरीराचे अवयव जीवाला पीडादायक बनतात त्याला उपघात नामकर्म म्हणतात. मोठी लांब शिंगे, मोठी स्तनं, गलेलठ्ठ पोट इत्यादि अवयव जीवाला पीडादायक आहेत.

**परघात नामकर्म** : परजीवाच्या घातास परघात म्हणतात. ज्या कर्माच्या उदयामुळे शरीरामध्ये दुसऱ्या जीवाचा घात करण्यास कारणभूत असे पुद्गल निष्पन्न होते, त्या कर्मास परघात नामकर्म म्हणतात, जसे सापाच्या दाढेमध्ये विष, विंचवाच्या नांगीमध्ये दुसऱ्याच्या दुःखास कारणभूत पुद्गलाचा संचय; सिंह, वाघ, चित्ता इत्यादिंमध्ये तीक्ष्ण नखं व दात, तसेच काही वृक्षांमध्ये विषारी फळं या गोष्टी परघात नामकर्माच्या उदयाने प्राप्त होतात.

**उच्छ्वास नामकर्म :** ज्या कर्माच्या उदयामुळे जीव श्वासोश्वासरूप कार्य करण्यास समर्थ होतो त्यास उच्छ्वास नामकर्म म्हणतात.

**आतप नामकर्म :** ज्या कर्माच्या उदयामध्ये शरीरात आतप अर्थात उष्णतायुक्त प्रभा उत्पन्न होते त्यास आतप नामकर्म म्हणतात. सूर्य विमानाच्या बादर पृथ्वीकायिक जीवांमध्ये याचा उदय आढळतो.

**उद्योत नामकर्म :** ज्या कर्माच्या उदयामध्ये शरीरात उद्योत अर्थात उष्णतारहित प्रभा उत्पन्न होते त्यास उद्योत नामकर्म म्हणतात. पृथ्वीकायिक (चन्द्रबिम्ब), जलकायिक व प्रत्येक वनस्पति या बादर एकेंद्रियांमध्ये तसेच द्वींद्रियापासून पंचेंद्रियापर्यंतच्या काही तिर्यंचांमध्ये (काजवा वगैरे) या कर्माचा उदय आढळतो.

तुम्ही विचाराल, 'अग्निकायिक जीवांमध्ये आतप नामकर्माचा उदय असेल, कारण अग्निमध्ये उष्णतादेखील आहे व प्रकाशदेखील आहे.'

अग्निकायिक जीवांना आतप नामकर्माचा उदय नसतो. त्यांच्यामध्ये उष्णता असली तरी त्यास आतप म्हणत नाहीत, तेज म्हणतात. उष्णस्पर्श नामकर्माच्या उदयाने ही उष्णता असते. सूर्यबिम्बामध्ये जे पृथ्वीकायिक जीव आहेत त्यांच्या सर्वांग उष्णतारूप प्रभेस आतप म्हणतात. त्याचप्रमाणे चंद्रबिम्बाच्या उष्णतारहित प्रभेस उद्योत म्हणतात.

तिर्यंचगतिच्या एकेंद्रिय, पर्याप्त, बादर पृथ्वीकायिकांमध्येच आतप नामकर्माचा उदय आढळू शकतो. सूक्ष्म जीवांना, अग्निकायिकांना, वायुकायिकांना, अपर्याप्तांना, वनस्पतिकायिकांना, तसेच त्रस जीवांना आतप नामकर्माचा उदय नसतो.

उद्योत नामकर्माचा उदयदेखील एकेंद्रिय बादर पर्याप्त पृथ्वीकायिक, जलकायिक व प्रत्येक वनस्पति तसेच पर्याप्त द्वींद्रियांपासून संज्ञी पंचेद्रियांपर्यंत काही जीवांमध्येच आढळतो. दुसऱ्या कोणत्याही गतिमधील जीवांना आतप किंवा उद्योत कर्माचा उदय असत नाही.

बस्स, आता अगदी थोड्या प्रकृति पहायच्या बाकी राहिल्या आहेत. यात्रेमध्ये पहाड चढताना शेवटच्या थोड्याच पायऱ्या उरतात व वरची मंदिरं दिसू

लागतात, तेव्हा हुश्श म्हणून आपण नव्या हुरुपाने चढण्यास सुरुवात करतो. तसेच आता फक्त बावीस प्रकृति उरल्या. त्यामध्ये दहा जोड्या आहेत - चार जोड्यांचा एक समूह (ग्रुप) आणि सहा जोड्यांचा दुसरा समूह व उरलेल्या दोन प्रकृति - तीर्थंकर व निर्माण. आता त्यांची नावे पाहूया.

त्रस-स्थावर, बादर-सूक्ष्म, पर्याप्त-अपर्याप्त, प्रत्येक-साधारण अशा चार जोड्यांमध्ये एकावेळी प्रत्येक जोडीतील यथायोग्य एक प्रकृतीचा उदय असतो.

**त्रस नामकर्म :** द्वीन्द्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंतच्या जीवांना त्रस म्हणतात. त्रस नामकर्माच्या उदयाने जीव त्रसपर्यायात जन्म घेतो.

**स्थावर नामकर्म :** पाच प्रकारच्या एकेंद्रियांना स्थावर म्हणतात. स्थावर नामकर्माच्या उदयाने जीव एकेंद्रिय पर्यायामध्ये जन्म घेतो.

**बादर नामकर्म :** बादर नामकर्माच्या उदयाने असे शरीर प्राप्त होते की जे दुसऱ्याकडून रोकले जाते व जे स्वतः दुसऱ्यास रोकते. बादर शरीर भिंतीतून किंवा इतर घन पदार्थातून आरपार जाऊ शकत नाही व त्या शरीरातून अन्य गोष्टी आरपार जाऊ शकत नाहीत. द्वीन्द्रियादिक सर्व जीव बादरच असतात. एकेंद्रियांमध्ये बादर व सूक्ष्म दोन्ही प्रकारचे जीव असतात.

**सूक्ष्म नामकर्म :** सूक्ष्म नामकर्माच्या उदयाने असे शरीर प्राप्त होते की जे दुसऱ्या पदार्थांद्वारे रोकले जाऊ शकत नाही आणि जे स्वतः दुसऱ्यास रोकत नाही - प्रतिबंध करत नाही. सूक्ष्म आणि बादर जीवांबद्दल विस्तृत चर्चा आपण 'करणानुयोग परिचय' मध्ये केली होती. तेथे पर्याप्त, अपर्याप्त जीव तसेच सहा पर्याप्ति यांविषयीदेखील सविस्तर चर्चा केली होती.

**पर्याप्त नामकर्म :** पर्याप्त नामकर्माच्या उदयाने आहारादि सहा पर्याप्ति उत्पन्न होतात, त्यांची नियमाने पूर्णता होते. पर्याप्ति म्हणजे पूर्ण होणे. या पर्याप्तिंची नावे आपण पाहिलीच आहेत, ती अशी - आहारपर्याप्ति, शरीरपर्याप्ति, इंद्रियपर्याप्ति, श्वासोच्छ्वास पर्याप्ति, भाषापर्याप्ति व मनपर्याप्ति.

**अपर्याप्त नामकर्म :** अपर्याप्त नामकर्माच्या उदयाने एकही पर्याप्ति पूर्ण होत नाही, जीव त्यापूर्वीच मरतो. सर्व पर्याप्ति सुरू तर होतात परंतु पूर्णता तर

एका पर्याप्तिची देखील होत नाही. या जीवांना लब्धि अपर्याप्तक - लब्ध्यपर्याप्तक जीव म्हणतात. ते एका श्वासाच्या अठराव्या भागात मरतात. त्यांचा एक भव इतका छोटा असल्यामुळे त्याला क्षुद्रभव असे म्हणतात. एकेंद्रियांपासून संज्ञी पंचेंद्रियांपर्यंत अपर्याप्त जीव आढळतात.

प्रत्येक व साधारण हे शरीराचे प्रकार आहेत. प्रत्येक शरीर जीव अर्थात एका शरीराचा स्वामी एक जीव असतो आणि साधारण जीव अर्थात एका शरीरात अनंत जीव एकावेळी रहातात - अनंत जीवांमध्ये एकच औदारिक शरीर असते.

प्रत्येक आणि साधारण हे भेद वनस्पतिकायिकांमध्येच असतात. अन्य एकेंद्रिय व सर्व त्रस जीव हे प्रत्येकशरीर जीवच असतात.

**प्रत्येक नामकर्म :** प्रत्येक नामकर्माच्या उदयाने प्रत्येक शरीराची प्राप्ति होते.

**साधारण नामकर्म :** साधारण नामकर्माच्या उदयाने साधारण शरीराची प्राप्ति होते. निगोद जीवांना साधारण नामकर्माचा उदय असतो. निगोदामध्येदेखील सूक्ष्म व बादर असे भेद असतात.

आता पुढच्या ज्या सहा जोड्या आहेत त्यांची नावे अशी आहेत -

स्थिर-अस्थिर, शुभ-अशुभ, सुभग-दुर्भग, सुस्वर-दुस्वर,

आदेय-अनादेय, यशस्कीर्ति-अयशस्कीर्ति. त्या प्रत्येकाचे स्वरूप पाहूया.

**स्थिर नामकर्म :** स्थिर नामकर्माच्या उदयाने शरीराचे धातु व उपधातु आपापल्या जागी रहातात. धातु म्हणजे सोने, चांदी, पितळ वगैरे धातु नव्हेत. मनुष्य व तिर्यंचांचे शरीर सप्तधातुंनी युक्त असते त्या धातुंविषयी आपण विचार करत आहोत.

सात धातु असे आहेत - रस, रुधिर, मांस, मेद, हाडं, मज्जा, व शुक्र. ते याच अनुक्रमाने परिणमतात. स्थिर नामकर्माच्या उदयाने रसादिक धातु काही काळापर्यंत स्वतःच्या रूपात अवस्थित रहातात. सात उपधातु अशाप्रकारे आहेत - वात, पित्त, श्लेष्म, शिरा, स्नायु, चर्म, उदराग्नि.

**अस्थिर नामकर्म :** अस्थिर नामकर्माच्या उदयाने धातु व उपधातु आपल्या जागी स्थिर न रहाता चलायमान होतात, रसादिक धातुंचे पुढच्या धातुरूपाने परिणमन होते.

**शुभ नामकर्म :** शुभ नामकर्माच्या उदयाने शरीराचे अवयव - मस्तकादिक प्रशस्त होतात - मनोज्ञ अर्थात रमणीक होतात.

**अशुभ नामकर्म :** अशुभ नामकर्माच्या उदयाने शरीराचे अवयव - मस्तकादिक अप्रशस्त होतात अर्थात अमनोज्ञ - अरमणीक होतात.

**सुभग नामकर्म :** सुभग नामकर्माच्या उदयाने अन्य लोक या जीवावर प्रीति करतात.

**दुर्भग नामकर्म :** दुर्भग नामकर्माच्या उदयाने अन्य लोक या जीवावर प्रीति करत नाहीत. रूपादिक गुणसंयुक्त असूनदेखील ते याच्यावर अप्रीति करतात.

**सुस्वर नामकर्म :** सुस्वर नामकर्माच्या उदयाने मनोज्ञ अर्थात सुरेल आवाज किंवा शब्द उपजतो.

**दुस्वर नामकर्म :** दुस्वर नामकर्माच्या उदयाने अमनोज्ञ अर्थात कर्कश स्वर किंवा शब्द उपजतो.

**आदेय नामकर्म :** आदेय नामकर्माच्या उदयाने प्रभासहित अर्थात कांतिसहित शरीर उपजते.

**अनादेय नामकर्म :** अनादेय नामकर्माच्या उदयाने प्रभारहित अर्थात कांतिरहित शरीर उपजते.

**यशस्कीर्ति नामकर्म :** यशस्कीर्ति नामकर्माच्या उदयाने आपले पुण्यरूप पवित्र गुण जगामध्ये प्रकट होतात अर्थात यश होते.

**अयशस्कीर्ति नामकर्म :** अयशस्कीर्ति नामकर्माच्या उदयाने जगामध्ये आपले अपयश प्रकट होते.

चला, आता फक्त दोनच प्रकृति राहिल्या.

**निर्माण नामकर्म :** निर्माण नामकर्माच्या उदयाने शरीराचे अवयव यथायोग्य उपजतात. याचे दोन भेद आहेत - स्थान निर्माण व प्रमाण निर्माण.

जाति नामकर्माच्या सापेक्षतेने नेत्रादिक अवयव ज्या ठिकाणी असायला पाहिजेत त्याच ठिकाणी उत्पन्न होतात त्यामध्ये स्थाननिर्माण नामकर्म निमित्त आहे. जसे, माशांचे डोळे विशिष्ट ठिकाणी असतात तर बेडकाचे डोळे विशिष्ट ठिकाणी तर मनुष्याचे डोळे त्यांच्या योग्य विशिष्ट ठिकाणी असतात.

प्रमाणनिर्माण नामकर्माच्या उदयाने नेत्रादिकांचे जे प्रमाण आहे, जी संख्या आहे, त्याच संख्येमध्ये ते अवयव बनतात.

**तीर्थंकर नामकर्म :** तीर्थंकर नामकर्माच्या उदयामुळे जीव तीर्थंकर होतो. त्यांची दिव्यध्वनि खिरते, समवशरणाची रचना होते व अन्य अनेक अतिशय होतात.

नामकर्माच्या या त्र्याण्णव प्रकृतींचे वर्णन वाचून तुम्ही कोणत्या प्रकृति बांधण्याचा विचार करू लागलात? इतर प्रकृति नाही पण तीर्थंकर प्रकृति तरी बांधणे योग्य आहे की नाही? याचा निर्णय तर प्रथम करावयास हवा. या प्रकृतींची नावे माहित नसतील तरी काही हरकत नाही परंतु सर्वात महत्त्वाची एक गोष्ट निर्णयपूर्वक जाणणे अति आवश्यक आहे. ती अशी की 'कोणतेही कर्म बांधण्यायोग्य नाही.'

कोणत्याही कर्माच्या फळामध्ये अर्थात त्याच्या उदयामुळे प्राप्त होणाऱ्या गोष्टींमध्ये ज्याला रुचि आहे, त्यामध्ये सुखबुध्दि आहे, तो उदय मला प्राप्त होईल तर किती चांगले अशी ज्याची बुध्दि आहे, तो कर्माचे बंधन उपादेय मानतो - कर्मबंध करण्यायोग्य मानतो. ही त्याची मिथ्याबुध्दि आहे. बंधतत्त्वासंबंधी व सातही प्रयोजनभूत तत्त्वांसंबंधी त्याची ही विपरीत मान्यता आहे.

नामकर्माच्या उत्तर प्रकृतिंपैकी काही प्रकृति प्रशस्त आहेत - पुण्यरूप आहेत व काही अप्रशस्त आहेत - पापरूप आहेत. पुण्य परिणामांमुळे - शुभभावांमुळे - विशुध्द परिणामांमुळे प्रशस्त प्रकृति बांधल्या जातात आणि पाप परिणामांमुळे - अशुभभावांमुळे - संक्लेश परिणामांमुळे अप्रशस्त प्रकृति बांधल्या जातात.

कर्म हे पुद्गल द्रव्य आहे - परद्रव्य आहे. ते बांधणे किंवा सोडणे तर कोणत्याही जीवाच्या आधीन नाही. अरहंत भगवानदेखील कर्माची एक

अवस्थादेखील बदलू शकत नाहीत. त्यामुळे प्रशस्त प्रकृति बांधणे आपल्या हाती नाही हे तर नक्की झाले - सिध्द झाले.

त्यावर तुम्ही विचाराल, 'ज्या शुभभावांनी प्रशस्त प्रकृति बांधल्या जातात ते शुभभाव तर जीवाचे परिणाम आहेत. ते तरी आम्ही विचारपूर्वक करू शकतो ना? ते तरी आमच्या हाती आहे ना?'

मुलींनो - हे जीवांनो! याच मिथ्यामान्यतेने हा जीव अनादिकाळापासून ग्रासलेला आहे. शरीराहून जीवाची भिन्नता तर सर्व संप्रदायातले लोक मान्य करतात. परंतु रागादि भावांपासून स्वतःची भिन्नता या जीवाच्या लक्षात येत नाही. विशिष्ट रागभाव करण्यायोग्य मानणे ही तर त्याची आस्रवतत्त्वामध्ये व बंधतत्त्वामध्ये उपादेयबुध्दि आहे. रागभाव करणे माझ्या हाती आहे, मी हवे तसे विकार पलटवू शकतो - करू शकतो असे मानणाऱ्याने जीवतत्त्व व आस्रव - बंध तत्त्व यांना एकमेक मानले आहे. सात तत्त्वांचे खरे स्वरूप व त्यांच्यातील भिन्नता त्याच्या लक्षात येत नाही.

मला सांगा, पूजा करताना, शास्त्र स्वाध्याय करताना मध्येच भलताच कोणता तरी विचार मनात का डोकावतो? आपली तशी इच्छा तर नसते, नाही का? ज्याप्रमाणे हा अशुभभाव आपण न करता, सहज त्या पर्यायाच्या योग्यतेने होतो, त्याचप्रमाणे शुभभावदेखील सहज येतात. ही सहजता अज्ञानी जीवाच्या लक्षात येत नाही व तो रागभावाचा कर्ता होतो - स्वतःला त्याचा कर्ता मानतो.

ज्ञानी जीव रागादिपासून स्वतःचे भिन्न अस्तित्व जाणतो. ज्ञानीला देखील रागादि होतात तरीदेखील त्यांची कर्ताबुध्दि त्याला नसते. तो त्यांचा सहज ज्ञाता असतो. अज्ञानी मानतो की शुभभाव तर करायलाच पाहिजेत ना? त्याशिवाय धर्म कसा प्रकट होईल?

अज्ञानी जीव शास्त्रात वाचतो की षोडशकारण भावनांमुळे तीर्थंकर प्रकृति बांधली जाते. त्याला वाटते की तीर्थंकर प्रकृति बांधणे किती चांगले! मी पण तीर्थंकर प्रकृति बांधेन. परंतु तो हे विसरतो की सम्यग्दृष्टि जीवालाच तीर्थंकर प्रकृतीचा बंध होऊ शकतो. जिनेन्द्र भगवंतांनी सांगितलेला मोक्षमार्ग सर्व जीवांना

समजावा असे व अन्य शुभभाव ज्ञानीला सहज येतात व तेव्हा त्याला तीर्थंकर प्रकृति बांधली जाते.

परंतु ज्या परिणामांमुळे तीर्थंकर प्रकृतीचा बंध होतो, त्या परिणामांना तो करण्यायोग्य मानत नाही - उपादेय मानत नाही. परंतु अंतरंगात स्थिर रहात नाही तेव्हा त्यास सहज तसे भाव येतात. खरे पाहता, एकदा का तीर्थंकर प्रकृतीचा बंध सुरू झाला तर आठव्या गुणस्थानापर्यंत प्रतिसमय हा बंध होत रहातो. एखाद्ा जीव त्याच भवात तीर्थंकर होतो तर एखादा जीव देवाचा किंवा नारकीचा एक भव करून त्यानंतर मनुष्य होऊन तीर्थंकर होतो.

आता विषय निघालाच आहे तर प्रशस्त व अप्रशस्त प्रकृति कोणत्या आहेत, हे पाहूया.

आपण कर्माच्या आठ मूलप्रकृति आणि त्यांच्या १४८ उत्तरप्रकृति पाहिल्या. त्यांचे सविस्तर वर्णन देखील पाहिले. शास्त्रामध्ये कोठे कोठे १२२ प्रकृतींचा हिशोब पाहून तुम्ही गोंधळात पडू नका. १४८ प्रकृतींना १२२ मध्ये गर्भित करतात, ते याप्रमाणे - ५ शरीर, ५ बंधन व ५ संघात नामकर्मांना वेगवेगळे न सांगता ५ शरीरातच त्या त्या बंधन व संघात नामकर्मास अंतर्भूत करून १५ ऐवजी ५ मोजले जातात. तसेच स्पर्शादि वीस प्रकृतिंऐवजी स्पर्श, रस, गंध, वर्ण या ४ मध्ये त्यांचे उपभेद गर्भित करून २० ऐवजी ४ मोजण्यात येतात.

अशाप्रकारे १०+१६=२६ ही संख्या वजा करता म्हणजेच १४८-२६ = १२२ प्रकृति मोजण्याची देखील पध्दत आहे. त्यापैकी सम्यग्मिथ्यात्व व सम्यक् प्रकृति बंधयोग्य नसल्याने बंधयोग्य प्रकृतींची संख्या १२० आहे.

लब्धिच्या प्रकरणात अप्रशस्त कर्मप्रकृतींचा अनुभाग अनंत गुणा - अनंत पटीने घटत जातो व प्रशस्त प्रकृतींचा अनुभाग अनंत गुणा वाढत जातो इत्यादि वर्णन येणार आहे. त्याचा अर्थ नीट समाजावा म्हणून आपण प्रशस्त व अप्रशस्त प्रकृति कोणत्या आहेत ते पाहूया.

आठ कर्मांचे दोन भेद आहेत - घातिकर्म व अघातिकर्म. त्यांच्या उत्तरप्रकृतींची संख्या खालीलप्रमाणे आहे.

कर्म

| घातिकर्म | | अघातिकर्म | |
|---|---|---|---|
| ज्ञानावरण | ५ | वेदनीय | २ |
| दर्शनावरण | ९ | आयु | ४ |
| मोहनीय | २८ | नाम | ९३ (६७) |
| अंतराय | ५ | गोत्र | २ |
| एकूण | ४७ | एकूण | १०१ (७५) |

कंसामध्ये लिहिलेली संख्या १२२ च्या हिशोबाने येते.

यापैकी घातिकर्माच्या सर्व ४७ प्रकृति अप्रशस्तच आहे. अघातिकर्मामध्ये प्रशस्त व अप्रशस्त असे दोन भेद आहेत.

अघातिकर्म

| प्रशस्त प्रकृति | | अप्रशस्त प्रकृति | |
|---|---|---|---|
| सातावेदनीय | १ | असातावेदनीय | १ |
| शुभआयु (देवायु, मनुष्यायु, तिर्यंचायु) | ३ | अशुभआयु (नरकायु) | १ |
| शुभनाम | ६३ (३७) | अशुभनाम | ५० (३४) |
| उच्चगोत्र | १ | नीचगोत्र | १ |
| एकूण | ६८ (४२) | एकूण | ५३ (३७) |

अशाप्रकारे १४८ प्रकृतिंपैकी ६८ प्रकृति प्रशस्त आहेत व घाति - अघाति दोन्हींच्या मिळून ४७+५३ = १०० प्रकृति अप्रशस्त आहेत.

तुम्ही म्हणाल, 'दोन्हींची बेरीज तर १६८ होते आणि प्रकृतींची संख्या तर तू १४८ सांगितली होतीस, हे कसे काय?'

याचा अर्थ असा आहे की तुम्ही लक्षपूर्वक वाचत आहात. छान गोष्ट आहे ही. यापैकी स्पर्शादि २० प्रकृति दोन्हीकडे समाविष्ट आहेत. प्रशस्त प्रकृतिंमध्ये प्रशस्त स्पर्शादि व अप्रशस्त प्रकृतिंमध्ये अप्रशस्त स्पर्शादि सामिल आहेत. याच संख्या १२२ प्रकृतींच्या हिशोबाने सांगावयाच्या झाल्या तर ४२ प्रकृति प्रशस्त आहेत व ८४ प्रकृति अप्रशस्त आहेत.

आता एवढा विस्तार केलाच आहे तर शुभनामकर्म व अशुभनामकर्मांची चर्चा खालील कोष्टकाद्वारे करूया.

नामकर्म

शुभनामकर्म (प्रशस्त) अशुभनामकर्म (अप्रशस्त)

| नामकर्म | शुभप्रकृति | संख्या | अशुभप्रकृति | संख्या |
|---|---|---|---|---|
| गति | देवगति, मनुष्यगति | २ | नरकगति, तिर्यंचगति | २ |
| जाति | पंचेन्द्रिय | १ | एकेन्द्रिय ते चतुरिन्द्रिय | ४ |
| शरीर | सर्व | ५ | | - |
| बंधन | सर्व | ५ | | - |
| संघात | सर्व | ५ | | - |
| अंगोपांग | सर्व | ३ | | - |
| स्पर्शादि | शुभ स्पर्शादि | २० | अशुभ स्पर्शादि | २० |
| संस्थान | समचतुरस्र | १ | बाकी पाच | ५ |
| संहनन | वज्रवृषभनाराच | १ | बाकी पाच | ५ |
| आनुपूर्वी | मनुष्यगत्यानुपूर्वी देवगत्यानुपूर्वी | २ | नरकगत्यानुपूर्वी, तिर्यंचगत्यानुपूर्वी | २ |
| विहायोगति | प्रशस्त विहायोगति | १ | अप्रशस्त विहायोगति | १ |
| अगुरुलघु | | १ | | |
| परघात | | १ | उपघात | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उच्छ्वास | | १ | | |
| आतप | | १ | | |
| उद्योत | | १ | | |
| त्रसादि | त्रस,बादर,पर्याप्त, प्रत्येक | ४ | स्थावर, सूक्ष्म, अपर्याप्त, साधारण | ४ |
| स्थिर आदि | स्थिर, शुभ, सुभग, सुस्वर, आदेय, यशस्कीर्ति | ६ | अस्थिर, अशुभ, दुर्भग दुस्वर, अनादेय, अयशस्कीर्ति | ६ |
| तीर्थंकर | | १ | | |
| निर्माण | | १ | | |
| | एकूण | ६३ | एकूण | ५० |

आपल्याला येथे हे पहावयाचे आहे की आपल्याला कर्माचा बंध अनादिकाळापासून निरंतर होत आला आहे. आयुचा बंध कधी कधी होतो परंतु बाकीच्या सात मूलप्रकृतींचा बंध तर निरंतर होतच असतो. जीवाने शुभभाव केले अथवा अशुभभाव केले तरीदेखील आठही कर्मांचा बंध होतो. त्यापैकी चार घातिकर्म तर सर्वच पापरूप आहेत - अप्रशस्तच आहेत. अघातिकर्मांमध्ये जे दोन भेद आहेत त्यापैकी प्रशस्त प्रकृतींचा बंध शुभपरिणामांनी - विशुध्द परिणामांनी होतो व अप्रशस्त प्रकृतींचा बंध अशुभपरिणामांनी - संक्लेश परिणामांनी होतो.

अशाप्रकारे ही गोष्ट सिध्द होते की पुण्य अर्थात शुभभाव केल्याने बंध तर होतोच, बंधाचा अभाव होत नाही! परंतु सम्यग्दर्शन प्राप्त करून मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी कषाय मिटतात तेव्हापासून विशिष्ट प्रकृतींचा बंध होणे टळते - त्या प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते. क्रमशः अप्रत्याख्यानावरण, प्रत्याख्यानावरण आणि संज्वलनादि कषायांच्या उदयाचा अभाव होत जातो, तसतशी अधिकाधिक प्रकृतींची बंधव्युच्छित्ति होते.

अशा रीतीने बंधाची हानि होणे संवर आहे. संवरपूर्वक निर्जरादेखील होते अर्थात सत्तेमध्ये असलेले कर्म अधिक प्रमाणात खिरून निघून जाते. बंधाची हानि होणे हा संवर आहे व सत्त्वाची हानि होणे ही निर्जरा आहे. हाच मोक्षमार्ग आहे, हीच लब्धि आहे कारण याच मार्गावर चालत राहिल्याने - आरूढ झाल्याने आपल्याला मोक्षाची प्राप्ति होते.

येथे तर फक्त प्रकृतिबंध थांबण्याविषयी चर्चा केली. परंतु आपण चार प्रकारांनी बंध होतो असे पाहिले होते, लक्षात आहे ना? - प्रकृतिबंध, प्रदेशबंध, स्थितिबंध आणि अनुभागबंध.

जीव सम्यक्त्व प्राप्त करतो तेव्हा या चारही प्रकारच्या बंधाची हानि होते. विशिष्ट प्रकृतींचा बंध होणे थांबते, कमी प्रमाणात प्रदेशबंध होतो, कर्मांचा स्थितिबंध अंतःकोडाकोडी सागरापेक्षा देखील कमी होतो, तसेच अप्रशस्त कर्मांचा अनुभाग अनंतपटींनी हीन होऊन बांधला जातो. प्रशस्त कर्मांचा स्थितिबंध तर घटतो परंतु त्यांचा अनुभाग अनंत पटींनी वाढत जातो.

सम्यक्त्व झाल्यानंतर तर वरील गोष्टी होतातच, परंतु जेव्हा जीव स्वतःचे स्वरूप जाणण्याविषयी उत्सुक होतो, तत्त्वज्ञानासंबंधी - स्वतःच्या आत्म्यासंबंधी त्याला जिज्ञासा आणि रुचि उत्पन्न होते तेव्हापासूनच अर्थात सम्यक्त्वाच्या पूर्वी होणाऱ्या पाच लब्धिंमध्ये देखील कर्मांमध्ये अनेक परिवर्तनं होतात, कर्मांची शक्ति ढिली पडू लागते. या सर्व गोष्टी आपण पाहू त्यावेळी तुम्ही म्हणाल, 'आम्ही विनाकारणच कर्मांना घाबरत होतो. 'जिस समय हो आत्मबुध्दि, कर्म थरथर कांपते हैं।' - हे शास्त्रातले कथन उचितच आहे.'

कर्मामध्ये होणारे हे सर्व काही परिणमन कर्मामध्ये कर्माच्या स्वतःच्या योग्यतेने होते. आपल्याला कर्मामध्ये काहीही करावे लागत नाही - आपण काही करूच शकत नाही.

कर्माच्या त्या अवस्थांचे - परिवर्तनाचे स्वरूप चांगल्या रीतीने समजावे म्हणून अजूनदेखील थोडी प्राथमिक माहिती घेणे आवश्यक आहे.

त्याची चर्चा आपण आगामी पत्रामध्ये करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# कर्मासंबंधी काही पारिभाषिक शब्द

पत्रांक ४ ७ जुलै २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

तुम्ही कळविलेत की कर्मासंबंधी माहिती वाचून, विशेष करून नामकर्माच्या उत्तरप्रकृति व त्यांचे कार्य जाणल्याने तुम्हाला मोठे नवल वाटले तसेच जिज्ञासेची तृप्ति झाली. त्याचबरोबर तुम्ही हेदेखील विचारत आहात की या साऱ्या गोष्टी जाणल्या नाहीत तर सम्यक्त्वाची प्राप्ति होऊ शकणार नाही का?

जरूर होऊ शकते. तुम्ही मला सांगा, एखाद्या पेशंटला काही रोग झाला असेल तर तो त्याचा इलाज करण्यासाठी डॉक्टरकडे जातो, अशावेळी त्याला जर डॉक्टरने दिलेल्या औषधाचे नाव, त्याचा रासायनिक फॉर्म्युला, त्याची कार्यपध्दति, शरीरात त्यामध्ये होणारे परिवर्तन आणि कोणत्या रूपात त्या औषधाचे शरीरातून उत्सर्जन होते याचे ज्ञान नसेल तर काय तो रोगी रोगमुक्त होऊ शकत नाही? बरा होऊ शकत नाही?

आणि समजा, त्या डॉक्टरलाच रोग झाला असेल की जो औषधाविषयीची सारी माहिती जाणतो, तर काय नुसत्या जाणण्याने त्याचा रोग दूर होईल की त्यालादेखील त्या औषधाचे सेवन करावे लागेल? औषध खाऊन तोही बरा होऊ शकतो, होय ना? त्याला दृढ विश्वास असतो की विशिष्ट औषधाच्या सेवनाने तो रोगमुक्त होईल.

आणि समजा, जर त्या रोग्याने औषधाच्या दुकानात जाऊन मनाला येईल ते औषध घेऊन खाल्ले तर? शक्यता आहे की त्या रोग्यावर रोगापासून नव्हे परंतु आयुष्यातूनच मुक्त होण्याचा प्रसंग येईल.

त्याचप्रमाणे एखादा जीव कर्मासंबंधी काही देखील जाणत नसेल, तरीदेखील त्याला सम्यक्त्व होऊ शकते. हां, परंतु हे अत्यावश्यक आहे की त्याला जिनेन्द्रकथित प्रयोजनभूत सात तत्त्वांचे 'ज्यों का त्यों श्रध्दान' असायला

पाहिजे, स्वतः परीक्षा करून तत्त्वनिर्णय करावयास हवा,स्व आणि पराचे भेदज्ञान हवे, स्वतःचे स्वरूप यथार्थ रीतीने भासित व्हायला हवे, कर्माच्या बंधामध्ये व त्याच्या फळामुळे प्राप्त झालेल्या सामुग्रीमध्ये त्याला कर्तृत्वबुध्दि व भोक्तृत्वबुध्दि नसावी तसेच शरीरादिमध्ये व रागादिमध्ये त्याला अहंबुध्दि व ममत्वबुध्दि नसावी.

मला एका गोष्टीचे उत्तर द्या की येथे आपण ज्या आगमकथित गोष्टी जाणत आहोत त्या सत्य आहेत की असत्य? त्या तर शंभर टक्के सत्यच आहेत, होय ना? तर मग या सत्य गोष्टी जाणण्याने आपल्या ज्ञानाचा विकास होत आहे की ऱ्हास होत आहे? टी. व्ही. वरच्या बातम्या जाणण्यासाठी सर्वजण किती उत्सुक असतात. जगभरातील घडामोडी जाणण्याविषयी जिज्ञासा जागृत होते परंतु हा जीव स्वतःमध्ये काय काय घडत आहे याविषयी बेखबर राहून दुसऱ्यांच्या खबरी जाणण्यासाठी पागल होत आहे.

आपल्या प्रत्येक समयाच्या परिणामांच्या निमित्ताने कर्म किती व कसे बांधले जाते, ते केव्हा, किती आणि काय फळ देते? कर्मबंध व कर्माचे फळ यांहून आपले स्वतःचे अस्तित्व भिन्न आहे की नाही? या साऱ्यातून सुटण्याचा काही उपाय होऊ शकतो की नाही? पुण्य केल्याने मोक्षमार्गाची सुरुवात होते की नाही? इत्यादि गोष्टींचा याला काही विचारदेखील येत नाही आणि दुसऱ्याचे पाहून काहीतरी करण्यामध्ये हा जीव समाधान मानतो.

मुलींनो, मोक्षाचा मार्ग अत्यंत सरळ, सहज, सुलभ आणि सुखकर आहे, सुखमय आहे. परंतु जीवाचा त्यावर विश्वासच नाही. हीच तर मेख आहे. मला काही तरी क्रिया केली पाहिजे तरच मला मोक्षमार्गाची प्राप्ति होईल अशी या जीवाला भ्रांति आहे. शुभभाव व देहादिकांची क्रिया करण्यामध्येच या जीवाने धर्म मानला आहे. परंतु शुभाशुभभावरहित असा त्रिकाली ध्रुव ज्ञानानंद स्वरूपी मी आहे या गोष्टीचा याला स्वीकार नाही. देहादिंची क्रिया तर जडाची - अचेतनाची क्रिया आहे - परद्रव्याची क्रिया आहे, जीव ती करूच शकत नाही. शुभाशुभराग तर विभाव आहे, स्वभाव नाही, जीवाच्या स्वभावाच्या विरुध्द भाव आहे. तर मग विभाव केल्याने याची स्वभावपर्याय कशी प्रकट होईल?

सम्यग्दर्शनरूप स्वभावपर्याय प्रकट झाल्यावर मोक्षमार्गाचा प्रारंभ होतो. त्यापूर्वी जीवाला पाच लब्धि असतात. त्यांचे स्वरूप समजण्यासाठी काही पारिभाषिक शब्दांचे ज्ञान होणे आवश्यक आहे. आता त्यावर विचार करूया.

आपण पूर्वी अनेक वेळा शिकलो आहोत की कर्माचा बंध चार प्रकारांनी सांगितला जातो. ज्या कर्मप्रकृतींचा बंध होतो तो 'प्रकृतिबंध' आहे. ज्या प्रमाणात - संख्येमध्ये कर्म परमाणु बांधले जातात, परमाणुच्या त्या संख्येस 'प्रदेशबंध' असे म्हणतात. प्रत्येक समयात अनंत कर्मपरमाणु बांधले जातात, त्यास 'समयप्रबध्द' अर्थात एका समयात बांधले जाणारे असे म्हणतात. बंध होतानाच हे निश्चित ठरते की ते कर्म अधिकाधिक किती काळापर्यंत जीवाशी निबध्द राहील - बांधलेले राहील आणि केव्हा ते अकर्मरूप होऊन निघून जाईल. या कालावधीस 'स्थितिबंध' असे म्हणतात. त्या कर्मपरमाणुंमध्ये फळ देण्याची जी शक्ति आहे तिला 'अनुभागबंध' असे म्हणतात.

बंध झाल्यानंतर कर्म जीवाच्या प्रदेशांमध्ये पडून रहाते - बांधलेले रहाते - त्यास 'सत्त्व' किंवा कर्माची 'सत्ता' असे म्हणतात. कर्माचा बंध झाल्यानंतर विशिष्ट काळापर्यंत त्याचा उदय अथवा उदीरणा होत नाही त्या काळास 'आबाधाकाल' असे म्हणतात. आबाधाकाल संपल्यावर कर्माचा उदय होण्यास सुरुवात होते अर्थात कर्म फळ देऊन खिरू लागते - अकर्मरूप होते - त्याची निर्जरा होते. ही सामान्य निर्जरा आहे, मोक्षमार्गातली निर्जरा नव्हे. ज्याप्रमाणे प्रत्येक समयात एका समयप्रबध्दाचा बंध होतो त्याचप्रमाणे एका समयप्रबध्दाची निर्जरादेखील होते.


अशा रीतीने जीवाच्या सत्तेमध्ये अनंतानंत कर्मपरमाणु सत्त्वरूपाने पडून असतात, त्यामध्ये दर समयाला एक समयप्रबध्दाचा बंध होतो आणि एक समयप्रबध्द परमाणु खिरून जातात - उदयास येतात व कर्माची सत्ता सतत चालू रहाते.

एका समयात बांधलेले परमाणु एकावेळी उदयास येत नाहीत, परंतु आबाधाकाल पूर्ण झाल्यावर अनंतर समयापासून (पुढच्याच समयापासून)

कर्माच्या स्थितीच्या अंत समयापर्यंत निरंतर - दर समयाला काही ना काही परमाणु खिरत रहातात. याला कर्माचा 'उदयकाल' असे म्हणतात. एकाच समयात उदयाला येणाऱ्या कर्म परमाणुंच्या समूहास 'निषेक' असे म्हणतात.

एका समयात बांधलेले कर्म सतत अनेक वर्षांपर्यंत उदयास येत रहाते. आपण दर समयाला कर्म बांधत आलो आहोत. त्यामुळे ज्या कर्मपरमाणुंची स्थिति पूर्ण होते अशा वेगवेगळ्या अनेक समयांमध्ये बांधलेले परमाणु एकावेळी उदयास येतात आणि त्यांचे फळ त्यांच्या अनुभागानुसार मिळते.

अशाप्रकारे सत्तेमध्ये जे कर्म आहे त्यामध्ये जे जे परमाणु समानस्थितिवाले आहेत त्यांच्या समूहास निषेक म्हणतात. याला सत्तेतील निषेक म्हणतात. यामधील दर समयाला एक निषेक खिरून जातो. वर्तमान समयात उदयास येणाऱ्या निषेकाला 'प्रथम निषेक' असे म्हणतात. आकृतिमध्ये आडवी रेघ काढून त्याला दाखविण्यात येते. त्याच्यावरच्या बाजूला दुसरी आडवी रेघ काढतात, जी दुसरा निषेक दर्शविते. दर समयात एक निषेक याप्रमाणे प्रत्येक कर्माचे आपापले अनेक निषेक-अनेक कोडाकोडी सागरांचे निषेक सत्तेमध्ये असतात.





कर्मांची स्थिति दर्शविण्यासाठी निषेक रचना असते. तुम्ही येथे असे समजू नका की जीवाच्या प्रदेशांमध्ये कर्म रांगा लावून उभे आहेत. जेव्हा जेव्हा कर्म बांधले जाते तेव्हा आत्म्याच्या असंख्यात प्रदेशांमध्ये ते परमाणु समानरूपाने पसरतात. वेगवेगळ्या ठिकाणी स्थित असलेल्या ज्या ज्या परमाणुंची समान स्थिति असेल त्या सर्वांना मिळून निषेक म्हणतात.

कर्म परमाणुंमध्ये स्थितिबरोबरच विशिष्ट अनुभागदेखील असतो - त्याची स्वतःची फलदान शक्ति असते. ही शक्ति अविभाग प्रतिच्छेदांमध्ये मोजली जाते. शक्तीच्या सर्वात छोट्या अंशास 'अविभाग प्रतिच्छेद' असे म्हणतात. कर्म परमाणुंमध्ये त्यांच्या शक्तीचे अविभाग प्रतिच्छेद असतात म्हणून एका परमाणुस


एक 'वर्ग' असे म्हणतात. ज्या ज्या परमाणुंमध्ये अर्थात वर्गांमध्ये समान अविभाग प्रतिच्छेद आढळतात त्या वर्गांच्या समूहास 'वर्गणा' असे म्हणतात.

सर्वात कमी अविभाग प्रतिच्छेदवाल्या वर्गांच्या वर्गणेस 'जघन्यवर्गणा' किंवा 'प्रथमवर्गणा' असे म्हणतात. ज्यांमध्ये एक अधिक अविभाग प्रतिच्छेद असतो अशा वर्गांच्या वर्गणेस 'द्वितीय वर्गणा' असे म्हणतात. प्रथम वर्गणा खाली दर्शवितात व द्वितीयादि वर्गणा आकृतीत दाखविल्याप्रमाणे वरच्या बाजूला दर्शवितात.




अनंत वर्गणांच्या समूहास 'स्पर्धक' असे म्हणतात. वर्गणांच्या वर्गांचे अविभाग प्रतिच्छेद वाढत वाढत ज्या वर्गणेमध्ये दुप्पट होतात, त्या वर्गणेपासून दुसरा स्पर्धक सुरू होतो, जेव्हा तिप्पट होतात त्या वर्गणेपासून तिसरा स्पर्धक सुरू हातो.

कोणत्याही एका समयात बांधलेल्या परमाणुंची जेव्हा आपण निषेक रचना पहातो तेव्हा त्याच्या प्रथम निषेकामध्ये परमाणुंची संख्या सर्वाधिक असते परंतु अनुभाग सर्वात हीन असतो. वरच्या वरच्या निषेकांमध्ये परमाणु कमी होत जातात आणि अनुभाग वाढत जातो.




निषेक रचना असो की स्पर्धक रचना असो, ते तर केवळ आलेख आहेत, चित्रांकन आहे. ज्याप्रमाणे वस्तुंच्या किंमती दर्शविणारे आलेख असतात किंवा टी. व्ही. वर क्रिकेट मॅच दाखवताना त्यांच्या धावसंख्येचा आलेख दाखवतात त्याप्रमाणे येथेही समजावे.

प्रत्येक कर्मप्रकृतीच्या अनंतानंत वर्गणा आणि स्पर्धक असतात. त्यामध्ये मंद अनुभागापासून तीव्रतम अनुभागापर्यंतच्या अनेक स्पर्धकांचे वर्णन करताना त्यांना उपमा देऊन - नाव देऊन समजाविले जाते.

घातिकर्म आणि अघातिकर्माच्या स्पर्धक रचनेची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

घातिकर्मामध्ये मंद अनुभागापासून तीव्र अनुभागवाल्या स्पर्धकांचे चार प्रकार आहेत -

(१) लताभाग (२) दारुभाग (३) अस्थिभाग (४) शैलभाग.

लता अर्थात वेल लवचिक-नरम असते, कठिण नाही त्याप्रमाणे या स्पर्धकांमध्ये अनुभाग मंद असतो. लतेपेक्षा - वेलीपेक्षा दारु अर्थात काष्ठ कठिण असते त्याप्रमाणे या स्पर्धकांचा अनुभाग अधिक असतो. काष्ठापेक्षा अस्थि अर्थात हाडे आणि अस्थिपेक्षा शैल अर्थात शिळा - पत्थर कठिण असतो त्याप्रमाणे येथेही समजावे.

या प्रत्येक प्रकाराचे अनंत स्पर्धक असतात.

अशाप्रकारे ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय कर्मांमध्ये तीव्रतेच्या अपेक्षेने शैल, अस्थि, दारु आणि लता अशी अनुभागाची चार स्थानं असतात. जेव्हा एखाद्या कर्मामध्ये चारही प्रकारचा अनुभागबंध होतो तेव्हा त्यास 'चतुःस्थानगत बंध' म्हणतात.

जीवाच्या विशुध्द परिणामांच्या निमित्ताने जेव्हा अतितीव्र अनुभागवाल्या घातिकर्माच्या प्रकृति बांधल्या जात नाहीत तेव्हा त्रिस्थानगत अर्थात अस्थि, दारु व लता भागवाले स्पर्धक बांधले जातात - शैलभागवाले बांधले जात नाहीत. जेव्हा द्विस्थानगत बंध होतो तेव्हा दारु आणि लता भागरूप बंध होतो, शैल व अस्थि भागवाला बंध होत नाही.

घातिकर्मामध्ये अनुभागाच्या अपेक्षेने आपण स्पर्धकांची चार स्थानं पाहिली त्याचप्रमाणे अघातिकर्मांमध्ये देखील स्पर्धकांचे चार - चार प्रकार आहेत. अघातिकर्मांमध्ये प्रशस्त आणि अप्रशस्त अशा दोन प्रकारच्या प्रकृति आहेत, त्यांच्या आपापल्या स्पर्धकांची नावे वेगवेगळी आहेत.

प्रशस्त प्रकृतिंमध्ये मंद अनुभागापासून तीव्र अनुभागवाल्या स्पर्धकांचे चार प्रकार याप्रमाणे आहेत -

(१) गुड (२) खांड (३) शर्करा (खडीसाखर) (४) अमृत.

या चार पदार्थांमध्ये गोडी क्रमशः अधिक अधिक आहे त्याप्रमाणे या प्रशस्त प्रकृतींच्या स्पर्धकांमध्ये अनुभाग अर्थात फल देण्याची शक्ति अधिकाधिक असते. यामध्ये जेव्हा द्विस्थानगत बंध होतो असे कथन येते तेव्हा गुड आणि खांडवाल्या स्पर्धकांचा बंध समजावा आणि जेव्हा चतुःस्थानगत बंध असे कथन येते तेव्हा चारही प्रकारच्या स्पर्धकांचा बंध समजावा.

अघातिकर्माच्या अप्रशस्त प्रकृतिंमध्ये मंद अनुभागापासून तीव्र अनुभागवाल्या स्पर्धकांचे चार प्रकार याप्रमाणे आहेत -

(१) निंब (२) कांजीर (३) विष (४) हलाहल.

हे पदार्थ अधिकाधिक कडू आहेत, तद्वत यांच्यामध्ये अनुभाग तीव्र आहे. जेव्हा जीवाच्या परिणामांची विशुध्दि वाढत जाते, तेव्हा अघातिकर्माच्या अप्रशस्त प्रकृतींचा अनुभागबंधदेखील द्विस्थानगत होऊ लागतो, चतुःस्थानगत बंध होत नाही. एवढेच नव्हे तर पूर्वी बांधलेल्या चतुःस्थानगत स्पर्धकांचा अनुभाग अनंत गुणा (अनंत पटीने) कमी कमी होत जातो व सत्तेमध्ये पडलेल्या कर्मांमध्ये द्विस्थानगत अनुभाग बाकी रहातो. याची चर्चा पुढे यथायोग्य ठिकाणी येईलच.

याला आता चार्ट (आकृति) द्वारे समजूया.

घातिकर्माची आणि अघातिकर्माची अनुभागाच्या अपेक्षेने चार चार स्थानं -

| घातिकर्म | अघातिकर्म | |
|---|---|---|
| अप्रशस्तच आहेत. | प्रशस्त | अप्रशस्त |
| शैल | अमृत | हलाहल |
| अस्थि | शर्करा | विष |
| दारु | खांड | कांजीर |
| लता | गुड | निंब |

घातिकर्मामध्ये दोन प्रकारच्या प्रकृति आहेत. सर्वघातिप्रकृति आणि देशघातिप्रकृति. जसे, केवलज्ञानावरण, केवलदर्शनावरण इत्यादि सर्वघाति प्रकृति आहेत. मतिज्ञानावरण, श्रुतज्ञानावरण, अवधिज्ञानावरण, मनःपर्ययज्ञानावरण इत्यादि देशघाति प्रकृति आहेत.

या प्रकृतींचे जे स्पर्धक आहेत त्यांमध्ये देखील दोन प्रकारचे स्पर्धक असतात - सर्वघाति स्पर्धक आणि देशघाति स्पर्धक.

आपण घातिकर्मामध्ये चार प्रकारचे स्पर्धक पाहिले - शैल, अस्थि, दारु व लता भागवाले. त्यापैकी शैल, अस्थि स्पर्धक व दारुभागातील अनंत बहुभाग स्पर्धक सर्वघाति स्पर्धक आहेत आणि दारुभागातील अनंतवा भाग स्पर्धक व लताभागवाले सर्व स्पर्धक देशघाति स्पर्धक आहेत.

तुम्ही म्हणाल, 'यात सांगण्याची काय गरज आहे? सर्वघाति प्रकृतीचे स्पर्धक सर्वघाति असतील आणि देशघाति प्रकृतीचे स्पर्धक देशघाति असतील.'

तुमचे अर्धेच कथन सत्य आहे. सर्वघाति प्रकृतीचे सर्वच स्पर्धक सर्वघाति स्पर्धक असतात परंतु देशघाति प्रकृतिमध्ये दोन्ही प्रकारचे स्पर्धक असतात - सर्वघाति स्पर्धक व देशघाति स्पर्धक.

हे पुन्हा एकदा समजून घेऊया, परंतु त्यापूर्वी बहुभाग व एकभाग कशास म्हणतात ते पाहूया. समजा, तुम्हाला १००० या संख्येस १० ने भाग देऊन बहुभाग व एकभाग करावयाचा आहे. त्यासाठी एक हजारास दहाने भाग देऊन शंभर येतात १०००÷१० = १०० अर्थात एका भागाची किंमत शंभर आहे. दहा भागांमधून एक भाग वेगळा काढला तर बहुभाग अर्थात नऊ भागांची किंमत नऊशे येते. म्हणून बहुभाग ९०० व एकभाग १०० होईल.

दारुभागवाले अनंत स्पर्धक आहेत, त्याला यथायोग्य त्यापेक्षा छोट्या अनंताने भाग दिला तर अनंतच येतात. त्यामध्ये बहुभाग व एकभाग केले असता दारुभागातील बहुभाग तर सर्वघाति स्पर्धक आहेत आणि एकभाग देशघाति स्पर्धक आहेत.

- घातिकर्म
  - सर्वघातिप्रकृति
    - सर्वघाति स्पर्धक
      - शैल
      - अस्थि
      - दारु (बहुभाग)
  - देशघातिप्रकृति
    - सर्वघाति स्पर्धक
      - शैल
      - अस्थि
      - दारु (बहुभाग)
    - देशघाति स्पर्धक
      - दारु (एकभाग)
      - लता

येथे हे लक्षात घ्या की प्रकृति देशघाति असली तरी तिचे स्पर्धक दोन प्रकारचे असतात - सर्वघाति स्पर्धक व देशघाति स्पर्धक.

आपण याला ज्ञानावरण कर्माच्या प्रकृतिंवर घटवूया. केवलज्ञानावरण ही सर्वघाति प्रकृति आहे, तिचे सर्व स्पर्धक सर्वघाति आहेत अर्थात पूर्णपणे घात करणारे आहेत, त्यामुळे पर्यायामध्ये केवलज्ञान प्रकट होत नाही. कर्म काहीदेखील करत नाही परंतु जेव्हा जीव केवलज्ञानरूप परिणमन करत नाही तेव्हा तेथे केवलज्ञानावरण तसेच अन्य ज्ञानावरण कर्मांचा उदय विद्यमान असतो.

मतिज्ञानावरण ही देशघाति प्रकृति आहे. याच्या सर्वघाति स्पर्धकांचा कधी उदय होत नाही, नेहमी देशघाति स्पर्धकांचाच उदय असतो. समजा, सर्वघाति स्पर्धकांचा उदय झाला तर जीव पर्यायामध्ये सर्वथा ज्ञानरहित होईल, अचेतन होईल - जे कधीही होत नाही.

यावरून आता 'क्षयोपशम' ची परिभाषा शिकविणे खूपच सोपे होईल. तसेही 'क्षयोपशमलब्धि'चे ज्ञान करून घेण्यापूर्वी क्षयोपशमाचे स्वरूप जाणणे आवश्यक आहे.

तुम्ही अनेक वेळा हे ऐकले आहे की मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान व मनःपर्ययज्ञान हे सर्व क्षयोपशम ज्ञान आहे. त्यामध्ये प्रतिपक्षी कर्मांचा क्षयोपशम आढळतो. याला आपण मतिज्ञानावरण कर्मावर घटवूया. क्षयोपशमाची व्याख्या

अशी आहे - 'वर्तमानकालीन सर्वघाति स्पर्धकांचा उदयाभावी क्षय, भविष्यकालीन त्याच स्पर्धकांचा सदवस्थारूप उपशम व वर्तमानकालीन देशघाति स्पर्धकांचा उदय - कर्माच्या या तीनरूप अवस्थांना क्षयोपशम म्हणतात.'

वर्तमान समयात सर्वघाति स्पर्धकांचा उदय न होणे यालाच क्षय असे म्हटले जाते. येथे क्षयाचा अर्थ सत्तेमधून नाश होणे असा नाही. भविष्यकाळामध्ये तर ते स्पर्धक विद्यमान आहेत - सत्तेमध्ये आहेत परंतु सर्वघातिरूपाने ते कधीही उदयाला येत नाहीत - आहेत तेथेच रहातात आणि स्थिति पूर्ण झाल्यानंतर देशघातिरूप होऊन उदयाला येतात. त्यांची उदीरणा होऊन उदयरूप न होणे यालाच सदवस्थारूप उपशम (अप्रशस्त उपशम) असे म्हणतात. वर्तमान समयात उदय देशघाति स्पर्धकांचा होत असतो. देशघाति त्यालाच म्हणतात की जे पूर्ण घात करण्यास समर्थ नसते. म्हणूनच एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंतच्या जीवांना मतिश्रुत ज्ञान उघाडरूप असतेच. कोणीही जीव ज्ञानरहित नसतो. सूक्ष्म निगोद जीवांमध्येदेखील ज्ञानाचा काही ना काही अंश प्रकट असतोच.

तुम्ही विचाराल, 'आताच तर तू सांगितले होतेस की अवधिज्ञानावरण ही देशघातिप्रकृति आहे, तर मग आपल्याला अवधिज्ञान प्रकट का नाही?'

तुमचा प्रश्न मार्मिक आहे परंतु थोडा अधिक विचार केला असता तुम्ही स्वतःच याचे उत्तर देऊ शकाल.

असे पहा, आपल्याला अवधिज्ञान प्रकट नाही ते आपल्या योग्यतेने प्रकट नाही याचा प्रथम स्वीकार करा. आता उरली कर्माची बाब. अवधिज्ञानावरण कर्माचे जे सर्वघाति स्पर्धक आहेत - शैल, अस्थि, दारु (बहुभाग) वाले जे स्पर्धक आहेत त्यांचा सध्या उदय चालू आहे म्हणून अवधिज्ञान प्रकट नाही. हे आपले औदयिक अज्ञान आहे. आता ज्या जीवांमध्ये अवधिज्ञान प्रकट आहे त्यांच्या शैल, अस्थि व दारु (बहुभाग) वाल्या स्पर्धकांचा उदयाभावी क्षय आहे, भविष्यकाळातील त्याच स्पर्धकांचा सदवस्थारूप उपशम आहे आणि लताभागरूप स्पर्धकांचा उदय आहे त्यांचे हे क्षायोपशमिक अवधिज्ञान आहे.

हे लताभागवाले स्पर्धक देखील मंदपासून तीव्रपर्यंत अनेक असतात. जर त्यातील तीव्र अनुभाग अर्थात अधिक आवरणाचा उदय असेल तर कमी शक्तिवाले अवधिज्ञान प्रकट होईल. जर मंद आवरणाचा उदय असेल तर ते अवधिज्ञान अधिक शक्तिवाले असेल. म्हणूनच देशावधिज्ञानाचे व परमावधिज्ञानाचे अनेक भेद आढळतात आणि सर्वोत्कृष्ट असे सर्वावधिज्ञान हे एकच प्रकारचे अवधिज्ञान असते.

मति, श्रुत ज्ञानामध्ये देखील देशघाति स्पर्धकांपैकी मंद आवरणाचा उदय असेल तर ज्ञानाचा उघाड अधिक असतो आणि तीव्र आवरणाचा उदय असेल तर ज्ञानाचा उघाड कमी असतो.

लब्धि अपर्याप्त सूक्ष्म निगोद जीवांमध्ये श्रुतज्ञानाचा सर्वात हीन उघाड असतो त्यास 'पर्यायज्ञान' असे म्हणतात. यालाच अक्षराचा अनंतावा भाग असे म्हणतात. 'अक्षर' नावाचा श्रुतज्ञानाचा एक प्रकार आहे . पर्यायज्ञानामध्ये ज्ञानाचे अनंत अविभाग प्रतिच्छेद असतात. त्यापेक्षा अनंतगुणा अविभाग प्रतिच्छेद अक्षरज्ञानात असतात. अक्षरज्ञानाच्या अपेक्षेने सांगावयाचे झाले तर अक्षरज्ञानात ज्ञानाचे जेवढे अविभाग प्रतिच्छेद असतात त्याच्या अनंताव्या भागप्रमाण अविभाग प्रतिच्छेद पर्यायज्ञानात असतात. पर्यायज्ञानानंतर अक्षरज्ञानापर्यंत वाढत्या अविभाग प्रतिच्छेदवाल्या ज्ञानाची अनेक स्थानं अर्थात भेद आहेत त्या सर्वांना मिळून एक नाव आहे - पर्यायसमासज्ञान.

जीवाला पर्यायज्ञानाएवढे ज्ञान तरी कमीत कमी असतेच, सर्वथा ज्ञानरहित असा जीव असूच शकत नाही. याचा अर्थ जरा समजून घ्या. आपल्याला जेवढे जेवढे किंवा ज्या ज्या पदार्थांसंबंधी ज्ञान होत असते त्याचे तेवढेच आवरण करणारे कर्मदेखील असते. तुम्ही जर्मनभाषा जाणत नाही, तेव्हा तुमच्या जर्मनभाषाज्ञानावरण कर्माचा उदय चालू आहे. आता जर तुम्ही जर्मनभाषा जाणू लागाल तर तेथे त्या ज्ञानावरणाचा उदय रहाणार नाही.

त्याचप्रमाणे पर्याय नावाचे ज्ञान निगोदामध्ये प्रकट आहे याचा अर्थ असा आहे की त्याला पर्यायज्ञानावरण कर्माचा उदय नाही. जर एखाद्या जीवाच्या पर्यायज्ञानावरण कर्माचा उदय झाला तर तो जीव सर्वथा ज्ञानरहित अचेतन

होऊन जाईल. ही गोष्ट तिन्ही काळात कधी होत नाही. म्हणूनच पर्यायज्ञानाला निरावरणज्ञान म्हटले आहे.

तर आता माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. काय तुम्हाला पर्यायज्ञान आहे? तुम्ही म्हणाल, 'आई, आम्हाला काय तू निगोद समजतेस? आम्ही तर संज्ञी पंचेंद्रिय पर्याप्त मनुष्यजीव आहोत. आमचे ज्ञान तर त्यांच्या अनंतपट आहे.'

याचे उत्तर मी दुसरा प्रश्न विचारून देईन, तुम्ही समजून घ्या. मला सांगा, एखाद्या करोडपतिजवळ एक रुपया असेल की नाही?

जर तुमच्याजवळ पर्यायज्ञान नाही असे मानले तर तुमच्या पर्यायज्ञानावरण कर्माचा उदय आहे असे मानावे लागेल.

सम्यग्ज्ञानचंद्रिकेमध्ये पं. टोडरमलजी लिहितात - 'पर्यायज्ञानरहित कोणताही जीव असत नाही. केवलज्ञानीलादेखील पर्यायज्ञान संभवते. महाज्ञानामध्ये अल्पज्ञान गर्भित आहे असे समजावे.' केवली भगवंतांना क्षायोपशमिक ज्ञान नसते. त्यांचे ज्ञान तर पूर्ण निरावरण ज्ञान आहे. जेव्हा केवलज्ञान प्रकट होते तेव्हा पाचही ज्ञानावरण कर्मांचा पूर्ण क्षय असतो.

पहिल्या गुणस्थानापासून बाराव्या गुणस्थानापर्यंतच्या जीवांना केवलज्ञान नसते, हे त्यांचे औदयिक अज्ञान आहे आणि त्यांना मति श्रुत आदि ज्ञान असते हे त्यांचे क्षायोपशमिक ज्ञान आहे.

येथे एक गोष्ट नीट ध्यानात घ्या. केवलज्ञानावरण प्रकृति सर्वघाति आहे, परंतु ती ज्ञानाचा पूर्ण घात करत नाही, फक्त आपल्या प्रतिपक्षी केवलज्ञानाचा पूर्ण घात करते. तिच्या उदयामध्ये तर अन्य चार ज्ञानांचा क्षयोपशम चालू रहातो.

त्याचप्रमाणे स्त्यानगृध्दि वगैरे पाच दर्शनावरण कर्म सर्वघाति आहेत परंतु त्या प्रकृति दर्शनाचा पूर्ण घात करत नाहीत. त्यांचा प्रतिपक्षी अर्थात जागृत अवस्था - तिचा पूर्ण घात करतात. त्यांच्या उदयामध्ये बाकीच्या चार दर्शनावरण प्रकृतींचा उदय किंवा क्षयोपशम यथायोग्य चालू रहातो.

याचा अर्थ असा आहे की केवलदर्शनावरण सर्वघाति प्रकृति आहे, तिचा उदय बाराव्या गुणस्थानाच्या अंतापर्यंत निरंतर असतो व त्याच्या निमित्ताने केवलदर्शनाचा पूर्ण घात होतो परंतु अन्य - चक्षुदर्शन, अचक्षुदर्शन किंवा अवधिदर्शन होत असते.

जागृत अवस्थेमध्ये चार दर्शनावरण कर्मांचा उदय असतो व निद्रावस्थेमध्ये चार दर्शनावरण कर्मांबरोबर पाच निद्रांपैकी एका निद्रा दर्शनावरण कर्माचा उदय असतो.

कर्मांचा क्षय होऊन क्षायिक भाव प्रकट होतो आणि क्षयोपशम होऊन क्षायोपशमिक भाव प्रकट होतो. क्षायिक ज्ञान अर्थात केवलज्ञान हे सर्वघाति व देशघाति अशा दोन्ही प्रकारच्या ज्ञानावरणाचा क्षय झाल्यावर प्रकट होते. क्षायिकदर्शन अर्थात केवलदर्शन हे सर्वघाति व देशघाति अशा सर्वच दर्शनावरणीय कर्मांचा क्षय झाल्याने प्रकट होते. क्षायिक सम्यक्त्व हे सर्वघाति अशा मिथ्यात्व व सम्यग्मिथ्यात्व आणि देशघाति अशा सम्यक् प्रकृति या दोन्ही प्रकारच्या दर्शनमोहनीय प्रकृतींचा क्षय झाल्याने प्रकट होते. क्षायिक चारित्र देखील सर्वघाति व देशघाति अशा दोन्ही प्रकारच्या चारित्रमोहनीय प्रकृतींचा क्षय झाल्याने प्रकट होते.

अंतराय कर्मामध्ये तर फक्त देशघाति प्रकृतिच आहेत म्हणून त्यांच्या क्षयाने क्षायिक दान, क्षायिक लाभ, क्षायिक भोग, क्षायिक उपभोग आणि क्षायिक वीर्य प्रकट होते.

परंतु क्षायोपशमिक भाव तर फक्त देशघाति कर्मांचा क्षयोपशम होण्यानेच होतो. सर्वघाति प्रकृतींचा क्षयोपशम होत नसतो. त्याचप्रमाणे अघाति कर्मांमध्ये देखील क्षयोपशम होण्याचा प्रश्नच येत नाही.

वर सांगितल्याप्रमाणे क्षायिकभाव तर नऊच आहेत. आता देशघाति प्रकृतींवर हे घटविले असता अठरा क्षायोपशमिक भाव तुमच्या सहज लक्षात येतील. क्षायोपशमिक भावामध्ये उदय तर देशघातिचा असतो. ते समजण्यासाठी सर्वघाति व देशघाति प्रकृतींची नावे पाहूया.

| मूलप्रकृति | सर्वघातिप्रकृति | देशघातिप्रकृति |
|---|---|---|
| (१) ज्ञानावरण | केवलज्ञानावरण | मतिज्ञानावरण,<br>श्रुतज्ञानावरण,<br>अवधिज्ञानावरण,<br>मन:पर्ययज्ञानावरण. |
| (२) दर्शनावरण | केवलदर्शनावरण,<br>स्त्यानगृध्दि, निद्रानिद्रा,<br>प्रचलाप्रचला, निद्रा, प्रचला. | चक्षुदर्शनावरण,<br>अचक्षुदर्शनावरण,<br>अवधिदर्शनावरण. |
| (३) मोहनीय | | |
| दर्शनमोहनीय | मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व. | सम्यक् प्रकृति. |
| चारित्रमोहनीय | अनंतानुबंधी - ४,<br>अप्रत्याख्यानावरण - ४,<br>प्रत्याख्यानावरण - ४, | संज्वलन ४,<br>नोकषाय ९. |
| (४) अंतराय | ——— | दानांतराय, लाभांतराय,<br>भोगांतराय, उपभोगांतराय,<br>वीर्यांतराय . |
| | एकूण २१ | एकूण २६ |


आता देशघातिकडे पहात पहात क्षायोपशमिक भाव आठवा. ते असे आहेत - मतिश्रुत आदि ४ सम्यक्ज्ञान व ३ कुज्ञान, ३ दर्शन, क्षयोपशम सम्यक्त्व, सराग चारित्र, संयमासंयम आणि दानादि ५.

या पध्दतीने विचार कराल तर सहजपणे लक्षात रहाते, पाठ होऊन जाते - करावे लागत नाही.

आता आणखी काही पारिभाषिक शब्द पाहून नंतर आपल्या विषयाला प्रारंभ करूया.

जीवाच्या परिणामांच्या निमित्ताने जेव्हा सत्तेमध्ये असलेल्या कर्मांची स्थिति व अनुभाग कमी होतो - घटतो तेव्हा त्याला 'अपकर्षण' असे म्हणतात आणि जेव्हा वाढतो तेव्हा त्यास 'उत्कर्षण' असे म्हणतात. अपकर्षणामध्ये स्थितिची हानि होते ते पुढील चार्टद्वारे पाहू. पूर्वी आपण निषेकरचना पाहिली होती त्यामध्ये

वरच्या निषेकांमधील काही परमाणु खालच्या निषेकांमध्ये येऊन मिळतात असे कथन केले जाते व चार्टमध्ये देखील दाखविले जाते




कर्मपरमाणु तर आहेत तेथेच स्थित रहातात, वर खाली पळापळ करत नाहीत. आपण वर्तमानपत्रात पहातो की आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रुपयाचे मूल्य खाली घसरते तेव्हा चार्टद्वारे खालच्या दिशेला रेषा काढून ते दाखविले जाते. परंतु त्यावेळी आपल्या तिजोरीत ठेवलेल्या रुपयाच्या नोटा काही वरच्या कप्प्यातून खाली घसरत नाहीत. अनुभागाच्या बाबतीतही असेच समजावे. जेव्हा स्पर्धकांचा अनुभाग घटतो तेव्हा कथन येते की वरच्या स्पर्धकातील काही परमाणु खालच्या स्पर्धकांमध्ये येऊन मिळतात. त्याचा अर्थ असा समजावा की त्यांचा अनुभाग कमी झाला.

वरचे स्पर्धक किंवा निषेक कायम राहून त्यातील काही परमाणु खालच्या स्पर्धकांमध्ये किंवा निषेकांमध्ये येऊन मिळतात तेव्हा त्यास अपकर्षण म्हणतात. परंतु विशिष्ट विशुध्द परिणामांच्या निमित्ताने वरच्या अनेक निषेकांचा समूह नष्ट होऊन त्यांचे सर्व परमाणु खालच्या निषेकांमध्ये येऊन मिळतात तेव्हा त्यास 'स्थितिकांडकघात' असे म्हणतात; आणि वरच्या अनेक स्पर्धकांचा अभाव होऊन त्यांचे सर्व परमाणु खालच्या कमी अनुभागवाल्या स्पर्धकांमध्ये येऊन मिळतात, तेव्हा त्यास 'अनुभागकांडकघात' असे म्हणतात.

ही गोष्ट नीट समजून घ्या की कांडकघाताद्वारे कर्माची स्थिति आणि अनुभाग घटतो परंतु कर्म नष्ट होत नाही, ते अकर्मरूप होत नाही. खालच्या निषेकांमधील परमाणुंची संख्या वाढते. याप्रकारे सत्तेमधील कर्मांची स्थिति घटते तसेच त्यांचे फळ देण्याची शक्तिदेखील हीन होते.

कर्मांमध्ये अन्यदेखील अनेक परिवर्तनं होतात ज्यांची नावे व स्वरूप पुढे योग्य वेळी सांगेन.

आता आगामी पत्राद्वारे आपल्या विषयास प्रारंभ करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# प्रथमोपशम सम्यक्त्व - पात्रता

पत्रांक ५ ३० जुलै २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

कर्मांची नावे व त्यांची सामान्य माहिती आणि काही पारिभाषिक शब्दांचे अर्थ पाहिल्यानंतर आता आपण मूळ विषयासंबंधी चर्चा सुरू करत आहोत. पूर्व पीठिकेमध्येच चर्चा खूप लांबली, म्हणतात ना 'नमनालाच खंडीभर तेल' तसे झाले. परंतु ही चर्चा आवश्यकच होती हे तुमच्या पुढे लक्षात येईल. येथे पत्रांद्वारे आपण स्थूल - ढोबळ चर्चा करणार आहोत. या विषयांची सूक्ष्म चर्चा गोम्मटसार - लब्धिसार, धवलादि ग्रंथांमधून जाणणे योग्य आहे.

लब्धिचा अर्थ आहे प्राप्ति अथवा लाभ - काही उपलब्धि होणे. आपल्याला लाभ तर अनंत सुखाची प्राप्ति होण्यामध्ये आहे. मोक्ष अनंत सुखरूप आहे आणि त्याच्या प्राप्तीचा उपाय संवर आणि निर्जरा हे आहेत आणि तेही सुखरूप आहेत. म्हणून त्यांची प्राप्ति होणे ही लब्धि आहे.

जेवढा जेवढा आस्रव आणि बंध कमी होईल, तेवढे तेवढे दुःख कमी होईल. कर्माच्या भाषेत सांगावयाचे झाले तर बंधाची हानि होणे अर्थात विशिष्ट कर्मप्रकृतींचा बंध थांबणे हा संवर आहे आणि पूर्वबध्द कर्माच्या सत्त्वाची हानि होणे अर्थात कर्म अधिक प्रमाणात खिरून जाणे ही निर्जरा आहे. हे कार्य सम्यग्दर्शन आणि अधिकाधिक आत्मस्थिरतेद्वारे अर्थात चारित्राद्वारे होते - कोणत्याही उच्च प्रकारच्या शुभभावाद्वारे हे संभवत नाही. म्हणूनच लब्धिसार ग्रंथामध्ये म्हटले आहे की दर्शन आणि चारित्र यांची प्राप्ति होणे हीच लब्धि आहे.

लब्धि हा शब्द अनेक वेगवेगळ्या अर्थांनी किंवा वेगवेगळ्या संदर्भामध्ये शास्त्रात आढळून येतो. क्षयोपशम ज्ञानामध्ये लब्धि आणि उपयोग असे दोन भेद असतात. विशिष्ट क्षयोपशमास लब्धि म्हणतात किंवा त्याच्या निमित्ताने आत्म्यामध्ये ज्ञानाची उघाडरूप जी शक्ति असते तिला लब्धि म्हणतात. तत्त्वार्थसूत्रात म्हटले आहे, 'लब्धिउपयोगौ भावेन्द्रियम्'.

गुणप्राप्तीच्या अर्थाने, विशिष्ट तपाच्या प्रभावाने प्राप्त होणाऱ्या ऋध्दीला देखील लब्धि म्हणतात.

दानांतराय आदि अंतराय कर्माच्या पाच प्रकृतींच्या क्षयोपशमाने किंवा क्षयाने प्राप्त होणाऱ्या दान, लाभ, भोग, उपभोग आणि वीर्य यांनादेखील लब्धि म्हणतात. अरहंत भगवानांच्या स्तुतिमध्ये त्यांचे वर्णन करताना म्हटले आहे, 'नवकेवललब्धिरमा धरंत' अर्थात अरहंत भगवानांना नऊ क्षायिक लब्धि असतात. त्या अशाप्रकारे - क्षायिक ज्ञान, क्षायिकदर्शन, क्षायिक सम्यक्त्व, क्षायिक चारित्र, क्षायिक दान, क्षायिक लाभ, क्षायिक भोग, क्षायिक उपभोग व क्षायिक वीर्य.

आपला विषय 'पंचलब्धि' आहे. प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त होण्यापूर्वी नियमाने होणाऱ्या पाच लब्धिंची आपण चर्चा करणार आहोत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत - (१) क्षयोपशमलब्धि (२) विशुध्दिलब्धि (३) देशनालब्धि (४) प्रायोग्यलब्धि (५) करणलब्धि.

यालाच सागार धर्मामृत नावाच्या ग्रंथामध्ये वेगळ्या शब्दात सांगितले आहे-

(१) संज्ञित्व (२) शुध्दि (३) देशना (४) कर्महानि (५) अस्तमिथ्यात्व.

नियमसार ग्रंथाच्या तात्पर्यवृत्ति नामक टीकेमध्ये पाच लब्धिंची नावे अशी आहेत -

(१) काललब्धि (२) करणलब्धि (३) उपदेशलब्धि (४) उपशमलब्धि व (५) प्रायोग्यलब्धि.

या पाच लब्धिंपूर्वक प्रथमोपशम सम्यक्त्वाची प्राप्ति होते. लब्धिंचे स्वरूप पहाण्यापूर्वी प्रथमोपशम सम्यक्त्वाचा अर्थ समजूया. सम्यक्त्व शब्दाशी तुम्ही चांगल्याच परिचित आहात. 'तत्त्वार्थश्रध्दानम् सम्यग्दर्शनम्' या सूत्राचा अर्थ आपण पूर्वी विस्ताराने पाहिला आहे. अनादि मिथ्यादृष्टि जीव सर्वप्रथम सम्यक्त्व प्राप्त करतो तेव्हा ते औपशमिक सम्यक्त्वच असते. सादि मिथ्यादृष्टि जीवदेखील कर्मांचा उपशम करून सम्यक्त्व प्राप्त करतो तेव्हा त्यास प्रथमोपशम सम्यक्त्व असे म्हणतात.

सादि व अनादि शब्दांचा अर्थ लक्षात आहे ना? स + आदि = सादि आणि अन + आदि = अनादि. ज्या जीवाने अनादिकाळापासून कधीही सम्यक्त्व प्राप्त केलेले नाही, जो अनादिकाळापासून मिथ्यात्व अवस्थेमध्येच आहे, त्यास अनादि मिथ्यादृष्टि म्हणतात. जो जीव सम्यक्त्व प्राप्त केल्यानंतर पुन्हा अतत्त्वश्रध्दानाने मिथ्यादृष्टि होतो त्याला सादि मिथ्यादृष्टि म्हणतात.

आता हे पाहूया की कोणत्या कर्मांचा उपशम करून जीव सम्यक्त्व प्राप्त करतो.

अनादि मिथ्यादृष्टिजवळ दर्शनमोहनीय कर्माची एक मिथ्यात्व प्रकृति सत्तेमध्ये असते कारण बंध तर फक्त एक मिथ्यात्व प्रकृतीचाच होत असतो, परंतु सादि मिथ्यादृष्टिजवळ दर्शनमोहनीयाच्या तीन प्रकृति अर्थात मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व, आणि सम्यक् प्रकृति काही काळापर्यंत सत्तेमध्ये रहातात कारण पहिल्या वेळेस प्रथमोपशम सम्यक्त्व झाल्यावर मिथ्यात्वाचे वरील तीन तुकडे होतात.

जो जीव प्रथमोपशम सम्यक्त्वसहित पहिल्या गुणस्थानातून चौथ्या गुणस्थानात जातो तो दर्शनमोहनीय आणि अनंतानुबंधी क्रोध, मान, माया व लोभ यांचा उपशम करतो. तेथे अनादि मिथ्यादृष्टि जीव मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी चार अशा पाच प्रकृतींचा उपशम करून प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करतो तर सादि मिथ्यादृष्टि जीव दर्शनमोहनीयाच्या तीन आणि अनंतानुबंधीच्या चार अशा सात प्रकृतींचा उपशम करून प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करतो.

याचा अर्थ असा आहे की जेव्हा जेव्हा जीव वर सांगितलेल्या कर्मांचा उपशम करून मिथ्यात्वातून सम्यक्त्व प्राप्त करेल तेव्हा तेव्हा त्यास प्रथमोपशम सम्यक्त्व म्हणतात. पहिल्या प्रथम - पहिल्यांदा सम्यक्त्व झाले म्हणून त्यास प्रथमोपशम सम्यक्त्व म्हणत नाहीत, परंतु जेव्हा जेव्हा एखादा मिथ्यादृष्टि जीव औपशमिक सम्यक्त्व प्राप्त करतो, तेव्हा तेव्हा त्यास प्रथमोपशम सम्यक्त्व असेच म्हणण्यात येते. मग भले ते पहिल्यांदा होऊ दे, दुसऱ्यांदा होऊ दे की असंख्यातव्या वेळा होऊ दे.

काय झाले? आश्चर्य का वाटले? तुम्ही या भ्रमात राहू नका की एकदा सम्यक्त्व झाले की आपले काम झाले. एखाद्या जीवास सम्यक्त्व होऊन सुटले व तो मिथ्यात्वात आला तर अधिकात अधिक अर्धपुद्गलपरावर्तन काळापर्यंत तो मिथ्यात्वातच राहू शकतो. हा अनंत काळ आहे. तत्त्वश्रध्दानी झाला, आत्म्याचा अनुभव केला तरीदेखील त्यातून पडून जीव परत मिथ्यात्वामध्ये जाऊ शकतो.

हां, द्रव्यानुयोगामध्ये आणि उपदेशाच्या मुख्यतेने जेथे पुरुषार्थाची प्रेरणा दिली जाते तेथे पडण्याची वार्ता करत नाहीत. परंतु येथे करणानुयोगात तर वस्तुस्थिति सांगितली जाते. या सर्व गोष्टी केवलीगम्य आहेत. एका जीवामध्येदेखील जर एवढ्या वेळा पुनःपुनः सम्यक्त्वातून पडणे आढळत असेल तर ती गोष्ट करणानुयोग जरूर सांगेल.

हे वाचून घाबरण्याचे काही कारण नाही, त्याचप्रमाणे सम्यक्त्व झाल्यावर शेखी मिरविण्याचीदेखील गरज नाही. कोणी म्हणेल की अशी पडण्याची शक्यता असेल तर मग आम्ही सम्यक्त्वाचा पुरुषार्थच करणार नाही; त्यावर त्याला समजावितात की एकदा का सम्यक्त्व झाले तर तू अल्पकाळात मुक्त होशीलच, आता तू इच्छा केलीस तरीदेखील अधिक काळ संसारात भटकू शकणार नाहीस. जर सम्यक्त्व प्राप्त झाल्यानंतर एखाद्याला मोठा अभिमान वाटू लागला, त्याला त्याचा मद झाला तर पर्यायामध्ये अहंबुध्दि होण्यामुळे सम्यक्त्वातून भ्रष्ट होऊन तो मिथ्यात्वात येईल. त्याला सांगितले जाते की पल्याच्या असंख्यातव्या भागप्रमाण वेळा जीव मिथ्यात्वातून सम्यक्त्वात व सम्यक्त्वातून मिथ्यात्वात जाऊ शकतो, म्हणून आपल्या परिणामांना सांभाळ, दृढ श्रध्दानी हो.

सम्यक्त्वाचे तीन प्रकार आहेत - (१) औपशमिक अथवा उपशम सम्यक्त्व (२) क्षायोपशमिक किंवा क्षयोपशम सम्यक्त्व अथवा वेदक सम्यक्त्व व (३) क्षायिक सम्यक्त्व.

दर्शनमोहनीय व अनंतानुबंधी कर्मांचा उपशम, क्षयोपशम व क्षय झाला असता जीवामध्ये जी अवस्था आढळते त्यास अनुक्रमे औपशमिक, क्षायोपशमिक आणि क्षायिक सम्यक्त्व म्हणतात.

उपशम चालू असताना या कर्मांच्या उदयाचा अभाव असतो. कर्म सत्तेमध्ये तर असते परंतु अंतर्मुहूर्त काळापर्यंत दबले जाते, उदयामध्ये येत नाही. क्षयोपशम सम्यक्त्वामध्ये मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी चार या सहा प्रकृतींचा उपशम असतो व सम्यक् प्रकृतीचा उदय असतो. सम्यक् प्रकृति देशघाति असल्याने सम्यक्त्वाचा घात करत नाही. क्षायिक सम्यक्त्वामध्ये या कर्मांचा सत्तेमधून पूर्ण नाश झालेला असतो.

औपशमिक अथवा उपशम सम्यक्त्वाचे दोन प्रकार आहेत -

(१) प्रथमोपशम सम्यक्त्व (२) द्वितीयोपशम सम्यक्त्व.

पहिल्यांदा होते ते प्रथमोपशम व दुसऱ्यांदा होते ते द्वितीयोपशम असा याचा अर्थ मुळीच नाही. प्रथमोपशम सम्यक्त्वासंबंधी चर्चा आपण केलीच आहे. द्वितीयोपशम सम्यक्त्व कोणाला व केव्हा होते हे आता पाहूया. ज्यावेळी क्षयोपशम सम्यक्त्वाचे धारक असे सहाव्या, सातव्या गुणस्थानातील मुनिराज उपशम श्रेणी चढण्याच्या अर्थात ८ व्या, ९ व्या, १० व्या व ११ व्या गुणस्थानात आरोहण करण्याच्या सन्मुख होतात तेव्हा ७ व्या गुणस्थानात क्षयोपशम सम्यक्त्वामधून पुन्हा त्या कर्मांचा उपशम करून ते उपशम सम्यक्त्व प्राप्त करतात, त्यास द्वितीयोपशम सम्यक्त्व म्हणतात.

आपली चर्चा तर प्रथमोपशम सम्यक्त्वाविषयी अर्थात मिथ्यात्वातून सम्यक्त्व प्राप्त करण्यासंबंधी चालू आहे. सर्वप्रथम आपण हे पाहूया की प्रथमोपशम सम्यक्त्व कोणाला प्राप्त होऊ शकते व कोणाला प्राप्त होऊ शकत नाही.

'चारही गतिवाला, भव्य, मिथ्यादृष्टि, संज्ञी पंचेंद्रिय, पर्याप्त, गर्भज (मनुष्य व तिर्यंचांमध्ये), मंदकषायरूप विशुध्दतेचा धारक, जागृत, साकार ज्ञानोपयोगी जीव पाच लब्धिंपूर्वक, पाचव्या करणलब्धिच्या अनिवृत्तिकरणाच्या अनंतर समयामध्ये प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करतो.'

आता यामध्ये ज्या ज्या गोष्टी पात्रतारूपाने सांगितल्या आहेत त्यांच्याविषयी चर्चा करूया.

मनुष्य, तिर्यंच, देव आणि नारकी या चारही गतितील मिथ्यादृष्टि जीवांना प्रथमोपशम सम्यक्त्व होऊ शकते परंतु भव्य जीवांनाच होईल, अभव्य जीवांना होणार नाही.

तुम्ही विचाराल, 'असा अन्याय का बरे ? त्यांच्या कोणत्या कर्माच्या कारणाने ते अभव्य आहेत ?'

याचे समाधान असे आहे की भव्यत्व आणि अभव्यत्व कोणत्याही कर्मामुळे नसते. त्याला तर जीवाचा पारिणामिकभाव म्हटले आहे. याचाच अर्थ असा होतो की यामध्ये कर्माची अपेक्षा असत नाही. तशाच प्रकारची योग्यता त्या जीवामध्ये अनादिकाळापासून विद्यमान असते. अभव्य जीव तिन्ही काळात कधीही सम्यक्त्व प्राप्त करू शकत नाहीत. त्यांना प्रायोग्यलब्धिपर्यंतच्या चारही लब्धि तर होऊ शकतात परंतु त्यांना करणलब्धि प्रकट होत नाही आणि सम्यक्त्वदेखील कधीच होऊ शकत नाही.

भव्य जीवांमध्ये सम्यक्त्वाची पात्रता तर असते. त्यांनादेखील काललब्धि आली असता, भवितव्यतेनुसार पुरुषार्थाने सम्यक्त्व प्राप्त होते, त्यामध्ये देशनारूप निमित्तदेखील असते. जो जीव अर्धपुद्‌गलपरावर्तन काळात मोक्षाला जाणार असेल तेव्हा त्यास सर्वप्रथम सम्यक्त्व प्राप्तीची योग्यता होते. जो त्यापेक्षा अधिक काळानंतर मोक्षास जाणारा असेल किंवा जो अनंतानंत काळानंतरदेखील मोक्ष प्राप्त करणार नसेल अशा दूरानुदूर भव्यांना सम्यक्त्व होणार नाही.

आपण 'कारण कार्य रहस्य' पुस्तकामध्ये पाच समवायांची चर्चा केली होती. सम्यक्त्व प्राप्तिमध्येदेखील पाचही समवाय असतातच. फक्त काललब्धि आली आहे म्हणून पुरुषार्थाशिवायच सम्यक्त्व प्रकट होईल असे कधीच संभवत नाही.

तुम्ही विचाराल, 'कर्माचा उपशम करण्याचा पुरुषार्थ करून तरी सम्यक्त्व होईल ना ?'

अगं बेटा, जीवाचा पुरुषार्थ जीवामध्ये आपल्या स्वतःमध्ये होतो. कोणत्याही द्रव्याची कोणतीही पर्याय दुसरे द्रव्य करू शकत नाही, बदलू शकत नाही, नष्ट देखील करू शकत नाही. प्रथमोपशम सम्यक्त्व होण्यापूर्वी तसेच ते झाल्यानंतर

कर्मामध्ये तसेच नवीन होणाऱ्या बंधामध्ये अनेक स्थित्यंतरं होतात-अवस्थांमध्ये बदल होतात. कर्मांच्या या सर्व अवस्था कर्मांमध्ये त्यांच्या स्वतःच्या योग्यतेने होतात. जीव तर फक्त तत्त्वविचार आणि तत्त्वनिर्णय करतो - हाच पुरुषार्थ आहे. तत्त्वविचार करत असताना कर्माचे उपशमादि आपोआप होतात - स्वतःच होतात, जीवाला कर्मामध्ये काही करावे लागत नाही - तो काही करूच शकत नाही.

अशाप्रकारे आपण हे पाहिले की चारही गतिंमधील भव्य मिथ्यादृष्टीला प्रथमोपशम सम्यक्त्व होऊ शकते. जरा लक्ष द्या, आपण मिथ्यादृष्टीला म्हटले आहे, सम्यग्दृष्टीला नव्हे. कारण क्षयोपशम सम्यक्त्व तर उपशम सम्यग्दृष्टीला होते अर्थात प्रथमोपशम सम्यक्त्वपूर्वक क्षयोपशम सम्यक्त्व होते आणि क्षयोपशम सम्यक्त्वपूर्वक क्षायिक सम्यक्त्व होते. द्वितीयोपशम सम्यक्त्व देखील क्षयोपशम सम्यक्त्वपूर्वक होते. म्हणून प्रथमोपशम सम्यक्त्व प्रकट करण्याचे कार्य मिथ्यादृष्टि जीवच करतो.

चारही गतिंमधील जीवांपैकी संज्ञी पंचेंद्रिय पर्याप्त जीवांनाच सम्यक्त्व होते, असंज्ञी जीवांना नाही, अपर्याप्तांनादेखील नाही. पर्याप्त व अपर्याप्त याविषयी चर्चा आपण 'करणानुयोग परिचय' मध्ये विस्ताराने केली होती. ज्यांच्या पर्याप्ति पूर्ण होतात त्यांना पर्याप्त जीव म्हणतात, त्यांना पर्याप्त नामकर्माचा उदय असतो. ज्यांची एकदेखील पर्याप्ति पूर्ण होत नाही, त्यापूर्वीच श्वासाच्या अठराव्या भागात जीव मरणास प्राप्त होतात, त्यांना अपर्याप्त म्हणतात. त्यांना अपर्याप्त नामकर्माचा उदय असतो. त्यांना लब्धि अपर्याप्त (लब्ध्यपर्याप्त) अथवा क्षुद्रभववाले जीव असे म्हणतात.

पर्याप्त जीवांमध्येसुध्दा जोपर्यंत दुसरी शरीरपर्याप्ति पूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांना निर्वृत्तिअपर्याप्त म्हणतात. चारही गतिंमधील पर्याप्त जीव प्रारंभी निर्वृत्ति अपर्याप्त असतात व शरीर पर्याप्ति पूर्ण होताच त्यांना पर्याप्त म्हटले जाते. सर्व पर्याप्ति पूर्ण होईपर्यंत त्यांचे मरण होत नाही. मनुष्यांमध्ये सर्व गर्भज मनुष्य पर्याप्तच असतात आणि सर्व सम्मूर्च्छन मनुष्य लब्धि अपर्याप्तच असतात.

देव, मनुष्य आणि नारकी तर नियमाने संज्ञी पंचेंद्रियच असतात. तिर्यंचांमध्ये एकेंद्रियांपासून संज्ञी पंचेंद्रियांपर्यंतचे जीव आढळतात. एकेंद्रियांपासून असंज्ञी

पंचेंद्रियांपर्यंतच्या जीवांना सम्यक्त्व प्राप्तीची पात्रताच नसते - त्या पर्यायांमध्ये त्यांना सम्यक्त्व प्राप्त होऊ शकत नाही आणि सम्यग्दृष्टि जीव मरून त्या पर्यायांमध्ये जन्मदेखील घेत नाही.

संज्ञी जीवांमध्येच ही पात्रता असते याचे कारण असे आहे की मनसहित जीवांना ज्ञानाचा एवढा उघाड असतो की त्या जीवांमध्येच उपदेश ऐकणे, धारणेमध्ये घेणे, त्यावर विचार करणे, तत्त्वनिर्णय करणे या गोष्टी संभवतात. मनरहित - असंज्ञी जीवांमध्ये ही पात्रताच नसते.

देव आणि नारकी जीव पर्याप्ति पूर्ण झाल्यानंतर प्रथमोपशम सम्यक्त्व प्रकट करू शकतात. मनुष्यांमध्ये आणि तिर्यंचांमध्ये पर्याप्त, गर्भज असणे आवश्यक आहे. अपर्याप्त जीवांमध्ये, तसेच सम्मूर्च्छन जीवांमध्ये प्रथमोपशम सम्यक्त्व होऊ शकत नाही. मनुष्यांमध्ये गर्भसहित आठ वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या प्राप्तीची पात्रता येते, त्यापूर्वी नाही. गर्भज तिर्यंचांमध्ये जन्मानंतर यथायोग्य काळात ही पात्रता येते. त्या काळास दिवस पृथक्त्व म्हटले आहे अर्थात ३ ते ९ दिवस.

तुम्ही म्हणाल, 'आम्ही तर पू. श्री कानजीस्वामीजींच्या प्रवचनात अनेक वेळा वाचले आहे की स्वयंभूरमण समुद्रामध्ये असंख्यात सम्मूर्च्छन महामत्स्य सम्यग्दृष्टि आहेत, पंचम गुणस्थानवर्ती आहेत. आणि तू तर गर्भज तिर्यंचांची वार्ता करत आहेस, हे कसे? गर्भज आणि सम्मूर्च्छन हे आहे तरी काय?'

येथे आपण प्रथमोपशम सम्यक्त्वाबद्दल बोलत आहोत. सम्मूर्च्छन, संज्ञी, पंचेंद्रिय तिर्यंच जे सादि मिथ्यादृष्टि आहेत, ते क्षयोपशम सम्यक्त्व प्राप्त करू शकतात परंतु प्रथमोपशम सम्यक्त्व नाही. गर्भज शब्दाचा अर्थ आहे - मातेच्या गर्भामध्ये जन्मणारे. मातेचे स्त्रीबीज व पित्याचे वीर्य यांच्या निमित्ताने त्यांच्या शरीराची उत्पत्ति होते. सम्मूर्च्छन जीव 'आसमंतात्' अर्थात सभोवतालच्या वातावरणातून पुद्‌गलांचे अर्थात आहारवर्गणेचे ग्रहण करून त्यांना शरीररूपाने परिणमवितात.

संज्ञी, पंचेंद्रिय,सम्मूर्च्छन तिर्यंच पर्याप्तदेखील असू शकतात आणि अपर्याप्तदेखील.एकेंद्रियांपासून चतुरिंद्रियांपर्यंतचे सर्वच तिर्यंच सम्मूर्च्छन तिर्यंच असतात. त्यांच्यामध्येही पर्याप्त आणि अपर्याप्त जीव असतात.

मनुष्यांमध्येदेखील सम्मूर्च्छन जीव आढळतात, जे लब्धि अपर्याप्त असतात. आर्यखंडाच्या महिलांच्या काखेत व अन्य विशिष्ट अंगांमध्ये यांची उत्पत्ति होत असते.

आता विषय निघालाच आहे तर देवांच्या व नारकींच्या जन्मासंबंधी माहिती पाहूया. त्यांचा उपपाद जन्म असतो. स्वर्ग व नरक यांमध्ये मातापित्याद्वारे पुत्रांची उत्पत्ति होत नाही. त्यांचे उपपाद जन्मस्थान आहेत, तेथे एका अंतर्मुहूर्तामध्ये जीव पूर्ण वृध्दिसहित - युवावस्थेतच जन्मतो. स्वर्गामध्ये बालबच्चे नसतात. तेथल्या जीवांना बाल म्हणजे केसही नसतात आणि बच्चे म्हणजे मुलंही नसतात.

तुम्ही म्हणाल, ‘अरे वा! किती छान! आम्ही तर दिवसभर मुलांना सांभाळण्यात, त्यांचे पालनपोषण करण्यात, खाऊ पिऊ घालण्यात, त्यांचा अभ्यास - गृहपाठ घेण्यात वेड्यासारखी धावाधाव करत असतो. म्हणूनच तेथे स्वर्गसुख आहे असे म्हणत असावेत. आमचा पूर्ण दिवस तर ‘बालसंगोपनात’ म्हणजे बाळांना सांभाळण्यात व बाल म्हणजे केसांची निगा राखण्यातच पसार होतो.’

चला, याची तरी जाणीव आहे म्हणायची! हेही नसे थोडके! परंतु असे होऊ देऊ नका की यातच जीवन व्यतीत होईल आणि आमच्या वयाच्या व्हाल की जेव्हा ‘बाल’ आणि ‘बच्चे’ दोन्ही सोडून निघून जातात तेव्हा त्यांच्या आठवणीतच दिवस कंठण्याची पाळी येईल.

कोणत्याही संज्ञी पंचेंद्रिय जीवाला सम्यक्त्व होईल असे नाही. मंदकषायरूप विशुध्द परिणामवाला जीवच त्यास पात्र असतो. याचे कारण असे आहे की कषाय मंद झाल्याशिवाय आणि धर्मानुरागरूप बुध्दि झाल्याशिवाय जीव शास्त्रश्रवण करण्यास तयारच होणार नाही. तीव्रकषायी जीवांना धर्मानुरागरूप परिणाम होत

नाहीत, त्यांना देवादिकांची श्रध्दा नसते, आचार्यांचा उपदेश ऐकण्याची त्यांची वृत्ति नसते. जो जीव आपले स्वतःचे अर्थात आत्म्याचे स्वरूप ऐकण्यासदेखील तयार नाही, त्याला सम्यक्त्व कसे बरे होईल? म्हणून संक्लेश परिणामवाल्या तीव्रकषायी जीवांना सम्यक्त्व प्राप्तीची योग्यता नसते.

तुम्ही विचाराल, 'नारकी जीवांमध्ये तर अशुभ लेश्या असते, त्यांच्यामध्ये तीव्र क्रोधादि परिणाम आढळतात, तर मग ते मंदकषायी कसे असू शकतील? हां, स्वर्गातील देवांना तीन शुभ लेश्या असतात म्हणून त्यांना तर आपण मंदकषायी म्हणू शकतो.'

नरकांमध्ये आणि स्वर्गांमध्ये आपापल्या नरकाची किंवा स्वर्गाची लेश्या आढळते. एकेका लेश्येमध्ये तर असंख्यात लोकप्रमाण इतकी स्थानं म्हणजेच भेद असतात. येथे आपण मंदकषायी म्हणतो तेव्हा पूर्व परिणामांच्या अपेक्षेने त्या जीवाचे कषाय मंद होतात असे समजावे.

मनुष्यांमध्ये आणि तिर्यंचांमध्ये चौथ्या गुणस्थानापर्यंत सहाही लेश्या आढळतात. परंतु प्रथमोपशम सम्यक्त्व होण्यापूर्वी त्यांना नियमाने पीत, पद्म किंवा शुक्ललेश्यारूप मंदकषायामध्येच सम्यक्त्व प्राप्त होते, अशुभ लेश्यांमध्ये नाही.

सम्यक्त्वाची प्राप्ति जागृत अवस्थेमध्येच होते, झोपेत होत नाही. जागृत अवस्थेमध्येदेखील साकार ज्ञानोपयोगवाल्या जीवालाच होते, निराकार दर्शनोपयोगामध्ये सम्यक्त्वाचा प्रारंभ होत नाही. उपशम सम्यक्त्वाच्या काळामध्ये नंतर दर्शनोपयोग असू शकतो.

ज्ञानोपयोगाला साकार म्हणतात कारण ज्ञान हे ज्ञेयांच्या विशेषांना जाणते आणि दर्शनोपयोगाला निराकार म्हणतात कारण त्यामध्ये फक्त सामान्य अवलोकन म्हणजे सामान्य प्रतिभास होतो. पदार्थांच्या विशेषांना जाणणे यालाच ज्ञानाचा आकार म्हणतात. जसे, सुगंधाला जाणले हे सांगायचे झाले तर ज्ञान सुगंधाकार झाले असे म्हटले जाते. यामध्ये आकाराचा अर्थ 'शेप' असा होत नाही. ज्ञानाकार आणि ज्ञेयाकार याविषयी आपण 'कारण कार्य रहस्य' पुस्तकात सविस्तर चर्चा केलीच होती.

मनोयोग, वचनयोग किंवा काययोग यामधील कोणत्याही योगवाल्या जीवास प्रथमोपशम सम्यक्त्वाची प्राप्ति होते.

आपण सुरुवातीला पाहिलेल्या पाच लब्धिंपूर्वकच प्रथमोपशम सम्यक्त्व होते.

काही जण विचारतात की आम्हाला आता किती लब्धि प्राप्त झाल्या आहेत? आम्ही अनेक वर्षांपासून शास्त्रस्वाध्याय करत आलो आहोत, तर मग आम्हाला चार लब्धि तरी आहेत ना?

जीव चार लब्धिंमध्ये का बरे संतुष्ट होतो आहे? अभव्य जीवांनादेखील अनंतवेळा प्रायोग्यलब्धि प्राप्त होऊ शकते. जर का भव्य जीवसुध्दा प्रायोग्यलब्धिपर्यंत येऊन करणलब्धिमध्ये गेले नाहीत, त्यांनी जर का आत्मसन्मुख पुरुषार्थ केला नाही, तर त्यांनासुध्दा सम्यक्त्वाची प्राप्ति होणार नाही. आपल्या त्रिकाली ध्रुव भगवान आत्म्याची महिमा आणि महानता जोपर्यंत भासित होत नाही तोपर्यंत या तत्त्वांना ऐकून, पाठ करून, धारणेमध्ये ठेवूनदेखील काही फायदा नाही. तद्वत परिणमन झाले तरच कार्य होईल.

यामध्ये एकेका लब्धिचा काळ अंतर्मुहूर्त आहे व सर्वांचा मिळून काळदेखील एक अंतर्मुहूर्त आहे.

तत्त्वजिज्ञासा - आत्म्याला जाणण्याची तीव्र रुचि उत्पन्न होते तेव्हा जीवाची विशुध्दिदेखील वृध्दिंगत होत जाते, अशावेळी देशना ऐकून अथवा पूर्वी ऐकलेल्या देशनेचा अर्थात जिनेन्द्रकथित तत्त्वांचा तो विचार करू लागतो - तत्त्वविचार आणि तत्त्वनिर्णय करू लागतो त्यावेळी या चारही लब्धि बरोबरच होतात - एकदम होतात - एकावेळी होतात. म्हणूनच देशना तर पूर्वभवाचीसुध्दा असू शकते. याबद्दलची अधिक चर्चा देशनालब्धिच्या प्रकरणामध्ये पुढे करूया.

तुम्ही म्हणाल, 'बस्स! तत्त्वजिज्ञासा झाली, तत्त्वं ऐकली, पाठ केले आणि झाली आत्मानुभूति? काही करणे धरणे नको? तर मग द्रव्यानुयोग जाणूनच आमचे काम फत्ते होईल. करणानुयोग जाणला नाही तरी कार्य होईल ना? चरणानुयोगाची तर आता जरूरीच नाही.'

पहा तर खरं, जीवाने आजपर्यंत काहीतरी क्रिया करण्यानेच धर्म होईल असे मानले होते. आता जेव्हा क्रियेने काही होत नाही असे ऐकतो तेव्हा हा जीव

क्रिया सोडून देऊ इच्छितो. त्यामध्येदेखील याची पराची कर्तृत्वबुध्दि तर कायमच राहिली कारण तो असेच मानतो आहे की मी करू शकतो परंतु आता करणार नाही. सम्यग्दर्शनरूपी कार्याचे कारण बाह्य देव, शास्त्र, गुरु, विशिष्ट आचरण, शारीरिक क्रिया आहेत असे मानून याने आपली 'कारणविपरीतता' कायम ठेवली आहे.

येथे आपला विषय करणानुयोगाच्या आधारे पाच लब्धि समजण्याचा आहे, तरीदेखील जो जीव सम्यक्त्व प्राप्त करतो त्याच्या आचरणामध्ये चरणानुयोगाच्या कथनानुसार सहजच परिणामांची विशुध्दि होते. त्याचे लौकिक जीवनही सदाचार आणि नैतिकता यांनी युक्त असते. तो अष्टमूलगुणांचा धारक असतो अर्थात पाच उदुम्बर फळं आणि मांस, मद्य व मधाचा तो त्यागी असतो. त्याला सात व्यसनं नसतात. स्वच्छंदी जीवन व हिंसादिक क्रूर परिणाम त्याला असत नाहीत. तो अभक्ष्यभक्षणाचा त्यागी व अन्याय, अनीतिचा त्यागी असतो.

द्रव्यानुयोगाच्या अनुसार तो तत्त्वविचार करतो. प्रथमानुयोग वाचून तो संसाराविषयी भयभीत होतो, तीर्थंकरादि पुरुषांची चरित्रं वाचून तो आपला पुरुषार्थ वाढवितो.

करणानुयोगाच्या कथनानुसार कर्मांच्या अवस्था सहज स्वयमेव होतात. जीव तर तत्त्वविचारात एवढा गढून जातो - तल्लीन होतो की अंतर्मुहूर्तात त्याला सम्यक्त्व सहजपणे प्राप्त होते.

सम्यक्त्वाच्या प्राप्तिसाठी पात्रता कशी असते याची सविस्तर चर्चा आपण करणानुयोग परिचय पुस्तकात केलीच होती. आता येथे आपला विषय आहे प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या प्राप्तीची प्रक्रिया. यामध्ये जीवाचे परिणाम व कर्मांच्या अवस्था यांच्या वर्णनाद्वारे आपण सम्यक्त्व प्रकट होण्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या पाच लब्धिंचे स्वरूप पहाणार आहोत.

आता आपण क्रमशः एकेका लब्धिचे स्वरूप पाहूया. आज आपण येथेच विराम घेऊया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# क्षयोपशमलब्धि आणि विशुध्दिलब्धि

पत्रांक ६ १८ ऑगस्ट २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

प्रथमोपशम सम्यक्त्व कोणाला प्राप्त होऊ शकते हे पाहिल्यानंतर आता त्याच्या पूर्वी होणाऱ्या पाच लब्धिंचे स्वरूप आपण पाहाणार आहोत. त्यातील पहिल्या क्षयोपशमलब्धिसंबंधी आपण चर्चा करूया.

क्षयोपशम शब्दाशी आता तुम्ही परिचित आहात. ज्ञानाच्या उघाडास क्षयोपशम किंवा क्षयोपशमज्ञान म्हणतात. कर्माच्या अवस्थेचे नावसुध्दा क्षयोपशम आहे, ज्याचे स्वरूप आपण विस्ताराने पाहिले आहे. ज्ञानावरण, दर्शनावरण आणि अंतराय कर्मांचा क्षयोपशम अनादिकाळापासून सर्व जीवांमध्ये असतो. मिथ्यात्व नावाच्या पहिल्या गुणस्थानापासून क्षीणकषाय नामक बाराव्या गुणस्थानापर्यंत आणि एकेंद्रियांपासून संज्ञी पंचेंद्रिय जीवांपर्यंत सर्वांमध्ये या कर्मांचा क्षयोपशम आढळतो. क्षयोपशम नामक सम्यक्त्वदेखील आहे जे चौथ्या गुणस्थानापासून सातव्या गुणस्थानापर्यंत आढळते. क्षयोपशम चारित्र देखील असते.

आपला विषय क्षयोपशम नसून क्षयोपशमलब्धि हा आहे. क्षयोपशमलब्धि तर फक्त संज्ञी पंचेंद्रियांनाचा प्राप्त होते परंतु संज्ञी पंचेंद्रिय होणे अर्थात ज्ञानाचा एवढा उघाड होणे यास क्षयोपशमलब्धि म्हणत नाहीत. त्याची व्याख्या तर पुढीलप्रमाणे आहे -

**क्षयोपशमलब्धि** - 'ज्ञानावरणादि समस्त अप्रशस्त कर्म प्रकृतींची शक्ति अर्थात अनुभाग ज्या काळी दर समयाला अनंत गुणा घटत्या अनुक्रमाने उदयास येऊ लागतो त्या काळात क्षयोपशमलब्धि होते. अप्रशस्त कर्मांची शक्ति हीन हीन होऊन उदयास येत रहाते.'

'अनंत गुणा घटणे' याचा अर्थ समजून घ्या. जेव्हा एखाद्या संख्येचा अनंत गुणा म्हणतात तेव्हा त्या संख्येस अनंतने गुणावे आणि जेव्हा अनंत गुणा घटता

किंवा 'अनंत गुणा घाटि' असे म्हणतात तेव्हा अनंतावा भाग समजावा. उदा. १६ या संख्येस चार गुणा केल्यावर १६ × ४ = ६४ संख्या येते आणि जेव्हा १६ ही संख्या चार गुणा घटते असे म्हणतात तेव्हा १६ ÷ ४ = ४ संख्या येते.

जीवाने पूर्वी बांधलेली व सत्तेमध्ये असलेली अप्रशस्त कर्म असतात त्यांचा अनुभाग घटत जातो आणि दर समयाला पूर्वीच्या अनुभागाच्या अनंताव्या भागरूप अनुभाग उरतो. उदयाला येतानाही अनंतावा भाग होऊन उदयास येतो. येथे फक्त अप्रशस्त कर्मांचीच बाब आहे, प्रशस्त कर्मांची नाही. पूर्वी आपण अप्रशस्त कर्मांचे विस्तृत वर्णन पाहिले होते. लक्षात आहे ना?

सर्व घातिकर्म अप्रशस्तच आहेत. अघातिकर्मांमध्ये प्रशस्त आणि अप्रशस्त असे दोन भेद आहेत. घातिकर्मांमध्ये ज्ञानावरणादि कर्मांचे आपापले अनंत स्पर्धक असतात. त्यामध्ये मंद अनुभागापासून तीव्र अनुभागापर्यंत स्पर्धकांचे ४ - ४ भेद म्हणजेच स्थानं आपण पाहिली होती - लता, दारु, अस्थि आणि शैल. अघातिकर्मांच्या ज्या अप्रशस्त प्रकृति आहेत त्यांच्या स्पर्धकांची सुध्दा ४ - ४ स्थानं आहेत - निंब, कांजीर, विष आणि हलाहल.

या ४ - ४ स्थानांमध्ये अनंत स्पर्धक आणि एकेका स्पर्धकामध्ये अनंत अनंत वर्गणा असतात. तसेच एकेका वर्गणेमध्ये अनंत अनंत वर्ग असतात. अभव्य राशीच्या अनंत गुणा व सिध्दराशीच्या अनंताव्या भागप्रमाण जो अनंत आहे तेवढे वर्ग अर्थात परमाणु एकेका वर्गणेमध्ये असतात आणि तेवढ्याच वर्गणा एकेका स्पर्धकात असतात.

या सर्व अप्रशस्त कर्मांचा अनुभाग अर्थात फल देण्याची शक्ति अनंताव्या भागप्रमाण घटत जाते आणि उदयास येते.

आता क्षयोपशम आणि क्षयोपशमलब्धि या दोन्हींमधील अंतर तुमच्या नीट लक्षात येईल. क्षयोपशम तर फक्त देशघाति प्रकृतिंमध्येच आढळतो परंतु क्षयोपशमलब्धिमध्ये दर समयाला अनुभागाचे अनंत गुणा घटणे हे कार्य तर सर्व घातिकर्मांमध्ये व अघातिकर्मांच्या अप्रशस्त प्रकृतिंमध्ये होत रहाते.

क्षयोपशमामध्ये तर देशघाति कर्मांचा जेवढा अनुभाग आहे तेवढाच उदयास येतो परंतु क्षयोपशमलब्धिमध्ये दर समयाला अनंतावा भाग होऊन उदयास येत रहातो.

क्षयोपशम तर निरंतर विद्यमान असतो - झोपेत, बेशुध्दावस्थेत देखील कायम रहातो परंतु क्षयोपशमलब्धि फक्त अंतर्मुहूर्तापर्यंतच असते, तीही जागृत अवस्थेमध्ये असते.

क्षयोपशम तर ज्ञानावरण, दर्शनावरण आणि अंतराय कर्मांच्या देशघाति प्रकृतिंमध्ये आढळतो, परंतु क्षयोपशमलब्धिमध्ये या तीन कर्मांच्या सर्वघाति व देशघाति दोन्ही प्रकारच्या प्रकृतींचा व त्याशिवाय मिथ्यात्व आणि चारित्रमोहनीय कर्मांचा अनुभाग देखील अनंत गुणा घटत घटत उदयास येतो. त्यांचा तीव्र अनुभागउदय न होता मंद अनुभागउदय होतो व तो देखील दर समयाला मंदतर होत जातो.

ज्याला शैलभागरूप किंवा अस्थिभागरूप तीव्र अनुभागवाल्या मिथ्यात्वाचा उदय आहे, ज्याला ७० कोडाकोडीसागर किंवा तत्सम उत्कृष्ट स्थितिवाला मिथ्यात्वाचा बंध होत असेल अशा जीवाला क्षयोपशमलब्धि आहे असे म्हणता येत नाही. त्या जीवांना विशुध्दिलब्धि आणि देशनालब्धिची पात्रता नसते. 'भावदीपिका' ग्रंथात पं. दीपचंदजी कासलीवाल म्हणतात की वरच्या तीव्र अनुभागवाल्या स्पर्धकांचा ज्यांना उदय आहे अशा तीव्र मिथ्यात्वी जीवांना मोक्षमार्गाचा उपदेश देणेदेखील योग्य नाही. उपदेश देतेवेळी सुध्दा पात्रता - अपात्रता यांचा विवेक बाळगावयास हवा.

जो तीव्र मिथ्यात्वी व तीव्र कषायी जीव आहे त्याला धर्मोपदेश ऐकण्याची बुध्दि होत नाही, कोणी ऐकवू लागला तर त्याच्या कषायांची वृध्दि होते. तो उपदेशदात्याचा तसेच ज्यामध्ये सत्य उपदेश आहे अशा सत्शास्त्रांचाच द्वेष करू लागतो, त्यांना विघ्न उत्पन्न करतो. परंतु अशा जीवांना पाहून आपण त्यांचा द्वेष करणे योग्य नाही. त्यांची सम्यक्त्वाची काललब्धि अजून दूर आहे आणि होनहार काही भलतीच आहे असे समजले पाहिजे. ज्यावेळी त्यांची सम्यक्त्वाची काललब्धि येईल त्यावेळी या पाच लब्धिपूर्वकच त्यांना सम्यक्त्व होईल.

त्यावेळी त्यांचे मिथ्यात्व व कषाय मंद होतील, जिनेन्द्रकथित सत्शास्त्रांची महिमा त्यांना भासू लागेल, उपदेशकसुध्दा त्यांना भेटतील व उपदेशाचे ग्रहणही त्यांच्याकडून होईल.

त्यांनी आज मानावे की काही काळानंतर मानावे, परंतु खऱ्या मोक्षमार्गाचे स्वरूप समजल्याखेरीज, आत्म्याचे स्वरूप समजल्याखेरीज, खऱ्या देव गुरु

शास्त्राचे स्वरूप समजल्याखेरीज त्यांना सम्यक्त्वाची प्राप्ति होणार नाही. सम्यक्त्वाची प्राप्ति झाल्याशिवाय मोक्षमार्गाची सुरुवात होणार नाही, मोक्षमार्गाखेरीज मोक्षाची प्राप्ति होणार नाही - सुखाची प्राप्ति होणार नाही, जन्म मरणाच्या फेऱ्यांमधून सुटका होणार नाही.

मिथ्यात्व ही सर्वघाति प्रकृति आहे. त्यामध्ये शैल, अस्थि व दारु (बहुभाग) असे तीन प्रकारचे स्पर्धक असतात. क्षयोपशमलब्धिमध्ये त्यांचा अनुभाग अनंत गुणा घटत जातो, तरीदेखील त्यास मिथ्यात्व कर्माचा क्षयोपशम म्हणत नाहीत.

असातावेदनीय आदि अप्रशस्त प्रकृतींचा अनुभागदेखील दर समयाला घटत जातो.

पहा बरं, कसा सहज सुंदर नियम आहे. एखाद्या जीवाने पूर्वी खूप पाप केले असेल, तीव्र मिथ्यात्वाचे सेवन करून तीव्र अनुभागवाल्या कर्मांचा बंध केला असेल तरीदेखील ज्यावेळी त्याला आपल्या आत्म्याचे स्वरूप व तत्त्वज्ञान जाणण्याविषयी जिज्ञासा आणि तीव्र रुचि उत्पन्न होते, त्यावेळी त्याच्या पूर्वबध्द कर्मांचा अनुभाग मंद होत जातो. जेव्हा मिथ्यात्व आणि चारित्रमोहनीय मंद होऊन उदयास येऊ लागेल तेव्हा सहजच जीवाचे मंदकषायरूप परिणाम होतील, धर्मानुरागरूप परिणाम होतील.

याच गोष्टीला विशुध्दलब्धिच्या रूपाने सांगितले जाते. पूर्वबध्द कर्मांचा अनुभागउदय मंद होणे हे कारण आहे - निमित्त आहे आणि मिथ्यात्व व रागादिकांचे मंद होणे - शुभपरिणाम होणे हे त्याचे नैमित्तिक कार्य आहे. म्हणूनच क्षयोपशमलब्धिला कारण जाणून आधी सांगितले आहे व विशुध्दिलब्धिला कार्य जाणून नंतर सांगितले आहे. तसे पाहिले तर या दोन्ही लब्धि एकदम एकावेळी विद्यमान असतात - एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे त्या आहेत.

आता नवे होणारे परिणाम शुभरागरूप असतात त्यांच्या निमित्ताने सातावेदनीय, शुभआयु, शुभनाम, उच्चगोत्र आदि प्रशस्त प्रकृतींचा बंध होतो. कारण आठही कर्मांचा उदय असतानाही नवा बंध तर मिथ्यात्व आणि कषायांच्या निमित्ताने होत असतो. शुभ परिणामांनी अघातिकर्मांच्या प्रशस्त प्रकृतींचा बंध होतो, तर अशुभपरिणामांनी अघातिकर्मांच्या अप्रशस्त प्रकृतींचा बंध होतो. दोन्ही

प्रकारच्या परिणामांनी ज्ञानावरणादि घातिकर्मांचा बंध तर होतोच परंतु नवा स्थितिबंध व अनुभागबंध शुभपरिणामांनी कमी बांधला जाईल व अशुभ परिणामांनी अधिक बांधला जाईल.

हीच गोष्ट विशुध्दिलब्धिच्या द्वारे सांगितली जाते. त्याची व्याख्या पाहूया -

**विशुध्दिलब्धि** - 'क्षयोपशमलब्धि ज्याला प्राप्त झाली आहे, त्या निमित्ताने जीवाला सातावेदनीय आदि प्रशस्त प्रकृतींच्या बंधास कारणभूत असे धर्मानुरागरूप शुभपरिणाम होतात, त्यांची प्राप्ति होणे ही विशुध्दिलब्धि आहे.'

क्षयोपशमलब्धिच्या फलस्वरूप जीवाचे मिथ्यात्व आणि कषाय दर समयाला मंद होत जातात, त्यामुळे सहजच त्याची धर्मानुरागरूप वृत्ति होते. देवदर्शन करणे, पूजा - स्वाध्याय करणे, सदाचारयुक्त नैतिक जीवन असणे, अभक्ष्यभक्षणाचा त्याग करणे, व्यसनाधीन न होणे, अन्याय, अनीति न करणे इत्यादि भाव त्याला सहज उत्पन्न होतात. या शुभपरिणामांच्या निमित्ताने त्याला सातावेदनीय आदि प्रशस्त कर्मांचा बंध होऊ लागतो.

विशुध्दि शब्द शास्त्रामध्ये वेगवेगळ्या जागी वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. विशुध्दिलब्धिच्या प्रकरणात तसेच इतर सामान्य कथनात विशुध्दिचा अर्थ शुभपरिणाम असाच करावा. करणलब्धिच्या प्रकरणात जेव्हा म्हटले जाते की विशुध्दि अनंत गुणा वाढत जाते तेव्हा तेथे तत्त्वज्ञानाची निर्मलता आणि श्रध्दा व चारित्राची निर्मलता यांच्यासह हानीस प्राप्त होणाऱ्या कषायांच्या उदयस्थानांना विशुध्दि म्हटले जाते.

प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या वेळी श्रध्दा अर्थात प्रतीति आणि तत्त्वनिर्णयाची निर्मलता असे समजावे आणि अपूर्वकरणादि श्रेणीच्या गुणस्थानांमध्ये चारित्रासंबंधी निर्मलता म्हणजेच वृध्दिंगत वीतरागता असे समजावे, त्यांच्यासह असणाऱ्या जीवाचे कषायांचे उदयस्थान हानीस प्राप्त होत जातात - त्याला विशुध्दि असे म्हणतात.

कोठे कोठे विशुध्दि म्हणजे विशेष शुध्दि - पूर्ण वीतरागता या अर्थाने देखील हा शब्द वापरला जातो. कषायांचा उदय पूर्णतः थांबल्यानंतर पूर्ण विशुध्द म्हटले जाते. जेथे जो अर्थ योग्य असेल तेथे तो ग्रहण करावा.

जीवाच्या कषायांना दोन भागांमध्ये विभाजित केले जाते - (१) संक्लेश परिणाम (२) विशुध्द परिणाम. कषायांची एकूण असंख्यात लोकप्रमाण स्थानं आहेत. त्यापैकी बहुभाग संक्लेश स्थानं आहेत व एकभाग विशुध्दिची स्थानं आहेत. त्या दोन्हींमध्ये काय फरक आहे ते पाहूया.

साता, स्थिर, शुभ, सुभग, सुस्वर, आदेय आदि शुभ प्रकृतींच्या बंधास कारणभूत अशा कषायस्थानांना विशुध्दिस्थान म्हणतात आणि असाता, अस्थिर, अशुभ, दुर्भग, दुस्वर, अनादेय आदि अशुभप्रकृतींच्या बंधास कारणभूत अशा कषायांच्या उदयस्थानांना संक्लेशस्थान म्हणतात.

अत्यंत तीव्र कषायांच्या अभावामध्ये जो मंदकषाय होतो त्याला विशुध्दि म्हणतात. सातावेदनीयाचे चतुःस्थानगतबंधापेक्षा सातावेदनीयाचे त्रिस्थानगत अनुभाग बंध करणारे जीवाचे परिणाम संक्लिष्टतर (अधिक संक्लेशवाले) आहेत अर्थात त्यांच्यापेक्षा तीव्र कषायवाले आहेत.

वर्धमान - वाढणाऱ्या कषायांना संक्लेश व हीयमान - घटणाऱ्या कषायांना विशुध्दि म्हणणे देखील ठीक नाही. कषायांची वृध्दि केवळ असाताच्या बंधाचे कारण नाही, कारण कषायांच्या वृध्दीच्या काळात देखील साताचाही बंध आढळतो. त्याचप्रमाणे कषायांच्या हानीच्या काळातदेखील असाताचा बंध आढळतो.

तेथे प्रश्न उद्‌भवतो की वाढणाऱ्या कषायांना संक्लेश आणि कमी होणाऱ्या कषायांना विशुध्दि असे का स्वीकारत नाहीत? कारण तसा स्वीकार केला असता संक्लेशस्थानं आणि विशुध्दिस्थानं यांची संख्या समान होण्याचा प्रसंग येईल. परंतु आपण तर पाहिले होते की संक्लेशस्थानं असंख्यात बहुभाग आहेत व विशुध्दिस्थानं एकभाग प्रमाण आहेत.

ही तर सामान्य संसारावस्थेतील गोष्ट झाली. परंतु सम्यक्त्वोत्पत्तीच्या काळात हानीस प्राप्त होणाऱ्या कषायस्थानांनाच विशुध्दि म्हणतात. येथे असे म्हणणे ठीक आहे. कारण दर्शनमोह आणि चारित्रमोह यांची क्षपणा किंवा उपशमना चालू असताना पूर्व समयात उदयास प्राप्त होणाऱ्या अनुभाग स्पर्धकांपेक्षा अनंत गुणा हीन अशा अनुभाग स्पर्धकांच्या उदयाने उत्पन्न झालेल्या कषायस्थानांना येथे विशुध्दि म्हटले जाते.

या चर्चेने हे निष्पन्न होते, स्पष्ट होते की नरकगतिमध्ये कृष्णादि तीन लेश्या असताना देखील तेथे विशुध्दिलब्धि असते.

पहा बरं, अजून तर या विशुध्दिलब्धिवाल्या जीवाला देशना अर्थात मोक्षमार्गाच्या स्वरूपासंबंधी उपदेश ऐकण्याची संधी प्राप्त झालेली नाही. त्याची प्राप्ति तर देशनालब्धिच्या प्रकरणामध्ये सांगितली जाईल. आता तर केवळ पुण्यबंधास कारणभूत असे धर्मानुरागरूप शुभपरिणाम होत आहेत.

कित्येक जीव एवढ्यानेच संतुष्ट होऊन जीवन व्यतीत करतात. मानवतेच्या भावनेने दुसऱ्यांना मदत करणे, सदाचाराने रहाणे, देवदर्शन, पूजा, यात्रा, दया, दानादि करणे यातच ते जीवनाची इतिकर्तव्यता मानतात - सफलता मानतात. अजून या जीवांना तत्त्वज्ञानाचा गंध नाही, खऱ्या देव गुरु शास्त्राची पारख नाही. असा जीव धर्मानुरागवश कोठे तरी प्रवचन - शास्त्र ऐकण्यासदेखील जातो, परंतु अजून पर्यंत याला खऱ्या उपदेशाची प्राप्ति झालेली नाही. स्वामीजी म्हणायचे की हा जीव पत्नी, मुलंबाळं, व्यापार, धंदा यातून मोठ्या मुष्किलीने एखादा तास काढून शास्त्र ऐकण्यास जातो तर कुगुरु त्याचा तो तास लुटतात. म्हणजेच त्याचा वेळ वाया जातो.

तुम्हीच विचार करा, अनादिकाळापासून आपण जन्म मरण करत आलो आहोत. त्यामध्ये अनंत वेळा कधी विशुध्द परिणामांद्वारे पुण्य प्रकृति बांधल्या तर कधी संक्लेश परिणामांद्वारे पाप प्रकृति बांधल्या परंतु बंधनातून सुटण्याचा मार्ग काही प्राप्त झाला नव्हता.

यातून सुटण्याचा मार्ग - मोक्षाचा मार्ग आणि त्याचा उपदेश जो जिनेन्द्र भगवंतांनी सांगितला आहे तोच यथार्थ आहे, सत्य आहे. बंधनातून सुटण्याचा मार्ग आज आपल्याला उपलब्ध आहे, त्याचे मूळकर्ता - मूळ उपदेशक तीर्थंकर भगवान आहेत. त्यांच्या दिव्यध्वनिमध्ये हा उपदेश सहज रीतीने सांगितला जातो. त्यानुसार गणधर आचार्य बारा अंगांची रचना करतात, ज्याला आपण द्वादशांग द्रव्यश्रुत म्हणतो. आचार्यांच्या परंपरेने हा मार्ग आजपर्यंत चालत आला आहे.

या मार्गाचा उपदेश ऐकण्याची जिज्ञासा उत्पन्न होणे, तशी बुध्दि होणे व हा सत्य उपदेश ऐकण्याची संधी मिळणे असे महाभाग्य - महान पुण्य त्यालाच

असेल की ज्याला क्षयोपशमलब्धि आणि विशुध्दिलब्धि यांच्यापूर्वक देशनालब्धि प्राप्त होते. विशुध्दिलब्धि असल्याशिवाय जीव जिनेन्द्रकथित उपदेश ऐकण्यास तयार होणार नाही, त्याला तशी बुध्दि होणार नाही.

ज्याप्रमाणे खडकावर पेरलेले बी उगवत नाही, वाया जाते, त्यासाठी मऊ मातीत पेरणे आवश्यक आहे त्याप्रमाणे जिनवाणी ऐकण्याचे महान भाग्य आणि ऐकून ते समजण्याचे महान भाग्य त्यालाच लाभेल की ज्याचे परिणाम मृदु असतील, विशुध्द असतील. अजून एक गोष्ट अशी आहे की ज्याला महान पुण्याचा उदय असेल त्यालाच महान दुर्लभ असे जिनवाणीश्रवणाचे महानभाग्य प्राप्त होते, अन्यथा हा उपदेश कानावर पडणेदेखील अत्यंत दुर्लभ आहे.

लोक तर पुण्याचे फळ संपत्ति आणि घरदार प्राप्त होण्यातच आहे असे मानतात. ते तर जीवाने अनंत वेळा प्राप्त केले व सोडले. परंतु त्या पुण्यास आपण चांगले कसे म्हणू शकतो की जे आपल्याला संसारातच भटकवत ठेवते?

जेव्हा जीवाला आपल्या आत्म्याचे स्वरूप जाणण्याची तीव्र जिज्ञासा उत्पन्न होते, त्याला धर्मानुरागरूप मंद कषाय होतात तेव्हा त्याच्या या पात्रतेमुळेच त्याला देशनारूप निमित्ताची सहज उपलब्धि होते. आता देशनालब्धिचे स्वरूप समजूया.

**देशनालब्धि** - 'सहा द्रव्य, सात तत्त्व अर्थात नऊ पदार्थ, मोक्षमार्ग, खऱ्या देव गुरु शास्त्राचे स्वरूप, स्व आणि पर यांचे ज्ञान, हेय - ज्ञेय - उपादेय आदि भाव इत्यादि संबंधी खरा उपदेश देणाऱ्या आचार्यादिकांचा अर्थात तीर्थंकर, आचार्य, उपाध्याय, साधु, पंचम किंवा चतुर्थ गुणस्थानवर्ती ज्ञानी जीवांचा समागम मिळणे, त्यांच्याद्वारे दिला गेलेला उपदेश म्हणजेच देशना मिळणे आणि उपदेशित पदार्थांचे ज्ञानामध्ये धारण होणे यास देशनालब्धि म्हणतात.'

उपदेशाला देशना म्हणतात आणि उपदेश ऐकून तो समजणे, लक्षात ठेवणे, त्यावर पुनः पुनः विचार करणे ही देशनालब्धि आहे. श्रवण, ग्रहण, धारण आदि याची अंगं आहेत.

फक्त उपदेश ऐकण्याची क्रिया ही देशनालब्धि नव्हे. देशनालब्धिवाला जीव तर आपल्या स्वरूपासंबंधीचा उपदेश अत्यंत रुचिपूर्वक ऐकत असतो. पद्मनंदी पंचविंशतिका ग्रंथात आचार्य पद्मनंदी म्हणतात -

'तत्प्रति प्रीतिचित्तेन येन वार्ताऽपि हि श्रुता ।
निश्चितं स भवेत् भव्य भावि निर्वाणभाजनम् ।।'

आपल्या स्वरूपाविषयीचे कथन ऐकून जीव आनंदित होतो, त्यासंबंधी अधिक जाणण्याची त्याला तीव्र जिज्ञासा व उल्हास उत्पन्न होतो.

घरगृहस्थीच्या कामांमधून कशाही तऱ्हेने वेळ काढून तो मोठ्या उत्साहाने उपदेश ऐकण्यास येतो. ही तर आपल्या सर्वांच्या अनुभवाची गोष्ट आहे की टी. व्ही. वरची आपल्या आवडीची सीरियल पहाण्यासाठी लोक बाकी सारी कामे पटापट उरकून सीरियलच्या वेळी बरोबर टी. व्ही. समोर येऊन हजर होतात.

त्याचप्रमाणे ज्याला तीव्र जिज्ञासा जागृत झाली आहे, त्याची रुचिच त्याचा मार्ग बनविते - मार्ग शोधून काढते. विषयकषायांच्या गोष्टींपेक्षा त्या जीवाला तत्त्वश्रवणामध्ये रस - गोडी लागू लागते, व्यवसायामध्ये होणारे आर्थिक नुकसानदेखील त्याला देशना ऐकण्यात विघ्न आणू शकत नाही - त्याला विचलित करू शकत नाही.

ज्याची देशनालब्धिची योग्यता असते, भवितव्य असते, त्याला ज्ञानीचा सत्समागम आणि उपदेशाची प्राप्तिदेखील सहज होते. त्या जीवाची तीव्र रुचिच त्यास कारणभूत ठरते.

तुम्हाला आठवतंय? १९७५ साली जेव्हा रीना तू सहा वर्षांची होतीस व मोना तू तीन वर्षांची होतीस तेव्हा तुम्हा दोघींना घरी तुमच्या काका - काकींकडे सोडून आम्ही दोघे व तुमचे आजी-आजोबा धर्मचक्र यात्रेत सामील झालो होतो, आम्ही सतत तीन महिने संपूर्ण भारताच्या तीर्थक्षेत्रांची व सिध्दक्षेत्रांची वंदना करत प्रवास करत होतो. एक हजार यात्रेकरू आणि अनेक विद्वान यांच्यासह ही यात्रा निघाली होती. त्यामध्ये दररोज अनेक विद्वानांच्या प्रवचनांचा आम्हाला लाभ मिळत होता.

यात्रेला जाण्याची मला अत्यंत तीव्र ओढ होती, रुचि होती. आमची यात्रा तर सफल झालीच परंतु त्याचबरोबर भवभवांतरामध्ये अत्यंत दुर्लभ असे खरे तत्त्वज्ञान ऐकण्याची संधि प्राप्त झाली. त्यावेळी हे लक्षात आले की, 'अहो, असे माझे विलक्षण स्वरूप! मला तर या गोष्टींची - तत्त्वज्ञानाच्या या अभ्यासाची

जाणीवही नव्हती, माहितीही नव्हती.' तसे पाहिले तर लहानपणापासून धार्मिक रुचि आणि संस्कार तर होते, परंतु तत्त्वज्ञानाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास नव्हता, त्याचे महात्म्य कधी भासले नव्हते. त्यानंतर देखील अनेक वेळा कधी तुम्हाला घेऊन तर कधी सोडून आम्ही शिबिरांना व प्रवचनांना जात असू.

तुम्ही दोघी एवढ्या छोट्या होतात तरीदेखील एवढ्या समंजस, शहाण्या व सहनशील होतात की त्याची आठवण झाली तर आजही मला मोठे आश्चर्य वाटते. आम्हा दोघांना तत्त्वज्ञानाच्या प्राप्तिमध्ये तुम्हा दोघींचे अमूल्य सहकार्य लाभलेले आहे यामध्ये काही शंका नाही. याबाबतीतल्या तुमच्या उपकाराचे स्मरण होते तेव्हा आजदेखील कृतज्ञतेने माझे डोळे पाणावतात.

ज्याला तीव्र रुचि उत्पन्न होते त्याला ज्ञानीचा समागम, देशना मिळणे आणि त्याप्रकारचे संयोग सहज प्राप्त होतात. वास्तविकता तर अशी आहे की संयोग कधीही बाधक नसतात, आपली संयोगामधील रुचि व गृध्दताच बाधक असते. ज्याला तत्त्वज्ञानाची रुचि नसते तो प्रतिकूल संयोगाच्या नावाखाली बहाणा शोधतो.

आपण पाहिले होते की मिथ्यात्व आणि कषायांच्या अनुभागाचा मंद, मंदतर उदय होत रहातो त्याचप्रमाणे ज्ञानावरणादि कर्मांचा अनुभागउदयदेखील मंद होत जातो. या कारणास्तव जीव जो उपदेश श्रवण करतो, ग्रहण करतो - समजतो त्यासंबंधी योग्य काय व अयोग्य काय आहे हा निर्णय करण्याची बुध्दि - एवढा विवेकदेखील त्याला असतोच. समोरची व्यक्ति ज्ञानी आहे आणि शास्त्रातला हा उपदेश सत्यच आहे याची त्याला स्वतःच्या बुध्दीने ओळख पटते. लौकिक जीवनात आपण पहातो की दुसऱ्याच्या बुध्दिप्रमाणे काम करणारे जीव स्वतः योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत.

धर्माचे स्वरूप व आत्म्याचे स्वरूप सांगणाऱ्या वक्त्यांमध्ये कोणी खरा उपदेश देतात तर कोणी धर्म आणि आत्मा या नावाखाली खोटा उपदेश देऊन मिथ्या मान्यतांचा प्रचार करतात. अशा परिस्थितिमध्ये उपदेशाची सत्यता व असत्यता यांचा निर्णय करण्यायोग्य व त्याची परीक्षा करण्यायोग्य विवेक आपल्याजवळ असणे आवश्यक आहे.

आपण चांगले संयोग व धनसंपत्तिकडे पाहून म्हणतो की हा सारा पुण्याचा उदय आहे. परंतु देशना देणाऱ्या, खरा उपदेश देणाऱ्या ज्ञानी जीवांचा समागम

होणे, त्यांचा सहवास प्राप्त होणे आणि त्यांच्याद्वारे दिलेल्या उपदेशाचे श्रवण, ग्रहण करण्याचे महाभाग्य प्राप्त होणे हे तर उच्च जातीच्या पुण्याचे फळ आहे.

शास्त्रांमधील कथनांचा चुकीचा अर्थ सांगणाऱ्या आणि आपल्या मतिकल्पनेप्रमाणे हवा तसा उपदेश देणाऱ्या लोकांची काही कमतरता नाही. ते तर स्वतःला देशना देणारे समजतात आणि आव तर असा आणतात की जणुं दुनियेच्या कल्याणासाठी त्यांचा अवतार झाला आहे. आश्चर्याची गोष्ट तर अशी आहे की त्यांना भक्तांची कधी उणीव भासत नाही. त्यांच्या मागे लागून अविवेकी पणाने वागणाऱ्या लोकांना पाहून विचार येतो की यांचे भवितव्य काही ठीक नाही.

एखाद्याला विचारावे, 'काय भाऊ, जेवलात का?' त्यावर तो म्हणतो, 'अहो, आम्ही तर सर्वांच्या भोजनाची व्यवस्था करणारे आहोत. पहा तर, मी हजार लोकांना भोजनाचे पास बनवून दिले.' त्याला विचारले, 'तर मग तुमचे पोट भरलेच असेल?' त्यावर तो म्हणतो, 'अहो, मला फुरसत कोठे आहे? पास देता देता मला जेवायला वेळच कोठे मिळाला?'

दुसरे एक उदाहरण पाहूया. दुसऱ्या एका महाशयांना विचारले, 'तुम्हाला पैशांची काही कमतरता तर नाही ना?' तो म्हणाला, 'मला विचारताहात? अहो, रोज तर माझ्यासमोर करोडपति लोक रांगा लावून उभे रहातात - माझ्याकडून पैसे घ्यायला आणि मला पैसे द्यायला.' पुन्हा प्रश्न विचारला, 'तर मग तुम्हाला पैशांची काही चिंताच नसेल.' तो म्हणतो, 'तुम्हाला मी कसं सांगू? मला घर घ्यावयाचे आहे, मुलीचे लग्न लावायचे आहे, मुलाला उच्च शिक्षण द्यायचे आहे. या सर्वांसाठी पैशांची खूप गरज आहे.' त्याला विचारले, 'परंतु तुम्ही तर म्हणत होतात...?' तो म्हणतो, 'हां! मी बँकेत कामाला आहे. इतके सारे लाखो रुपये देण्याचे, घेण्याचे, मोजण्याचे काम करण्यासाठी मला काही हजार रुपये पगार मिळतो.'

त्याचप्रकारे एकाला विचारले, 'काय हो, तुम्हाला देशना तर मिळालीच असेल नाही का?' तो म्हणतो, 'काय वार्ता करता! मी तर देशना देणाऱ्यांपैकी आहे. मी तर इतक्या साऱ्या ग्रंथांचे टाईप सेटिंग केले आहे, प्रूफ रीडिंग केले आहे, व्याख्यानं ऐकविली आहेत.' त्याला म्हटले, 'फारच चांगली गोष्ट आहे.

तर मग आपण देशना देणारे ज्ञानी धर्मात्मा आहात.' त्यावर तो म्हणतो, 'नाही हो, आमचे एवढे भाग्य कोठे?'

देशना तर ज्ञानी जीवांच्या उपदेशालाच म्हणतात. तो उपदेशदेखील मोक्षमार्गासंबंधी असणे आवश्यक आहे; द्रव्यानुयोगासंबंधी असायला पाहिजे, स्व पर भेदविज्ञान करण्यामध्ये कार्यकारी असायला पाहिजे. अन्य अनुयोगासंबंधी कथन असेल तर तेही वीतरागतेची पुष्टी करणारे हवे. द्रव्यानुयोगाच्या सिध्दांतांना सिध्द करणारे हवे.

एखादा ज्ञानी गृहस्थ जीव आपल्या मुलाबाळांना व्यापार धंदा, घरादारासंबंधी काही सल्ला देत असेल, उपदेश देत असेल, समाजात कसे वागावयास हवे या बाबतीत काही शिकवण देत असेल तर त्याला देशना म्हणत नाहीत.

देशनेचे मूल स्रोत अरहंत भगवान आहेत. त्यांच्या उपदेशानुसार रचित शास्त्रं आणि त्या शास्त्रातील उपदेश देणारे गुरुसुध्दा देशनेचे स्रोत आहेत, देशना देणारे आहेत. ते तर फक्त मोक्षमार्गाचाच उपदेश देतात. परंतु चौथ्या, पाचव्या गुणस्थानातील जीव अजून गृहस्थावस्थेत आहेत. शास्त्रस्वाध्याय करताना ते देखील केवळ मोक्षमार्गाचाच उपदेश देतील, आत्मस्वरूपाचे कथन करतील, द्रव्यानुयोगाचे अनेक सिध्दांत समजावतील. जसे, निमित्त-उपादान, निश्चय व्यवहार, पाच समवाय, क्रमबध्दपर्याय, देव गुरु शास्त्राचे स्वरुप, हेय ज्ञेय उपोदय तत्त्वांचे स्वरूप आदिंचे सविस्तर वर्णन करतील. परंतु गृहस्थोचित इतर कार्यांमध्ये आपल्या कुटुंबियांना, साधर्मींना व समाजातील अन्य लोकांना गरज पडल्यास लौकिक उपदेशसुध्दा देतील. त्यांच्या शास्त्राविषयीच्या उपदेशालाच तर देशना म्हणतात परंतु लौकिक उपदेशास देशना म्हणणे योग्य नाही.

येथे तर आपण देशनेसंबंधी चर्चा केली. आपला विषय तर देशनालब्धि हा आहे. त्याबद्दल अधिक चर्चा आपण पुढील पत्राद्वारे करूया.

पत्र खूप लांबले, आता येथेच विराम घेऊया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# देशनालब्धि

पत्रांक ७ १५ सप्टेंबर २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

गेल्या पत्रापासून आपण देशनालब्धिसंबंधी चर्चा सुरु केली होती. प्रथमोपशम सम्यक्त्व होण्यापूर्वी देशनालब्धि असायलाच हवी, ती आवश्यक आहे. दुसरा नियम असा आहे की देशना ज्ञानी जीवांकडूनच प्राप्त होते किंवा असे म्हणा की ज्ञानीच्या उपदेशालाच देशना म्हणतात.

तुम्ही विचारले आहे की, 'तत्त्वार्थसूत्रामध्ये सम्यग्दर्शनाचे दोन भेद सांगितले आहेत - निसर्गज सम्यग्दर्शन व अधिगमज सम्यग्दर्शन. दुसऱ्याच्या उपदेशाने जे प्राप्त होते त्याला अधिगमज सम्यग्दर्शन असे म्हणतात आणि कोणाच्याही उपदेशाशिवायच जे प्राप्त होते त्याला निसर्गज सम्यग्दर्शन असे म्हणतात. यावरून असे दिसते की देशनालब्धिची आवश्यकता सर्वांना असत नसावी?'

हे लक्षात ठेवा की या भवामध्ये एखाद्या जीवाला ज्ञानीद्वारे उपदेशाची अर्थात देशनेची प्राप्ति झाली नसेल आणि तरीदेखील त्याला सम्यग्दर्शन झाले तर असे समजावे की त्याला पूर्वभवामध्ये नियमाने देशना मिळालेली आहे. या भवात त्याला देशना मिळालेली नाही म्हणून त्याला निसर्गज सम्यग्दर्शन असे म्हणतात आणि ज्याला याच भवात देशना मिळाली असेल व नंतर सम्यग्दर्शन झाले तर त्यास अधिगमज सम्यग्दर्शन असे म्हणतात. परंतु देशनेशिवाय सम्यग्दर्शन होईल असे सर्वथा निसर्गज सम्यग्दर्शन होऊच शकत नाही.

पुढच्या भवात उपदेशाचे शब्द लक्षात राहिले नाहीत तरीदेखील तत्त्वांचा भाव लक्षात येतो आणि अंतर्मुख विचारदशेमध्ये तत्त्वांचे भावभासन होऊ लागते. त्यामध्ये बाह्यनिमित्त जिनबिम्बदर्शन, स्वर्गामध्ये ऋध्दि - वैभव वगैरे पहाणे किंवा नरकामध्ये तीव्र वेदना आणि मनुष्यांमध्ये धर्मश्रवण, धर्मस्मरण, शास्त्रवाचन किंवा उपदेश ऐकणे इत्यादि असू शकतात. याला बाह्यदेशना किंवा देशना म्हटले आहे. देशनालब्धिमध्ये जीव त्याचे श्रवण, ग्रहण, धारण इत्यादि

करतो, त्यावर विचार करतो, त्याचा निर्धार करतो. फक्त उपदेश ऐकणे ही देशनालब्धि म्हटली जात नाही.

समजा तुम्ही रोहितला सांगितले की 'जा बेटा, पाणी घेऊन ये.' तो उभा राहून तुमच्याकडे पहातच राहिला तर तुम्ही त्याला पुन्हा सांगाल. तरीदेखील त्याने ऐकले नाही तर रागवाल व विचाराल 'काय रे, ऐकले नाहीस का?' ऐकून जर त्याने पाणी आणले तरच आपण म्हणतो की त्याने ऐकले. तुमच्या सांगण्यानुसार मुलं वागली तर तुम्ही म्हणता ना की माझा राजा बेटा किती चांगला आहे. माझे सर्व ऐकतो.

काय आपण कधी विचार केला आहे का की भगवंतांनी आणि आचार्यांनी सांगितलेल्या किती गोष्टी आपण ऐकतो? तुमच्या मुलांच्या दृष्टांतावरून तुम्ही समजलाच असाल की फक्त कानांनी ऐकू येणे यास ऐकणे म्हणत नाहीत. ऐकून ते समजणेही आवश्यक आहे, लक्षात ठेवणेही आवश्यक आहे, त्यावर विचार करणे, त्याचा निर्णय करणे व तद्वत परिणमन करणे ही सारी अंगं आवश्यक आहेत. त्याखेरीज आपण कसे म्हणू शकतो की याने भगवंतांचा उपदेश ऐकला?

लोक भगवंतांचे कोठे ऐकू इच्छितात? ते तर भगवंतांना ऐकवू इच्छितात, ऐकवत रहातात. रोज मंदिरात जोरजोरात पूजापाठ म्हणत भक्ति करतात, गातात, भगवानांचा जयजयकार करतात. परंतु भगवंतांनी काय सांगितलंय त्याला शास्त्रांद्वारे किंवा गुरुंकडून किंवा विद्वानांकडून ऐकू इच्छित नाहीत. ही कशी अवस्था झाली माहित आहे? द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय जीव, ज्यांना विकलेंद्रिय म्हणतात, त्यांना वचन म्हणजे भाषा तर असते परंतु पंचेंद्रियांप्रमाणे कर्णेंद्रिय नसल्याने ते ऐकू शकत नाहीत. आपणही जर भगवंतांना व मंदिरात उपस्थित असलेल्या इतर लोकांना भक्ति व पूजापाठ ऐकवत असू आणि प्रवचनकार काय म्हणतात ते ऐकत नसू तर आपली अवस्थादेखील विकलेंद्रियां प्रमाणे आहे असे म्हणावे लागेल.

देशनेमध्ये निमित्तरूपाने देव शास्त्र गुरु आदि असतात परंतु देशना तेव्हाच म्हटली जाते जेव्हा जीव त्याचे श्रवण करेल, ग्रहण करेल म्हणजेच समजून घेईल, त्याला लक्षात ठेवेल अर्थात धारणेमध्ये ठेवेल. जर जे ऐकले आहे ते

समजलेच नाही तर ते काय कामाचे? त्याचप्रमाणे समजले तर खरे, पण तात्काळ विस्मरण झाले तरीदेखील काय कामाचे? जे ऐकले, समजून घेतले, लक्षात ठेवले त्याचे स्मरण करून त्यावर विचार करणे, चिंतन मनन करणे, स्वतः युक्ति आणि न्याय यांच्याद्वारे तर्काच्या कसोटीवर घासून त्या तत्त्वांच्या सत्यतेचा निर्णय करणे हीच तर महत्त्वाची गोष्ट आहे. निर्णय होताच तद्वत परिणमन देखील होते.

जसे, एखाद्याने खऱ्या देव गुरु शास्त्राचे स्वरूप ऐकले, सर्वज्ञतेचे स्वरूप ऐकले तर तो विचार करू लागतो व स्वतःच्या पूर्वीच्या मान्यतांशी तुलना करून पहातो की मी तर आजपर्यंत असे मानत आलो होतो, आता मला खरे स्वरूप काय आहे हे समजले. जर त्याचा निर्णय झाला तर तो कुदेव, कुगुरु, कुशास्त्र यांना सोडून देईल, त्यांच्याबद्दलचा आदर, त्यांचा विनय, त्यांची भक्ति या सर्व गोष्टी सुटून जातील.

खरे पहाता देशना तर देशनालब्धिमध्ये निमित्त आहे. परंतु त्याच्याशिवाय प्रथमोपशम सम्यक्त्व होऊच शकत नाही म्हणून स्थूलरूपाने देशनेला किंवा देशना ज्यांच्याकडून प्राप्त होते त्या खऱ्या देव शास्त्र गुरुंना सम्यग्दर्शनाचे निमित्त म्हटले जाते.

निमित्त नैमित्तिक संबंध एकाच समयात होणाऱ्या दोन कार्यांमध्ये आढळतो. एक तर अनुकूल भासित होणाऱ्या निमित्तरूप परद्रव्याचे कार्य आणि एक नैमित्तिक कार्य. या दोन्हींचा काळ एकच असतो. याला शास्त्रामध्ये कालप्रत्यासत्ति म्हटले आहे. दोन भिन्न कार्यांचा काळ एकच असणे व त्यांच्यामध्ये निमित्त नैमित्तिक संबंध असणे यास कालप्रत्यासत्ति म्हणतात. देशनालब्धिरूप कार्यामध्ये देशना निमित्तरूपाने असते. सम्यग्दर्शनरूपी कार्य तर त्यानंतर होते.

येथे आपण वारंवार देशनेला देशनालब्धिचे निमित्त म्हणत आहोत. देशनालब्धि तर ज्ञानाची पर्याय आहे. स्वतःची तीव्र रुचि व स्वतःचे स्वरूप जाणण्याची तीव्र जिज्ञासा असेल तर देशनालब्धिची पर्याय आपल्या योग्यतेने प्रकट होण्याचा काल येताच ज्ञानीची देशनादेखील निमित्ताच्या रूपाने सहज मिळते. परंतु निमित्तामुळे ज्ञान होत नाही. एवढेच नव्हे तर देव शास्त्र गुरुविषयी

आदरभाव, रागभाव असतो परंतु त्या रागभावाच्या कारणाने देखील ज्ञान होत नाही.

प्रवचनसार ग्रंथाच्या ३५ व्या गाथेवरील टीकेवर प्रवचन करताना पू. श्री कानजीस्वामीजी म्हणतात - 'समोर तीर्थंकर, आचार्यादि आहेत म्हणून ज्ञान झाले अथवा उपदेश ऐकला - दिव्यध्वनि ऐकली म्हणून ज्ञान झाले असे नाही. वाणीच्या कारणाने मला ज्ञान झाले, अचेतनामुळे ज्ञान झाले असे मानणारा स्वतःच्या चैतन्यस्वभावाला नाकारतो - त्याचा घात करतो.'

निमित्तामुळे कार्य होत नाही तरीदेखील विवक्षित कार्यामध्ये योग्य निमित्त असतेच - वाटेल त्या निमित्ताच्या उपस्थितिमध्ये कार्य होत नाही. देशनालब्धिमध्ये सर्वज्ञ भगवंतांची - जिनेन्द्र भगवंतांची वाणीच निमित्त असते. ती वाणी तीर्थंकरांची किंवा इतर केवलींची असेल किंवा त्यांच्या दिव्यध्वनि अनुसार दुसऱ्या आचार्यांनी किंवा अन्य सम्यग्ज्ञानी जीवांनी सांगितलेली असेल - तिलाच देशना म्हणण्यात येईल. अन्यमतींच्या कल्पना आणि त्यांचा उपदेश तर मोक्षमार्गाच्या दृष्टीने तीन काळात कधीही कार्यकारी होणार नाही.

येथे निमित्ताचे ज्ञान करविले जात आहे परंतु त्याविषयीची आदरबुध्दि तोडत आहेत, निमित्ताधीन दृष्टि सोडवत आहेत.

ज्याला निमित्त नैमित्तिक संबंधाची सहजता लक्षात येत नाही अशा कित्येक जीवांना प्रश्न पडतो की, 'आम्हाला ज्ञानीची देशना प्राप्त करावयाची आहे तर समोरची व्यक्ति ज्ञानी - सम्यग्दृष्टि आहे हे आम्ही कसे ओळखायचे?'

मिथ्यात्वी जीवाला ज्ञानीची खरी ओळख - खरी परीक्षा असूच शकत नाही. त्याला शोधण्यासंबंधी आकुलता करण्याची काही आवश्यकता नाही. मिथ्यादृष्टि जीव तर अन्य जीवांची बाह्य प्रवृत्ति आणि क्रिया पाहून त्यांच्याद्वारे त्यांची पारख करू पहातो. समोरच्या जीवांच्या अभिप्रायाला - सम्यग्दर्शनाला हा समजू शकत नाही - ओळखू शकत नाही - याच्या ते लक्षात येत नाही. आपल्याला तर उपदेशाची सत्यता ओळखावयाची आहे. कारण ज्ञानी जीवदेखील जो उपदेश देतात तो सर्वज्ञाच्या वचनानुसार देतात, आपल्या घरच्या म्हणजे स्वतःच्या कल्पनेने कोणत्याही गोष्टी सांगत नाहीत.

शास्त्र वाचणारादेखील प्रारंभ करताना म्हणतो की, 'अस्य मूलग्रंथकर्तारः श्री सर्वज्ञदेवः, तदुत्तर ग्रंथकर्तारः श्री गणधर देवाः ....' अर्थात् 'या ग्रंथाचे मूळ कर्ता श्री सर्वज्ञ भगवान आहेत, त्यांची दिव्यध्वनि ऐकून नंतर ग्रंथांची रचना करणारे श्री गणधर आचार्य आहेत, त्यांच्या उपदेशानुसार आचार्यांच्या परंपरेने जे ग्रंथ रचले गेले, त्यामधील या विशिष्ट ग्रंथाचा आपण स्वाध्याय करत आहोत. श्रोत्यांनी सावधान होऊन ऐकावे.'

आगमाचे वचन अर्थात कथन सर्वज्ञ भगवंतांचे असते, कोणत्याही वक्त्याचे ते असत नाही. हे कथन म्हणजे तर वस्तुस्वरूपाविषयीची यथार्थ माहिती आहे.

समजा, तुम्हाला एखाद्याने एक लाख रुपयाचा डिमाण्ड ड्राफ्ट पोस्टाने पाठवला. पोस्टमनने तो तुम्हाला दिला. तुम्ही पोस्टमनकडे पाहिले तेव्हा त्याने जुने कपडे, जुन्या चपला घातलेल्या दिसल्या, त्याची बॅगदेखील फाटकी होती. त्याला पाहून तुम्ही असा तर विचार करत नाही की हा माणूस इतका गरीब दिसतो तो एक लाख रुपयाचा डिमाण्ड ड्राफ्ट कसा देऊ शकेल बरं? कारण तुम्हाला माहित आहे की हा तर पत्रं, पाकिटं पोहोचविणारा आहे, लाख रुपये काही याचे नाहीत. लाख रुपये पाठवणारा तर कोणी दुसराच आहे.

तुम्ही म्हणाल, 'आम्ही ज्ञानीला ओळखू शकणार नाही. परंतु आताच तू सांगितले होतेस की त्यांच्या उपदेशाची सत्यता पडताळून पाहिली पाहिजे. एखाद्याचा उपदेश खरा आहे की खोटा आहे हे आम्ही कसे ओळखायचे?'

ज्याच्या उपदेशामध्ये रागभावांचे पोषण होत असेल, 'निमित्ताने कार्य होते म्हणून प्रथम निमित्ताला शोधा' अथवा 'शुभभाव केल्याने तुमचे कल्याण होईल, पुण्य करता करता तुम्हाला मोक्षाची प्राप्ति होईल' अथवा 'मोठ्या ग्रंथांचा शास्त्रस्वाध्याय करू नका ते तुमचे काम नाही' वगैरे गोष्टी ज्याच्या कथनामध्ये येत असतील, जो स्वतः उच्च पदवी धारण करून स्वच्छंद आचरण करत असेल, कुदेवादिकांची पूजा सत्कार करण्याचा उपदेश देत असेल, स्वतः शास्त्राविरुध्द - आगमाविरुध्द आचरण करत असेल, लोकांना भडकवून द्वेषबुध्दि निर्माण करून समाजात फूट पाडत असेल - भांडणं लावत असेल तर त्याचा सर्वच उपदेश खोटा आहे असे समजावे.

खोटा उपदेश देणारेदेखील शास्त्रातील शब्दांचा वापर करूनसुध्दा मिथ्या मान्यतांचाच प्रचार करतात. काही लोक म्हणतात, 'आपल्याला त्याच्याशी काय देणं घेणं? आम्ही तर त्यांच्या उपदेशातल्या फक्त चांगल्या गोष्टीच ग्रहण करू!'

परंतु ही गोष्ट सर्वथा अयोग्य आहे. लौकिक गोष्टींमध्ये हा जीव अत्यंत चतुर आहे परंतु याबाबतीत तो असा अविवेक करतो ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. दुधाच्या मोठ्या पातेल्यात विषाचा एक थेंब जरी पडला तर आपण सर्वच्या सर्व दूध फेकून देतो, जेथे विष पडले असेल तेथील थोडेसे दूध फेकून देऊन बाकीचे दूध वापरत नाही. ते विषमिश्रित दूध प्यायल्याने या भवाचा अंत होईल या भीतीपोटी तो किती दक्ष रहातो, केवढी काळजी घेतो!

परंतु ज्या उपदेशाने अनेक भवांचे नुकसान होते व जीव जन्म मरणाच्या चक्रात अडकून अनंत काळापर्यंत निगोदात जातो तो उपदेश चांगला आहे असे समजून ऐकतो व त्यानुसार चुकीच्या मार्गाने जातो, त्याची अशीच होनहार - भवितव्य असेल की त्याला अशी विपरीत बुध्दि होते.

अविरत सम्यग्दृष्टीची ओळख त्याच्या बाह्य आचरणाकडे पाहून होऊ शकत नाही. अणुव्रत व महाव्रत यांचे धारक अशा ज्ञानी जीवांची व्रतं तर आपण जाणू शकतो. परंतु या सर्व जीवांची वाणी मला स्वतःला कल्याणकारी आहे की नाही या गोष्टीची खात्री देशनालब्धि प्राप्त करणाऱ्या जीवाला अवश्य पटते. ही वाणी, हा उपदेश जर जिनेन्द्रकथित वस्तुव्यवस्थेच्या अनुसार असेल, भावलिंगी संतांच्या शास्त्रानुसार कथन केले असेल तर ते निश्चितच जीवाला हितकारी असते.

परंतु एखादा वक्ता जिनागमाच्या विरुध्द उपदेश देत असेल तर तो स्वतःचे तसेच त्याच्या अनुयायांचे अकल्याणच करत असतो. शास्त्रामध्ये त्याला 'उपलनाव' म्हटले आहे. उपल म्हणजे पत्थर, दगड. दगडाची नाव पाण्यात स्वतः तर बुडतेच तिच्यामध्ये बसणाऱ्या जीवांना घेऊन बुडते. त्याचप्रमाणे खोटा उपदेश देणारे व त्या उपदेशास योग्य समजून ग्रहण करणारे सर्व जीव भवसागरामध्ये गटांगळ्या खाऊन कालांतराने निगोद अवस्था प्राप्त करतात.

काही कषायी जीवांनी मूळ शास्त्रात फेरफार करून रागादिंचे पोषण करणारी, मिथ्या मान्यतांचे पोषण करणारी कित्येक कथनं शास्त्रामध्ये घुसडली

आहेत. परंतु ज्ञानी जीव या कथनांचा निषेध करतात, विवेकी बुध्दिमान जीवांच्या ते लक्षात येते. आपलीदेखील कोणी दिशाभूल करत नाही ना हे पहाण्याची जबाबदारी आपली स्वतःची आहे, आपल्याला त्या बाबतीत दक्षता बाळगावयाला हवी.

सध्या लौकिक दैनंदिन व्यवहारामध्ये फसवाफसवी करणारे, लबाडी करणारे अनेक लोक आहेत. दागदागिने, कपडे, खाद्यपदार्थ वगैरेंमध्ये काही मिलावट - भेसळ नाही ना याबाबतीत आपण किती तरी जागरुक असतो. त्याचप्रकारची दक्षता, जागरुकता देशनेच्या बाबतीत ठेवली पाहिजे. कारण येथे तर आपल्या कल्याणाची गोष्ट आहे, भवांचा अभाव करून मोक्ष प्राप्त करण्याची महान गोष्ट आहे.

तुम्ही म्हणाल, 'खऱ्या वक्त्याचे व खऱ्या उपदेशाचे स्वरूप तर लक्षात आले. परंतु गुरुला सर्वस्व समर्पण करावे लागेल ना? आम्ही कोठेसे वाचले होते.'

समर्पण कशाचे कराल? तन, मन, धन जे परपदार्थ आहेत त्यांचे समर्पण करणे तर सर्व परसमर्पण झाले, सर्व 'स्व' समर्पण कोठे झाले? शिवाय, परपदार्थांमध्ये कोणाचे काही चालत नाही. म्हणून त्यांचे समर्पण आपल्या आधीन नाही. हे जीव, तू तर चेतन आहेस, ज्ञानस्वरूप आहेस, ज्ञानोपयोग पूर्णरूपाने शास्त्राभ्यासात लावणे, तत्त्वनिर्णय करण्यात सर्व बुध्दि लावणे हेच सर्वस्व समर्पण होईल.

सम्यक्त्वसन्मुख मिथ्यादृष्टीचे वर्णन करताना पं. टोडरमलजी म्हणतात - ''खरा उपदेश ऐकून सावध होऊन हा जीव विचार करू लागतो की अहो, मला तर या गोष्टींचा पत्ताच नव्हता, मी भ्रमापोटी प्राप्त पर्यायातच (मनुष्यादि पर्यायांना येथे पर्याय म्हटले आहे) तन्मय झालो आहे. परंतु या पर्यायाची स्थिति खूपच अल्प आहे तसेच येथे मला सर्व निमित्तं मिळालेली आहेत. म्हणून मला या गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत कारण यांमध्ये तर माझेच हित - माझेच प्रयोजन भासत आहे. असा विचार करून जो उपदेश ऐकला त्याचा निर्धार करण्याचा उद्यम केला.''

निर्धारण करण्याची तीन अंगं आहेत - त्याच्या तीन पायऱ्या आहेत -

(१) उद्देश अर्थात त्यांची नावे जाणणे,

(२) लक्षण निर्देश अर्थात त्यांची लक्षणं जाणणे व नंतर

(३) विचारसहित परीक्षा करणे.

ही तत्त्वं अशीच आहेत की नाही यावर विचार करणे. जोपर्यंत जिनेन्द्र भगवंतांनी जशी तत्त्वं सांगितली आहेत तसाच आपला निर्णय होत नाही तोपर्यंत अशाचप्रकारे आपल्या विवेकाने - बुध्दीने विचार करावा. जर काही शंका असेल तर आपल्या गुरुंना किंवा अन्य विद्वानांना विचारावे किंवा अन्य साधर्मींना विचारावे. विवेकपूर्वक एकांतामध्ये विचार करावा की जसा उपदेश दिला आहे, तसेच वस्तुस्वरूप आहे की अन्यथा आहे.

येथे आपल्या मान्यतांचे पोषण करावयाचे नाही परंतु जिनदेवांनी सांगितलेल्या तत्त्वांचा अनुमान वगैरे द्वारे विचार करून तसाच निर्णय होईल त्याप्रकारे विचार करावयाचा आहे. गणिताच्या पुस्तकातील उदाहरणं सोडवल्यावर आपण पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या उत्तरांशी आपले उत्तर जुळवून पहातो आणि जर आपले उत्तर त्या उत्तराशी जुळत नसेल तर आपली कोठे चूक होत आहे ते शोधून दुरुस्त करतो. जर चूक लक्षात येत नसेल तर शिक्षकांना किंवा आपल्या सहाध्यायींना विचारतो. परंतु आपल्या उत्तरानुसार पुस्तकात सुधारणा करत नाही. त्याप्रमाणेच येथेही समजावे.

देशनालब्धि ही ज्ञानाची पर्याय असून उपयोगरूप ज्ञानामध्ये या साऱ्या गोष्टी होतात. देशनालब्धिद्वारे जीव तत्त्वांचे श्रवण करतो, त्याचे ग्रहण करतो अर्थात समजून घेतो आणि धारण करतो अर्थात चांगले लक्षात ठेवतो किंवा पाठ करतो. जर उपदेश धारणच केला नाही तर नंतरच्या काळात त्यावर विचार करून त्याची योग्यता किंवा अयोग्यता याचा निर्णय तो कसा करू शकेल?

ज्याप्रमाणे गाय गवत खाते व नंतर आरामात बसून रवंथ करते त्याप्रमाणे धारणेमध्ये ठेवलेल्या सिध्दांतांचे स्मरण करून त्यावर विचार करून त्यावर चिंतन, मनन करणे आवश्यक आहे.

देशना अर्थात उपदेश ऐकतेवेळी जीवाने विवेकपूर्वक ऐकले पाहिजे. त्याचे कारण असे आहे की जिनागमाचा उपदेश चार अनुयोगांमध्ये विभाजित आहे. चारही अनुयोगांचे तात्पर्य वीतरागता आहे, परंतु प्रत्येक अनुयोगाच्या कथनपध्दतिमध्ये व विषयांमध्ये अंतर आहे, फरक आहे. एकाच प्रवचनामध्ये

विवक्षित प्रयोजनासाठी अन्य अन्य अनुयोगातील कथन केले जाऊ शकते. त्यावेळी त्या कथनाचा योग्य अर्थ आणि त्याचे प्रयोजन आपल्याला समजणे आवश्यक आहे. शास्त्राचे प्रयोजन तर वीतरागतेचा उपदेश देणे हे आहे, रागादि मिटविण्याचेच त्यामध्ये प्रयोजन असते, कोठेही रागादि वाढविण्याचा हेतु नसतो.

देशनेमध्ये द्रव्यानुयोगाच्या सिध्दांतांचे मोठे महत्त्व आहे. कारण त्यामध्ये जीवादि पदार्थांचे यथार्थ श्रध्दान होण्याच्या दृष्टीने विस्तारपूर्वक युक्ति, हेतु, दृष्टांत देऊन निरूपण केले जाते, प्रमाण आणि नय यांद्वारे वस्तुचे विवेचन केले जाते, वस्तुव्यवस्थेचे ज्ञान करविले जाते, ज्याप्रकारे स्व - पर भेदविज्ञान होईल त्याप्रकारे जीव - अजीवाचा निर्णय करविला जातो, ज्यामुळे वीतरागभाव उत्पन्न होईल त्या रीतीने आस्रवादिकांचे स्वरूप सांगितले जाते, त्यामध्ये ज्ञान - वैराग्यास कारणीभूत असणाऱ्या आत्मानुभवनादिकांची महिमा वर्णिली जाते.

पं. टोडरमलजी म्हणतात, - ''जे जीव आत्मानुभवाचा उपाय करत नाहीत व बाह्य क्रियाकांडातच मग्न आहेत त्यांना आत्मानुभवनामध्ये जोडण्यासाठी व्रत - शील - संयमादिंचा हीनपणा प्रकट केला जातो - सांगितला जातो. तेथे असे समजू नये की हे सारे सोडून पापात जोडले जावे. शुध्दोपयोग प्रकट करण्यासाठी शुभोपयोगाचा निषेध करतात. अध्यात्मशास्त्रामध्ये पुण्य व पाप दोन्ही बंधाची कारणे असल्याने त्यांना समान म्हटले जाते. परंतु पुण्य मंदकषायरूप आहे व पाप तीव्रकषायरूप आहे. म्हणून पुण्य सोडून पापामध्ये प्रवृत्त होणे योग्य नाही.'' उपदेशाचे मर्म तर आपण समजून घेतले पाहिजे. उपदेशाचा उलटा अर्थ लावून यथार्थ उपदेशाचा निषेध करणे योग्य नाही.

काही लोकांचे असे म्हणणे आहे की द्रव्यानुयोगामध्ये व्यवहारधर्माला हीन म्हटले आहे, सम्यग्दृष्टीच्या विषयभोगास निर्जरेचे कारण म्हटले आहे - अशी विधानं ऐकून जीव स्वच्छंदी होतील, पुण्य सोडून पापात मग्न होतील. म्हणून असे ग्रंथ वाचणे - ऐकणे हे योग्य नाही.

तुम्हीच विचार करा, तीव्र मिथ्यात्वी जीव कल्याणकारी अध्यात्मग्रंथांचा उपदेश ऐकून देखील स्वच्छंदीच होतील परंतु त्याकारणाने विवेकी जीव अध्यात्मशास्त्रांचा अभ्यास करायचा तर सोडणार नाहीत. जो यथार्थ रीतीने ऐकेल तो स्वच्छंदी होणार नाही. परंतु पुढच्या मागच्या संदर्भारहित कोणतीही

गोष्ट - कोणतेही वाक्य वाचून किंवा ऐकून एखादा जीव स्वतःच्या मिथ्या अभिप्रायाने स्वच्छंदी झाला तर त्यात ग्रंथांचा तर काही दोष नाही, त्या जीवाचाच दोष आहे.

''जर खोट्या दोषाची कल्पना करून अध्यात्मशास्त्रं वाचण्याचा - ऐकण्याचा निषेध केला तर मोक्षमार्गाचा मूळ उपदेश तर त्यामध्येच आहे. त्यांचा निषेध करण्याने तर मोक्षमार्गाचा निषेध होतो. स्वच्छंदी होणारा जीव अगोदर पण मिथ्यादृष्टि होता व आता अध्यात्मशास्त्र वाचूनदेखील मिथ्यात्वीच राहिला. परंतु जर अध्यात्मशास्त्रांचा उपदेशच दिला गेला नाही तर अनेक जीवांच्या मोक्षमार्गाच्या प्राप्तीचा अभाव होईल आणि यामध्ये अनेक जीवांचे खूपच नुकसान होईल या कारणास्तव अध्यात्मशास्त्रांच्या उपदेशाचा निषेध करू नये.''

हे सारे विवेचन पं. टोडरमलजींनी मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथाच्या 'उपदेशाचे स्वरूप' नामक आठव्या अधिकारात केले आहे. ते संपूर्ण प्रकरण म्हणजेच आठवा अधिकार सुरुवातीपासून शेवटपर्यंत नीट ध्यान देऊन वाचा. त्यामध्ये आपल्या अनेक शंकांचे निरसन होते. ते लिहितात -

''कित्येक जीव म्हणतात की द्रव्यानुयोगरूप अध्यात्म उपदेश आहे तो उत्कृष्ट आहे; म्हणून ज्यांना उच्चदशा प्राप्त झाली आहे त्यांनाच तो कार्यकारी आहे; खालच्या दशावाल्या जीवांना व्रतसंयमादिकांचा उपदेश देणेच योग्य आहे.

त्यांना सांगण्यात येते - जिनमतामध्ये अशी परिपाठी आहे की आधी सम्यक्त्व होते व नंतर व्रतं होतात; ते सम्यक्त्व स्व - पराचे श्रध्दान झाल्यावर होते आणि ते श्रध्दान द्रव्यानुयोगाचा अभ्यास केल्यावर होते; म्हणून प्रथम द्रव्यानुयोगानुसार श्रध्दान करून सम्यग्दृष्टि व्हावे, त्यानंतर चरणानुयोगानुसार व्रतादिक धारण करून व्रती व्हावे - याप्रकारे मुख्यरूपाने तर खालच्या दशेमध्येच द्रव्यानुयोग कार्यकारी आहे; गौणरूपाने ज्याला मोक्षमार्गाची प्राप्ति होत नाही असे दिसून येते त्याला प्रथम एखाद्या व्रताचा उपदेश दिला जातो; म्हणून उच्च दशावाल्यांनी अध्यात्माचा अभ्यास करणे योग्य आहे असे समजून खालच्या दशावाल्यांनी त्यापासून पराङ्‌गमुख होणे योग्य नाही.''

''तसेच जर असे म्हणाल की उच्च उपदेशाचे स्वरूप खालच्या दशावाल्यांना (अज्ञानीला) भासित होत नाही.

त्याचे उत्तर असे आहे - इतर तर अनेक प्रकारची चतुराई याला समजते आणि येथे मूर्खपणा दाखवतो तर हे योग्य नाही. अभ्यास करण्याने स्वरूप चांगल्या प्रकारे भासित होते. आपल्या बुध्दिप्रमाणे कमी जास्त भासित होईल परंतु सर्वथा निरुद्यमी होण्याची पुष्टी करणे हे तर जिनमार्गाचा द्वेषी होण्यासारखे आहे.

तसेच जर असे म्हणाल की हा काळ निकृष्ट आहे म्हणून उत्कृष्ट अशा अध्यात्म उपदेशाची मुख्यता करू नये.

तर त्यांना सांगण्यात येते - हा काळ साक्षात मोक्ष न होण्याच्या अपेक्षेने निकृष्ट आहे, आत्मानुभवनादिकाद्वारे सम्यक्त्वादि होण्याची या काळात मनाई नाही. म्हणून आत्मानुभवनादिकासाठी द्रव्यानुयोगाचा अभ्यास अवश्य करावा.

याच पंचम काळातील कुंदकुंदाचार्य मुनींनी मोक्षपाहुडमध्ये म्हटले आहे की या काळात देखील द्रव्यानुयोगाचा उपदेश मुख्य हवा.''

द्रव्यानुयोगाच्या शास्त्रांचा निषेध करणे, जिनवाणीचा अपमान करणे, बाहेर फेकून देणे, नष्ट करणे, तसे करणाऱ्यांना अनुमोदना देणे, त्यांचा आदर करणे हे तर नरक निगोदाच्या तिकिटावर आपल्या हाताने स्वाक्षरी करण्यासारखे आहे. नाही समजलात? आपण बाहेरगावी प्रवासाला जाण्यापूर्वी रेल्वेच्या तिकिटाचे आरक्षण करतो त्यासाठी स्वाक्षरी करून आवेदन पत्र (फॉर्म) भरून द्यावा लागतो. याचा अर्थ असा होतो की आपण स्वतः स्वेच्छेने तेथे जाण्याची तयारी करतो.

या बाबतीत देखील असेच समजावे. अशा परिणामांच्या फलस्वरूप ज्ञानावरणादि पाप प्रकृतींचा असा तीव्र बंध होतो की त्याच्या फलस्वरूप त्याला अनंत काळापर्यंत निगोदामध्ये जन्म-मरण करावे लागते.

देशनालब्धिच्या वर्णनामध्ये आपण पाहिले आहे की श्रवण, ग्रहण, धारण व निर्धारण याची अंगं आहेत. दिव्यध्वनिमध्ये चारही अनुयोगांचे कथन येते म्हणून ते चारही देशनारूप आहेत. त्यामध्ये द्रव्यानुयोगात सांगितलेल्या तत्त्वांची हेय, ज्ञेय, उपादेयरूपाने परीक्षा करावी. त्यामध्ये जीवादिक द्रव्यांना व जीवादिक तत्त्वांना ओळखावे, स्व आणि पर यांना ओळखावे, त्यागण्यायोग्य अशा

मिथ्यात्वाचे, रागादिकांचे व ग्रहण करण्यायोग्य अशा समग्दर्शनादिंचे स्वरूप समजून त्यांना ओळखावे, निमित्त नैमित्तिक जसे आहे तसे ओळखावे.

करणानुयोग, चरणानुयोग, प्रथमानुयोग यांचे कथन जाणावे. जेथे परीक्षा होऊ शकते तेथे करावी, जेथे होऊ शकत नाही तेथे आज्ञेनुसार जाणावे.

पं. टोडरमलजी लिहितात - ''याप्रकारे हे जाणण्यासाठी जीव कधी स्वतःच विचार करतो, कधी शास्त्र वाचतो, कधी अभ्यास करतो, कधी प्रश्नोत्तरं करतो इत्यादिरूप प्रवर्तन करतो. आपले कार्य करण्याचा याला खूप उत्साह आहे म्हणून अंतरंग प्रीतीने त्याचे साधन करतो. याप्रकारे साधन करत असताना जोपर्यंत (१) खरे तत्त्वश्रध्दान होत नाही (२) 'हे असेच आहे' अशा प्रतीतिसहित जीवादि तत्त्वांचे स्वरूप आपल्याला भासित होत नाही (३) जशी पर्यायामध्ये आत्मबुध्दि आहे तशी फक्त आत्म्यातच अहंबुध्दि होत नाही. (४) हित-अहितरूप आपल्या भावांना (परिणामांना) ओळखत नाही - तोपर्यंत सम्यक्त्वसन्मुख मिथ्यादृष्टि आहे. असा जीव थोड्याच कालावधीत सम्यक्त्व प्राप्त करेल. याच भवात किंवा पुढच्या भवात त्याला सम्यक्त्व होईल.''

ते पुढे लिहितात, ''पहा तत्त्वविचाराची महिमा! तत्त्वविचाराने रहित आहे असा जीव देवादिकांची प्रतीति करेल, अनेक शास्त्रांचा अभ्यास करेल, व्रतादिक पाळेल, तपश्चरणादि करेल तरीदेखील त्याला सम्यक्त्वाची प्राप्ति होणार नाही आणि तत्त्वविचार करणारा जीव वरील गोष्टी नसताना देखील सम्यक्त्वाचा अधिकारी होतो.''

जीव तर फक्त तत्त्वविचार आणि तत्त्वनिर्णय करू लागतो त्याद्वारेच त्याला प्रायोग्यलब्धिची प्राप्ति होते आणि सखोल तत्त्वचिंतनात मग्न होऊन जातो तेव्हा शुध्दात्मसन्मुख अवस्थेमध्ये करणलब्धिची आणि सम्यक्त्वाची प्राप्तिदेखील सहजच होते. दुसरे काही करण्या-धरण्याची गोष्टच नाही.

प्रायोग्यलब्धिसंबंधी चर्चा आपण आगामी पत्राद्वारे करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# प्रायोग्यलब्धि

पत्रांक ८ ३० सप्टेंबर २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

देशनालब्धिच्या प्रकरणामध्ये आपण देशना व देशनालब्धि यांचे स्वरूप विस्ताराने पाहिले. देशनालब्धिच्या श्रवण, ग्रहण, धारण, निर्धारण आदि अंगांची चर्चादेखील केली. द्रव्यानुयोगाच्या ज्या तत्त्वांना आणि सिध्दांतांना आपल्याला परीक्षापूर्वक जाणावयाचे आहे व ज्यांचा निर्णय करावयाचा आहे त्या अति महत्वाच्या विषयांची विस्तृत चर्चा आपण 'जैनतत्त्व परिचय' व 'जिनागमाचे कारण कार्य रहस्य' या पुस्तकांमध्ये पत्रांद्वारे केली आहे.

शास्त्रांचे श्रवण व वाचन केल्यानंतर 'आता आम्हाला काय केले पाहिजे?' असा प्रश्न लोकांच्या मनात उद्‌भवतो. याचे कारण असे आहे की जीव अनादिकाळापासून काहीतरी करू इच्छितो. परंतु मी काय करू शकतो व काय करू शकत नाही याचा निर्णय नसल्याने विशिष्ट क्रिया म्हणजे भक्ति, पूजा, ध्यान, स्वाध्याय या क्रिया करून माझे सम्यग्दर्शनरूपी कार्य का होत नाही असा विचार करून हा जीव निराश होतो.

परंतु तत्त्वविचाराद्वारे तत्त्वनिर्णय करणे हाच पुरुषार्थ आहे आणि जेव्हा जीव पुरुषार्थ करतो तेव्हा बाकीचे समवायदेखील सहज उपस्थित होतात. कर्माचे उपशमादिरूप निमित्तसुध्दा सहजच उपस्थित होते.

तत्त्वांचा उपदेश प्राप्त होण्यामध्ये बाह्य गुरु अर्थात ज्ञानी निमित्तरूपाने असतात परंतु स्वतत्त्वाची प्राप्ति अर्थात सम्यग्दर्शनाची प्राप्ति होण्यामध्ये आत्माच आत्म्याचा गुरु आहे. आत्मा स्वतःच आपले स्वरूप जाणण्यासाठी उत्सुक होतो, त्याची जिज्ञासा आणि रुचि हीच त्याची उपादान शक्ति आहे जिच्या कारणाने त्याला बाह्य उपदेशक आणि उपदेश सहज प्राप्त होतो. आत्मा स्वतःच त्यावर वारंवार विचार करण्यास प्रवृत्त होतो. त्याच्या स्वतःच्या योग्यतेनेच दुसऱ्या

गोष्टींमध्ये त्याला रस वाटेनासा होतो, स्वरूप अनुभवाची त्याला तीव्र ओढ लागते आणि त्याचा उपयोग परपदार्थ व पर्याय यांच्यापासून हटून निज ध्रुव त्रिकाली ज्ञायक स्वभावावर केंद्रित होतो. कोणाच्या शिकविण्याने या गोष्टी होऊ शकत नाहीत.

एखादा गुरु माझे भले करेल अशी मान्यता निमित्ताधीन दृष्टि आहे. निमित्त अर्थात गुरु तर असतात, देशनादेखील असते परंतु देशनालब्धि तर उपादानाने प्राप्त होते. देशना तर खऱ्या देव गुरु शास्त्रांद्वारेच प्राप्त होते, कुदेव कुगुरु व कुशास्त्र कधीही देशनेमध्ये निमित्त होऊ शकत नाहीत. म्हणून खऱ्या देव गुरु शास्त्राचा निर्णय करणे आपले आद्य कर्तव्य आहे. कुदेवादिकांच्या द्वारे विपरीत उपदेश मिळतो, पूर्वीच्या विपरीत मान्यतांचे पोषण होते, विशिष्ट क्रिया करण्याने मोक्ष प्राप्त होतो असा उपदेश ऐकून जीवांची दिशाभूल होते.

सम्यग्दर्शनरूपी कार्याचे कारण बाह्य देव शास्त्र गुरु, एखादे विशिष्ट आचरण, शारीरिक क्रिया वगैरेंना मानून या जीवाने कारणविपरीतता कायम ठेवली. परंतु खरे कारण तर उपादान रूपाने आपल्या द्रव्यातच विद्यमान आहे. स्वभाव पर्यायाचे अर्थात शुध्द पर्यायाचे कारण तर त्रिकाल शुध्द स्वभाव - पारिणामिक भाव आहे. त्याचा कारणरूपाने स्वीकार करून त्याच्याशी अभेद होऊन जाणत राहिल्याने सम्यग्दर्शनरूपी कार्य प्रकट होते. त्याच्या पूर्वी प्रकट होणाऱ्या पाच लब्धिंसंबंधी आपण चर्चा करीत आहोत. जीव तत्त्वविचार व तत्त्वचिंतन करतो त्यावेळी कर्मांच्या अवस्था कशा होतात त्याची चर्चा आता प्रायोग्यलब्धिच्या या प्रकरणात आपण करणार आहोत. प्रथम त्याचे स्वरूप सांगून नंतर त्याला विस्ताराने समजून घेऊया.

**प्रायोग्यलब्धि** - क्षयोपशमलब्धि, विशुध्दिलब्धि आणि देशनालब्धि पूर्वक जीवाची विशुध्दि दर समयाला वाढत जाते, त्याच्या कारणाने आयुखेरीज इतर सात कर्मांची स्थिति घटून अंतःकोडाकोडी सागर प्रमाण रहाते. स्थितिचे हे घटणे स्थितिकांडकघाताद्वारे होते. अप्रशस्त कर्मांचा अनुभाग घटून घातिकर्मांमध्ये लता व दारुभागरूप तथा अघातिकर्मांमध्ये निंब व कांजीररूप बाकी रहातो. अप्रशस्त कर्मांच्या अनुभागाचे हे घटणे अनुभागकांडकघाताद्वारे होते.

प्रायोग्यलब्धिमध्ये जो नवा कर्मबंध होतो त्यामध्ये स्थितिबंध देखील अंतःकोडाकोडी सागरवर्ष एवढा होतो - जो क्रमाने घटत जातो, त्यास स्थितिबंधापसरण म्हणतात. हजारो - हजारो स्थितिबंधापसरण झाल्यानंतर क्रमशः काही प्रकृतींचा बंध होणे थांबते, त्यास प्रकृतिबंधापसरण म्हणतात.

स्थितिबंध आणि प्रकृतिबंध घटतो त्याप्रमाणे अप्रशस्त कर्मांचा घटत जाणारा द्विस्थानगत अनुभागबंध होतो परंतु प्रशस्त प्रकृतींचा वाढत जाणारा चतुःस्थानगत अनुभागबंध होतो. प्रदेशबंधदेखील अनुत्कृष्ट व अजघन्य होतो. या शब्दांचा सविस्तर अर्थ पुढे सांगणारच आहे.

वर सांगितलेले कार्य करण्याची योग्यता प्राप्त होणे यास प्रायोग्यलब्धि अथवा प्रायोग्यतालब्धि म्हणतात. पूर्वी पाहिलेल्या तीन लब्धिंपूर्वक जीव तत्त्वविचार करू लागतो त्या काळात वृध्दिंगत  विशुध्दिच्या कारणाने - निमित्ताने वर सांगितलेल्या कर्मांच्या अवस्था सहज बनतात. त्यासाठी जीवाला अन्य कोठलाही पुरुषार्थ करावा लागत नाही. जीवाने काही विशिष्ट प्रयोग केल्यामुळे प्रायोग्यलब्धि होत असावी असे मुळीच नाही. या चारही लब्धिंमध्ये जीव बुध्दिपूर्वक एवढेच करतो की तत्त्वजिज्ञासेपूर्वक तत्त्वश्रवणादि करून तत्त्वविचार करू लागतो.

वर सांगितलेल्या गोष्टींवर आता विस्ताराने चर्चा करूया कारण त्यामध्ये अनेक पारिभाषिक शब्द आहेत. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर जीव प्रायोग्यलब्धिमध्ये प्रवेश करतो त्यावेळी त्याच्या सत्तेमध्ये असलेल्या पूर्वबध्द कर्मांची स्थिति घटून अंतःकोडाकोडी सागर प्रमाण रहाते. त्याचप्रमाणे नवा होणारा बंध देखील अंतःकोडाकोडी सागरापेक्षा कमी स्थितिवाला होतो व अनेक प्रकृतींचा बंध होणे थांबते.

सर्वप्रथम अंतःकोडाकोडी सागर या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. सागराचे प्रमाण तुम्हाला माहित आहे - दहा कोडाकोडी अध्दापल्यांचा एक अध्दासागर होतो. कोडाकोडीचा अर्थ आहे करोड गुणिले करोड. कर्मांची स्थिति अध्दासागरांमध्ये मोजली जाते. अध्दासागराचे प्रमाण विसरलात की काय? पुन्हा ढोबळरूपाने पाहूया.

एक योजन रुंद व एक योजन खोल असा एक खड्डा अर्थात पल्य खणावा - हे सारे कल्पनेतच करावयाचे आहे बरं! त्यानंतर उत्तम भोगभूमिमध्ये जन्मलेल्या सात दिवसांपेक्षा कमी वयाच्या मेंढ्यांच्या केसांच्या अग्रभागांनी तो खड्डा ठसोठस भरावा - याला रोमखंड म्हणतात. आता दर शंभर वर्षांनी एक रोमखंड काढावा. अशा तऱ्हेने जेव्हा खड्डा पूर्ण रिकामा होईल तेवढ्या कालावधीस एक पल्य म्हणतात. एका पल्याच्या असंख्यातव्या भागातदेखील असंख्यात करोड वर्ष असतात. याला व्यवहारपल्य म्हणतात. अशा असंख्यात व्यवहारपल्यांचा एक उध्दारपल्य होतो व असंख्यात उध्दारपल्यांचा एक अध्दापल्य होतो. अशा दहा कोडाकोडी अध्दापल्यांचा एक अध्दासागर होतो. एखादा जीव मिथ्यात्वाचा अतितीव्र परिणाम करतो तेव्हा तो एका समयात उत्कृष्ट अर्थात अधिकात अधिक ७० कोडाकोडी सागर वर्षांचा स्थितिबंध करतो.

परंतु एक गोष्ट समजून घ्या की असा उत्कृष्ट स्थितिबंध करणारा जीव प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करू शकत नाही, त्याचप्रमाणे श्रेणीमध्ये आरोहण करणाऱ्या जीवांप्रमाणे जो जघन्य स्थितिबंध करतो त्यालादेखील प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त होऊ शकत नाही.

प्रायोग्यलब्धिच्या अगोदर जीवाच्या आयुखेरीज इतर सात कर्मांची स्थिति अनेक कोडाकोडी सागरांची असते. त्या सर्व सात कर्मांची स्थिति घटून अंतःकोडाकोडी सागरांची रहाते. अर्थात करोड गुणिले करोड सागर वर्षांपेक्षा कमी होते. कोडाकोडीसागरापेक्षा कमी व करोड सागरापेक्षा अधिक संख्येस अंतःकोडाकोडीसागर म्हणतात. स्थितिचे हे घटणे स्थितिकांडकघाताद्वारे होते.

कांडक म्हणजे खंड अर्थात तुकडा. अनेक निषेकांच्या समूहाला येथे कांडक म्हटले आहे. समान स्थितिवाल्या परमाणुंच्या समूहास निषेक म्हणतात. एकेका समयात एक एक निषेक याप्रमाणे अनेक कोडाकोडी सागरांचे निषेक सत्तेमध्ये असतात. त्यामधील अंतःकोडाकोडी सागर एवढ्या स्थितिचे निषेक सोडून त्यावरील सर्व निषेकांच्या समूहास येथे एक कांडकरूपाने ग्रहण केले आहे - सांगितले आहे.

प्रायोग्यलब्धिच्या प्रारंभी एक अंतर्मुहूर्त काळात या कांडकाच्या सर्व निषेकांचे सर्व परमाणु खालच्या उरलेल्या निषेकांमध्ये निक्षेपित केले जातात, त्यांचे निक्षेपण केले जाते म्हणजेच ते खालील निषेकांमध्ये येऊन मिसळतात.

पहा, येथे कर्म अजून सत्तेतच पडून राहिले आहे परंतु तत्त्वविचाराच्या निमित्ताने अनेक कोडाकोडी सागरांची स्थिति घटून अंतःकोडाकोडी सागर प्रमाण उरते. हे कार्य आयुकर्माव्यतिरिक्त इतर सर्व सात कर्मांमध्ये होते. याचा अर्थ असा होतो की प्रशस्त व अप्रशस्त सर्व कर्मांची स्थिति घटते. आयुकर्माची जेवढी स्थिति असेल तेवढीच ती रहाते.

लब्धिसार ग्रंथामध्ये स्थितिकांडकघाताचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगितले आहे - ''स्थितिसत्त्व अर्थात सत्तेमधील कर्मांची स्थिति, त्यामधून एक एक समय व्यतीत झाला असता एक एक निषेकच खिरतो, स्थितिसत्त्व एकेका समयाने घटते. परंतु दर्शनलब्धि आणि चारित्रलब्धि यांच्या निमित्ताने स्थितिकांडक विधानाद्वारे किंवा अपकृष्टि विधानाद्वारे अर्थात अपकर्षणाद्वारे खूपच जास्त प्रमाणात स्थितिसत्त्व घटते. स्थितिकांडकघाताचे विधान म्हणजेच त्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे आहे.

अधिक प्रमाणवाले स्थितिसत्त्व असते. त्यामध्ये दर समयाला उदय येण्यायोग्य अनेक निषेक असतात अर्थात एकेका समयात एकेक निषेक अशाप्रकारे निषेकांची संख्या पुष्कळ असते. त्यामधील वरच्या अनेक निषेकांचा नाश करून स्थितिसत्त्व घटविणे यास स्थितिकांडकघात म्हणतात. नाश करण्यायोग्य सर्व निषेकांना येथे कांडक म्हटले आहे. कांडकातील निषेकांचे सर्व परमाणु बाकीच्या निषेकांमधील आवलीप्रमाण वरचे निषेक सोडून अर्थात अतिस्थापनावली सोडून खालच्या सर्व निषेकांमध्ये निक्षेपण केले जातात अर्थात त्यांमध्ये येऊन मिसळतात - त्यांची स्थिति खालच्या निषेकांसमान होते.

या सर्व परमाणुंमधील काही परमाणु पहिल्या समयात निक्षेपण केले जातात, काही द्वितीयादि समयांमध्ये - अशाप्रकारे यथायोग्य अंतर्मुहूर्त काळापर्यंत सर्व परमाणु खालच्या निषेकांमध्ये येऊन मिसळतात आणि वरच्या विशिष्ट निषेकांचा

नाश होतो, अभाव होतो. जेवढ्या निषेकांचा नाश होतो तेवढ्या समयांची स्थिति घटते अर्थात स्थितिसत्त्व घटते.

याला दृष्टांत देऊन समजावितात. समजा, स्थितिसत्त्व ४८ समय आहे, त्याचे ४८ निषेक आहेत आणि सर्व निषेकांमधील परमाणु २५००० आहेत. त्यामधील ८ निषेकांचा नाश करावयाचा आहे अर्थात ८ निषेकांच्या एका कांडकाचा घात करावयाचा आहे, त्यामध्ये १००० परमाणु आहेत. ते परमाणु बाकीच्या ४० निषेकांपैकी वरच्या दोन निषेकांना सोडून खालच्या ३८ निषेकांमध्ये येऊन मिसळतात. त्यातील काही परमाणु पहिल्या समयात, काही दुसऱ्या समयात याप्रकारे चार समयांपर्यंत येऊन मिसळतात. चौथ्या समयात उरलेल्या सर्व परमाणुंना त्या ३८ निषेकांमध्ये मिसळवून वरच्या ८ निषेकांचा अभाव होतो. अशा तऱ्हेने ४८ निषेकांचे स्थितिसत्त्व घटून ४० समय रहाते. हा तर दृष्टांत झाला. दार्ष्टांतामध्ये अर्थात वास्तवामध्ये अनेक कोडाकोडी सागरांचे निषेक कांडकघाताद्वारे नष्ट होऊन त्यातील सर्व परमाणु अंतःकोडाकोडी सागर प्रमाण खालच्या निषेकांमध्ये येऊन मिसळतात. अशाप्रकारे एका अंतर्मुहूर्तात अनेक कोडाकोडी सागरांचे स्थितिसत्त्व घटते. ज्या एक आवलीप्रमाण निषेकांमध्ये हे परमाणु दिले जात नाहीत त्यांना अतिस्थापनावली म्हणतात.''

ज्याप्रमाणे स्थितिकांडकघाताद्वारे स्थितिसत्त्व घटते व अंतःकोडाकोडी सागर प्रमाण बाकी रहाते, त्याचप्रमाणे अप्रशस्त कर्मांचा अनुभाग घटून अनंतावा भागप्रमाण अनुभाग बाकी रहातो. हे कार्य अनुभागकांडकघाताद्वारे पार पडते. पूर्वी सत्तेमधील अप्रशस्त प्रकृतींचा जेवढा अनुभाग होता त्याचे अनंत भाग केले असता त्यातील बहुभागवाल्या स्पर्धकांचा अनुभाग घटून एक भागवाल्या स्पर्धकांसमान कमी अनुभाग होतो. किंवा याला असेही सांगू शकतो की तीव्र अनुभागवाले अर्थात शैल व अस्थिवाले तसेच हलाहल व विषवाले स्पर्धक नष्ट होऊन त्यांचे सर्व परमाणु मंद अनुभागवाल्या अर्थात दारु व लतावाल्या तसेच कांजीर व निंबवाल्या स्पर्धकांमध्ये येऊन मिसळतात. तीव्र अनुभागवाल्या अनेक स्पर्धकांचा अर्थात एका अनुभागकांडकाचा नाश एका अंतर्मुहूर्तात होतो, याला अनुभागकांडकघात म्हणतात. ही प्रक्रिया केवळ अप्रशस्त प्रकृतिंमध्येच होते.

प्रशस्त प्रकृतिंमध्ये तर अनुभाग अनंत गुणा वाढून चतुःस्थानगत अर्थात गुड, खांड, शर्करा, अमृत भागरूप होतो.

पूर्वी बांधलेल्या व सत्तेमध्ये असलेल्या आयुखेरीज इतर सर्व कर्मांची स्थिति अशाप्रकारे घटते. त्याचप्रमाणे आता येथे जो नवा कर्मबंध होतो त्याचा स्थितिबंधदेखील अंतःकोडाकोडी सागराचाच होतो. तरीदेखील स्थितिसत्त्वाच्या संख्यातव्या भागाएवढा (संख्यातवा हिस्सा) कमी स्थितिबंध होतो. हा स्थितिबंध देखील क्रमशः घटत घटत जातो. याला स्थितिबंधापसरण म्हणतात. अपसरण म्हणजे कमी होणे, घटणे.

लब्धिसार ग्रंथामध्ये स्थितिबंधापसरणाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे -

''स्थितिबंध कषायाच्या अनुसार होतो म्हणून मिथ्यात्व आणि कषाय हीन झाल्यामुळे - मंद झाल्यामुळे स्थितिबंध घटतो अर्थात नवीन बंध कमी स्थितिवाला होतो. घटण्यास 'अपसरण' असे म्हणतात, स्थितिबंधाच्या घटण्यास 'स्थितिबंधापसरण' असे म्हणतात. प्रायोग्यलब्धिमध्ये स्थितिबंध क्रमशः घटत जातो. जेवढी स्थिति कमी बांधली अर्थात स्थितिबंधामध्ये जेवढी घट झाली तेवढे तर स्थितिबंधापसरण झाले आणि घटल्यानंतर जेवढ्या प्रमाणात स्थिति बांधली जाईल तेवढा स्थितिबंध बाकी उरला. जेवढा स्थितिबंध उरला तेवढाच स्थितिबंध अंतर्मुहूर्त काळापर्यंत समान प्रमाणात - त्याच प्रमाणात होत रहातो. याला 'स्थितिबंधापसरणकाल' असे म्हणतात. यानंतर दुसऱ्यांदा स्थितिबंधापसरण होते.

याला दृष्टांत देऊन सांगितले आहे. जसे, अगोदर १ लाख वर्षांचा स्थितिबंध होत होता. त्यामध्ये १००० वर्षप्रमाण स्थितिबंधापसरण झाले तेव्हा ९९००० वर्ष एवढा स्थितिबंध उरला. स्थितिबंधापसरणकालाच्या पहिल्या समयात, दुसऱ्या समयात..... अशा तऱ्हेने अंतर्मुहूर्त काळापर्यंत एवढाच समान स्थितिबंध होत राहील. त्यानंतर ८०० वर्षप्रमाण दुसरे स्थितिबंधापसरण झाले. त्यावेळी ९८२०० वर्ष एवढा स्थितिबंध उरला. अंतर्मुहूर्त काळापर्यंत एवढाच समान स्थितिबंध होत राहील. त्यानंतर तिसरे स्थितिबंधापसरण होईल.

दृष्टांतामध्ये १००० वर्ष, ८०० वर्ष हे काल्पनिक प्रमाण सांगितले आहे. प्रत्यक्षात पल्याच्या संख्यातव्या भागाएवढे स्थितिबंधापसरण होते. याच रीतीने संख्यात (हजारो - करोडो) वेळा स्थितिबंधापसरण झाल्यानंतर जेव्हा पृथक्त्वशे सागर अर्थात ७०० ते ८०० सागर एवढी घट होते तेव्हा पहिल्या प्रथम - पहिल्या वेळेस प्रकृतिबंधापसरण होते. याला प्रकृतिबंधापसरणाचे प्रथम स्थान म्हणतात. पृथक्त्वचा अर्थ येथे ७ ते ८ असा करावा. अन्यत्र काही ठिकाणी पृथक्त्वचा अर्थ ३ ते ९ असा करतात. पृथक्त्वशे सागरचा अर्थ होतो सातशे ते आठशे सागर वर्ष.''

ज्याप्रमाणे स्थितिबंधाच्या क्रमशः घटण्यास स्थितिबंधापसरण म्हणतात त्याचप्रमाणे विशिष्ट कर्मप्रकृतींचा बंध क्रमशः घटणे - त्यांचा बंध होणे थांबणे - याला प्रकृतिबंधापसरण म्हणतात.

एकेका स्थितिबंधापसरणाद्वारे स्थितिबंधामध्ये पल्याच्या संख्यातव्या भागाएवढी घट होते. असे संख्यात हजार स्थितिबंधापसरण झाल्यानंतर जेव्हा एकूण ७०० ते ८०० सागर वर्षांएवढी घट होते तेव्हा प्रकृतिबंधापसरणाचे पहिले स्थान येते. त्यावेळी विशिष्ट प्रकृतींचा बंध थांबतो. त्यानंतर पुन्हा संख्यात हजार स्थितिबंधापसरणांद्वारे जेव्हा स्थितिबंध आणखी ७०० ते ८०० सागर वर्षांएवढा घटतो तेव्हा प्रकृतिबंधापसरणाचे दुसरे स्थान येते. यामध्ये दुसऱ्या काही प्रकृतींचा बंध थांबतो.

याचप्रकारे संख्यात हजार स्थितिबंधापसरणांनंतर तिसऱ्या वेळा प्रकृतिबंधापसरण होते. याच क्रमाने प्रायोग्यलब्धिमध्ये प्रकृतिबंधापसरणाची एकूण ३४ स्थानं आहेत. या ३४ स्थानांद्वारे ४६ प्रकृतींचा बंध थांबतो. बंधाच्या या थांबण्याला बंधाची व्युच्छित्ति असेही म्हणतात. तरीदेखील प्रकृतिबंधापसरण आणि बंधाची व्युच्छित्ति या दोन भिन्न गोष्टी आहेत. त्या दोन्हींमध्ये जो फरक आहे त्याची चर्चा आपण नंतर करूया.

या ३४ स्थानांमध्ये ज्या ४६ प्रकृतींचे बंधापसरण होते - बंध थांबतो त्यांची नावे पाहूया. यामध्ये काही स्थानांमध्ये एकापेक्षा अधिक प्रकृतींची नावे आहेत

तेथे या प्रकृतींचा संयोगरूप बंध थांबतो असे समजावे. जसे, सूक्ष्म, साधारण, अपर्याप्त यांचा संयोगरूप बंध थांबतो परंतु सूक्ष्म, साधारण, पर्याप्त यांचा बंध होत रहातो किंवा बादर, प्रत्येक, द्वींद्रियादिकाबरोबर अपर्याप्त कर्माचा बंध होत रहातो. या प्रकृतींचा एका वेळी होणारा बंध थांबतो. या प्रकृति यथासंभव दुसऱ्या प्रकृतिंसह नंतरदेखील बांधल्या जातात.

अजून एक गोष्ट नीट लक्षात घ्या. येथे आपण ४६ प्रकृतींचे बंधापसरण होते असे म्हटले आहे त्यावेळी असे समजावे की या अपुनरुक्त प्रकृति आहेत. अपुनरुक्तचा अर्थ असा आहे की संयोगरूपाने एखाद्या प्रकृतीचे नाव अनेकवेळा येते तरीदेखील मोजताना त्या प्रकृतीला एकदाच मोजावे. जसे, अपर्याप्त नामकर्माचे नाव एकेंद्रियापासून पंचेंद्रियासह अनेक वेळा आले आहे परंतु त्याला एकदाच मोजावे. याउलट पर्याप्त नामकर्म हे संयोगरूपाने एकेन्द्रियापासून असंज्ञी पंचेंद्रियासह अनेक वेळा आले आहे, तरीदेखील संज्ञी पंचेंद्रिय, पर्याप्त हा बंध चालूच रहातो. त्याचा बंध थांबत नाही म्हणून बंधापसरण होणाऱ्या ४६ प्रकृतिंमध्ये पर्याप्त नामकर्म मोजले जात नाही. बादर नामकर्माच्या बाबतीतही असेच समजावे. आता आपण त्या ३४ स्थानांना क्रमशः पाहू त्यामुळे ही गोष्ट तुमच्या नीट लक्षात येईल. येथे स्थानांचा क्रमांक व त्या स्थानावर बंधापसरण होणाऱ्या प्रकृतींची नावे लिहित आहे.

(१) नरकायु (२) तिर्यंचायु (३) मनुष्यायु (४) देवायु.

येथे चारही आयुकर्मांचा बंध क्रमशः थांबतो. प्रथमोपशम सम्यक्त्वाचा काळ पूर्ण झाल्यावर क्षयोपशम सम्यक्त्व होते तेव्हा मनुष्यायुचा आणि देवायुचा बंध पुन्हा सुरू होतो. दुसऱ्याही कित्येक प्रकृतींचा बंध पुन्हा होऊ लागतो. ३३ व्या व ३४ व्या स्थानावर सांगितलेल्या प्रकृतींचा बंधदेखील पुन्हा सुरू होतो. आता पुढची स्थानं पाहूया.

(५) नरकगति व नरकगत्यानुपूर्वी.

यानंतर अपर्याप्त नामकर्मासह संयोगरूप स्थानं खालीलप्रमाणे आहेत -

(६) सूक्ष्म, अपर्याप्त, साधारण. (७) सूक्ष्म, अपर्याप्त, प्रत्येक.

(८) बादर, अपर्याप्त, साधारण. (९) बादर, अपर्याप्त, प्रत्येक

(१०) द्वींद्रिय, अपर्याप्त. (११) त्रींद्रिय, अपर्याप्त.

(१२) चतुरिंद्रिय, अपर्याप्त. (१३) असंज्ञी, पंचेंद्रिय, अपर्याप्त.

(१४) संज्ञी, पंचेंद्रिय, अपर्याप्त.

यानंतर पर्याप्त नामकर्मासह संयोगरूप स्थानं खालीलप्रमाणे आहेत -

(१५) सूक्ष्म, पर्याप्त, साधारण. (१६) सूक्ष्म, पर्याप्त, प्रत्येक.

(१७) बादर, पर्याप्त, साधारण.

(१८) बादर, पर्याप्त, प्रत्येक, एकेंद्रिय, स्थावर, आतप.

एकेंद्रियासंबंधी बंधाचे हे अंतिम स्थान असल्याने याचबरोबर एकेंद्रिय व स्थावर प्रकृतींचा बंध देखील थांबतो. त्याचप्रमाणे आतप प्रकृति फक्त एकेंद्रिय, बादर, पर्याप्त, प्रत्येक यांच्यासहच बांधली जाते, दुसऱ्या प्रकृतिंसह बांधली जात नाही म्हणून त्या प्रकृतींचा बंध देखील येथेच थांबतो. म्हणून १८ वे स्थान उपरोक्त सहा प्रकृतींच्या संयोगरूप बंधापसरणाचे स्थान आहे.

पुढे लिहिण्यात येणारे पर्याप्त प्रकृतिसहितवाली स्थानंदेखील द्वींद्रियापासून असंज्ञी पंचेंद्रियपर्यंतच आहेत कारण संज्ञी पंचेंद्रिय, पर्याप्त हा बंध तर चालूच रहातो, त्याचे बंधापसरण होत नाही. आता पुढची स्थानं पाहूया.

(१९) द्वींद्रिय, पर्याप्त, (२०) त्रींद्रिय, पर्याप्त.

(२१) चतुरिंद्रिय, पर्याप्त. (२२) असंज्ञी पंचेंद्रिय, पर्याप्त.

(२३) तिर्यंचगति, तिर्यंचगत्यानुपूर्वी, उद्योत. (२४) नीचगोत्र.

पहा, तिर्यंचगतिसंबंधीचा बंध येथेच थांबतो, म्हणून त्याच्यासह बांधल्या जाणाऱ्या उद्योत प्रकृतीचा बंधदेखील येथेच थांबतो. ही प्रकृति तिर्यंचगतिसह एकेंद्रियापासून पंचेंद्रिय, पर्याप्त यांच्यासहच बांधली जाते.

(२५) अप्रशस्त विहायोगति, दुर्भग, दुस्वर, अनादेय.

(२६) हुंडक संस्थान, असंप्राप्तासृपाटिका संहनन.

हे सहावे संस्थान व सहावे संहनन आहे, या पध्दतीने लक्षात ठेवणे सोपे जाईल.

(२७) नपुंसकवेद.

(२८) वामन संस्थान, कीलित संहनन. (पाचवे संस्थान व पाचवे संहनन)

(२९) कुब्जक संस्थान, अर्धनाराच संहनन. (चौथे संस्थान व चौथे संहनन).

(३०) स्त्रीवेद.

(३१) स्वाति संस्थान, नाराच संहनन (तिसरे संस्थान व तिसरे संहनन).

(३२) न्यग्रोधपरिमंडल संस्थान, वज्रनाराच संहनन (दुसरे संस्थान व दुसरे संहनन).

(३३) मनुष्यगति, मनुष्यगत्यानुपूर्वी, औदारिक, औदारिक अंगोपांग, वज्रवृषभनाराच संहनन.

येथे पहिले संहनन तर सांगितले परंतु पहिल्या संस्थानाचा बंध थांबत नाही, आठव्या गुणस्थानापर्यंत त्याचा बंध चालू रहातो. त्याचे कारण विचारण्यापूर्वीच मी तुम्हाला सांगून टाकते.

संहनन नामकर्म तर तिर्यंचगति व मनुष्यगति यांच्यासहच बांधले जाते कारण तिर्यंचांचे आणि मनुष्यांचे औदारिक शरीर असते व ते संहननासहित असते - येथे एकेंद्रियांना सोडून इतर सर्वजण समजावेत. परंतु संस्थान अर्थात आकार याचा चारही गतिसहित बंध होतो. आठव्या गुणस्थानापर्यंत देवगतिचा बंध होतो, तेव्हा त्याच्याबरोबर समचतुरस्र नामक पहिले संस्थान नामकर्म देखील बांधले जाते.

आता शेवटचे स्थान पाहूया.

(३४) अस्थिर, अशुभ, असातावेदनीय, अयशस्कीर्ति, अरति आणि शोक.

नंतर ३३ व्या स्थानाचा बंध पुन्हा सुरू होऊन चौथ्या गुणस्थानात चालू रहातो, चौथ्या गुणस्थानाच्या शेवटी थांबतो. तसेच ३४ व्या स्थानाचा बंध पुन्हा सुरू होऊन सहाव्या गुणस्थानाच्या अंतापर्यंत होत रहातो. याप्रमाणे प्रायोग्यलब्धिच्या ३४ स्थानांद्वारे ४६ प्रकृतींचा बंध थांबतो.

तुम्ही म्हणाल, 'चला, फार चांगली गोष्ट सांगितलीस. आता आम्ही प्रायोग्यलब्धिमध्येच राहू, त्यामुळे आमच्या एवढ्या साऱ्या प्रकृतींचा बंध होणे थांबेल आणि आमचा संवर सुरू होईल. कारण सात तत्त्वांच्या प्रकरणामध्ये आम्ही शिकलो होतो की बंध होण्याचे थांबणे हा संवर आहे.'

मुलींनो, अशी चूक कधीही करू नका. जर पापप्रकृतींचा बंध झाला नाही परंतु पुण्यप्रकृतींचा बंध झाला म्हणून संवर होतो असे मानाल तर जेव्हा पुण्य प्रकृतींचा बंध न होता त्याच्याऐवजी पापप्रकृतींचा बंध झाला असता पुण्यप्रकृतींचा देखील संवर मानावा लागेल. येथे तर फक्त अघातिकर्मांच्या काही पापप्रकृतींचा बंध फक्त एका अंतर्मुहूर्तासाठी थांबला आहे. शिवाय अशाप्रकारचे प्रायोग्यलब्धिचे परिणाम व प्रकृतिबंधापसरणाची ३४ स्थानं तर अभव्यांनादेखील असू शकतात. तर मग काय तुम्ही असे मानाल का की अभव्यांनासुध्दा संवर होतो? घातिकर्म तर सगळी पापरूपच आहेत, त्यांचा तर निरंतर बंध होतच रहातो.

सर्वात मोठे पाप व पापकर्म तर मिथ्यात्व आहे. त्याचा बंध व उदय देखील येथे चालूच आहे. करणलब्धिच्या शेवटच्या समयापर्यंत मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी कषाय इत्यादिंचा बंध चालू असतो. प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या पहिल्या समयापासून त्यांचा बंध तसेच उदय दोन्हीही मिटतात. जीव शुध्दोपयोगरूप भावसंवर करतो तेव्हा कर्मामध्ये मिथ्यात्वादि १६ व अनंतानुबंधी आदि २५ अशा एकूण ४१ प्रकृतींचा द्रव्यसंवर आपोआप होतो. कर्माची कोणतीही अवस्था जीव करूच शकत नाही. जीव केवळ पुरुषार्थ करतो.

पुरुषार्थ ही पर्याय आहे म्हणून ती स्वद्रव्याच्या संपूर्ण भागात होते, द्रव्याच्या बाहेर होत नाही, परद्रव्यात होत नाही. म्हणून जीवाचा पुरुषार्थ जीवामध्ये होतो, शरीरात किंवा कर्मात होत नाही.

ही गोष्ट नीट लक्षात घ्या की या पहिल्या चार लब्धिंमध्ये होणाऱ्या शुभ व शुभतर विशुध्द परिणामांद्वारे मोक्षमार्गामध्ये अनुकूल असा संवर होत नाही.

दुसरी गोष्ट, काय तुम्ही प्रायोग्यलब्धिमध्येच राहू इच्छिता? की सम्यक्त्वाची प्राप्ति करू इच्छिता? एवढ्यानेच संतुष्ट होऊन थोडेफार पुण्य बांधून त्याचे फळ किती काळ भोगाल? पुण्य आणि त्याच्या फळाची वांछा यामध्ये तर मिथ्यात्व पुष्ट होत रहाते त्याच्याबाबतीत कधी विचार कराल? आणखी एक गोष्ट, या चार लब्धिंचा प्रत्येकाचा काळ तसेच चारहींचा मिळून काळ एक अंतर्मुहूर्त असतो, अधिक नाही.

एखादा म्हणेल की आम्ही अनेक वर्षांपासून स्वाध्याय करत आहोत म्हणून इतक्या वर्षांपासून आमची प्रायोग्यलब्धि चालू आहे, तर तसे नाही.

ज्या भवामध्ये संज्ञी पंचेंद्रियपणा मिळाला तो संपूर्ण भव क्षयोपशमलब्धि नाही. परंतु सम्यक्त्वाची उत्पत्ति होण्यायोग्य प्रक्रिया जेव्हा जेव्हा होईल, तेव्हा तेव्हा क्षयोपशमादि पाच लब्धि होतील आणि याच प्रक्रियेद्वारा सम्यक्त्व ग्रहण करण्याची अर्थात प्राप्त करण्याची योग्यता उत्पन्न होईल. योग्यता उत्पन्न झाली म्हणून सम्यक्त्व होईलच असे नाही, परंतु जेव्हा सम्यक्त्व होते तेव्हा त्याच्या पूर्वी या लब्धिरूप योग्यतेची प्राप्ति अवश्य होते.

आता आपण प्रकृतिबंधापसरण आणि बंधाची व्युच्छित्ति या दोन्हींमध्ये काय अंतर आहे - काय फरक आहे ते पाहू. त्यामुळे तुमचा बंधामध्ये संवर होण्याचा जो भ्रम आहे तो देखील नाहिसा होईल.

प्रकृतिबंधापसरणाचे स्वरूप आपण विस्ताराने पाहिले आहे. विशिष्ट गुणस्थानात विशिष्ट प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा असे समजावे की त्या प्रकृतींचा बंध त्या गुणस्थानाच्या अंतिम समयापर्यंत होतो, त्या गुणस्थानानंतरच्या वरच्या कोणत्याही गुणस्थानात त्याचा बंध आढळत नाही. जसे, मिथ्यात्व प्रकृतीच्या बंधाची व्युच्छित्ति पहिल्या गुणस्थानात होते. याचा अर्थ असा आहे की मिथ्यात्व प्रकृति पहिल्या गुणस्थानात बांधली जाते, दुसऱ्या किंवा वरच्या कोणत्याही गुणस्थानात ती बांधली जात नाही. याप्रमाणे पहिल्या गुणस्थानात एकूण १६ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते.

त्याचप्रमाणे अनंतानुबंधी आदि २५ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति दुसऱ्या गुणस्थानात होते. याचा अर्थ असा आहे की त्या प्रकृति दुसऱ्या गुणस्थानाच्या अंतिम समयापर्यंतच बांधल्या जातात अर्थात पहिल्या व दुसऱ्या गुणस्थानात बांधल्या जातात, वरच्या कोणत्याही गुणस्थानात त्या बांधल्या जात नाहीत. याप्रमाणे प्रत्येक गुणस्थानाची बंधव्युच्छित्ति निश्चित आहे. त्याची चर्चा आपण पुढे करूच. आता तर आपण त्या दोन्हींमधील अंतर पहात आहोत.

प्रकृतिबंधापसरण तर प्रायोग्यलब्धिपासून उपशम सम्यक्त्वाच्या काळापर्यंत होते. त्यामध्ये फक्त अघातिकर्मांच्या काही पापप्रकृतींचा बंध अंतर्मुहूर्तापर्यंत थांबतो. जोपर्यंत सम्यक्त्व प्राप्त होत नाही तोपर्यंत याला संवर म्हणता येत नाही. कारण प्रायोग्यलब्धिमध्ये तर अजून मिथ्यात्व गुणस्थानच चालू आहे.

जीव सम्यक्त्व प्राप्त करून जेव्हा वरच्या गुणस्थानांमध्ये जातो तेव्हाच पूर्वीच्या गुणस्थानांमध्ये होणाऱ्या बंधाची व्युच्छित्ति झाली असे म्हणता येते. सम्यक्त्व प्राप्त करताच जीव चौथ्या गुणस्थानात जातो तेव्हा मिथ्यात्वादि १६ आणि अनंतानुबंधी आदि २५ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते. याला ४१ प्रकृतींचा संवर म्हणता येते.

बंधापसरण तर फक्त अंतर्मुहूर्तासाठीच होते परंतु बंधाची व्युच्छित्ति तर जोपर्यंत जीव वरच्या गुणस्थानांमध्ये आहे तोपर्यंत खालच्या गुणस्थानांसंबंधी बंधाची व्युच्छित्ति कायम रहाते. प्रकृतिबंधापसरण तर भव्य आणि अभव्य दोघांमध्ये होते परंतु बंधाची व्युच्छित्ति तर फक्त भव्यांमध्ये व तेही सम्यक्त्व प्राप्त झाल्यावरच होते.

येथे आपण प्रायोग्यलब्धिचे स्वरूप पहात आहोत. जीवाचे परिणाम दर समयाला अधिकाधिक विशुध्द होत जातात, त्याच्या निमित्ताने कर्मांची सत्ता, बंध व उदय या सर्वांमध्ये परिवर्तन होते. सत्तेमध्ये असलेल्या कर्मांची स्थिति आणि अनुभाग स्थितिकांडकघाताद्वारे व अनुभागकांडकघाताद्वारे घटतात. नवा बंध होतो त्यामध्ये देखील स्थितिबंध स्थितिबंधापसरणाद्वारे आणि विशिष्ट प्रकृतींचा बंध प्रकृतिबंधापसरणाद्वारे घटत जातो. आपण बंधाचे चार प्रकार पाहिले होते - प्रकृतिबंध, प्रदेशबंध, स्थितिबंध व अनुभागबंध.

येथे प्रदेशबंध देखील अनुत्कृष्ट व अजघन्य होतो. प्रदेशबंधाचा अर्थ आहे एका समयात जेवढे कर्मपरमाणु बांधले जातात त्यांची संख्या. सर्वात कमी संख्येस जघन्य प्रदेशबंध म्हणतात आणि सर्वात अधिक संख्येस उत्कृष्ट प्रदेशबंध म्हणतात. त्या दोन्हीच्या मधील मध्यम संख्येतील उत्कृष्टाकडील संख्येस अनुत्कृष्ट व जघन्याकडील संख्येस अजघन्य म्हणतात.

अनुभागबंधाचे काही वैशिष्ट्य आहे. त्यामध्ये फक्त घटणे नाही. अप्रशस्त प्रकृतींचा अनुभागबंध द्विस्थानगत होतो त्यामध्ये देखील दर समयाला अनुभाग अनंत गुणा घटणारा असा बांधला जातो अर्थात पापप्रकृतींचा अनुभाग अत्यंत घटत घटत बांधला जातो. परंतु प्रशस्त प्रकृतींचा अनुभाग याच्या उलट अर्थात चतुःस्थानगत आणि तो देखील दर समयाला अनंत गुणा वाढता असा बांधला जातो.

आता उदयामध्ये येणाऱ्या कर्मांमध्ये कोणते परिवर्तन होते ते पाहूया. ज्या कर्माचा उदय असतो त्या कर्माचा जीव भोक्ता असतो. उदय तर एका समयात एका निषेकाचाच होतो. म्हणून स्थितिउदयामध्ये वर्तमान एक समयाची स्थितिवाला एक निषेकच उदयास येतो. अनुभागउदयामध्ये अप्रशस्त कर्मांचा द्विस्थानरूप आणि प्रशस्त कर्मांचा चतुःस्थानरूप अनुभागउदय होतो - जीव त्यांचा भोक्ता असतो. पहा तर खरं, पूर्वबध्द तीव्र पापकर्माचे फळ मंद होऊन उदयास येते आणि पूर्वबध्द पुण्यकर्माचे फळ अधिक प्रमाणात उदयास येते. प्रदेशउदय देखील अजघन्य आणि अनुत्कृष्ट होतो. ज्या प्रकृति उदयरूप आहेत त्यांचीच उदीरणा होते.

अशा प्रकारे प्रायोग्यलब्धिमध्ये कर्मांमध्ये होणाऱ्या अनेक परिवर्तनांची आपण चर्चा केली.

बाकी चर्चा पुढील पत्रांद्वारे करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# करणलब्धि - अध:प्रवृत्तकरण

पत्रांक ९ १२ ऑक्टो. २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या पूर्वी होणाऱ्या पाच लब्धिंचे स्वरूप आपण पहात आहोत. त्यापैकी चार लब्धिंविषयी आपण चर्चा केली आहे. आपण हे देखील पाहिले की भव्य आणि अभव्य या दोन्ही प्रकारच्या जीवांना प्रायोग्यलब्धिपर्यंतच्या चार लब्धि प्राप्त होऊ शकतात. परंतु पाचवी करणलब्धि फक्त भव्य जीवांनाच प्राप्त होते, अभव्य जीव तर करणलब्धि प्राप्त करूच शकत नाहीत.

भव्य जीवांपैकी काही जीव करणलब्धि प्राप्त करतील अथवा कित्येक जीव करणारही नाहीत. त्यांच्यामध्ये पात्रता असूनदेखील उपादानगत योग्यतेनुसार, पुरुषार्थानुसार, भवितव्यतेनुसार आणि काललब्धिअनुसार जे जीव अंतर्मुहूर्तामध्ये सम्यक्त्व प्राप्त करणार असतील तेच जीव करणलब्धिमध्ये प्रवेश करतील अर्थात त्यांना करणलब्धि प्राप्त होईल. त्यावेळी निमित्तरूपाने कर्माचा उपशम कर्माच्या स्वतःच्या उपादान योग्यतेने स्वयमेव होईल.

शास्त्रामध्ये काललब्धिच्या अपेक्षेने - तिच्या मुख्यतेने कथन केले जाते तेव्हा सांगण्यात येते की ज्याची काललब्धि आली आहे त्यालाच सम्यक्त्व प्रकट होईल. कथन कोणत्याही एका समवायाच्या अपेक्षेने केले असेल तरीही तेथे पाचही समवायांचा सुमेळ असतो. उपदेशामध्ये पुरुषार्थ करण्याची प्रेरणा देत असताना पुरुषार्थाच्या मुख्यतेने कथन केले जाते की जो जीव मोक्षाचा पुरुषार्थ करेल - मोक्षाचा उपाय करेल त्याचे पाचही समवाय उपस्थित होतात आणि त्याच्या मोक्षमार्गाचा प्रारंभ होतो.

पहा हं, येथे सम्यक्त्वाचा पुरुषार्थ न म्हणता मोक्षाचा पुरुषार्थ म्हटले आहे. तत्त्वनिर्णय करून, स्व आणि पराचे भेदविज्ञान करून, अभेद अखंड त्रिकाली ध्रुव निज शुध्दात्म्याला निजरूपाने जाणत रहाणे हाच पुरुषार्थ आहे. या

भेदविज्ञानाद्वारेच सम्यक्त्व प्राप्त होते, याच्याद्वारेच वरची गुणस्थानं प्रकट होतात आणि केवलज्ञानसुध्दा याच्याद्वारेच प्रकट होते.

हाच मोक्षमार्ग प्रकट होण्याचा विधि आहे. म्हणून 'केवली भगवानांनी आमचे सम्यक्त्व जेव्हा होणार आहे ते जाणले आहे तेव्हाच ते होईल, तर मग आम्हाला पुरुषार्थ करण्याचा उपदेश का देता?' अथवा 'केवली भगवानांनी आमच्या भविष्याच्या पर्याय जशा होणार आहेत तशा जाणल्या आहेत, म्हणून त्या तशाच होणार आहेत तर मग आमचा पुरुषार्थ तो काय राहिला? आम्ही तर पराधीन झालो' इत्यादि प्रश्न व मान्यता चुकीच्या आहेत ही गोष्ट तुमच्या लक्षात आली असेल.

तुम्ही या गोष्टीबद्दल आश्चर्य व्यक्त केले होतेत की भव्य जीवांप्रमाणे अभव्य जीवांना देखील प्रायोग्यलब्धि होऊ शकते आणि त्यांच्या कर्मामध्ये सुध्दा स्थितिकांडकघात, स्थितिबंधापसरण, प्रकृतिबंधापसरण वगैरे गोष्टी होतात.

मुलींनो, शुभभाव तर भव्य अभव्य दोघांना होत असतात, त्याच्या निमित्ताने प्रशस्त कर्मांचा बंध होतो. परंतु भव्य जीवांनी देखील जर प्रायोग्यलब्धिपर्यंत येऊन स्वभाव सन्मुखतेचा, तत्त्वनिर्णयाचा आणि त्यानुसार परिणमण्याचा पुरुषार्थ केला नाही म्हणजेच जर त्यांना करणलब्धिची प्राप्ति झाली नाही तर त्यांनाही सम्यक्त्वाची प्राप्ति होणार नाही.

ज्या करणलब्धिचे नाव तुम्ही अनेक वेळा ऐकले आहे आणि जी प्राप्त झाल्यावर नियमाने सम्यक्त्व होतेच होते, त्याचप्रमाणे जी प्राप्त झाली नाही तर सम्यक्त्व होऊच शकत नाही, तिचे स्वरूप जाणण्यासाठी तुम्ही खूपच उत्सुक आहात हे मला माहित आहे. आता त्याची चर्चा करूया.

'करण' परिणामांना म्हणतात. पूर्वोक्त चार लब्धिंपूर्वक जीवाच्या परिणामांची विशुध्दि दर समयाला वृध्दिंगत होत जाते. करणलब्धिमध्ये प्रवेश करणाऱ्या चारही गतिंमधील व त्रिकालवर्ती सर्व जीवांच्या परिणामांची तुलना केली असता त्यामध्ये तीन प्रकार आढळतात. पहा, केवली भगवान तर सर्व द्रव्य गुण पर्यायांना जाणतात. अनंत जीवांच्या अनादिअनंत काळातील दर समयातील

परिणाम ते युगपत् - एकावेळी जाणतात.

पूर्वीच्या काळी ज्या जीवांनी करणलब्धिचे परिणाम केले होते, वर्तमानकाळात जे करत आहेत आणि भविष्य काळामध्ये जो करतील त्या सर्व जीवांचे परिणाम केवली भगवान एका समयात युगपत् - एकदम - एकावेळी जाणतात. प्रत्येक जीवाच्या परिणामांची विशुध्दि दर समयाला अनंत गुणा वाढते. परंतु भिन्न भिन्न जीवांच्या परिणामांमध्ये असणाऱ्या समानतेच्या किंवा असमानतेच्या अपेक्षेने या परिणामांचे तीन भेद करण्यात येतात. त्या परिणामांची म्हणजेच तीन करणांची नावे याप्रमाणे आहेत -

(१) अधःप्रवृत्तकरण.

(२) अपूर्वकरण.

(३) अनिवृत्तिकरण.

अशाप्रकारे चार लब्धिंपूर्वक जीवाचा उपयोग निजशुध्दात्म्याकडे लागतो त्यावेळी क्रमाने अधःप्रवृत्तकरण म्हणजेच अधःकरण, अपूर्वकरण आणि अनिवृत्तिकरण परिणाम होतात. याला करणलब्धि म्हणतात.

करणलब्धिचा काळ एक अंतर्मुहूर्त असतो, तिन्ही करणांचा काळदेखील आपापला एकेक अंतर्मुहूर्त असतो. तरीदेखील अनिवृत्तिकरणाचा काळ सर्वात अल्प आहे, अपूर्वकरणाचा काळ त्यापेक्षा संख्यात गुणा मोठा आहे आणि अधःकरणाचा काळ त्यापेक्षादेखील संख्यात गुणा मोठा आहे.

सर्वप्रथम तिन्ही करणांचे स्वरूप व वैशिष्ट्यं पाहून त्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा करूया.

**अधःप्रवृत्तकरण** - अधःप्रवृत्तकरण सुरू करून ज्याला अधिक समय लोटले आहेत अशा वरच्या समयवर्ती काही जीवांचे परिणाम आणि अधःप्रवृत्तकरण सुरू करून थोडेच समय झाले आहेत अशा खालच्या समयवर्ती काही जीवांचे परिणाम यांमध्ये संख्या व विशुध्दता यांची समानता असू शकते. याला अनुकृष्टि रचना म्हणतात.

येथे चार आवश्यक होतात. नियमाने होणाऱ्या गोष्टींना आवश्यक म्हणतात. ते असे -

(१) विशुध्दि दर समयाला अनंत गुणा वाढते.

(२) स्थितिबंधापसरण होतात.

(३) प्रशस्त प्रकृतींचा दर समयाला अनंतगुणा वाढता असा चतुःस्थानगत अनुभागबंध होतो.

(४) अप्रशस्त प्रकृतींचा दर समयाला अनंत गुणा घटता असा द्विस्थानगत अनुभागबंध होतो.

वेगवेगळ्या जीवांचे विशुध्दीचे परिणाम वेगवेगळे असतात. तिन्ही काळातील अनंत जीवांचे करणलब्धिचे परिणाम जिनेन्द्र भगवानांनी प्रत्यक्ष जाणले आहेत आणि सांगितले आहेत, जे असंख्यात लोकप्रमाण आहेत. लोकाकाशामध्ये जेवढे असंख्यात प्रदेश आहेत त्या संख्येस एक लोक म्हणतात. त्याला चिन्हाद्वारे म्हणजेच सहनानीद्वारे दाखवायचे झाल्यास '≡' असे दाखविले जाते. असे १ लोक, २ लोक, ३ लोक....करोड लोक....असंख्यात लोक दाखविण्यासाठी '≡ a' असे चिन्ह लिहितात.

आमच्या सकाळच्या स्वाध्यायामध्ये सध्या पं. टोडरमलजी लिखित 'अर्थ संदृष्टि अधिकार' चालला आहे. पल्य, असंख्यात, अनंत वगैरे मोठमोठ्या संख्या चिन्हांद्वारे - संदृष्टिद्वारे दाखवून त्यावरील गणितं यामध्ये समजाविली आहेत. त्यामधील हे चिन्ह तुम्हाला दाखवत आहे.

आता अपूर्वकरणाचे स्वरूप आणि त्यातील वैशिष्ट्य पाहूया.

**अपूर्वकरण** - येथे दर समयाला विशुध्दीचे परिणाम अपूर्व अपूर्व होतात. खालच्या आणि वरच्या समयातील परिणाम कधीही समान होऊ शकत नाहीत अर्थात येथे अनुकृष्टि रचना होत नाही. अधःप्रवृत्तकरणामध्ये होणाऱ्या चार आवश्यकांबरोबर येथे आणखी चार आवश्यक होतात ते असे - (१) गुणश्रेणी (२) गुणसंक्रमण (३) स्थितिकांडकघात (४) अनुभागकांडकघात.

अधःप्रवृत्तकरणाच्या परिणामांपेक्षाही येथील परिणाम असंख्यात लोक गुणा होतात. याला संदृष्टिद्वारे याप्रमाणे लिहितात - '≡∂ ≡∂'.

वर सांगितलेल्या सर्व आवश्यकांचे सविस्तर वर्णन आपण नंतर पहाणार आहोत. त्यापूर्वी अनिवृत्तिकरणाचे स्वरूप पाहूया.

**अनिवृत्तिकरण** - निवृत्ति = परिणामांमध्ये भेद किंवा असमानता.

अनिवृत्ति = त्रिकालवर्ती नाना जीवांच्या परिणामांमध्ये समानता.

येथे प्रत्येक समयातील परिणाम अनंतगुणा विशुध्द होत जातात, तरीदेखील सर्व अनंत जीवांचे एकेका समयातील परिणाम समानच असतात. येथेदेखील आयुशिवाय बाकीच्या सात कर्मांमध्ये गुणश्रेणी, गुणसंक्रमण, स्थितिकांडकघात व अनुभागकांडकघात होतात. अनिवृत्तिकरणाचा संख्यात बहुभाग व्यतीत झाल्यावर दर्शनमोहनीय कर्मामध्ये 'अंतरकरण' आणि 'उपशमकरण ' होते.

आता या तिन्ही करणांचे स्वरूप विस्ताराने पाहूया. यामधील अनेक नवे शब्द वाचून घाबरून जायचे काही कारण नाही. वारंवार ऐकण्याने किंवा वाचण्याने आपण कोणत्याही विषयाशी परिचित होत असतो. मोना, तूच तर सांगितले होतेस की तू दररोज रियाला सहा द्रव्य, सात तत्त्वं, इंद्रियं, पाप, कषाय इत्यादिंची नावे शिकवितेस. पाच वर्षांची रिया जेव्हा कषायांची नावे सांगताना क्रोध, मान, असे म्हणून थोडी थांबली तेव्हा पावणे दोन वर्षांचा सोहम् त्याच्या बोबड्या भाषेत पटकन म्हणाला, 'माया, लोभ ' तेव्हा मोना तू स्वतःच आश्चर्यचकित झाली होतीस आणि आता तू दररोज दोन्ही मुलांना शिकवितेस. ही फार चांगली गोष्ट आहे.

लहान मुलांची आकलनशक्ति व निरीक्षणशक्ति तीव्र असते, मोठ्यांचे अनुकरण करण्याची वृत्ति त्यांच्यामध्ये आढळते. रीना, सात व पाच वर्षांचे तुझे रोहित व रोहन तुझ्याकडून स्वाध्यायाच्या गोष्टी तर शिकतातच, त्याचबरोबर कुदेवादिकांना न मानणे, अभक्ष्यभक्षण न करणे, बाहेरचे केक वगैरे पदार्थ न

खाणे याविषयी ते काटेकोर आहेत. कोणाच्या घरी एखादा नवा पदार्थ खाण्याचा प्रसंग आला तर ते आधी विचारतात, 'मम्मी, तू हे खाऊ शकतेस? जर हो असेल तरच आम्ही खाऊ.'

मुलांवर सुयोग्य संस्कार करणे हीच त्यांच्या हिताची गोष्ट आहे, हीच त्यांच्यासाठी उत्तम संपत्ति आहे. ही सारी मुलं प्रशंसेस पात्र आहेतच, तुम्ही दोघीदेखील सुयोग्य मातेचे कर्तव्य पार पाडत आहात या गोष्टीचे मला समाधान वाटते. आता स्वतःच्या मुलांबरोबर ओळखीच्या व नातलगांच्या इतर मुलांनादेखील जरूर शिकवा. हे सुध्दा स्वाध्यायाचे अंग आहे. आम्हाला काही येत नाही असा विचारसुध्दा मनात आणू नका.

मला तरी कोठे अधिक ज्ञान आहे? माझ्या अल्पबुध्दिमध्ये जे काही आले आहे ते शास्त्रानुसार लिहिण्याचा विकल्प मला येतो व त्यामध्ये माझे सखोल चिंतन होते. शक्यता आहे की या निमित्ताने तुमची रुचि जागृत होऊन तुम्हाला मूळ ग्रंथ वाचण्याची प्रेरणा मिळेल व ग्रंथांचा अर्थ जाणून घेताना तुम्हाला सोपे जाईल.

तुमचा प्रश्न होता की, 'तू तर शुध्दोपयोगाची वार्ताच करत नाहीस, फक्त करणपरिणामांच्या फलस्वरूप सम्यक्त्वाची प्राप्ति होते असे वारंवार सांगत आहेस, असे का?' चांगला प्रश्न आहे. येथे आपण करणानुयोगाद्वारे परिणामांचे व कर्मांचे सूक्ष्म वर्णन पहात आहोत. प्रत्येक अनुयोगाची भाषा अर्थात वर्णन करण्याची पध्दत वेगवेगळी असते. मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथामध्ये पं. टोडरमलजी याविषयी लिहितात -

''चरणानुयोगामध्ये बाह्य विषयाच्या मुख्यतेने समजाविले जाते, द्रव्यानुयोगात आत्मपरिणामांच्या मुख्यतेने वर्णन केले जाते आणि करणानुयोगात सूक्ष्म वर्णन केले जाते. द्रव्यानुयोगात स्थूल निरूपण असते. द्रव्यानुयोगात उपयोगाचे तीन भेद सांगितले आहेत - शुभोपयोग, अशुभोपयोग व शुध्दोपयोग. छद्मस्थ जीवांच्या बुध्दिगोचर अर्थात ज्ञानामध्ये येण्यायोग्य परिणामांच्या अपेक्षेने हे कथन केले जाते. यामध्ये धर्मानुरागरूप परिणाम शुभोपयोग आहे,

पापानुरागरूप व द्वेषरूप परिणाम अशुभोपयोग आहे आणि रागद्वेषरहित परिणाम शुध्दोपयोग आहे - असे सांगितले जाते.

करणानुयोगामध्ये कषायशक्तीच्या अपेक्षेने गुणस्थानांमध्ये संक्लेश किंवा विशुध्द परिणामांच्या अपेक्षेने कथन केले जाते. करणानुयोगामध्ये रागादिरहित शुध्दोपयोग यथाख्यात चारित्र झाल्यावर होतो आणि तो मोहाचा नाश झाल्यावर स्वयमेव होतो. खालच्या गुणस्थानांमध्ये असा शुध्दोपयोग कसा होऊ शकतो? परंतु द्रव्यानुयोगामध्ये शुध्दोपयोग करण्याचाच मुख्य उपदेश दिला जातो. त्यामुळे छद्मस्थ जीव ज्या काळात बुध्दिगोचर भक्ति आदि तसेच हिंसा आदि कार्यरूप परिणामांना सोडून आत्मानुभवनादि कार्यामध्ये प्रवर्तन करतो, त्या काळात त्याला शुध्दोपयोगी म्हणतात. त्या काळात देखील केवलज्ञानगम्य सूक्ष्म रागादि होतात, परंतु द्रव्यानुयोगामध्ये त्याची विवक्षा केली जात नाही, स्वतःच्या बुध्दिमध्ये जाणले जाणारे - बुध्दिगोचर रागादिक सोडण्याच्या अपेक्षेने त्याला शुध्दोपयोगी म्हटले जाते.

यथाख्यात चारित्र झाल्यावर द्रव्यानुयोग आणि करणानुयोग दोन्हींच्या अपेक्षेने शुध्दोपयोग आहे, परंतु खालच्या गुणस्थानांमध्ये (चौथ्या, पाचव्या वगैरे) द्रव्यानुयोगाच्या अपेक्षेने कधी कधी शुध्दोपयोग होतो परंतु करणानुयोगाच्या अपेक्षेने सदैव कषायअंशाचा सद्भाव असल्याने शुध्दोपयोग होत नाही. म्हणून द्रव्यानुयोगाची कथनपध्दति करणानुयोगाशी जुळवून पहाता कधी जुळते तर कधी जुळत नाही. ''

पं टोडरमलजी पुढे लिहितात -

''करणानुयोगामध्ये कषायशक्तीच्या अपेक्षेने कथन असते. कषायांची प्रवृत्ति वेगळी गोष्ट आहे आणि अंतरंग कषायशक्ति वेगळी गोष्ट आहे. एखाद्या जीवाची कषायांची प्रवृत्ति अधिक असेल आणि जर त्याची अंतरंग कषायशक्ति कमी असेल तर त्याला मंदकषायी म्हणतात. परंतु ज्या जीवांची कषायांची प्रवृत्ति कमी आहे परंतु अंतरंग कषायशक्ति खूप अधिक असेल तर त्यांना तीव्रकषायी म्हणतात. जसे, व्यंतरादि देव कषायाने नगरादिंचा नाश करण्याचे कार्य करतील

तरीदेखील त्यांची कषायशक्ति कमी असल्याने त्यांना पीतलेश्या असते. याउलट एकेंद्रियादि जीव कोणतेही कषायकार्य करताना दिसत नाहीत तरीदेखील कषायशक्ति खूप अधिक असल्याने त्यांना कृष्णादि तीन लेश्या असतात.

सर्वार्थसिध्दि नामक सर्वात वरच्या स्वर्गातील देव कषायरूप कमी प्रवर्तन करतात परंतु कषायशक्ति अधिक असल्याने त्यांना असंयम आहे, याउलट पाचव्या गुणस्थानातील गृहस्थ विवाह करतो, व्यापारादि करतो इत्यादि कषायकार्य तर खूप करतो, परंतु कषायशक्ति मंद असल्याने त्यांना देशसंयमी म्हटले आहे.''

एकेका लेश्येमध्ये असंख्यात लोकप्रमाण कषायांची स्थानं असतात, त्यामध्ये मंद तीव्र भेद असतात. जीवांचे सर्व कषाय असंख्यात लोकप्रमाण आहेत. त्याला यथायोग्य असंख्यात लोक या संख्येने भाग दिला असता असंख्यात लोकच येते. त्यामध्ये बहुभागप्रमाण तर संक्लेश परिणाम आहेत ज्यामध्ये कृष्ण, नील व कपोत लेश्या असते. एकभागप्रमाण विशुध्द परिणाम आहेत ज्यामध्ये पीत, पद्म व शुक्ल लेश्या असते.

संक्लेश परिणामांमध्ये कोणत्याही लेश्येतील तीव्र संक्लेशाला तीव्रकषाय व संक्लेशाची हानि होण्यास मंद कषाय म्हणतात. परंतु विशुध्द परिणामांमध्ये कोणत्याही लेश्येतील विशुध्दीच्या वृध्दीस मंदकषाय व विशुध्दीच्या हानीस तीव्रकषाय म्हणतात.

वरील उदाहरणामध्ये सर्वार्थसिध्दिच्या देवांना तीन कषाय चौकड्या विद्यमान आहेत - अप्रत्याख्यानावरण, प्रत्याख्यानावरण व संज्वलन. पंचम गुणस्थानवर्ती जीवास दोन कषाय चौकड्या विद्यमान आहेत - प्रत्याख्यानावरण, संज्वलन. सर्वार्थसिध्दिवाल्यांना शुक्ल लेश्या असली तरी देखील अप्रत्याख्यानावरणामध्ये कषायशक्ति अधिक आहे, ते थोडा देखील त्यागाचा परिणाम होऊ देत नाहीत.

प्रत्याख्यानावरणामध्ये त्यापेक्षा कषायशक्ति कमी आहे, त्यामुळे पाचव्या गुणस्थानवाल्यांना थोडा त्याग तर होऊ शकतो, परंतु सकलसंयम होऊ देत नाही. म्हणून पीतादि तीन लेश्या असूनदेखील तेथे देशसंयम म्हटले आहे.

पं. टोडरमलजी लिहितात -

''कषायांप्रमाणे योगाच्या बाबतीतही असेच आहे. योगाची प्रवृत्ति वेगळी गोष्ट आहे व कर्माकर्षण योगशक्ति वेगळी गोष्ट आहे. (कर्माकर्षण शक्तीचा अर्थ आहे कर्माला आकर्षण करण्याची योगशक्ति ज्याला भावयोग म्हणतात.) एखाद्या जीवाची मन, वचन, कायेची प्रवृत्ति-क्रिया खूपच कमी दिसून येते परंतु कर्माकर्षण शक्तीच्या अपेक्षेने त्याला योग अधिक आहे. याउलट एखाद्या जीवाची ही प्रवृत्ति -प्रयत्न अधिक दिसतात परंतु कर्माकर्षण शक्ति अल्प असल्याने अल्पयोग म्हटला आहे. जसे, केवलीभगवान गमनादि क्रियेने रहित आहेत, त्यांना योग अधिक आहे आणि द्वीद्रियादिक जीव गमनादि करतात तरीदेखील त्यांना योग अल्प आहे.

करणानुयोगामध्ये परिणामांचे व कर्मांच्या अवस्थांचे सूक्ष्म विवेचन केले जाते. त्या अनुसार प्रयत्नपूर्वक कोणताही उद्यम होऊ शकत नाही. करणानुयोगामध्ये यथार्थ वस्तुस्थिति सांगितली जाते, त्यामध्ये आचरणाची मुख्यता नसते. चरणानुयोग, द्रव्यानुयोग आदिच्या उपदेशानुसार जो वागेल त्या निमित्ताने जे कार्य होणार असेल ते स्वयमेव होईल. जसे, कोणी कर्माचा उपशम वगैरे करू इच्छित असेल तर कशाप्रकारे होईल? जो स्वतः तत्त्वादिकांचा निर्णय करण्याचा उद्यम करेल त्या निमित्ताने सहजच उपशम सम्यक्त्व होईल.

म्हणून करणानुयोगानुसार जसे आहे तसे जाणून घ्यावे परंतु प्रवृत्ति तर बुध्दिगोचर ज्याने भले होईल तशी करावी.''

वरील संपूर्ण विवेचन मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथाच्या आठव्या अधिकारात आहे. तुम्ही विचाराल, 'जर द्रव्यानुयोगानुसार तत्त्वं जाणून तत्त्वनिर्णय करणे हाच पुरुषार्थ किंवा प्रयत्न - उद्यम आहे, तर मग करणानुयोग जाणायचाच कशाला? विनाकारण वेळ आणि शक्ति वाया कशाला घालवायची?'

मुलींनो, आपल्याला ज्याच्यामध्ये रुचि आहे अशा मोक्षमार्गाचे सर्वांगीण स्वरूप जाणण्याची जिज्ञासादेखील सहजच होते. जगभरातल्या इतर घटना जाणण्याचा रस कमी होऊन सत्य परिस्थिति जाणण्याची उत्सुकता होणे, त्यात

उत्साह वाटणे स्वाभाविक आहे. ज्यांना क्रिकेटमध्ये रुचि आहे, त्यांना मॅच कोणी जिंकली एवढेच ऐकण्याने कधी समाधान होते का? ते लोक तर आख्खा दिवस टी. व्ही. समोर बसून सुरुवातीपासून शेवटपर्यंत मॅच बघतात, पुन्हा हायलाईट्स पहातात, वारंवार त्याच विषयावर एकमेकांशी गप्पा मारतात.

माझ्यासारखीला प्रश्न पडतो की एका चेंडूची फेकाफेकी करण्यात इतके सारे खेळाडू पळापळी करतात आणि त्यांना पहात असता लाखो लोक वरखाली होतात - हर्ष शोक करतात, असे त्यामध्ये आहे तरी काय? त्यावर एखादा क्रिकेटरसिक उत्तर देईल, 'अरसिकेषु कवित्व निवेदनं, शिरसि मा लिख मा लिख मा लिख' अर्थात 'हे भगवान, ज्याला काव्य, शास्त्र, विनोद इत्यादिंमध्ये रस नाही, त्याची रुचि नाही त्याला काव्य काय आहे हे शिकविणे माझ्या नशिबात लिहू नकोस.'

परंतु येथे तर करणानुयोगात ज्यांना रस नाही, रुचि नाही अशा जीवांनादेखील त्यांच्याच कल्याणासाठी सांगावेसे वाटते की, 'बा जीवा! तू काय करत आहेस याचा तुला पत्ता नाही. अनादि कर्मबंधामध्ये अडकून सतत कर्मबंधनाचेच कार्य तू करत आहेस. पहा, यातून सुटण्याचा मार्ग अत्यंत सोपा, सुलभ आणि सहज आहे. ऐक, तू तर फक्त तत्त्वविचारादिक कार्य कर, कर्मांमध्ये ही सारी स्थित्यंतरं स्वयमेव होतील. तुला सम्यक्त्वाची प्राप्ति होईल, तुझी कर्मबंधनं ढिली पडतील, पूर्वबध्द पापकर्म शक्तिहीन होतील, त्यांची स्थितिदेखील घटेल परंतु पुण्यकर्मांची शक्ति वाढून तुला त्यांचे फळदेखील मिळत राहील, तसेच त्यांचादेखील नाश होऊन तुला लवकरच मोक्षाची प्राप्ति होईल.'

येथे आपण करणानुयोगाच्या आधारे करण परिणामांची चर्चा करत आहोत. पूर्वोक्त चार लब्धिंपूर्वक जीव करण परिणाम मांडतो अर्थात जयसेनाचार्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर, 'अध्यात्मभाषेमध्ये निजशुध्दात्मभावनारूप सविकल्प स्वसंवेदन ज्ञानाद्वारे आणि आगमभाषेमध्ये अधःप्रवृत्तकरण, अपूर्वकरण व अनिवृत्तिकरण या तीन करण परिणामांद्वारे आत्म्यामध्ये लीन होतो - एकाग्र होतो.' येथे भावना शब्दाचा अर्थ आहे तद्रूप होणे - एकाग्र होणे. फक्त इच्छा करत रहाणे असा भावना शब्दाचा अर्थ नाही.

पं. टोडरमलजी मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथात लिहितात -

''करणलब्धिवाल्या जीवाचा बुध्दिपूर्वक इतकाच उद्यम (प्रयत्न) होतो की तो उपयोगाला तत्त्वविचारामध्ये मग्न करतो - तद्रूप होऊन लावतो. त्या कारणाने दर समयाला परिणाम निर्मल होत जातात. तत्त्वोपदेशाचा विचार निर्मल होत गेल्याने थोड्याच काळात त्याला तत्त्वश्रध्दानरूप सम्यक्त्व होते. या परिणामांची तारतम्यता केवलज्ञानी जाणतात, त्यांचे निरूपण करणानुयोगामध्ये केले आहे.''

आता आपण एकेका करण परिणामाचे स्वरूप विस्ताराने पाहूया. तत्त्वविचार आणि तत्त्वनिर्णय यांमध्ये उपयोग लागतो तेव्हा जीवाचे परिणाम अनंतगुणा विशुध्द होत जातात. आपण विशुध्दिलब्धिमध्ये विशुध्दि वाढण्याची चर्चा केली होती, येथे करणलब्धिमध्येदेखील विशुध्दि सांगितली जाते. पूर्वी तर सातावेदनीय वगैरे प्रकृतींच्या बंधास कारणभूत अशा परिणामांना विशुध्द परिणाम म्हटले होते. आता येथे जी विशुध्दि आहे त्यामध्ये तत्त्वज्ञानासंबंधी निर्मलता जाणावी, तत्त्वश्रध्दानासंबंधी निर्मलता जाणावी. येथे करणलब्धिमध्ये मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी कषाय उत्तरोत्तर मंद, मंदतर, मंदतम होत जातात त्यांच्या अपेक्षेने विशुध्दि समजावी.

आपण पूर्वी पाहिले होते की चारही गतिंमधील भव्य मिथ्यादृष्टि जीव प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करू शकतो. त्यामध्ये कोणी सातव्या नरकातील नारकी असेल, ज्याला कृष्ण लेश्या असते, कोणी नवव्या ग्रैवेयक स्वर्गातला मिथ्यादृष्टि जीव असेल ज्याला शुक्ल लेश्या असते, कोणी मनुष्य अथवा तिर्यंच असेल ज्यांना पीत, पद्म किंवा शुक्ल लेश्या असते. येथे आपापली लेश्या तर कायम रहाते परंतु अशुभ लेश्यावाल्यांचे संक्लेश घटतात तर शुभलेश्यावाल्यांची विशुध्दि वाढते. त्यांच्या कषायांची स्थानं पूर्व परिणामांपेक्षा घटत जातात.

तरीदेखील त्या सर्व जीवांमध्ये तत्त्वज्ञानाच्या निर्मलतेरूप विशुध्द परिणामांमध्ये प्रारंभी समानता किंवा असमानता असते व अनिवृत्तिकरणामध्ये सर्वांचे परिणाम एकसारखे विशुध्द असतात - समान असतात.

अधःप्रवृत्तकरणामध्ये वरच्या आणि खालच्या समयांमध्ये समान परिणाम असतात त्याला अनुकृष्टि रचना म्हणतात. त्याचे स्वरूप आता आपण पाहूया. तुम्ही टी. व्ही. वर क्रिकेट मॅच पहाता. त्या मॅचचे धावते वर्णन - कॉमेंट्री करता करता पूर्वी खेळल्या गेलेल्या इतर मॅचेसशी त्याची तुलना करून त्याचे वर्णन केले जाते. एखादी टीम चौथ्या ओव्हरपर्यंत जेवढ्या धावा (रन्स) काढते, तेवढ्याच धावा एखादी टीम तिसऱ्या ओव्हरपर्यंत, एखादी टीम दुसऱ्या ओव्हरपर्यंत तर एखादी टीम पहिल्या ओव्हरमध्येच करते. त्यांच्या धावसंख्येत या प्रकारे समानता असू शकते. त्याचप्रमाणे येथे त्रिकालवर्ती अनंत जीव, जे अधःप्रवृत्तकरण मांडतात त्यांच्या परिणामांमध्ये पहिल्या, दुसऱ्या आदि समयांमध्ये समानता असू शकते.

क्रिकेटमध्ये तर फक्त भूतकालीन मॅचशीच तुलना केली जाते. परंतु केवलीभगवान तर युगपत् - एकाच समयात, सर्व अनंत जीवांचे भूत, भविष्य व वर्तमान समयातील सर्व परिणाम जाणतात. त्या परिणामांची विशुध्दि पाहिली तर वेगवेगळ्या जीवांमध्ये वेगवेगळ्या परिणामांची संख्या असंख्यात लोकप्रमाण असते.

अधःप्रवृत्तकरणाच्या अंतर्मुहूर्त काळामध्ये दर समयातील परिणामांची संख्या विशिष्ट असते. त्यामध्ये पहिल्या समयात जेवढे परिणाम असतील त्यापेक्षा दुसऱ्या समयामध्ये परिणामांची विशुध्दि तर अनंत गुणा वाढतेच, परंतु परिणामांच्या संख्येतदेखील विशिष्ट वृध्दि होते. तिसऱ्या समयात विशुध्दि त्यापेक्षा अनंतगुणा होते आणि त्यांच्या संख्येत तशीच समान वृध्दि होते. दर समयाला संख्येमध्ये समान वाढ होते यास 'चय' म्हणतात. अशाप्रकारे सर्व समयांतील एकूण परिणामांची संख्या असंख्यात लोकप्रमाण असते. याचे विस्तृत वर्णन गोम्मटसार - जीवकाण्ड, लब्धिसार आदि ग्रंथांमध्ये केले आहे. आपण येथे स्थूलरूपाने त्याची चर्चा करूया.

आपण येथे काल्पनिक संख्या घेऊन या अधःप्रवृत्तकरणातील अनुकृष्टि रचना समजून घेऊया. या काल्पनिक संख्यांद्वारे गणित समजणे यास 'अंकसंदृष्टि' म्हणतात आणि यथार्थ संख्यांद्वारे ते समजणे यास 'अर्थसंदृष्टि' म्हणतात.

अधःप्रवृत्तकरणाची अंकसंदृष्टि खालीलप्रमाणे आहे -

अधःप्रवृत्तकरणाचा काळ एक अंतर्मुहूर्त आहे, आपण मानूया १६ समय आहे. त्रिकालवर्ती अनंत जीवांचे अधःकरण परिणाम असंख्यात लोकप्रमाण आहेत, आपण मानूया ३०७२ आहेत. पहिल्या समयात वेगवेगळ्या जीवांची विशुध्दि वेगवेगळी असते. सर्वात जघन्य विशुध्दिला आपण पहिल्या क्रमांकाचा परिणाम म्हणूया, त्यापेक्षा अधिक विशुध्द असा अन्य एक परिणाम दुसऱ्या क्रमांकाचा आहे. त्यापेक्षा अधिक विशुध्दिवाला तिसऱ्या क्रमांकाचा परिणाम आहे. अशाप्रकारे पहिल्या समयात संभवनीय असे सर्व परिणाम येथे अंकसंदृष्टिमध्ये १६२ होतात.

या परिणामांचे आपण चार खंड करूया - चार ग्रुप्स बनवूया. परंतु पहिल्या ग्रुपपेक्षा दुसऱ्या ग्रुपमध्ये १ परिणाम अधिक असेल (+१), दुसऱ्यापेक्षा तिसऱ्यामध्ये आणखी एक अधिक (+२), तसेच तिसऱ्यापेक्षा चौथ्यामध्ये आणखी एक अधिक (+३). या एकेकाने अधिक होण्यास समान चय म्हणतात किंवा समान वृध्दि म्हणतात. सर्व चय मिळून 'चयधन' होते जे येथे १+२+३= ६ आहे. १६२ संख्येचे चार खंड करण्यासाठी सर्वप्रथम त्यातून चयधन वजा करूया. १६२ - ६ = १५६. आता याचे चार समान खंड केल्यास १५६ ÷ ४ = ३९ होतील.

चय मिळविल्यास पहिल्या समयातील चार खंड याप्रकारे होतील -

३९, ४०, ४१, ४२ याचे तात्पर्य असे आहे की १ ते ३९ क्रमांकांच्या वेगवेगळ्या परिणामांचा एक खंड अथवा ग्रुप आहे. ४० ते ७९ क्रमांकांच्या वेगवेगळ्या परिणामांचा द्वितीय खंड आहे त्यामध्ये एकूण ४० परिणाम आहेत. तृतीय खंडामध्ये ८० ते १२० क्रमांकांचे एकूण ४१ परिणाम आहेत आणि चतुर्थ खंडामध्ये १२१ ते १६२ क्रमांकांचे एकूण ४२ परिणाम आहेत. अशाप्रकारे पहिल्या समयात एकूण १६२ परिणाम असू शकतात. त्यामध्ये हे चार खंड आहेत. पहिल्या क्रमांकाच्या परिणामास प्रथम समयाच्या प्रथम खंडातील जघन्य परिणाम म्हणतात आणि ३९ व्या परिणामास प्रथम समयाच्या प्रथम खंडातील उत्कृष्ट परिणाम म्हणतात आणि २ ऱ्यापासून ३८ व्या परिणामांना त्यातील

मध्यम परिणाम म्हणतात. प्रत्येक खंडाच्या जघन्य परिणामापेक्षा त्याच खंडाचा उत्कृष्ट परिणाम अनंत गुणा विशुध्द असतो.

त्याचप्रमाणे ४० वा परिणाम प्रथम समयाच्या द्वितीय खंडातील जघन्य परिणाम आहे, ७९ वा परिणाम प्रथम समयाच्या द्वितीय खंडातील उत्कृष्ट परिणाम आहे आणि ४१ व्यापासून ७८ व्या परिणामापर्यंतचे सर्व परिणाम मध्यम आहेत. याचप्रकारे तिसऱ्या व चौथ्या खंडातील परिणाम जाणावेत. १६२ वा परिणाम प्रथम समयातील चतुर्थ खंडाचा उत्कृष्ट परिणाम आहे किंवा पहिल्या समयाचा सर्वोत्कृष्ट परिणाम आहे.

हे लक्षात असू द्या की भिन्न भिन्न जीवांचे हे भिन्न भिन्न परिणाम आहेत. १ ल्या परिणामापेक्षा २ रा अधिक विशुध्द, त्यापेक्षा तिसरा अधिक विशुध्द आहे. १ल्या परिणामापेक्षा ३९ वा परिणाम अनंत गुणा विशुध्द आहे. येथे अंकसंदृष्टिमध्ये १ ते ३९ परिणाम अधिकाधिक विशुध्द आहेत असे म्हटले आहे. परंतु वास्तविक पहाता एकेका खंडामध्ये असंख्यात लोकप्रमाण परिणाम असतात आणि त्यांमध्ये षट्स्थानपतित वृध्दीची असंख्यात लोकप्रमाण स्थानं असतात. हा विषय लिहून समजावणे मोठे कठीण काम आहे. म्हणून त्याची चर्चा येथे करणार नाही. ज्ञानमार्गणा हा विषय समजावताना मी षट्स्थानपतित वृध्दीचा विषय विस्ताराने समजावला आहे. तुम्हाला जिज्ञासा असेल तर त्याच्या कॅसेट्स जरूर ऐका. याचप्रमाणे ३९ व्या परिणामापेक्षा ४० वा परिणाम अनंत गुणा विशुध्द आहे. याचा अर्थ असा आहे की पहिल्या खंडातील उत्कृष्ट परिणामापेक्षा दुसऱ्या खंडातील जघन्य परिणाम अनंत गुणा विशुध्द आहे.

ही पहिल्या समयाची गोष्ट झाली. आता प्रत्येक जीवाची दुसऱ्या समयामध्ये आपापल्या पूर्व परिणामांपेक्षा विशुध्दि अनंत गुणा वाढते, त्याचबरोबर सर्व परिणामांची संख्यादेखील वाढते. आपण मानूया की प्रत्येक खंडातील संख्येमध्ये एकाने वाढ होते अर्थात प्रत्येक समयामध्ये चार चार परिणामांची वृध्दि होते. पहिल्या समयात आपण १६२ परिणाम पाहिले होते, दुसऱ्या समयात विशुध्दि तर अनंत गुणा वाढते व परिणाम १६६ होतात.

प्रथम समयातील प्रथम खंडामध्ये १ ते ३९ परिणाम होते त्या प्रत्येकाची विशुध्दि अनंत गुणा वाढते व संख्येमध्येही वृध्दि होऊन आता त्यांची विशुध्दि आणि संख्या ४० ते ७९ या परिणामांसमान होते.

पहा, प्रथम समयाच्या द्वितीय खंडात जेवढी विशुध्दि आणि संख्या होती तेवढीच विशुध्दि आणि संख्या द्वितीय समयाच्या प्रथम खंडात होते.

त्याचप्रमाणे प्रथम समयाच्या द्वितीय खंडात जे ४० ते ७९ पर्यंत ४० परिणाम होते त्यांची विशुध्दि अनंत गुणा आणि संख्या एकाने वाढून ते परिणाम ८० ते १२० पर्यंत ४१ होतात.

प्रथम समयाच्या तृतीय खंडात जे ८० ते १२० पर्यंतचे ४१ परिणाम होते त्यांची विशुध्दि आणि संख्या वाढून द्वितीय समयाच्या तृतीय खंडात १२१ ते १६२ पर्यंत ४२ होतात.

प्रथम समयाच्या चतुर्थ खंडात जे १२१ ते १६२ पर्यंतचे ४२ परिणाम होते त्यांची विशुध्दि आणि संख्या वाढून द्वितीय समयाच्या चतुर्थ खंडात १६३ ते २०५ पर्यंत ४३ परिणाम होतात. अशाप्रकारे द्वितीय समयातील एकूण परिणाम ४०+४१+४२+४३ = १६६ होतात.

हे खालीलप्रमाणे लिहितात. प्रथम समय खाली लिहितात व द्वितीय समय त्याच्यावर लिहितात. म्हणून खालून वर वाचावे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ रा | १६६ | ४०<br>(४० ते ७९) | ४१<br>(८० ते १२०) | ४२<br>(१२१ ते १६२) | ४३<br>(१६३ ते २०५) |
| १ ला | १६२ | ३९<br>(१ ते ३९) | ४०<br>(४० ते ७९) | ४१<br>(८० ते १२०) | ४२<br>(१२१ ते १६२) |
| समय | एकूण परिणाम | प्रथम खंड | द्वितीय खंड | तृतीय खंड | चतुर्थ खंड |

तिसऱ्या समयामध्ये देखील परिणामांची विशुध्दि तर अनंतगुणा वाढते आणि संख्या समान वृध्दीने - समान चयसहित वाढते. चय म्हणजे Difference. पहिल्या समयात आपण १६२ परिणाम मानले होते, दुसऱ्या समयात ४ ने वृध्दि होऊन त्यांची संख्या १६६ होते, तिसऱ्या समयात अजून ४ ने वृध्दि होऊन त्यांची संख्या १७० होते. एकेका समयातील एकूण परिणामांच्या संख्येत ४ ने वृध्दि होते, तसेच प्रत्येक खंडाच्या परिणामांमध्ये १ ने वृध्दि होते. अधःकरणाचे आपण १६ समय मानले होते.

या १६ समयातील परिणाम व खंड पुढील कोष्टकाद्वारे पाहूया.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | २२२ | ५४ (६९१ ते ७४४) | ५५ (७४५ ते ७९९) | ५६ (८०० ते ८५५) | ५७ (८५६ ते ९१२) |
| १५ | २१८ | ५३ (६३८ ते ६९०) | ५४ | ५५ | ५६ |
| १४ | २१४ | ५२ (५८६ ते ६३७) | ५३ | ५४ | ५५ |
| १३ | २१० | ५१ (५३५ ते ५८५) | ५२ | ५३ | ५४ |
| १२ | २०६ | ५० (४८५ ते ५३४) | ५१ | ५२ | ५३ |
| ११ | २०२ | ४९ (४३६ ते ४८४) | ५० | ५१ | ५२ |
| १० | १९८ | ४८ (३८८ ते ४३५) | ४९ | ५० | ५१ |
| ९ | १९४ | ४७ (३४१ ते ३८७) | ४८ | ४९ | ५० |
| ८ | १९० | ४६ (२९५ ते ३४०) | ४७ | ४८ | ४९ |
| ७ | १८६ | ४५ (२५० ते २९४) | ४६ | ४७ | ४८ |
| ६ | १८२ | ४४ (२०६ ते २४९) | ४५ | ४६ | ४७ |
| ५ | १७८ | ४३ (१६३ ते २०५) | ४४ | ४५ | ४६ |
| ४ | १७४ | ४२ (१२१ ते १६२) | ४३ | ४४ | ४५ |
| ३ | १७० | ४१ (८० ते १२०) | ४२ | ४३ | ४४ |
| २ | १६६ | ४० (४० ते ७९) | ४१ | ४२ | ४३ |
| १ | १६२ | ३९ (१ ते ३९) | ४० (४० ते ७९) | ४१ (८० ते १२०) | ४२ (१२१ ते १६२) |
| समय | परिणाम | प्रथम खंड | द्वितीय खंड | तृतीय खंड | चतुर्थ खंड |

यातील प्रत्येक समयातील परिणामांची संख्या क्रमाने १६२, १६६, १७०, १७४, १७८, १८२, १८६, १९०, १९४, १९८, २०२, २०६, २१०, २१४, २१८ व २२२ होईल आणि या सर्वांची बेरीज केली असता अधःकरणाचे एकूण परिणाम ३०७२ होतील.

हे कोष्टक नीट पाहिले असता ही गोष्ट लक्षात येईल की १ ते ३९ हे ३९ परिणाम तर फक्त प्रथम समयातच आहेत. त्याचप्रमाणे १६ व्या समयातील चतुर्थ खंडाचे ५७ परिणाम अन्यत्र कोठेही नाहीत. ४० परिणाम पहिल्या व दुसऱ्या समयात समान आहेत. ४१ परिणाम पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या समयात समान आहेत. तसेच ४२ परिणाम पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या समयात समान आहेत. परिणामांची ही समानता चार समयापर्यंत आढळते. जसे, ४८ परिणाम ७ व्या, ८ व्या, ९ व्या, १० व्या समयात समान आहेत. जेवढ्या समयांपर्यंत परिणामांची सम्मानता आढळते तेवढ्या समयांना 'निर्वर्गणाकांडक' असे म्हणतात, जो येथे ४ आहे. आपण प्रत्येक समयाच्या परिणामांचे तेवढेच खंड करतो. एक एक समयातील परिणाम खंडांना 'वर्गणाकांडक' असे म्हणतात. समयाच्या समानतेला वर्गणा म्हणतात, त्याने रहित अशा वरच्या समयवर्ती खंडांचे कांडक ते निर्वर्गणाकांडक आहेत.

एका समयातील खंड आडव्या ओळीत लिहितात, त्या चार खंडांना 'तिर्यक् गच्छ' असे म्हणतात. अधःकरणाचे १६ समय एकावर एक लिहिले आहेत त्याला 'ऊर्ध्वगच्छ' असे म्हणतात. मूळग्रंथ वाचताना सोपे जावे म्हणून मी हे शब्द येथे लिहित आहे.

गेल्या नऊ वर्षांमध्ये आम्ही सम्यग्ज्ञानचंद्रिकेच्या सर्व भागांचा तसेच अर्थसंदृष्टि अधिकाराचा अनेक वेळा अभ्यास केला, हे ग्रंथ मी शिकविले देखील. परंतु माझ्या अल्पबुध्दिद्वारे त्यांचा अर्थ स्पष्ट होता होता बरेच कठिण गेले होते. ग्रंथ वाचताना अर्थ समजत नाही व कठिण वाटते या सबबीखाली तुम्ही ग्रंथांचे वाचन सोडून देऊ नये असे मला वाटते. म्हणूनच काही शब्द व त्यांचा अर्थ मी येथे मुद्दाम - जाणून बुजून लिहित आहे.

खालच्या व वरच्या समयातील विशुध्दि आणि संख्या यांमध्ये समानता असू शकते, यालाच 'अनुकृष्टि रचना' असे म्हणतात. हे ध्यानात ठेवा की ही समानता भिन्न भिन्न अर्थात नाना जीवांच्या अपेक्षेने सांगितली गेली आहे. एका जीवाच्या अपेक्षेने तर दर समयाला विशुध्दि अनंतगुणा वाढत जाते, तसेच एका जीवाचा एका समयात एकच परिणाम असतो.

अधःप्रवृत्तकरणात आपण चार आवश्यक पाहिले होते -

(१) दर समयाला अनंत गुणा विशुध्दि - जीवाची विशुध्दि पहिल्या समयापेक्षा दुसऱ्या समयामध्ये अनंत गुणा वाढते. तिसऱ्या समयात त्यापेक्षाही अनंतगुणा याप्रकारे अंतर्मुहूर्त काळापर्यंत विशुध्दि दर समयाला अनंत गुणा वाढत जाते.

(२) स्थितिबंधापसरण - याचे स्वरूप तर आपण प्रायोग्यलब्धिमध्ये पाहिले होते. परंतु येथे वेगळ्याच घटत्या प्रमाणात नवा स्थितिबंध होतो. हा स्थितिबंध घटत जातो व असे हजारो स्थितिबंधापसरण होतात. स्थितिबंधामध्ये प्रत्येक वेळी पल्याच्या संख्यातव्या भागाएवढी घट होते. याकारणाने अधःकरणाच्या सुरुवातीला जेवढा स्थितिबंध होत होता त्याच्या संख्यातव्या भागाएवढा स्थितिबंध त्याच्या शेवटी होऊ लागतो.

जो जीव प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करून पहिल्या गुणस्थानातून पाचव्या गुणस्थानात जातो त्याचा याच्याही संख्यातव्या भागाएवढा स्थितिबंध उरतो. जो जीव पहिल्या गुणस्थानातून सातव्या गुणस्थानात जातो त्याचा स्थितिबंध त्याच्याही संख्यातव्या भागाएवढा उरतो.

(३) प्रशस्त प्रकृतिंमध्ये अनंत गुणा वाढता असा चतुःस्थानगत अनुभागबंध होतो. स्थितिबंध तर सातही प्रकृतिंमध्ये घटतो परंतु अनुभागबंध प्रशस्त प्रकृतिंमध्ये वाढतो तर अप्रशस्त प्रकृतिंमध्ये घटतो. प्रशस्त प्रकृतींचे अनुभागाच्या अपेक्षेने चार प्रकार सांगितले होते, आठवतंय ना? गुड, खांड, शर्करा व अमृत नावाचे स्पर्धक आहेत. अधःप्रवृत्तकरणाच्या वाढत्या विशुध्दिमुळे येथे प्रशस्त प्रकृतींचा अनुभाग दर समयाला अनंत गुणा वाढता असा बांधला जातो, ज्यामध्ये हे चारही प्रकारचे स्पर्धक असतात.

(४) अप्रशस्त प्रकृतिंमध्ये अनंत गुणा घटता असा अनुभागबंध होतो, तोही द्विस्थानगत होतो. लता व दारुभागरूप आणि निंब व कांजीरभागरूप होतो.

अधःप्रवृत्तकरणानंतर अपूर्वकरण परिणाम होतात. त्याची चर्चा आपण आगामी पत्राद्वारे करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# करणलब्धि - अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण

पत्रांक १० २४ ऑक्टो. २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

पूर्व पत्रासंबंधीची तुम्हा दोघींची प्रतिक्रिया वाचून मला समाधान वाटले. तुम्ही लिहिले आहे की, 'अधःप्रवृत्तकरणाच्या वाढत्या विशुध्दिप्रमाणे आमची जिज्ञासाही उत्तरोत्तर वाढत आहे. आता अपूर्वकरणासंबंधी अपूर्व गोष्टी जाणण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.'

हे योग्यच आहे. आत्मार्थी जीवांना चारही अनुयोगांच्या अभ्यासाची रुचि असते. करणानुयोगासंबंधी अरुचि ही जिनवाणी प्रति अरुचिभाव दर्शविते. या 'पंचलब्धि' विषयावर मी आतापर्यंत चार वेळा शिबिरात शिकविले आहे - दोन वेळा जयपूर शिबिरात व दोन वेळा देवळालीमध्ये. ब्र. पं. यशपालजी जैन व शिबिरांचे अन्य निर्देशक व आयोजक यांच्या प्रेरणेने तसेच लोकांच्या करणानुयोग शिकण्याविषयीच्या तीव्र भावनेनेच मी हे साहस करण्यास तयार झाले होते.

अनेक लोकांच्या मनात प्रश्न उद्‌भवतो की 'करणानुयोगाच्या एवढ्या साऱ्या सूक्ष्म गोष्टी न जाणतादेखील सम्यक्त्व होऊ शकते तर मग यामध्ये का उगीच गुंतायचे? फक्त द्रव्यानुयोगाचा अभ्यास करून आम्ही सम्यक्त्व प्राप्त करून घेऊ.'

सम्यक्त्व प्राप्त करणे हे तर आपले आद्य कर्तव्य आहे. द्रव्यानुयोग तर कार्यकारी आहेच, परंतु करणानुयोगातील सूक्ष्म वर्णनाने द्रव्यानुयोगातील सिध्दांतांना पुष्टि मिळते, आपल्या ज्ञानात व श्रध्दानात दृढता येते, आपल्याला मोक्षमार्गाची व मोक्षाची रुचि असेल तर त्यांच्या संबंधी सर्वांगीण माहिती करून घेण्यामध्येदेखील तेवढीच रुचि सहज उत्पन्न होते.

पूर्वी पाहिले होते की ज्याला क्रिकेटमध्ये रुचि आहे त्याला फक्त कोण जिंकले हे जाणून समाधान होत नाही, त्याला तर संपूर्ण मॅच पहाण्यात रस असतो - त्यामध्ये त्याला रुचि असते. त्यावेळी त्याच्या मनात हा प्रश्न उठत

नाही की, 'आख्खा दिवस वाया घालविण्याची काय आवश्यकता आहे? मी मॅच पाहिली नाही तरी जय-पराजय जो होणार आहे तो होईलच.' फक्त करणानुयोग शिकण्याविषयी त्याला हा प्रश्न पडतो यावरून त्याची रुचि अजून अन्यत्र आहे असे समजावे.

आज आपण अपूर्वकरणासंबंधी चर्चा करणार आहोत.

येथे देखील परिणामांची विशुध्दि दर समयाला अनंत गुणा वाढतच जाते, त्या कारणाने अपूर्व - अपूर्व परिणाम होतात. खालच्या व वरच्या समयातील कोणत्याही जीवांचे परिणाम कधीही समान असू शकत नाहीत अर्थात येथे अनुकृष्टि रचना होत नाही. भिन्न समयवर्ती अनेक जीवांचे परिणाम भिन्नच असतात, एकसमान नसतात. परंतु एकाच समयवर्ती जीवांचे परिणाम समान अर्थात सदृशही असू शकतात किंवा असमान अर्थात असदृशही असू शकतात.

एकाच समयात त्रिकालवर्ती अनंत जीवांच्या अपेक्षेने जघन्यापासून उत्कृष्टापर्यंत अनेक प्रकारची विशुध्दि संभवते. अधःप्रवृत्तकरणाच्या अंतिम समयामध्ये जेवढे भिन्न भिन्न प्रकारचे परिणाम होते त्यामधील एकेका परिणामापासून असंख्यात लोकप्रमाण भेदांची उत्पत्ति होते.

यामुळे अधःप्रवृत्तकरणात असंख्यात लोकप्रमाण ≡∂ परिणाम असतात, तर अपूर्वकरणातील सर्व परिणाम असंख्यात लोक × असंख्यात लोक असतात. अर्थात ≡∂ ≡∂ असतात.

प्रथम समयात परिणामांचे जघन्यापासून उत्कृष्टापर्यंत अनेक भेद आढळतात, त्यामध्ये जघन्य विशुध्दिपेक्षा उत्कृष्ट विशुध्दि अनंत गुणा असते. प्रथम समयातील परिणामांची ही विशिष्ट Range अथवा मर्यादा म्हणता येईल. परंतु द्वितीय समयातील परिणामांची जघन्य विशुध्दि देखील प्रथम समयाच्या उत्कृष्ट विशुध्दिपेक्षा अनंत गुणा असते. त्यापेक्षा अनंत गुणा द्वितीय समयातील विशुध्दि असते. द्वितीय समयातील परिणामांची स्वतःची विशिष्ट Range मर्यादा असते. द्वितीय समयातील परिणाम प्रथम समयातील कोणत्याही परिणामाशी जुळत नाहीत, त्यांच्यासमान नसतात, अपूर्व अपूर्वच होतात. अशाप्रकारे दर समयातील परिणामांची विशुध्दि अनंत गुणा - अनंत गुणा होत जाते.

ही तर विशुध्दिची गोष्ट झाली. दर समयातील परिणामांच्या संख्येचा विचार केल्यास प्रथम समयातील परिणामांच्या संख्येमध्ये एक 'चय' प्रमाण संख्या वाढून द्वितीय समयातील परिणामांची संख्या येते. त्यामध्ये आणखी एक चय वाढविला असता तृतीय समयातील परिणामांची संख्या येते. याचप्रमाणे दर समयाला एक एक चय वाढत जातो. याला आपण अंकसंदृष्टीच्या द्वारे समजूया अर्थात काल्पनिक संख्यांद्वारे समजूया.

समजा, प्रथम समयात ४५६ परिणाम होतात अर्थात जघन्य विशुध्दिवाला १ ला परिणाम व उत्कृष्ट विशुध्दिवाला ४५६ वा परिणाम आहे. त्या दोन्हींच्या मधले मध्यम परिणाम आहेत.

द्वितीय समयात परिणामांची विशुध्दि तर पूर्व परिणामांपेक्षा अनंत गुणा होते परंतु परिणामांची संख्या १६ ने वाढून तेथे एकूण ४७२ परिणाम होतात. याचे तात्पर्य असे आहे की प्रथम समयात १ ते ४५६ परिणाम आहेत तर द्वितीय समयात ४५७ ते ९२८ पर्यंत एकूण ४७२ परिणाम आहेत. प्रथम समयातील ४५६ वा परिणाम उत्कृष्ट आहे त्यापेक्षाही द्वितीय समयातील ४५७ वा जघन्य परिणाम अनंत गुणा विशुध्द आहे. ४५७ व्या पेक्षा द्वितीय समयातील ९२८ वा उत्कृष्ट परिणाम अनंत गुणा विशुध्द आहे.

आपण अध:प्रवृत्तकरणामध्ये पाहिले होते की प्रथम समयात १६२ परिणाम होते व द्वितीय समयात १६६ परिणाम होते, परंतु तेथे अनेक परिणाम दोन्ही समयांमध्ये समान होते. ४० व्या परिणामापासून १६२ व्या परिणामापर्यंतचे परिणाम दोन्हींमध्ये समान होते. त्याप्रकारची समानता येथे अपूर्वकरणामध्ये आढळत नाही.


१ ते ४५६ पर्यंतचा कोणताच परिणाम द्वितीय समयात आढळत नाही. द्वितीय समयातील सर्व परिणाम अपूर्वच असतात. पूर्व समयात कोणत्याही जीवामध्ये आढळत नाहीत.

द्वितीय समयातील ४५७ ते ९२८ पर्यंतच्या ४७२ परिणामांमध्ये चय १६ ने वाढ होऊन तृतीय समयात ४८८ परिणाम होतात - ते ९२९ पासून १४१६ पर्यंत असतात.

हे देखील आपण कोष्टकाद्वारे समजूया. आपण पूर्वी पाहिले होते की अपूर्वकरणाचा काळ एक अंतर्मुहूर्त असतो परंतु तो अधःप्रवृत्तकरणाच्या अंतर्मुहूर्त काळाच्या संख्यातव्या भागाएवढा असतो. आपण मानूया की त्याच्या अर्धा म्हणजे ८ समयाचा आहे. तसेच अपूर्वकरणाचे सर्व परिणाम ४०९६ आहेत. प्रत्येक समयात जघन्यापासून उत्कृष्टापर्यंत किती परिणाम असतात ते खालील कोष्टकाद्वारे समजूया.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | ५६८ | ३५२९ | ते | ४०९६ |
| ७ | ५५२ | २९७७ | ते | ३५२८ |
| ६ | ५३६ | २४४१ | ते | २९७६ |
| ५ | ५२० | १९२१ | ते | २४४० |
| ४ | ५०४ | १४१७ | ते | १९२० |
| ३ | ४८८ | ९२९ | ते | १४१६ |
| २ | ४७२ | ४५७ | ते | ९२८ |
| १ | ४५६ | १ | ते | ४५६ |
| समय | एकूण परिणाम | जघन्य परिणाम | | उत्कृष्ट परिणाम |

प्रत्येक समयातील विशुध्दि खालीलप्रमाणे आहे -




वर दाखविल्याप्रमाणे विशिष्ट समयातील जघन्य विशुध्दिपेक्षा त्याच समयातील उत्कृष्ट विशुध्दि अनंत गुणा असते आणि त्या उत्कृष्ट विशुध्दिपेक्षा

नंतरच्या समयातील जघन्य विशुध्दि अनंत गुणा असते. याला 'सर्पाची चाल' असे म्हणतात.


आता येथे जे चार आवश्यक होतात, त्यांचे स्वरूप पाहूया. ही गोष्ट लक्षात असू द्या की अधःप्रवृत्तकरणात सांगितलेले चार आवश्यक तर येथेही होतात, त्याचबरोबर आणखी चार गोष्टी होतात, त्यांची चर्चा करूया. त्यांची नावे आपण पूर्वी पाहिली होती - गुणश्रेणी, गुणसंक्रमण, स्थितिकांडकघात (स्थितिखंडन) व अनुभागकांडकघात (अनुभागखंडन). अधःप्रवृत्तकरणाप्रमाणे स्थितिबंधापसरण तर होतच रहाते.

**(१) गुणश्रेणी** - श्रेणी अर्थात पंक्ति - ओळी, निषेकांच्या पंक्ति. कर्मांची निषेक रचना दाखविताना आपण आकृतिद्वारे एकेका समयात एकेक निषेक दाखविला होता. वर्तमान समयाचा निषेक सर्वात खाली आडव्या रेषेद्वारे दाखविला जातो. त्याच्यावर द्वितीयादि एकेक समयाचा निषेक एकेका आडव्या रेषेद्वारे दाखविला जातो.

त्यामध्ये वर्तमान समयापासून एक आवली काळापर्यंतच्या निषेकांना 'उदयावली' म्हणतात. वरच्या निषेकांना 'उपरितन स्थिति' म्हणतात. परिणामांच्या विशुध्दीच्या निमित्ताने सत्तेमधील कर्मांचे अपकर्षण होते अर्थात त्यांची स्थिति कमी होते. वरच्या निषेकातील परमाणुंची स्थिति कमी झाल्याने ते खालच्या निषेकांमध्ये येऊन मिसळतात. येथे वर खाली जे म्हटले जाते ते समजण्यासाठी सांगितले जाते. कर्म काही रांगा लाऊन उभे नाहीत.

अपकर्षित केलेले परमाणु ज्या विवक्षित, पंक्तिबध्द निषेकांमध्ये गुणित प्रमाणात दिले जातात तेवढ्या निषेकांची 'गुणश्रेणी रचना' होते. एका समयात जेवढे परमाणु गुणश्रेणीत दिले जातात त्यांची विभागणी - वाटप कशाप्रकारे होते ते पाहू. सर्वात खालच्या निषेकामध्ये जेवढे परमाणु (द्रव्य) दिले जातात, त्याच्या पेक्षा असंख्यात गुणा परमाणु दुसऱ्या निषेकात दिले जातात, त्याहीपेक्षा असंख्यात गुणा परमाणु तिसऱ्या निषेकात याप्रमाणे गुणश्रेणीच्या असंख्यात निषेकांमध्ये असंख्यात गुणा क्रमाने दिले जातात.


पूर्वीच्या निषेकांमध्ये तर कर्म परमाणु होतेच, आता त्यामध्ये एवढे सारे परमाणु येऊन मिळतात जे त्यांच्या बरोबर उदयाला येतील. समजा, एका समयात ८५ परमाणुंचे अपकर्षण होऊन गुणश्रेणीमध्ये दिले गेले. येथे आपण गुणश्रेणी ४ समयांची मानूया, तसेच असंख्यातचे प्रमाणसुध्दा ४ मानूया. पहिल्या निषेकात १ परमाणु, दुसऱ्यात ४, तिसऱ्यात १६ व चौथ्यामध्ये ६४ परमाणु दिले गेले. ही तर प्रथम समयाची गोष्ट झाली. द्वितीय समयात त्याहीपेक्षा असंख्यात गुणा परमाणु अपकर्षित होतात. म्हणून ८५ × ४ = ३४० परमाणु गुणश्रेणीमध्ये दिले जातील, तेही त्याच पध्दतीने असंख्यात गुणा क्रमाने दिले जातील. पहिल्या निषेकात ४, दुसऱ्यात १६, तिसऱ्यात ६४ व चौथ्यात २५६.




याचप्रकारे दर समयाला परमाणु अपकर्षित होतात आणि गुणश्रेणीमध्ये दिले जातात. जेव्हा ते निषेक उदयाला येतील तेव्हा असंख्यात गुणा समयप्रबध्द उदयाला येतील, त्यास 'गुणश्रेणी निर्जरा' म्हणतात.

आयुकर्म सोडून इतर सात कर्मांमध्ये ही गुणश्रेणी रचना होते. येथे जी गुणश्रेणी रचना होते ती उदयावलीच्या निषेकांना सोडून त्यावरच्या निषेकांमध्ये होते. तुम्ही विचाराल, 'किती निषेकांमध्ये अर्थात किती समयांच्या निषेकांमध्ये ही गुणश्रेणी होते?' त्याचे उत्तर असे आहे की गुणश्रेणीचा आयाम-लांबी अर्थात निषेकांची संख्या समयांमध्ये सांगितली जाते. अपूर्वकरण व अनिवृत्तिकरण या दोन्हींचा मिळून जो अंतर्मुहूर्त काळ आहे त्यापेक्षा गुणश्रेणीचा आयाम थोडा अधिक आहे अर्थात त्यामध्ये जेवढे समय आहेत तेवढ्या समयांमध्ये म्हणजेच तेवढ्या निषेकांमध्ये ही गुणश्रेणी रचना होते. 'थोडा अधिक' असे म्हटले त्याचे जे प्रमाण आहे त्यास 'गुणश्रेणी शीर्ष' म्हणतात.

अपकर्षण केलेले द्रव्य गुणश्रेणीच्या वरच्या इतर निषेकांमध्येदेखील दिले जाते, त्या निषेकांना 'उपरितन स्थिति' म्हणतात. परंतु येथे घटत्या प्रमाणात दिले जाते. याला आकृतिद्वारे समजूया.




प्रत्येक समयात किती परमाणु अपकर्षित होऊन खाली येतात त्याचेदेखील गणित आहे. येथे मी लिहित आहे, समजले तर ठीकच आहे, नाही समजले तरी चिंता करण्याचे कारण नाही, प्रत्यक्ष भेटल्यावर समजावून सांगेन.

सर्व निषेकांतील एकूण परमाणुंच्या संख्येस विशिष्ट संख्येने भाग दिला जातो त्यास 'अपकर्षण भागहार' म्हणतात. भागहार म्हणजे भाजक. भाग दिल्यावर जी संख्या येते तेवढ्या परमाणुंचे अपकर्षण होऊन ते परमाणु उदयावलीमध्ये, गुणश्रेणीमध्ये व उपरितन स्थितिमध्ये दिले जातात. कोठे किती दिले जातात तेही पाहूया.

वरील संख्येस पल्याच्या असंख्यातव्या भागाने भाग देऊन त्यातील बहुभाग उपरितन स्थितिमध्ये दिला जातो, परंतु तेथे अंतःकोडाकोडी सागर प्रमाण निषेक असल्याने एकेका निषेकात फारच थोडे द्रव्य दिले जाते. यातील सर्वात वरच्या एक आवलीप्रमाण निषेकांमध्ये अपकर्षित द्रव्य दिले जात नाही त्यास 'अतिस्थापनावली' म्हणतात.

गुणश्रेणी व उदयावली यांना मिळून एकभाग दिला जातो. त्याला असंख्यात लोक या संख्येने भाग देऊन बहुभाग गुणश्रेणीमध्ये दिला जातो जो असंख्यात गुणा क्रमाने दिला जातो व एकभाग उदयावलीमध्ये दिला जातो.

दर समयाला याप्रकारे अपकर्षण होत रहाते. गुणश्रेणीमध्ये दर समयाला असंख्यात गुणा द्रव्य दिले जाते. हे गुणश्रेणी विधान सातही कर्मांमध्ये होते. आयुकर्माचा तर एका समयात एकच निषेक खिरतो, त्यात गुणश्रेणी विधान होत नाही.

अपकर्षणाद्वारे स्थिति घटते त्याचबरोबर अप्रशस्त कर्मांचा अनुभाग दर समयाला अनंत गुणा घटत घटत उदयाला येतो. गुणश्रेणीचे हे निषेक जेव्हा उदयावलीमध्ये येऊन उदयरूप होतील तेव्हा दर समयाला असंख्यात समयप्रबध्द एवढी निर्जरा होईल, असंख्यात गुणा निर्जरा होईल. याला गुणश्रेणी निर्जरा म्हणतात. म्हणूनच छहढालेमध्ये म्हटले आहे -

**' कोटि जन्म तप तपैं, ज्ञान बिन कर्म झरैं जे ।**
**ज्ञानी के छिनमाँहि त्रिगुप्ति तैं सहज टरैं ते ।।'**

ज्ञानीची एका समयात जेवढी निर्जरा होते तेवढी निर्जरा अज्ञानीची करोडो भवांमध्ये तप करण्यानेदेखील होत नाही. कारण केवळ शुभभाव करण्याने अर्थात शुध्दोपयोगरहित व्रत तप करण्याने गुणश्रेणी निर्जरा होत नाही, तेथे तर फक्त एक समयप्रबध्द इतकीच निर्जरा होते, जिला स्थिति पूर्ण झाल्यावर होणारी 'सविपाक निर्जरा' असे म्हणतात. एवढेच काय, तेथे नवा बंधही होतच असतो. अज्ञानीला संवर नसतो.

ज्ञानी जीवांना काही प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति झाल्याने संवर असतो आणि पूर्वबध्द कर्म अधिक प्रमाणात खिरण्याने निर्जरा असते.

तुम्ही म्हणाल, 'अजून तर अपूर्वकरणाची गोष्ट चालली आहे, अजून तर सम्यक्त्वाची प्राप्ति झालेली नाही, त्यापूर्वीच गुणश्रेणी निर्जरा कशी असेल?'

त्याचे समाधान असे आहे की करण परिणामामध्ये ज्ञानोपयोग निजशुध्दात्म्याच्या सन्मुखच असतो, परंतु परिणतिमध्ये अजून मिथ्यात्व असते, कारण अनिवृत्तिकरणाच्या अंतिम समयापर्यंत मिथ्यात्वाचा उदय असतो. अत्यंत मंद होत होत अर्थात अनुभाग दर समयाला अनंत गुणा हीन होऊन मिथ्यात्व उदयाला येते. शिवाय या जीवांना या करणपरिणामांच्या अनंतर समयात (लगेचच नंतरच्या समयात) नियमाने सम्यक्त्वाची प्राप्ति होतेच. म्हणून शुध्दोपयोगाच्या फलस्वरूप येथे गुणश्रेणी निर्जरा होते.

एखाद्याला प्रश्न पडणे स्वाभाविक आहे की गुणश्रेणीद्वारे तर असंख्यात गुणा परमाणु उदयाला येतात, तर मग मिथ्यात्वाच्या अधिक परमाणुंचा उदय झाल्याने मिथ्यात्व वाढत असेल.

तसे नाही. परमाणुंच्या संख्येवर त्या कर्माचे फळ अवलंबून नाही परंतु त्याच्या अनुभागउदयाचेच फळ मिळत असते अर्थात त्यांचा जीवाच्या परिणामांशी निमित्तपणा बनतो. येथे परमाणुंची संख्या म्हणजे प्रदेशउदय वाढला तरीदेखील अनुभागउदय अत्यंत मंद झाल्याने जीवाचा मिथ्यात्व परिणामदेखील मंद - मंदतर होत जातो. अन्य अप्रशस्त कर्मांमध्ये देखील गुणश्रेणी द्वारे असेच घडते.

आता आपला विषय दर्शनमोहनीय कर्माची उपशमना करणाऱ्या जीवांबद्दल चालला आहे. दर्शनमोहनीय कर्माची क्षपणा करणाऱ्या तसेच श्रेणी चढणाऱ्या जीवांनादेखील करणपरिणाम असतात. तेथे होणारी गुणश्रेणी निर्जरा येथे होणाऱ्या गुणश्रेणी निर्जरेपेक्षा असंख्यात गुणा असते अर्थात वरच्या गुणस्थानांमध्ये निर्जरा होणाऱ्या परमाणुंची संख्या असंख्यात गुणा असते. आता गुणसंक्रमणाचे स्वरूप पाहूया. येथे होणाऱ्या अपूर्वकरणामध्ये गुणसंक्रमण होत नाही, उपशम सम्यक्त्वाच्या काळात होते. परंतु श्रेणी चढतेवेळी आदि अन्यत्र अपूर्वकरणामध्ये गुणसंक्रमण होत असते म्हणून त्याचे स्वरूप आपण आताच पाहूया.

**गुणसंक्रमण** - याची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे -

'ज्या अप्रशस्त प्रकृतींचा बंध होत नाही त्या प्रकृतींचे जे द्रव्य (परमाणु) आहे, ते दर समयाला असंख्यात गुणा क्रमाने, ज्यांचा बंध होत आहे अशा स्वजातीय प्रकृतिंमध्ये संक्रमित होते, आपले स्वरूप सोडून त्या अन्य प्रकृतिरूप परिणमते. या विधानाला गुणसंक्रमण असे म्हणतात.'

अशाप्रकारे दर समयाला असंख्यात गुणा क्रमाने सजातीय अन्य प्रकृतिरूप संक्रमित होणे यास गुणसंक्रमण म्हणतात. या प्रकारचे गुणसंक्रमण श्रेणी चढताना अपूर्वकरण आणि अनिवृत्तिकरण गुणस्थानांमध्ये होते. त्यावेळी तेथे असातावेदनीय प्रकृतीचे सातावेदनीयरूप संक्रमण होते.

त्याचप्रमाणे अनंतानुबंधीचे विसंयोजन होताना अनंतानुबंधीचे सर्व परमाणु गुणसंक्रमण विधानाद्वारे अप्रत्याख्यानावरण, प्रत्याख्यानावरण आणि संज्वलन प्रकृतिरूप परिणमित होतात. तेथे देखील करण परिणामांद्वारे हे गुणसंक्रमण होते.

ज्यावेळी जीव क्षयोपशम सम्यक्त्वातून क्षायिक सम्यक्त्व प्रकट करतो तेव्हा पहिल्या तीन करणांद्वारे अनंतानुबंधीचे विसंयोजन करतो, त्या कारणाने सत्तेमध्ये असलेले अनंतानुबंधीचे सर्व परमाणु अन्य तीन कषायकर्मरूप होतात. त्याच्या पश्चात एक अंतर्मुहूर्तानंतर जीव पुन्हा तीन करण परिणाम मांडतो. त्या कारणाने प्रथम मिथ्यात्वाचे आणि नंतर पुन्हा आणखी तीन करण परिणामांद्वारे सम्यग्मिथ्यात्वाचे सर्व परमाणु सम्यक् प्रकृतिरूप संक्रमित होऊन त्या दोन प्रकृतींचा सत्तेमधून पूर्ण क्षय होतो. तेथेदेखील गुणसंक्रमणाद्वारेच हे कार्य निष्पन्न होते.

पहा हं, येथे संक्रमण न म्हणता गुणसंक्रमण म्हटले आहे. फक्त संक्रमण तर क्षयोपशम सम्यक्त्वाच्या काळात देखील होत असते. तेथेदेखील मिथ्यात्व आणि सम्यग्मिथ्यात्वाचे परमाणु सम्यक् प्रकृतिरूप होऊन त्यारूपाने उदयाला येत रहातात. परंतु तेथे संक्रमित होणाऱ्या परमाणुंची संख्या अल्प असते.

प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या काळामध्ये प्रारंभी विशुध्दीची अनंत गुणा वृध्दि होते. त्याच्या नंतर विशुध्दीच्या मंदतेमुळे अल्प परमाणु संक्रमित होतात. त्यास 'विध्यात संक्रमण' म्हणतात. क्षयोपशम सम्यक्त्वात विध्यात संक्रमण होत असते.

एका समयात किती परमाणु संक्रमित होतात त्याची संख्या काढण्यासाठी सर्व परमाणुंच्या संख्येस विशिष्ट संख्येने भाग दिला जातो. जेव्हा 'गुणसंक्रमण भागहार' या संख्येने भाग देऊन जी संख्या येते तेवढे परमाणु संक्रमित होतात, तेव्हा त्यास गुणसंक्रमण म्हणतात.

जेव्हा 'विध्यात संक्रमण भागहार' या संख्येने भाग देऊन जी संख्या येते तेवढे परमाणु संक्रमित होतात, तेव्हा त्यास विध्यात संक्रमण म्हणतात. अशाच प्रकारे अन्य अन्य भागहाराच्या कारणाने अन्य अन्य पाच प्रकारचे संक्रमण संभवतात परंतु तो विषय येथे अपेक्षित नाही. कर्मकांडाच्या 'पंचभागहार चूलिका' या प्रकरणात त्याचे विस्तृत वर्णन आहे.

अशाप्रकारे गुणसंक्रमणामध्ये असंख्यात गुणा असंख्यात गुणा परमाणु संक्रमित होतात.

अपूर्वकरणाच्या चार आवश्यकांमध्ये स्थितिकांडकघात व अनुभागकांडकघात देखील होत असतात.

**स्थितिकांडकघात** - सत्तेमध्ये असलेल्या कर्मांची स्थिति अर्थात स्थितिसत्त्व कांडकरूपाने हीन होणे - कमी होणे यास स्थितिकांडकघात म्हणतात. कांडक म्हणजे तुकडा - अनेक निषेकांच्या समूहाला येथे कांडक म्हटले आहे. एका कांडकामध्ये अनेक समयांचे जे निषेक आहेत त्या सर्वांचा अभाव होऊन त्यांचे सर्व परमाणु एक अंतर्मुहूर्त काळामध्ये खालच्या निषेकांमध्ये येऊन मिसळतात. प्रायोग्यलब्धिच्या प्रकरणामध्ये आपण याचे स्वरूप पाहिले होते. परंतु प्रायोग्यलब्धिमध्ये स्थितिकांडकघात झाला तरी सम्यक्त्व होईलच असा नियम नाही.

आपण पाहिले होते की अधःप्रवृत्तकरणाच्या पहिल्या समयापासूनच स्थितिबंधापसरण होत रहाते, ज्या कारणाने नवा होणारा बंध कमी स्थितिवाला होत जातो व तोदेखील दर अंतर्मुहूर्ताला घटत जातो. अपूर्वकरणामध्ये स्थितिबंधापसरण तर होतच रहाते त्याचबरोबर हजारो स्थितिकांडकघातांद्वारे स्थितिसत्त्व घटत जाते.

स्थितिबंध म्हणजे बांधल्या जाणाऱ्या कर्मांची स्थिति आणि स्थितिसत्त्व म्हणजे सत्तेमध्ये असलेल्या कर्मांची स्थिति. येथे संख्यात हजार स्थितिकांडकघात होतात.

कांडकाचे प्रमाण छोटे अर्थात जघन्य, मोठे अर्थात उत्कृष्ट तसेच मध्यम असू शकते. हे प्रमाण स्थितिसत्त्वाच्या अनुसार असते. वेगवेगळ्या जीवांचे स्थितिसत्त्वाचे प्रमाण वेगवेगळे असते. कोणाचे जघन्य स्थितिसत्त्व अंतःकोडाकोडी पल्य असते तर कोणाचे उत्कृष्ट स्थितिसत्त्व अंतःकोडाकोडी सागर असते. मध्यम भेद असंख्यात आहेत. म्हणून स्थितिअनुसार कांडकाचे प्रमाणदेखील जघन्य, मध्यम किंवा उत्कृष्ट असते.

जेवढ्या निषेकांचा अभाव होतो त्याला कांडक म्हणतात व तेवढ्या समयांना 'कांडकआयाम' म्हणजे कांडकाची लांबी असे म्हणतात. जघन्य

स्थितिकांडकआयाम पल्याच्या संख्यातव्या भागप्रमाण असतो, तर उत्कृष्ट स्थितिकांडकआयाम पृथक्त्व सागर अर्थात ७ सागर ते ८ सागर एवढा असतो. एक स्थितिकांडकघात झाल्यावर एवढी स्थिति घटते.

एक वेळा स्थितिकांडकघात होतो त्याला एक अंतर्मुहूर्त काळ लागतो कारण प्रत्येक समयात काही परमाणु अपकर्षित होऊन खालच्या निषेकांमध्ये येऊन मिसळतात आणि एक अंतर्मुहूर्तात कांडकाच्या सर्व निषेकांचे सर्व परमाणु खाली येऊन त्या निषेकांचा अभाव होतो. या कालावधीस 'स्थितिकांडकोत्करण काल' असे म्हणतात.

येथे एक गोष्ट नीट लक्षात घ्या की हे सारे परमाणु सत्तेतच रहातात, वरच्या निषेकांमधून खालच्या निषेकांमध्ये येतात. खालच्या निषेकांमधील परमाणुंची संख्या वाढत जाते.

पूर्वी आपण पाहिले होते की स्थितिकांडकघाताबरोबर येथे स्थितिबंधापसरण व अनुभागबंधापसरण होत असतात. स्थितिबंध घटतो त्यावेळी एक अंतर्मुहूर्त काळापर्यंत तेवढाच समान स्थितिबंध होत रहातो, या अंतर्मुहूर्त काळास 'स्थितिबंधापसरण काल' असे म्हणतात.

स्थितिकांडकोत्करण काल व स्थितिबंधापसरण काल हे दोन्ही समान अंतर्मुहूर्त आहेत, परंतु अनुभागकांडकोत्करण काल अल्प आहे. एका स्थितिकांडकघाताच्या काळामध्ये संख्यात हजार वेळा अनुभागकांडकघात होतात. त्याचे स्वरूप आता पाहूया.

**अनुभागकांडकघात** - एक एक अंतर्मुहूर्त काळात एक एक अनुभागकांडकघात होतो, त्या अंतर्मुहूर्त काळास 'अनुभागकांडकोत्करण काल' असे म्हणतात. अनुभागकांडकघाताद्वारे अप्रशस्त प्रकृतींचे अनुभागसत्त्व घटते.

आपण पूर्वी स्पर्धकांचे स्वरूप पाहिले होते. एकेका प्रकृतिमध्ये अनंत अनंत स्पर्धक असतात. अप्रशस्त प्रकृतींच्या अनंत स्पर्धकांना अनंताने भाग दिला असता त्यातील बहुभाग स्पर्धकांचा अनुभाग घटून उरलेल्या एकभागरूप

स्पर्धकांसमान होतो. याप्रकारे अनंतबहुभाग स्पर्धकांचा एका कांडकाद्वारे घात होतो, त्यास एक अनुभागकांडकघात म्हणतात.

उरलेल्या स्पर्धकातील अनंत बहुभागाचा दुसऱ्या अनुभागकांडकघाताद्वारे नाश होऊन अनुभाग घटतो. याप्रमाणे एकेका अनुभागकांडकघाताद्वारे अप्रशस्त प्रकृतींचा अनुभाग अनंतवा भाग अनंतवा भाग होत जातो.

असे अनुभागकांडकघात संख्यात हजार वेळा होतात तेवढ्या काळात स्थितिकांडकघात एक वेळा होतो आणि अपूर्वकरणामध्ये व अनिवृत्तिकरणामध्ये असे स्थितिकांडकघात संख्यात हजार वेळा होतात.

अनुभागकांडकघाताच्या बाबतीत एक गोष्ट ध्यानात घ्या की सातावेदनीय आदि प्रशस्त प्रकृतींचा अनुभागकांडकघात होत नाही. याउलट दर समयाला त्यांचा अनुभाग अनंत गुणा वाढत जातो. स्थितिकांडकघाताद्वारे तर प्रशस्त व अप्रशस्त दोन्ही प्रकारच्या प्रकृतींची स्थिति घटते.

अशाप्रकारे अपूर्वकरणाच्या प्रथम समयात प्रशस्त व अप्रशस्त प्रकृतींचे जे अनुभागसत्त्व होते त्यापेक्षा त्याच्या अंतिम समयात प्रशस्त प्रकृतींचे अनुभागसत्त्व अनंत गुणा वाढलेले व अप्रशस्त प्रकृतींचे अनुभागसत्त्व अनंत गुणा हीन झालेले आढळते.

याप्रमाणे अपूर्वकरणाचा एक अंतर्मुहूर्त काळ समाप्त झाल्यावर अनिवृत्तिकरणास प्रारंभ होतो.

**अनिवृत्तिकरण** - वर अपूर्वकरणाचे जे चार आवश्यक सांगितले होते ते येथे देखील होतात अर्थात गुणश्रेणी, गुणसंक्रमण, स्थितिकांडकघात व अनुभागकांडकघात होत रहातात, स्थितिबंधापसरण देखील होते. परंतु त्यामध्ये अंतर हे आहे की येथे समान समयवर्ती सर्व जीवांचे परिणाम अर्थात अनिवृत्तिकरण मांडणाऱ्या त्रिकालवर्ती अनंत जीवांचे परिणाम समानच असतात.

अनिवृत्तिकरणाच्या अंतर्मुहूर्त काळामध्ये दर समयाला विशुध्दि तर अनंत गुणा वाढत जाते, परंतु प्रत्येक समयात एकेकच परिणाम असतो. म्हणून

अनिवृत्तिकरणाच्या अंतर्मुहूर्त काळाचे जेवढे समय असतात तेवढेच तेथे परिणाम असतात. अशाप्रकारे एकेका समयाचे परिणाम एकेकच असल्याने तेथे जघन्य, मध्यम व उत्कृष्ट असे भेद असत नाहीत. म्हणूनच याचे नाव अनिवृत्तिकरण आहे. निवृत्ति म्हणजे परिणामांमध्ये भेद असणे व अनिवृत्ति म्हणजे परिणामांमध्ये भेद नसणे.

येथे फक्त विशुध्दीच्या अपेक्षेनेच परिणामांची समानता समजली पाहिजे. गति, लेश्या, शरीरादिचा आकार, वर्ण, ज्ञान, उदयरूप कषाय इत्यादिंमध्ये भेद असूनदेखील सर्व अनंत जीवांची विशुध्दि समानच असते. ही विशुध्दि दर समयाला अनंत गुणा वाढत जाते.

अपूर्वकरण व अनिवृत्तिकरण या दोन्हींमध्ये आणखी एक अंतर आहे. येथे जे स्थितिकांडकघात इत्यादि होतात त्यामध्ये स्थितिकांडक, अनुभागकांडक व स्थितिबंध यांचे प्रमाण घटते. त्याचे कारण असे आहे की स्थितिसत्त्व उत्तरोत्तर घटत जाण्याने या कांडकांचे व स्थितिबंधाचे प्रमाणदेखील उत्तरोत्तर घटत जाते. कांडक देखील छोटे छोटे होतात व स्थितिबंधामध्ये होणारी घटदेखील कमी होते.

अपूर्वकरण समाप्त करून जो अनिवृत्तिकरणाच्या पहिल्या समयात येतो तेव्हा त्याचा स्थितिकांडक आयाम - जघन्य पल्याच्या असंख्यातव्या भागाएवढा असतो तर उत्कृष्ट त्यापेक्षा संख्यातवा भाग अधिक असतो. पहिल्याच समयात त्या कांडकाचा घात झाल्यावर सर्व जीवांच्या परिणामांची विशुध्दि समान असल्या कारणाने स्थितिकांडकघात, अनुभागकांडकघात, स्थितिबंधापसरण, गुणश्रेणी निर्जरा व गुणसंक्रमण या सर्वांमध्ये समानता आढळते.

परंतु येथे योगाच्या सदृशतेचा काही नियम नाही त्यामुळे त्यांच्या प्रदेशबंधामध्ये समानतेचा काही नियम नाही.

पूर्वी आपण पाहिले होते की अपूर्वकरणाच्या काळापेक्षा अनिवृत्तिकरणाचा काळ छोटा आहे अर्थात त्याच्या संख्यातव्या भागाएवढा आहे. आपण अंकसंदृष्टिद्वारे अपूर्वकरणाचा काळ ८ समय मानला होता आणि ८ समयांच्या सर्व परिणामांची एकूण संख्या ४०९६ मानली होती. आता येथे अनिवृत्तिकरणाचा


काळ ४ समय मानू. त्यामुळे प्रत्येक समयाचा एक परिणाम या हिशोबाने येथे एकूण ४ परिणाम होतील जे क्रमशः अनंतगुणा विशुध्दिवाले असतील.

अपूर्वकरणात होणारे सर्व आवश्यक येथेही होत रहातात. ज्ञानोपयोग शुध्द आत्म्यामध्ये एकाग्र रहातो, तरीदेखील अजून परिणतिमध्ये मिथ्यात्व असते, अजून मिथ्यात्वाचे निषेक उदयास येत रहातात. याच प्रकारे अनिवृत्तिकरणाच्या काळास संख्यातने भाग देऊन बहुभाग व्यतीत झाल्यानंतर अर्थात समजा पाच भागांपैकी चार भाग व्यतीत झाल्यावर 'अंतरकरण' होते.

**अंतरकरण** - 'विशिष्ट निषेकांमधील सर्व द्रव्य इतर निषेकांमध्ये अर्थात या ठिकाणी वरच्या व खालच्या निषेकांमध्ये निक्षेपण करून त्या विशिष्ट निषेकांचा अभाव करणे यास 'अंतरकरण' म्हणतात. हे अंतर फक्त दर्शनमोहनीय कर्मामध्येच केले जाते.

अनादि मिथ्यादृष्टीच्या सत्तेमध्ये दर्शनमोहनीय कर्माची एकमात्र मिथ्यात्व प्रकृतिच विद्यमान असते, म्हणून तेथे फक्त मिथ्यात्व प्रकृतिमध्ये अंतर केले जाते. सादि मिथ्यादृष्टीच्या सत्तेमध्ये ज्याला दर्शनमोहनीयाच्या मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व व सम्यक् प्रकृति या तीनची सत्ता विद्यमान आहे, तेथे तिन्ही प्रकृतिंमध्ये अंतर केले जाते.

हे अंतर अनिवृत्तिकरण काळानंतर उदय येण्यायोग्य निषेकांमध्ये अर्थात गुणश्रेणीशीर्ष आणि त्याच्या वरचे काही निषेक यांच्यामध्ये केले जाते, अर्थात त्या निषेकांचे सर्व परमाणु काही खालच्या तर काही वरच्या निषेकांमध्ये निक्षेपित केले जातात. हे कार्य अपकर्षण आणि उत्कर्षण यांच्याद्वारे होते. त्याकारणाने तेथल्या निषेकांचा अभाव होतो. जेवढ्या निषेकांचा अभाव होतो तेवढ्या संख्येस - समयास 'अंतरायाम' असे म्हणतात.



या अंतरकरणाद्वारे निषेकांची एक अतूट मालिका तुटून दोन भागांमध्ये विभाजित होते - एक प्रथम किंवा पूर्व स्थिति आणि एक द्वितीय किंवा उपरितन स्थिति. त्या दोन्हींच्या मध्ये अंतर्मुहूर्त प्रमाण अंतर पडते.

अंतर करण्याचे हे विधान - हे कार्य एक अंतर्मुहूर्तामध्ये पूर्ण होते, त्या काळास 'अंतरकरण काल' असे म्हणतात. एक स्थितिकांडकघात होण्यासाठी जेवढा अल्प वेळ लागतो तेवढ्याच काळात अंतरकरण होते.

अंतरकरणाद्वारे ज्या निषेकांचा अभाव केला जातो त्यांच्या खालच्या निषेकांना प्रथम स्थिति म्हणतात. प्रथम स्थितिचे निषेक अनिवृत्तिकरणाच्या उरलेल्या काळात उदय होऊन खिरून जातात. अंतराच्या वरच्या निषेकांना द्वितीय स्थिति म्हणतात. तेथे अंतःकोडाकोडीसागरप्रमाण निषेक असतात.

प्रथम स्थितिमधील मिथ्यात्व कर्माचे निषेक दर समयाला उदयाला येतात आणि त्यावेळी जीवाला देखील मिथ्यात्वभाव होत असतो. मिथ्यात्व कर्माचा उदय चालू आहे आणि जीवाला सम्यक्त्व प्राप्त झाले आहे असे कधी होऊ शकत नाही.

अंतरकरण झाल्यानंतर अनिवृत्तिकरणाच्या उरलेल्या काळातच द्वितीय स्थितिवाल्या मिथ्यात्वाच्या निषेकांचा उपशम केला जातो अर्थात त्यांची उदीरणा किंवा उदय होऊन ते लवकर उदयास येऊ शकणार नाहीत त्यायोग्य केले जातात.

**उपशमकरण** - दर्शनमोहनीय कर्मामध्ये अंतर केल्यानंतर द्वितीय स्थितिवाल्या निषेकांना अर्थात मिथ्यात्वाच्या परमाणुंना उदय येण्यास अयोग्य केले जाते, त्याला 'उपशमकरण' असे म्हणतात.

ज्याप्रमाणे आपण गुणसंक्रमणात पाहिले होते की दर समयाला असंख्यात गुणा द्रव्य संक्रमित होते, त्याचप्रमाणे येथेही दर समयाला असंख्यात गुणा द्रव्य उपशमित केले जाते - उदय किंवा उदीरणा होण्यास अयोग्य केले जाते.

या उपशमविधानामध्ये अर्थात उपशमकरणामध्ये द्वितीय स्थितितील मिथ्यात्वाच्या परमाणुंना 'गुणसंक्रमण भागहार' या संख्येने भाग देऊन जेवढी

संख्या येते तेवढे परमाणु दर समयाला उपशमित केले जातात. प्रत्येक समयात असंख्यात गुणा असंख्यात गुणा द्रव्य उपशमित केले जाते. अशाप्रकारे एक अंतर्मुहूर्त काळात द्वितीय स्थितितील सर्व द्रव्य - सर्व परमाणु उपशमित केले जातात. या काळास 'उपशमकरण काल' असे म्हणतात.

प्रथम स्थितिमध्ये दर्शनमोहनीयाचे जेवढे निषेक आहेत तेवढ्या समयांपर्यंत अर्थात अनिवृत्तिकरणाच्या उरलेल्या काळामध्ये अंतिम समयापर्यंत हे उपशमविधान होत रहाते. या काळात मिथ्यात्व कर्माची गुणश्रेणी होत नाही परंतु आयुशिवाय इतर सर्व कर्मांची गुणश्रेणी होत रहाते. पूर्वी मिथ्यात्व कर्मात जी गुणश्रेणी झाली होती त्यातील एकेक निषेक उदयाला येऊन खिरत रहातो.

अशाप्रकारे जोपर्यंत उपशमविधानाद्वारे द्वितीय स्थितितील मिथ्यात्वाच्या द्रव्यास उपशमित करण्याचे कार्य होत रहाते, तोपर्यंत प्रथम स्थितितील मिथ्यात्वाच्या निषेकांचा उदय होत रहातो. उपशमविधानाच्या काळात जीव सासादन गुणस्थानास प्राप्त होत नाही कारण त्याला मिथ्यात्वाचा उदय चालू आहे आणि त्याचे गुणस्थानही पहिले आहे. सासादनामध्ये येणारा जीव तर औपशमिक सम्यक्त्वातून भ्रष्ट होऊन अनंतानुबंधीच्या उदयाने सासादन नामक दुसऱ्या गुणस्थानात येतो.

अनिवृत्तिकरणाच्या अंतिम समयात प्रथम स्थितितील अंतिम निषेक खिरून जातो आणि त्याच्या अनंतर (लगोलग नंतरच्या) समयात अंतरायाम असतो - अंतर असते - तेथे तर मिथ्यात्वाचे निषेकच नसतात त्यामुळे मिथ्यात्वाचा उदय पण रहात नाही. द्वितीय स्थितिमध्ये मिथ्यात्वाचे द्रव्य सत्तेमध्ये पडून आहे परंतु ते सर्वच उपशमित केले गेल्याने तेथून सुटून अंतरायामाच्या काळात त्याचा उदय होण्याची जराही संभावना असत नाही. यामध्ये अपकर्षण - उत्कर्षण होऊ शकत नाही. म्हणून अनिवृत्तिकरणाच्या अनंतर समयात 'अंतराचा काल' प्रारंभ होताच जीवाला प्रथमोपशम सम्यक्त्वाची प्राप्ति होते.

या ठिकाणी दर्शनमोहनीय कर्मात अंतरकरण व उपशमकरण यांद्वारे उपशम होतो आणि अनंतानुबंधी क्रोध, मान, माया व लोभ यांमध्ये अप्रशस्त उपशम होतो. अनंतानुबंधी प्रकृतिंमध्ये अंतर पडत नाही परंतु त्यांचा उदय अप्रत्याख्यानावरणादि इतर प्रकृतिरूपाने होतो. येथे अनंतानुबंधीमध्ये अप्रशस्त

उपशम होतो. अप्रशस्त उपशमनाद्वारे जे कर्म उपशांत होते त्यामध्ये अपकर्षण, उत्कर्षण, संक्रमण शक्य आहे, फक्त उदयावलीमध्ये प्रविष्ट होणे शक्य नाही.

या रीतीने अंतरायामाच्या पहिल्या समयापासूनच दर्शनमोहनीय आणि अनंतानुबंधी क्रोधादि या कर्मांच्या प्रकृति, प्रदेश, स्थिति व अनुभाग यांचा संपूर्णतः उपशम झाल्याने औपशमिक तत्त्वश्रध्दानरूप सम्यक्त्व प्राप्त करून जीव प्रथमोपशम सम्यग्दृष्टि होतो.

अनादिकाळापासून दर समयामध्ये मिथ्यात्व कर्माचा उदय आणि जीवाचा मिथ्यात्वभाव होतच आला होता, आता त्यामध्ये खंड पडला. येथे मिथ्यात्व कर्माचा उदयही राहिला नाही आणि जीवाचा मिथ्यात्वभावही राहिला नाही परंतु सम्यक्त्वाची प्राप्ति झाली. आता उपयोगदेखील शुध्द आहे व परिणतिदेखील शुध्द आहे. उपयोग अर्थात जाणण्याच्या क्रियेचा कल आणि परिणति अर्थात श्रध्दा - अभिप्राय - प्रतीति.

करण परिणामातील उपयोगाच्या शुध्दतेमुळे अर्थात निजशुध्दात्मा आपल्या ज्ञानाचा विषय बनवून त्यालाच जाणत राहिल्याने सहजरूपाने परिणतिमध्ये सम्यक्त्वाची प्राप्ति होते - सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्ररूपी मोक्षमार्गाचा प्रारंभ होतो, अतीन्द्रिय आनंदाची प्राप्ति होते.

जयसेनाचार्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर निजशुध्दात्मभावनारूप सविकल्प स्वसंवेदन ज्ञानाच्या बळाने निर्विकल्प निजशुध्दात्मानुभूति प्राप्त होते. येथे पूर्व पर्यायाचे ज्ञान करविले आहे. ज्ञान आपल्या निजशुध्दात्म्याला जाणण्यामध्ये एकाग्र होते तेव्हा त्याला भेदरहित अखंड आत्म्याचा तसेच रागरहित आत्म्याचा अनुभव होतो. येथे भावना शब्दाचा अर्थ एकाग्रता असा आहे, सविकल्प हे ज्ञानाचे विशेषण आहे आणि निर्विकल्प शब्द भेदरहित अभेद निजशुध्दात्म्याचा व रागरहित शुध्दोपयोगाचा सूचक आहे.

आता प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या काळामध्ये काय काय घडते त्याची चर्चा पुढील पत्राद्वारे करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

# प्रथमोपशम सम्यक्त्व

पत्रांक ११. ४ नोव्हें. २००२

प्रिय सौ. रीना व सौ. मोनास,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

अनादिकाळापासून हा जीव स्वतःच्या मिथ्यात्व परिणामांमुळे जन्ममरणरूपी संसारात परिभ्रमण करत आला आहे. जेव्हा विशिष्ट योग्यतेने युक्त असा जीव जिनेन्द्रकथित तत्त्वांचा उपदेश ग्रहण करून तत्त्वविचार आणि तत्त्वनिर्णय करतो त्यावेळी पाच लब्धिंपूर्वक त्याला प्रथमोपशम सम्यक्त्वाची प्राप्ति होते.

जीवाच्या वृध्दिंगत विशुध्द परिणामांच्या निमित्ताने कर्मांमध्येही जी परिवर्तनं होतात त्याची आपण चर्चा केली. अनिवृत्तिकरणाच्या अनंतर समयात जीव प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करतो. परिणामांच्या विशुध्दीच्या कारणाने येथेही काही विशेष गोष्टी घडतात त्याची आपण चर्चा करूया.

प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या पहिल्या समयापासूनच द्वितीय स्थितिमधील उपशमित केलेल्या मिथ्यात्व प्रकृतीचे गुणसंक्रमण सुरू होते. दर्शनमोहनीयाच्या मिथ्यात्व प्रकृतीचे द्रव्य (परमाणु) दर समयाला असंख्यात गुणा क्रमाने सम्यग्मिथ्यात्व आणि सम्यक् प्रकृतिरूपाने परिणमित होते. परंतु आता येथे मिथ्यात्वाची गुणश्रेणी, स्थितिकांडकघात, अनुभागकांडकघात होत नाहीत परंतु ज्ञानावरणादि इतर कर्मांमध्ये होतात. येथे मिथ्यात्वाचा उदयही नाही व बंधही नाही.

पूर्वी जो मिथ्यात्वाचा अनुभाग होता त्याचा हजारो अनुभागकांडकघातांद्वारे अनंतवा भाग बाकी उरलेला असतो. त्यातील काही परमाणुंचा अनुभाग त्याहीपेक्षा अनंतवा भाग होऊन सम्यग्मिथ्यात्व प्रकृति तयार होते आणि ज्या परमाणुंचा अनुभाग त्याच्याही अनंताव्या भागाएवढा होतो ते सम्यक् प्रकृतिरूप होतात.

या प्रमाणे मिथ्यात्वाचा अनुभाग अनंत गुणा हीन होऊन एका मिथ्यात्व प्रकृतिमधून तीन प्रकृति बनतात - मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व आणि सम्यक् प्रकृति. यालाच असे म्हणतात की प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या काळात मिथ्यात्वाचे तीन तुकडे होतात.

यांमध्ये अनुभाग तर क्रमशः अनंतवा भाग अनंतवा भाग असतो परंतु यांच्या परमाणुंची संख्या क्रमशः असंख्यातवा भाग असंख्यातवा भाग एवढी होते.

अशा प्रकारे संख्येच्या अपेक्षेने -

मिथ्यात्व द्रव्यापेक्षा सम्यग्मिथ्यात्वाचे द्रव्य असंख्यातवा भाग आणि सम्यक् प्रकृतीचे द्रव्य त्याच्याही असंख्यातवा भाग प्रमाण असते.

आणि अनुभागाच्या अपेक्षेने -

मिथ्यात्वाचा अनुभाग त्याच्या पूर्व अनुभागाच्या अनंतवा भागप्रमाण होतो, सम्यग्मिथ्यात्वाचा अनुभाग त्याच्याही अनंतवा भागप्रमाण होतो आणि सम्यक् प्रकृतीचा अनुभाग त्याच्याही अनंतवा भागप्रमाण होतो.

प्रथम समयापासून एक अंतर्मुहूर्त काळापर्यंत मिथ्यात्वाचे गुणसंक्रमण होते. दर समयाला असंख्यात गुणा परमाणु संक्रमित होतात.

पहिल्या समयात मिथ्यात्वाचे काही परमाणु सम्यग्मिथ्यात्व आणि सम्यक् प्रकृतिरूप परिणमित होतात, तेथे सम्यक् प्रकृतीच्या द्रव्यापेक्षा सम्यग्मिथ्यात्वाचे द्रव्य असंख्यात गुणा आहे.

दुसऱ्या समयामध्ये मिथ्यात्वाचे द्रव्य, जे पहिल्या समयापेक्षा असंख्यात गुणा आहे, त्या दोन प्रकृतिरूप होते. या कारणाने पहिल्या समयातील सम्यग्मिथ्यात्वाच्या द्रव्यापेक्षा दुसऱ्या समयातील सम्यक् प्रकृतीचे द्रव्य असंख्यात गुणा असते आणि त्यापेक्षा दुसऱ्या समयातील सम्यग्मिथ्यात्वाचे द्रव्य असंख्यात गुणा असते.

त्यापेक्षा तिसऱ्या समयातील सम्यक् प्रकृतीचे द्रव्य असंख्यात गुणा असते व त्याहीपेक्षा तिसऱ्याच समयातील सम्यग्मिथ्यात्वाचे द्रव्य असंख्यात गुणा असते. याच पध्दतीने अंतर्मुहूर्त काळापर्यंत अर्थात गुणसंक्रमणाच्या काळात सर्पाच्या चालीप्रमाणे असंख्यात गुणा क्रम होत रहातो. आपण याला अंकसंदृष्टिद्वारे समजूया. असंख्यातसाठी सहनानी म्हणजे चिन्ह ४ मानून खालीलप्रमाणे समजाविले जाते -

| | सम्यग्मिथ्यात्वाचे द्रव्य | सम्यक् प्रकृतिचे द्रव्य |
|---|---|---|
| ३ रा समय | १०२४ | २५६ |
| २ रा समय | ६४ | १६ |
| १ ला समय | ४ | १ |

गुणसंक्रमणाचा काळ समाप्त झाल्यावर हे संक्रमण अल्प प्रमाणात चालू रहाते, त्यास विध्यात संक्रमण म्हणतात. विध्यात म्हणजे मंद. येथे विशुध्दि मंद झाल्याने अल्प परमाणुंचे संक्रमण होते.

या प्रकारे प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करून काही जीव १ ल्या मिथ्यात्व गुणस्थानातून ४ थ्या असंयत गुणस्थानात, काही ५ व्या देशसंयत गुणस्थानात तर काही ७ व्या अप्रमत्त गुणस्थानात जातात. ५ व्या व ७ व्या गुणस्थानात जाणाऱ्यांचे स्थितिसत्त्व ४ थ्या गुणस्थानात जाणाऱ्यांच्या स्थितिसत्त्वाच्या संख्यातवा भाग संख्यातवा भाग प्रमाण उरते. कारण त्यांची विशुध्दि अधिक असते.

४ थ्या गुणस्थानात जाणारा जीव मिथ्यात्वाबरोबर अनंतानुबंधी चौकडीचा अप्रशस्त उपशम करतो, ५ व्या गुणस्थानात जाणारा जीव दोन कषाय चौकडींचा अप्रशस्त उपशम करतो तर ७ व्या गुणस्थानात जाणारा जीव तीन कषाय

चौकडींचा अप्रशस्त उपशम करतो. त्यांच्या अनुदयामध्ये - उदय नसल्यामुळे जीवाची मंदकषायरूप विशुध्दि वाढते आणि त्यामुळे स्थितिसत्त्व अधिक प्रमाणात घटते. त्याचप्रमाणे गुणश्रेणी निर्जरादेखील असंख्यात गुणा होते.

७ व्या गुणस्थानात जाणारा जीव ४ थ्या - ५ व्या गुणस्थानात जाऊन वर चढतो ही मान्यता बरोबर नाही ही गोष्ट या कर्मांच्या अवस्थांद्वारे सिध्द होते. त्याचप्रमाणे मिथ्यात्व गुणस्थानात केवळ द्रव्यलिंग धारण केल्याने त्याचे सम्यक्त्वासहित ७ वे गुणस्थानच प्रकट होते ही गोष्टदेखील सिध्द होत नाही.

तुम्हाला माहितच आहे की ५ व्या गुणस्थानात जाणारा जीव द्रव्यलिंगी श्रावक असणे आवश्यक आहे, तसेच ७ व्या गुणस्थानात जाणारा जीव द्रव्यलिंगी मुनि असणे आवश्यक आहे. कारण यथोचित द्रव्यलिंग असल्याखेरीज भावलिंग प्रकट होत नाही.

आता प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या काळात काय वैशिष्ट्यं असतात ते पाहूया.


प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या काळात मरण होत नाही असा नियम आहे. येथे दर्शनमोहनीय व अनंतानुबंधी चौकडीचा उपशम असल्यामुळे त्यांचा उदयही नसतो व बंधही थांबतो. परंतु आयुशिवाय ज्ञानावरणादि इतर प्रकृतिंमध्ये गुणश्रेणी, स्थितिकांडकघात, अनुभागकांडकघात होत रहातात. त्याच्या फलस्वरूप त्या कर्मांची गुणश्रेणी निर्जरा होते.

४ थ्या गुणस्थानापेक्षा ५ व्या गुणस्थानात व त्यापेक्षा ७ व्या गुणस्थानात निर्जरा अधिक होते, कारण तेथे विशुध्दि अधिक असते.

प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या पहिल्या समयापासूनच संवर आणि निर्जरा चालू होतात. प्रायोग्यलब्धिमध्ये कित्येक प्रकृतींचे बंधापसरण झाले होते, ते येथेही चालू रहाते. त्याच्याबरोबर पहिल्या व दुसऱ्या गुणस्थानामध्ये ज्यांच्या बंधाची व्युच्छित्ति होते त्या सर्व प्रकृतींचा बंध थांबतो, त्यांचा संवर होतो. ५ व्या व ७ व्या गुणस्थानात जाणाऱ्या जीवांची इतरही अनेक प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते, त्याविषयी नंतर बोलूया.

प्रथमोपशम सम्यक्त्वाच्या अंतर्मुहूर्त काळामधील अधिकात अधिक सहा आवली आणि कमीत कमी एक समय बाकी राहिला असताना अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ यांपैकी कोणत्याही एकाचा उदय झाल्याने जीव सम्यक्त्वातून भ्रष्ट होतो व २ ऱ्या सासादन गुणस्थानास प्राप्त होतो. तेथून पडून तो मिथ्यात्वात जातो.

प्रथमोपशम सम्यक्त्वाचा काळ पूर्ण झाल्यानंतर नियमाने दर्शनमोहनीय कर्माच्या तीन प्रकृतिंपैकी एका प्रकृतीचा उदय होतो. तो कसा याला आकृतिद्वारे समजूया.




उपशम सम्यक्त्वाच्या काळात दर्शनमोहनीयाचे तीन तुकडे होतात. उपशम सम्यक्त्वाच्या काळात त्यातील कोणाचेही अपकर्षण होऊन उदय किंवा उदीरणा होणे संभवत नाही.

हा सम्यक्त्वाचा काळ पूर्ण होईपर्यंत अंतरायामामध्ये दर्शनमोहनीयाच्या निषेकांचा अभाव असतो. परंतु सम्यक्त्वाचा काळ पूर्ण होताच द्वितीय स्थितिमधील तिन्ही प्रकृतींचे परमाणु अपकर्षणाद्वारे अंतरायामामध्ये येतात व अंतर भरून काढतात - तेथे निषेकांची रचना होते. याला 'अंतरपूरण' म्हणतात.

उपशम सम्यक्त्वाचा काळ पूर्ण होताच अंतरायामामध्ये निषेक नसतात त्यानंतर द्वितीय स्थितिमधून अपकर्षण होऊन खाली येतात व त्यांचा उदय होतो.

यावरून एक गोष्ट सिध्द होते की दर्शनमोहनीयाच्या प्रकृतींच्या उदयाने उपशम सम्यक्त्व सुटत नाही, परंतु उपशमाचा काळ एक अंतर्मुहूर्तच असतो त्यानंतर उपशम सुटून जातो परंतु सम्यक्त्व सुटून जाण्याचा काही नियम नाही.

त्या तीन प्रकृतिंपैकी जीवाच्या परिणामांच्या निमित्ताने जी प्रकृति उदयरूप असते ती तर उदयावलीमध्ये येते व इतर दोन प्रकृति उदयावलीच्या वरच रहातात आणि उदयरूप प्रकृतिमध्ये संक्रमित होऊन त्यारूपाने उदयाला येतात.

अशा रीतीने प्रथमोपशम सम्यक्त्वाचा काळ पूर्ण झाल्यावर -

(१) मिथ्यात्व प्रकृतीच्या उदयाने जीव पुन्हा १ ल्या मिथ्यात्व गुणस्थानात जातो. किंवा

(२) सम्यग्मिथ्यात्वाच्या उदयाने जीव ३ ऱ्या सम्यग्मिथ्यात्व (मिश्र) गुणस्थानात जातो. किंवा

(३) सम्यक् प्रकृतीच्या उदयाने जीव क्षयोपशम सम्यग्दृष्टि अर्थात वेदक सम्यग्दृष्टि होतो. त्याचे सम्यक्त्व तसेच विशिष्ट गुणस्थान कायम रहाते.

अशा प्रकारे प्रथमोपशम सम्यग्दृष्टि जीव नियमाने मिथ्यात्वात जातो या मान्यतेचे निराकरण होते. कषायपाहुड, धवला, लब्धिसार, मोक्षमार्ग प्रकाशक इत्यादि ग्रंथांमध्ये याचे वर्णन आहे. येथे प्रथमोपशम सम्यक्त्वासंबंधी बोलत आहोत.

'धवला' ग्रंथात या प्रथमोपशम सम्यक्त्वी जीवांमध्येच दोन प्रकार सांगितले आहेत - प्रथम सम्यक्त्वी आणि अप्रथम सम्यक्त्वी. तेथे म्हटले आहे की अनादि मिथ्यादृष्टि जीव पहिल्या वेळी प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करतो तेव्हा उपशम सम्यक्त्वाचा काळ पूर्ण झाल्यावर नियमाने मिथ्यात्वात जातो परंतु अप्रथम वेळी म्हणजे द्वितीयादि वेळी प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करतो त्या जीवाला वर सांगितलेले तीन मार्ग मोकळे आहेत - त्याच्यासाठी मिथ्यात्वात जाण्याचा नियम नाही.

तुम्ही म्हणाल, 'एक वेळा सम्यक्त्व प्राप्त झाल्यावर पुन्हा पुन्हा सम्यक्त्व होण्याची गोष्ट कशी काय करत आहेस?'

हे पहा, एखादा जीव प्रथमोपशम सम्यक्त्वानंतर मिथ्यात्वात जाऊ शकतो अथवा एखादा क्षयोपशम सम्यक्त्वातून सुटून मिथ्यात्वात जाऊ शकतो. जेव्हा तो जीव पुन्हा सम्यक्त्व प्राप्त करेल तेव्हा एखादा कर्मांचा क्षयोपशम करून क्षयोपशम सम्यक्त्व प्राप्त करेल किंवा एखादा त्यांचा उपशम करून प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करेल.

सम्यक्त्वातून मिथ्यात्व व पुन्हा सम्यक्त्व या रीतीने असंख्यात वेळा (पल्याच्या असंख्यातव्या भाग वेळा) होऊ शकते. एक वेळा प्रथमोपशम सम्यक्त्व झाल्यावर दर्शनमोहनीयाच्या तीन प्रकृतींची सत्ता असंख्यात वर्षांपर्यंत रहाते. जीव मिथ्यात्वात गेला तरी या तीन प्रकृतींची सत्ता अंतःकोडाकोडी सागर इतकी रहाते. त्यावेळी इतर दोन प्रकृति मिथ्यात्व रूपाने उदयास येत रहातात व त्यांचा एक एक निषेक खिरून जातो. नवा होणारा बंध तर फक्त मिथ्यात्वाचाच होत असतो. अशाप्रकारे एकेक निषेक निघून जात जात जेव्हा सम्यग्मिथ्यात्व व सम्यक् प्रकृति यांची सत्तारूप स्थिति अगदी थोडी बाकी रहाते, तेव्हा तो जीव पुन्हा या तिन्ही प्रकृतींचा व अनंतानुबंधीचा एकदम उपशम करून प्रथमोपशम समयक्त्व प्राप्त करू शकतो.

अगदी थोडी म्हणजे किती याचे प्रमाण गोम्मटसार कर्मकांड गाथा ६१५ मध्ये दिले आहे. तेथे म्हटले आहे की या दोन प्रकृतींची सत्तारूप स्थिति त्रस जीवांमध्ये पृथक्त्व सागर प्रमाण बाकी रहाते व एकेंद्रियांमध्ये एक सागराला पल्याचा असंख्यातवा भाग कमी एवढी बाकी रहाते तोपर्यंतच्या काळास 'वेदक योग्य काल' असे म्हणतात आणि त्यापेक्षाही सत्तारूप स्थिति कमी असेल तर त्याला 'उपशमकाल' असे म्हणतात.

वेदकयोग्य काळात जीव पुन्हा प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करू शकत नाही, वेदक म्हणजे क्षयोपशम सम्यक्त्व प्राप्त करू शकतो. परंतु उपशम कालामध्ये तो प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करू शकतो. या उपशम योग्य

कालामध्ये त्या दोन प्रकृति मिथ्यात्वरूप संक्रमित होऊ लागतात त्याला उद्वेलना म्हणतात. प्रथम सम्यक् प्रकृति उद्वेलना होऊन सत्तेतून नष्ट होते व त्यानंतर सम्यग्मिथ्यात्व प्रकृतिदेखील उद्वेलना होऊन नष्ट होते. असा जीव सादि मिथ्यादृष्टि असला तरी आता त्याच्या सत्तेमध्ये दर्शनमोहनीयाची एक मिथ्यात्व प्रकृतीच शिल्लक रहाते.

म्हणून एक वेळा प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करुन मिथ्यात्वात गेलेल्या जीवास पुन्हा प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त करण्यास असंख्यात करोड वर्षांचा कालावधि जातो - याला प्रथमोपशम सम्यक्त्वाचे 'अंतर' म्हणतात.

परंतु प्रथमोपशम सम्यक्त्वातून पडून मिथ्यात्वात आलेला जीव एक अंतर्मुहूर्तानंतर लगेच क्षयोपशम सम्यक्त्व प्राप्त करू शकतो कारण त्याचा वेदकयोग्य काल असतो.

प्रथमोपशमाच्या बाबतीत जे अंतर पाहिले तेवढेच अंतर सासादन गुणस्थानाच्या बाबतीतही समजावे. कारण प्रथमोपशम सम्यक्त्वातूनच जीव सासादनामध्ये येतो, क्षयोपशम सम्यक्त्वातून कोणी सासादनात येऊ शकत नाही.

प्रथमोपशम सम्यक्त्व प्राप्त झाल्यावर जीव पहिल्या मिथ्यात्व गुणस्थानातून चौथ्या अविरत सम्यक्त्व गुणस्थानात येतो तेव्हा त्याला ४१ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते. आपण पाहिले होते की बंधयोग्य १२० प्रकृति आहेत. त्यापैकी मोक्षमार्गाचा प्रारंभच ४१ प्रकृतींच्या बंधाच्या व्युच्छित्तीने होतो. येथे व्युच्छित्ति शब्दाचा अर्थ पाहूया.

'ज्या प्रकृतींचा बंध विवक्षित गुणस्थानापर्यंतच होतो, त्याच्या वरच्या गुणस्थानांमध्ये होत नाही त्याला असे म्हणतात की त्या विवक्षित गुणस्थानात त्या विशिष्ट प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति झाली.'

जसे, मिथ्यात्वादि १६ प्रकृतींचा बंध फक्त पहिल्या गुणस्थानातच होतो, दुसऱ्या किंवा त्याच्या वरच्या कोणत्याच गुणस्थानात होत नाही म्हणून पहिल्या गुणस्थानात १६ प्रकृतींची बंध व्युच्छित्ति होते असे म्हटले जाते. व्युच्छित्ति होणे

म्हणजे बंधाचा अभाव होणे. परंतु जेव्हा आपण म्हणतो की १ ल्या गुणस्थानात बंधाची व्युच्छित्ति झाली तेव्हा असे समजावे की त्याच्या अंतिम समयापर्यंत बंध आहे परंतु त्यांचा द्वितीयादि गुणस्थानांमध्ये बंध नाही.

तुम्ही विचाराल, 'तेथे तर बंध आहे तरीदेखील तेथेच बंधाचा अभाव झाला असे का म्हणतात? वरच्या गुणस्थानात बंधाचा अभाव झाला असे म्हणणे योग्य आहे.'

याला द्रव्यार्थिकनयाचे कथन म्हणतात. याला दृष्टांताद्वारे समजूया. आपण सर्वजण देवळालीमध्ये एकत्र जमलो होतो. शिबिरानंतर मोना तू औरंगाबादला गेलीस आणि रीना तू आमच्याबरोबर मुंबईला आलीस. आता मला सांगा की मोना व आम्ही एकमेकांपासून कोठे वेगळे झालो? त्याचे तुम्ही उत्तर द्याल की देवळालीमध्ये आपण एकमेकांपासून वेगळे झालो - विभक्त झालो. जर मी तुम्हाला विचारले की देवळालीमध्ये तर आपण एकत्र होतो तुम्ही तेथे विभक्त होण्याची गोष्ट कशी करता? त्यावर सांगण्यात येईल की त्यानंतर आपण एकत्र नव्हतो म्हणून तेथेच विभक्त झालो असे म्हणण्याची पध्दत आहे. त्याचप्रमाणे जेव्हापर्यंत बंध होता तेथेच बंधाची व्युच्छित्ति झाली असे म्हटले जाते.

पहिल्या गुणस्थानात १६ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते, तर दुसऱ्या गुणस्थानात २५ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति होते, तिसऱ्या गुणस्थानात बंध व्युच्छित्ति होत नाही. म्हणून जेव्हा जीव सम्यक्त्व प्राप्त करतो तेव्हा १ ल्या गुणस्थानातून ४ थ्या गुणस्थानात गेल्यावर त्याच्या ४१ प्रकृतींचा बंध थांबतो - तेवढा संवर सुरू होतो.

चौथ्या गुणस्थानात आणखी १० प्रकृतींची बंध व्युच्छित्ति होत असल्याने ५ व्या गुणस्थानातल्या जीवांना ५१ प्रकृतींचा बंध थांबतो. ५ व्या गुणस्थानात ४ प्रकृतींची बंध व्युच्छित्ति होते व ६ व्या गुणस्थानात ६ प्रकृतींची बंध व्युच्छित्ति होते त्यामुळे ७ व्या गुणस्थानात जाणाऱ्या जीवांना ६१ प्रकृतींचा बंध थांबतो.

तुम्ही म्हणाल, 'आई, त्या प्रकृतींची नावे तरी सांग म्हणजे मग आम्ही त्यात फायद्याचा व नुकसानीचा अंदाज बांधू शकू. समजा चांगल्या कर्मप्रकृतींची बंध व्युच्छित्ति झाली तर काय फायदा?'

पहा, अजूनदेखील काही कर्मप्रकृति चांगल्या आहेत, फायदेशीर आहेत - लाभदायक आहेत ही मान्यता सोडायची काही तयार नाही. तरी देखील या गोष्टीची तुम्हाला खुशी होईल की निसर्गाचा असाच नियम आहे की मोक्षमार्गाचा प्रारंभ होताच सर्वाधिक अप्रशस्त प्रकृतींचा बंध थांबतो व इतर अप्रशस्त प्रकृतींचा अनुभाग - फलदान शक्ति प्रतिसमय अनंत गुणा घटत जाते. येथे सारा लाभच लाभ आहे म्हणून तर लब्धि म्हटले आहे. तुमची जिज्ञासा पाहून येथे त्या ४१ प्रकृतींची नावे लिहित आहे.

मिथ्यात्वासंबंधीच्या १६ प्रकृति -

मिथ्यात्व, हुंडक संस्थान, नपुंसकवेद, असम्प्राप्तासृपाटिका संहनन, एकेंद्रिय, स्थावर, आतप, सूक्ष्म, अपर्याप्त, साधारण, द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय, नरकगति, नरकगत्यानुपूर्वी, नरकायु या १६ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति १ ल्या गुणस्थानात होते.

अनंतानुबंधीसंबंधीच्या २५ प्रकृति -

| | | | |
|---|---|---|---|
| अनंतानुबंधी | ४ | - | क्रोध, मान, माया, लोभ. |
| स्त्यानगृध्दि आदि | ३ | - | स्त्यानगृध्दि, निद्रानिद्रा, प्रचलाप्रचला. |
| संस्थान | ४ | - | न्यग्रोधपरिमंडल, स्वाति, कुब्जक, वामन. |
| संहनन | ४ | - | वज्रनाराच, नाराच, अर्धनाराच, कीलित. |
| तिर्यंचसंबंधी | ४ | - | तिर्यंचगति, तिर्यंचगत्यानुपूर्वी, तिर्यंचायु, उद्योत. |
| इतर | ३ | - | दुर्भग, दुस्वर, अनादेय. |
| इतर | ३ | - | स्त्रीवेद, नीचगोत्र, अप्रशस्तविहायोगति. |

या २५ प्रकृतींच्या बंधाची व्युच्छित्ति २ऱ्या गुणस्थानात होते.

पूर्वी प्रायोग्यलब्धिच्या प्रकरणामध्ये प्रकृतिबंधापसरणाच्या द्वारे ४६ प्रकृतींचा बंध थांबतो हे आपण पाहिले होते. तुम्हाला प्रश्न उठणे स्वाभाविक आहे की येथे चौथ्या गुणस्थानात जाणाऱ्या जीवाला तर ४१ प्रकृतींचा संवर होतो असे म्हटले आहे. तर मग कोणत्या प्रकृतींचा बंध पुन्हा सुरू होतो?

हे पहा, ४६ प्रकृतिंपैकी मनुष्यायु व देवायु या दोन प्रकृति तसेच ३३ व्या व ३४ व्या स्थानातील मिळून ११ प्रकृति अशा सर्व मिळून १३ प्रकृतींचा बंध चौथ्या गुणस्थानात होईल परंतु इतर ८ प्रकृतींचा बंध मिटेल. त्या प्रकृति अशा आहेत - मिथ्यात्व, अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ आणि स्त्यानगृध्दि, निद्रानिद्रा व प्रचलाप्रचला या ८ प्रकृतींचा बंध थांबतो. ४६-१३+८ = ४१.

याच प्रमाणे प्रत्येक गुणस्थानातील बंधव्युच्छित्ति निश्चित आहे. येथे गुणस्थानानुसार फक्त संख्या लिहित आहे. 'गोम्मटसार कर्मकांड' मध्ये त्याचे सविस्तर वर्णन आहे.

| गुणस्थान | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बंधव्युच्छित्ति | १६ | २५ | ० | १० | ४ | ६ | १ | ३६ | ५ | १६ | ० | ० | १ |

वर दाखविल्याप्रमाणे १२० प्रकृतींची बंधव्युच्छित्ति होत जाते. चौदाव्या अयोगकेवली गुणस्थानात योगाचा अभाव असल्याने बंधच होत नाही, जीव सर्वथा अबंध दशेस प्राप्त होतो. येथे सर्व कर्मांचा आस्रव आणि बंध सर्वथा थांबल्याने पूर्णरूपाने संवर प्रकट होतो.

ज्याप्रमाणे बंधाचा अभाव होत जातो त्याचप्रमाणे विशिष्ट गुणस्थानात विशिष्ट प्रकृतींच्या उदयाचा देखील अभाव होत जातो. त्यांच्या उदयाची व्युच्छित्ति होत जाते. सम्यक्त्व प्राप्त होताच चौथ्या गुणस्थानातील जीवांना मिथ्यात्व, अनंतानुबंधी क्रोधादि ४, सूक्ष्म, साधारण, अपर्याप्त, आतप, स्थावर, एकेंद्रिय, द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय, सम्यग्मिथ्यात्व या सर्व प्रकृतींच्या उदयाचा अभाव होतो.

तुम्ही विचाराल, 'परंतु आम्ही पूर्वी बांधलेली कर्मं जातील कोठे?' यामध्ये घाबरण्याचे काही कारण नाही. सत्तेमध्ये पडून असलेली कर्मं काहीदेखील लाभ नुकसान करत नाहीत. या कर्मांची निर्जरा, क्षय किंवा सजातीय इतर प्रकृतिंमध्ये संक्रमण इत्यादि विधानांचे वर्णन क्षपणासार आदि ग्रंथांमधून जाणले असता आपल्या सर्व प्रश्नांचे निरसन होते.

कर्मकांड ग्रंथातून बंधाची व उदयाची व्युच्छित्ति वाचून ते पाठ करा. कारण

त्यांचे ज्ञान झाले असता मोक्षमार्गाचे स्वरूप अत्यंत स्पष्ट रीतीने आपल्या लक्षात येते, अन्यमतींच्या अनेक भ्रामक कल्पनांचे खंडन होते.

तुम्ही म्हणाल, 'बंधाची आणि उदयाची व्युच्छित्ति जाणल्याने अन्यमतींच्या भ्रामक कल्पनांचे खंडन कसे काय होऊ शकते? एखादे उदाहरण तरी सांग.'

त्यासाठी प्रथम काही नियम जाणून घ्या. हे नियमदेखील बंधाच्या व उदयाच्या व्युच्छित्तिमुळेच आहेत. आपण पाहिले होते की चारही गतिंमधील जीव सम्यक्त्व प्राप्त करू शकतात. नरकातले जीव नपुंसकवेदी असतात, देव स्त्रीवेदी किंवा पुरुषवेदी असतात, मनुष्यांमध्ये व तिर्यंचांमध्ये तीनही वेदांपैकी एका वेळी एक वेद असतो. हे सारे कोणतेही वेदवाले जीव सम्यक्त्व प्राप्त करू शकतात. परंतु सम्यक्त्वासहित मनुष्य, तिर्यंच किंवा देव यांमध्ये जन्मणारा जीव पुरुषवेदी पुरुषच होतो, स्त्री नाही. नरकात तर फक्त एक नपुंसक वेदच असतो. कोणत्याही गतिमधील स्त्री, मग भले ती स्वर्गातील देवी असो, जन्मतः सम्यग्दृष्टि असू शकत नाही. मनुष्यांमध्येदेखील कोणतीही स्त्री जन्मतः सम्यग्दृष्टि असू शकत नाही. अजून एक गोष्ट अशी आहे की मनुष्यांमध्ये स्त्रियांना पाचवे गुणस्थान प्राप्त होऊ शकते परंतु त्या मुनि बनू शकत नाहीत. त्यांना सहावे किंवा त्यानंतरचे कोणतेही गुणस्थान असू शकत नाही.

आता आपण एखाद्या भ्रामक कल्पनेचे खंडन कशाप्रकारे होते ते पाहूया. एक अत्यंत भ्रामक कल्पना अशी आहे की मल्लिनाथ तीर्थंकर स्त्री होते, ते स्त्रीपर्यायातच तीर्थंकर होऊन मुक्त झाले.

मल्लीनाथ भगवान भरतक्षेत्रातील तीर्थंकर होते. भरतक्षेत्रातील तीर्थंकरांची पाचही कल्याणकं होतात - गर्भकल्याणक, जन्मकल्याणक, दीक्षाकल्याणक, केवलज्ञानकल्याणक आणि मोक्षकल्याणक. ज्याचे गर्भकल्याणक होते तो जीव नियमाने सम्यक्त्वासहितच गर्भात येतो. तो पूर्वभवात सम्यग्दृष्टिच असतो. तर मग सम्यक्त्वासहित जन्मणारा जीव पुरुषच असतो स्त्री कदापि नाही. भाववेदाच्या अपेक्षेनेदेखील त्यांना पुरुषवेदच असतो, स्त्रीवेद असूच शकत नाही.

मल्लिनाथ तीर्थंकरांचा जीव पूर्वभवामध्ये अपराजित स्वर्गातील देव होता, तेथून मरून तो मनुष्य झाला होता. अपराजित स्वर्गातील सर्वच जीव जन्मतः

सम्यग्दृष्टिच असतात तसेच तेथे देवांगना नसतातच, फक्त पुरुष पर्यायातील जीवच असतात. म्हणून पूर्वभवात देखील ते पुरुष होते.

तिसरी गोष्ट, ग्रैवेयक स्वर्गाच्या वरील अनुदिश व अनुत्तर या स्वर्गांतील सर्व देव त्यापूर्वीच्या भवात नियमाने भावलिंगी मुनिच असतात, जे पुरुषच असतात, स्त्री नाही. या प्रकारे मल्लिनाथाचा जीव पूर्वीच्या तिसऱ्या भवात देखील पुरुषच होता, स्त्री नाही.

आणखी एक नियम जाणून घ्या. भावस्त्रीवेदवाल्या पुरुषांना तीर्थंकर प्रकृतीचा बंध तर होऊ शकतो परंतु त्यांना तीर्थंकर प्रकृतीचा उदय होऊ शकत नाही. तीर्थंकर प्रकृतीचा उदय तेराव्या गुणस्थानात होतो आणि कोणत्याही स्त्रीमध्ये तर पाचव्या गुणस्थानाच्या वर जाण्याची पात्रताच नसते.

आणखी जाणायचंय? त्याच भवात मोक्षाला जाणाऱ्या जीवांना चरमशरीरी म्हणतात. त्यांना नियमाने वज्रवृषभनाराच संहननच असते आणि स्त्रियांना तर खालची तीन संहननंच असतात, वरची तीन संहननं कधी असूच शकत नाहीत.

आम्हाला एक व्यक्ति म्हणाली होती की, 'मल्लिनाथ तीर्थंकर स्त्री होते की पुरुष या भानगडीत आपण कशाला पडायचे? त्याच्याशी आपल्याला काय देणे घेणे? कोणी त्यांना स्त्री मानोत की कोणी त्यांना पुरुष मानोत, त्यामुळे आपले काय बिघडले?'

मुलींनो, ज्याला जसे मानावयाचे आहे तसे तर तो मानतच आहे. परंतु यथार्थ वस्तुस्थितिसंबंधीचा आपला निर्णय यथार्थ आहे की नाही हे पहाणे हे तर प्रत्येक जीवाचे कर्तव्य आहे. देव, मुनि व शास्त्र यांचे यथार्थ स्वरूप असेच आहे, अन्यथा नाही अशा प्रकारचा दृढ निर्णय झाल्याशिवाय सम्यक्त्वाची प्राप्ति होऊच शकत नाही.

चारही अनुयोगांच्या अभ्यासाद्वारे आपल्या मान्यतेमधील व आचरणामधील विपरीतता दूर करून वीतरागता प्राप्त करणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे. येथे इतर जीवांचे दोष दाखविणे हे आपले प्रयोजन नाही, परंतु आपली मान्यता सुधारणे हेच प्रयोजन आहे. इतर जीवांच्या मान्यता व त्यांचे आचरण पाहून स्वतः कषायी होणे - रागी द्वेषी होणे योग्य नाही.

स्वाध्याय व तत्त्वज्ञानाचा अभ्यास नसल्या कारणाने फक्त आचरण सुधारण्याचा उपदेश देऊन त्यांच्या मान्यता सुधारत नाहीत. आपल्याला दुसऱ्यांच्या नव्हे तर आपल्या स्वतःच्या मान्यतांचे व आचारविचारांचे अवलोकन करून स्वतःच आपल्या दोषांचे निराकरण केले पाहिजे.

मुलींनो, अनंत काल भटकून आज आपण मनुष्यपर्यायामध्ये आलो आहोत. या मनुष्यभवाच्या दुर्लभतेसंबंधी आपण पूर्वी चर्चा केली होती. आता तत्त्वजिज्ञासा व तत्त्वरुचि तर तुम्हाला आहेच, जिनेन्द्रकथित तत्त्वंदेखील तुम्हाला प्राप्त झाली आहेत. बस्स! आता वारंवार त्याच तत्त्वांचा विचार करत रहा. संयोगांना बदलण्याची रुचि सोडून द्या. सारे संयोग त्यांच्या स्वतःच्या योग्यतेने जसे बनणार किंवा बिघडणार असतील तसे होतील. आपली स्वतःबद्दलची रुचि कायम ठेवा. छहढाला मध्ये म्हटले आहे -

**'परद्रव्यनतै भिन्न आपमें रुचि सम्यक्त्व भला है।'**

मुलींनो, अनादिकाळापासून हा जीव संयोगांमध्ये, शरीरामध्ये व रागादिंमध्येच गुंग झालेला आहे. हा जीव म्हणतो की, 'भेदज्ञान तर करावयाचे आहेच पण आधी पैसे तर कमवून घेऊ! विदेशयात्रा तर करून येऊ! मुलाबाळांना शिकवू सवरू! त्यांचा विवाह लावून देऊ!'

मला सांगा, स्वतःला मी संयोगांहून भिन्न आहे असे जाणावयाचे आहे, शरीराहून भिन्न आहे असे जाणावयाचे आहे, रागादिंहून भिन्न आहे हे ओळखावयाचे आहे तर मग कोणते संयोग असतील तर भेदज्ञान होईल? अमेरिकेतले की भारतातले? झोपडीपासून भेदज्ञान करणे सोपे आहे की राजमहालापासून? काळे शरीर असेल तर भेदज्ञान होईल की गोरे शरीर? काळ्या केसांपासून भेदज्ञान करणे सोपे आहे की पांढऱ्या केसांपासून? कोणत्या रागापासून स्वतःला भिन्न ओळखावयाचे आहे? अशुभाहून मी भिन्न आहे असे तर जीव म्हणतो परंतु पहा मला कसा उच्च प्रकारचा शुभभाव येत आहे असे म्हणून त्यातच संतुष्ट होतो, त्याकारणाने स्वतःला महान मानतो.

मुलींनो, हे तत्त्वज्ञान नुसते ऐकण्याची किंवा वाचण्याची गोष्ट नाही. त्याला आत्मसात करण्याची गोष्ट आहे - अंतरोन्मुख पुरुषार्थ करण्याची गोष्ट आहे.

आत्मख्याति ग्रंथामध्ये आचार्य अमृतचंद्र लिहितात - 'अलम् अलम् अति विस्तरेन, बहु विकल्पेन' अर्थात अति विस्तार व खूप विकल्प हे आता बस कर. तर काय आपल्याला कधी वाटतं का की आता खूप वाचलं, कधी एकदा अंतरंगात लीन होऊ!

अग, छोटं मूल सुध्दा आई जर त्याला भरवत असेल तर तिला अडवून स्वतःच्या हाताने खाण्याचा प्रयत्न करते. छोटी छोटी मुलं टी. व्ही. वर क्रिकेट मॅच पाहून स्वतः बॅट घेऊन बॉल मारण्याची ॲक्शन करू लागतात. आपल्या आवडीचे कार्य असेल तर समोरची व्यक्ति समजावून सांगू लागली तरी तिला अडवून मला समजलं म्हणून स्वतः तसे करू लागतो.

परंतु अध्यात्मशास्त्राच्या बाबतीत मात्र कोणी समजावून सांगू लागला तर नुसते ऐकून घेतो व इतर कार्य करू लागतो. काय झालंय काय आपल्याला?

लौकिक गोष्टींमध्ये तर आपण खूप हुषार आहोत. तुम्ही स्वयंपाक करताना तवा गरम करता तेव्हा काय गॅस बंद करून इतर कामं करू लागता व परत येऊन थंड तव्यावर पोळ्या भाजता की काय? तुम्हाला म्हण माहितच आहे की 'तवा गरम आहे तोवर पोळी भाजून घ्यावी.'

त्याचप्रमाणे शास्त्र वाचताना किंवा ऐकताना आत्म्याची विशुध्दि वाढली, अध्यात्माचा रसपरिपाक झाला तर त्याचवेळी शास्त्राचेदेखील लक्ष सोडून अंतर्मुख परिणाम झाले तरच सम्यक्त्वरूपी कार्य होईल. लोक म्हणतात देखील की जोपर्यंत शास्त्र - स्वाध्याय ऐकतो तोपर्यंतच परिणाम चांगले रहातात.

केवळ विशुध्दि म्हणजे शुभभावरूप परिणमन करणे आपले प्रयोजन नाही. ते तर आपण अनंत वेळा करून चुकलो आहोत. शास्त्र वाचताना किंवा त्यानंतर जेव्हा आत्मरस उत्पन्न होईल - अंतरंगात तीव्र रुचि वाटेल - स्वतःच्या ज्ञानस्वभावाची अपूर्व महिमा वाटू लागेल अशावेळी वाचणे सोडून अंतर्मुख व्हा.

जीव विचार करतो की आता अजून किती शास्त्रांचा अभ्यास करू म्हणजे मग सम्यक्त्व होईल?

जेव्हा सिध्दांत ऐकून योग्य तत्त्वनिर्णय होतो तेव्हा आता करणे धरणे काय राहिले? ना दुसऱ्यांची पर्याय पलटावयाची आहे, ना स्वतःची. आपण सहज ज्ञाता दृष्टारूप आहोतच, त्यारूप रहायचे आहे. आपण परिपूर्ण आहोत, तर बस्स, दृढ विश्वासासहित आनंदात रहा ना!

एखादा म्हणतो की, 'आता मी कोणते विकल्प करू म्हणजे मला सम्यक्त्व होईल?' त्याला सांगण्यात येते की, 'अरे बाबा! तू तत्त्वनिर्णय केला आहेस. विकल्पांद्वारे तर तत्त्वनिर्णयाप्रत पोहोचावयाचे होते. आता तुला कसल्या विकल्पांची जरूरी आहे? स्वतःमध्ये स्थिर हो, लीन हो.

दही बनविण्यासाठी दुधाला विरजण लावल्यानंतर त्याला काय सतत हलवित रहाता? त्याने दही विरजेल? पावसाळ्यात गढूळ पाण्यात तुरटी फिरविल्यानंतर पाण्याला हलवित बसता की तसेच स्थिर राहू देता? भिंगामधून सूर्यकिरणं केंद्रित करून कागद जाळू शकतो, त्यावेळी भिंग हलवित ठेवल्याने कागद जळेल की स्थिर ठेवण्याने?

या सर्व गोष्टींमध्ये तर तुम्ही हुषार आहात परंतु स्वतःमध्ये स्थिर राहू इच्छित नाही. विकल्पांचे जाळे विणून स्वतः त्यातच अडकून राहू इच्छिता? विकल्प तर येतील परंतु प्रथम हे तरी नक्की ठरवा की विकल्प करीत राहिल्याने आत्मानुभव होणार नाही. विकल्प आपोआप स्वतःच सुटून जातील आणि निर्विकल्प आत्मानुभूती होईल.

विकल्प हा सुध्दा राग आहे. राग स्वतःच्या योग्यतेने येईल तसेच जाईल, संयोग देखील येत-जात रहातील. सर्वप्रथम यांच्याहून आपली भिन्नता जाणायची आहे. आपण तर संयोगांना हटवू किंवा जुळवू पहातो. देवळालीमध्ये आपण शिबिरासाठी येतो. तेथील वातावरण पाहून आपण प्रसन्न होतो, तेव्हा मनात पहिला विचार असा येतो की आपणही तेथे एक बंगला किंवा फ्लॅट खरेदी करावा. परंतु तेथील भगवानांचे दर्शन करताना कधी असा विचार येतो का की मीदेखील भगवान व्हावे?

शास्त्र प्रवचनात शुध्दात्म्याची व अध्यात्माची चर्चा ऐकून लोक म्हणतात की, 'या तर सर्व वरच्या दर्जाच्या गोष्टी आहेत, हाय लेव्हलच्या गोष्टी आहेत. प्रथम शुभभाव तर करायलाच पाहिजेत ना?' मुलींनो, शुभभाव येतात परंतु 'करायलाच पाहिजेत' यामध्ये तर मान्यतेची चूक आहे - विपरीत अभिप्राय आहे.

तत्त्वविचाराचा भाव तर उत्कृष्ट शुभभाव आहे. पंचलब्धिच्या या प्रकरणामध्ये आपण पाहिले की तत्त्वविचार आणि तत्त्वनिर्णय यांच्याद्वारेच अल्प काळात सम्यक्त्वाची प्राप्ति होते. त्याची सविस्तर चर्चा आपण केलीच आहे.

मला पूर्ण खात्री आहे की शास्त्राचे हे मर्म समजून, जिनेन्द्रकथित सिध्दांतांचा वारंवार अभ्यास - विचार - निर्णय करून तुम्ही सम्यक्त्वप्राप्तीचा पुरुषार्थ कराल. त्याच्याद्वारेच पंचपरावर्तनरूप संसाराचा अभाव होऊन मोक्षाची प्राप्ति होईल.

आपण अनादिकाळापासून या जन्ममरणरूपी संसारामध्ये केवढा काळ गमावला आहे याचे चित्रण पहावयाचे असेल तर द्रव्यपरावर्तन, क्षेत्रपरावर्तन, कालपरावर्तन, भवपरावर्तन आणि भावपरावर्तन यांचे स्वरूप समजून घ्यावे लागेल. त्या विषयावरील कॅसेट्स व सी. डी. देखील तयार झाल्या आहेत, त्या अवश्य ऐका.

आता आपला हा पंचलब्धिचा विषय येथेच समाप्त करीत आहे. हा विषय तसा गहन आहे, शिकविताना व लिहिताना माझे ग्रंथांचे अनेक वेळा वाचन झाले, जैनेन्द्र सिध्दांत कोश, लब्धिसार, मोक्षमार्गप्रकाशक यांची कितीतरी वेळा पारायणं झाली - त्यांचा आधार घेतला. तुम्हीदेखील वारंवार वाचून हा विषय आत्मसात करा, त्यामुळे भविष्यात मूळ ग्रंथ वाचताना तुम्हाला सोपे जाईल.

एका गोष्टीची पुन्हा आठवण करून देते. यामधील कर्मांची नावे व अवस्था यांच्याविषयी काही गोष्टी लक्षात राहिल्या नाहीत तरी चालेल परंतु जीवाची व कर्माची स्वतंत्रता कधी विसरू नका. स्वतःच्या स्वभावाची दृष्टि कधी सोडू नका. मोक्षाचा यथार्थ उपाय करणाऱ्याला सर्व कारणं स्वयमेव मिळतात.

महावीर जयंतीच्या दिवशी पंचलब्धि या विषयावर पत्ररूप स्वाध्याय सुरु केला होता, आज महावीर निर्वाणाच्या दिवशी देवळाली येथे याची पूर्णता होत आहे.

कल्याणमस्तु.

जय जिनेन्द्र.

तुमची आई

